म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. १०५३

पु. ग. सहस्रबुद्धे

व्यक्ती आणि समाज यांच्या परस्परसंबंधांतून निर्माण झालेल्या समस्यांबाबत विचार

# वैयक्तिक व सामाजिक

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

REFBK-0013088

निबंध
७४०१०
६।३।७७

१९५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४०१० वि: निबंध
सांकेतांक १९५३ नों. दि. ६।३।७७

# वैयक्तिक व सामाजिक

व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संबंधांतून
निर्माण झालेल्या समस्यांबाबत काही विचार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं आलय
समृद्धी योजना
१९७०

# वैयक्तिक
# व
# सामाजिक

लेखक

डॉ. पुरुषोत्तम गणेश सहस्रबुद्धे
एम्.ए., पीएच्.डी.

REFBK-0013088

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
टिळक रोड, पुणें २

© सुरक्षित

मूल्य चार रुपये

प्रथम प्रकाशन
सप्टेम्बर १९६३

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३, नारायण पेठ, पुणें २

पुढल्या वर्षी जून १९६४ मध्ये मी अध्यापनाच्या क्षेत्रातून निवृत्त होत आहे. १९२८ ते १९६४ या तीन तपांच्या काळात हजारो विद्यार्थी माझ्या हाताखालून शिकून गेले. या सर्व विद्यार्थ्यांच्या मनावर बुद्धिवादाचे, ज्ञाननिष्ठेचे व राष्ट्रभक्तीचे संस्कार करावे ही माझ्या लेखनामागची एक प्रबळ प्रेरणा होती. ज्यांच्या प्रेरणेमुळे, अशा रीतीने, मी लेखन केले त्या सर्व महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांना हा निबंधसंग्रह अर्पण केला आहे.

पु. ग. सहस्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५८०९० वि: निबंध
क्रमांक २०५३ नोंद दि. ६/३/७९

# प्रस्तावना

**व्यक्ती** आणि समाज यांचे परस्परसंबंध काय असावे हा प्राचीन काळापासून अत्यंत वादग्रस्त असा विषय आहे. समाजातील व्यक्तीची वैयक्तिक ध्येये व समाजाची ध्येये यांचा समन्वय घालणे आणि असे करताना या दोहींच्याही आंतरिक शक्तींच्या विकासाला पूर्ण अवसर देणे यात समाजाच्या शास्त्यांचे, नेत्यांचे, तत्त्ववेत्त्यांचे सर्व कौशल्य आहे. हा तोल जेव्हा ढळतो, समाजरक्षणाच्या प्रयत्नांत व्यक्तींच्या सहजगुणांची जेव्हा गळचेपी होते किंवा व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेने व्यक्ती उच्छृंखल होऊन सैराट वागू लागतात, तेव्हा समाजाचा नाश होतो.

मानवाच्या कर्तृत्वाच्या मूलप्रेरणांचा विचार याच शास्त्रात येतो. व्यक्तीचे कर्तृत्व तिच्या आंतरिक शक्तीवर अवलंबून आहे की ते परिस्थितीवर, भोवतालच्या समाजस्थितीवर अवलंबून आहे, तिच्या बऱ्यावाईट कृत्यांची जबाबदारी तिच्यावरच आहे की समाजावर, याही प्रश्नाचा समाजशास्त्रज्ञ शतकानुशतक विचार करीत आहेत. आजच्या युगात व्यक्ती ही स्वयंप्रेरित, स्वयंचल आहे असे मत सर्वत्र रूढ आहे असे बाह्यतः दिसते. पण गेल्या शंभर वर्षांतील मार्क्स, फ्रॉईड इ. पंडितांनी मानवी जीवनाचा एकांगी विचार करून व्यक्तीचे कर्तृत्व सर्वस्वी अमान्य केले आहे. मात्र आपण तसे केलेले नाही असे त्यांचे मत आहे.

व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधीच्या या वादातूनच धर्मकारण, समाजकारण, राजकारण व अर्थकारण या क्षेत्रांत बहुविध समस्या निर्माण होतात. मोक्ष हे व्यक्तीचे अंतिम प्राप्तव्य आहे असे बहुतेक सर्व धर्म मानतात. पण ते साध्य करताना ऐहिक संसाराकडे, समाजहिताकडे तिने किती दुर्लक्ष

करावे, त्याची किती हेळसांड करावी याविषयी समाज जे धोरण ठरवील त्यावर त्याचा उत्कर्षापकर्ष बव्हंशी अवलंबून असतो. आपला धर्म कोणता, समाजधर्म कोणता हे ठरविताना मानवाला स्वतःच्या बुद्धीने निर्णय करण्याचा अधिकार आहे की नाही, का त्याने सर्वस्वी श्रुतिस्मृतींना माथा घेऊनच वर्तले पाहिजे, हा प्रश्न तर समाजहिताच्या दृष्टीने अत्यंत मूलगामी आहे. बुद्धीची अवहेलना करून शब्दप्रामाण्याच्या आहारी गेल्यामुळेच भारताचे सर्व कर्तृत्व सात-आठशे वर्षे कुजून गेले होते. नव्या जगात समाजवादी समाजरचनेचा महिमा फार मानला जातो. पण अर्थसाधने शासनांच्या ताब्यात गेली की व्यक्तीचे स्वातंत्र्य संपले, व्यक्ती गुलाम झाली, असे मानणारा एक पक्ष आहे. आणि धर्मबंधने व समाजातील जातिबंधने ही व्यक्तीला अंतीं समाजाला जितकी घातक तितकीच ही अर्थबंधनेही घातक आहेत असे या पक्षाचे मत आहे. म्हणजे याही क्षेत्रात वैयक्तिक आणि सामाजिक यांच्या क्षेत्रांच्या मर्यादा कोणत्या हा प्रश्न उभा राहतो.

व्यक्ती आणि समाज यांचे परस्परसंबंध काय असावे या प्रश्नातून आतापर्यंतच्या इतिहासात ज्या बहुविध समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यांचा विचार या संग्रहांतील निबंधांत केलेला आहे. वैयक्तिक धर्म व सामाजिक धर्म, वैयक्तिक हित व सामाजिक हित, व्यक्तीचे अधिकार व सामाजिक अधिकार, व्यक्तीचे कर्तृत्व व समाजाचे कर्तृत्व या संबंधीचे चिंतन हेच या सर्व निबंधांतील सूत्र असल्यामुळे या संग्रहाला ‘ वैयक्तिक व सामाजिक ’ असे नाव दिले आहे.

यातील बहुतेक निबंधांतील चर्चा तात्त्विक असली तरी भारतीय समाजाचा उत्कर्षापकर्ष डोळ्यापुढे ठेवून त्या संबंधातच ती बव्हंशी केलेली आहे. आपल्या समाजात वैयक्तिक पुण्य, वैयक्तिक धर्म यांकडेच सर्वांनी लक्ष दिले व सामाजिक पुण्याकडे लक्ष दिले नाही, ‘ मुख्य पूजेचे आयतन, प्राणिमात्रा सुखदान ’ असे संतांनी सांगितले असूनही त्या सुखदानातून आपल्या स्वर्गमोक्षलाभाची तरतूद कशी होईल एवढीच दृष्टी आपल्या लोकांनी ठेविली; उलट गेल्या दोनतीनशे वर्षांत पाश्चात्त्य देशांत ख्रिस्ती धर्मांत जे पंथोपपंथ निघाले त्यांचे सर्व लक्ष सामाजिक पुण्याकडेच होते हा विचार पहिल्या निबंधात विशद केला आहे. डॉ. सिग्मंड, फ्रॉईड, वॉटसन, इ. मानसशास्त्रवेत्त्यांनी

व्यक्तीच्या कोणत्याही कृत्याला ती स्वत: जबाबदार नसून तिच्यावर होणारे संस्कार, तिची परिस्थिती ही जबाबदार आहेत असा सिद्धान्त मांडला आहे. त्यावर श्रद्धा ठेविल्यामुळे आपल्या समाजाचा कसा अधःपात होत आहे याचे विवेचन दुसऱ्या लेखात केले आहे. 'शिवछत्रपतींचे क्रांतिकार्य' या लेखाचे विद्यार्थ्यांनी पुन:पुन्हा वाचन, मनन करावे अशी माझी त्यांना विनंती आहे. छत्रपतींनी स्वराज्यस्थापना केली एवढेच त्यांना माहीत असते. पण हे कार्य साधताना त्यांनी धार्मिक, सामाजिक, आर्थिक, सर्व प्रकारची क्रान्ती येथे कशी केली याची त्यांना कल्पना नसते. त्या क्रान्तीवाचून छत्रपतींना स्वराज्यस्थापनेत यश आलेच नसते असे म्हणण्याइतके तिचे महत्त्व आहे. भारताच्या प्राचीन इतिहासातून शक्य तेवढे पुरावे, प्रमाणे देऊन या क्रान्तिकार्याचे स्वरूप या निबंधात स्पष्ट केले आहे.

डग्लस जे हा एक इंग्लिश समाजवादी पंडित आहे. त्याने 'सोशॅलिझम् इन् दि न्यू सोसायटी' हा ग्रंथ नुकताच (१९६२) लिहिला आहे. समाजवादाची मूलभूत तत्त्वे मार्क्सच्या आधीच्या पंडितांनी सांगितली होती. ती समाजाला मान्य होऊन त्यामुळे त्याची प्रगतीही होत होती. त्या तत्त्वांना योग्य अवसर मिळाला असता तर गेल्या आणखी शंभर वर्षांत बरीच प्रगती झाली असती. पण दुर्दैवाने मध्येच मार्क्सचा अवतार झाला व त्याने अत्यंत अशास्त्रीय सिद्धान्त मांडून समाजवादाला अत्यंत विपरीत विकृत रूप दिले, असे या ग्रंथात जे याने विवेचन केले आहे. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी मी मार्क्सवाद वाचण्यास प्रारंभ केला. तेव्हापासूनच माझे हे मत झालेले आहे. 'मार्क्सचे भविष्यपुराण' हा विषय अनेक वर्षांपूर्वी मी व्याख्यानांतून मांडला होता. पुढे अधिक अभ्यासाने मार्क्सचा 'ऐतिहासिक जडवाद' व त्याचा वर्गविग्रहाविषयीचा सिद्धान्त हे अत्यंत अशास्त्रीय व भ्रामक आहेत, हे मनाशी निश्चित झाले. 'मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्य' व 'मार्क्सचे भविष्यपुराण' या निबंधांत मार्क्सवादातील अशास्त्रीयता मी स्पष्ट करून दाखविली आहे.

भारतामध्ये सध्या लाचलुचपत, वशिलेबाजी, काळाबाजार, भ्रष्टता गुंडगिरी कोणत्या थराला गेली आहे हे सर्वांनाच माहीत आहे. यामुळे आपल्या लोकशाहीचा पायाच ढासळत आहे. ही भ्रष्टता हे लोकशाहीवरचे केवढे संकट आहे, याची कल्पना यावी म्हणून अमेरिकेतील असल्याच 'राजकारणी'

भ्रष्टतेचे सविस्तर विवेचन 'आपल्या लोकशाहीवरील नवे संकट' या लेखात केले आहे. आपल्याकडच्या या 'मवाली राजकारणा'चा विचार करताना भारतातील सत्ताधारी पक्षातील लोकांचीच वक्तव्ये मी आधारासाठी दिलेली आहेत. या सर्व वर्णनावरून आपण कोणत्या ज्वालामुखीवर उभे आहो याची कल्पना वाचकांना येईल असे वाटते. अमेरिकेतही हीच परिस्थिती आहे. पण तेथल्या लोकांच्या कर्तृत्वाची दुसरीही बाजू आपण अभ्यासिली पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, लोकसत्ता, यांचा अमेरिका हा आजच्या जगातला एकमेव आधारस्तंभ आहे. या महनीय तत्त्वांचे जगातल्या प्रत्येक देशात संरक्षण करण्याची जिम्मेदारी आपल्या शिरावर आहे, अशीच अमेरिकनांची धारणा आहे. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी ते काय काय प्रयत्न करीत आहेत, कोणत्या योजना त्यांनी आखल्या आहेत, त्याची माहिती अमेरिकेविषयीच्या दुसऱ्या लेखात दिली आहे. अमेरिका हे भांडवलशाही राष्ट्र आहे. आणि भांडवलशाही म्हणजे उन्मत्त, स्वार्थी, मदांध, आक्रमक, युद्धपिपासु सत्ता हे समीकरण आपल्या डोक्यांत बसून गेले आहे. हे समीकरण आणखी दृढ करण्याचा कम्युनिस्ट अखंड प्रयत्न करीत असतात. भारत सरकार अमेरिकेशी स्नेहसंबंध ठेवते म्हणून कम्युनिस्ट आपल्या शास्त्यांना, अमेरिकेचे लाचार गुलाम, त्यांचे बूटपुश्ये अशा चीन-रशियातून लिहून आलेल्या शिव्या हुकमाप्रमाणे देत असतात. त्यामुळे व अमेरिकेचा इतिहास आपणांस पटत नसल्यामुळे त्या थोर राष्ट्राविषयी आपल्या मनात फार विकृत समज होण्याचा संभव आहे. त्यामुळे आपलीच अतिशय हानी होईल. आपले शत्रु-मित्र आपल्याला ओळखता येऊ नयेत ही फार नामुष्कीची गोष्ट आहे. अमेरिकेच्या इतिहासाचा अभ्यास आपल्या विद्यालयातून केला जावा अशी सूचना मी केली आहे.

'आधी समाजकारण की आधी राजकारण' हा वाद महाराष्ट्रांत एके काळी फार चिघळला होता. कमीत कमी चाळीस वर्षे या वादाने महाराष्ट्राचे रक्त आटवले आहे. वास्तविक ही दोन्ही कारणे परस्परपोषक आहेत. एकावाचून दुसरे पंगूच राहणार. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या विचाराने व प्रत्यक्ष कृतीने हा विचार महाराष्ट्राच्या पुढे मूर्त केला आहे. राजकारण ही तरवार असली तर समाजकारण ही ढाल आहे, असे त्यांचे मत आहे

त्यांचे एतद्‌विषयक विचार 'समाजकारणाची बचावती ढाल' या लेखात मांडले आहेत.

अशा रीतीने आरंभी सांगितल्याप्रमाणे **वैयक्तिक आणि सामाजिक** याविषयीची अनेक तत्त्वे, अनेक सिद्धान्त व अनेक वाद यांचा परामर्श या निबंधसंग्रहात घेतलेला आहे. तरुण वाचकांनी या तत्त्वांचा मूळ ग्रंथापर्यंत जाऊन कसून अभ्यास केला तर ते त्यांच्या मनोविकासाच्या दृष्टीने व भारताच्या लोकशाहीच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत हितावह होईल.

२५-८-६३ **पु. ग. सहस्रबुद्धे**

# अनुक्रमणिका


१. वैयक्तिक पुण्य आणि सामाजिक पुण्य
( नोव्हेंबर १९५९ ) ... १

२. ते समाजाला विचारा
( नोव्हेंबर १९६१ ) ... २९

३. श्रीछत्रपतींचे क्रांतिकार्य
( नोव्हेंबर १९६० ) ... ५२

४. मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्य
( सप्टेंबर १९५८ ) ... ८५

५. मार्क्सचे भविष्यपुराण
( मे १९५९ ) ... १०९

६. समाजकारणाची बचावती ढाल
(जानेवारी १९६१) ... १३३

७. आपल्या लोकशाहीवरील नवे संकट
( डिसेंबर १९५८ ) ... १४३

८. अमेरिका
( फेब्रुवारी १९६३ ) ... १६५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा

# १. वैयक्तिक पुण्य व सामाजिक पुण्य

महाभारत वाचीत असताना, विशेषतः त्यातील श्रीकृष्णाचे चरित्र व तत्त्वज्ञान अभ्यासीत असताना मनात एक विचार पुनः पुन्हा येत राहतो. या महापुरुषाने जो अत्यंत श्रेष्ठ असा व्यवहारधर्म सांगितला आहे, अभ्युदय व निःश्रेयस् या दोहोंवर समदृष्टी ठेवून प्रपंच यशस्वी करण्यासाठी त्याने जे तत्त्वज्ञान सांगितले आहे, त्याचे प्रत्यक्ष आचरण कोण करतो हे आपण पाहू लागलो तर असे दिसते की, अर्वाचीन काळच्या, गेल्या ४–५ शतकातल्या पाश्चात्त्य लोकांनीच श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान व्यवहारात आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. भीष्मांनी केलेले राजधर्माचे प्रवचन वाचू लागलो म्हणजे हेच मनात येते. धनाची महती, बलाची महती, दीर्घ उद्योगाची महती ही भीष्मांनी आणि महाभारतातील इतर कर्त्या पुरुषांनी पदोपदी गायिली आहे. असंतोष हे सर्व वैभवाचे मूळ आहे हाही विचार भारतात अनेक ठिकाणी आला आहे. उद्योग, पुरुष-प्रयत्न यांचे महत्त्व तर महाभारताच्या पानापानावर वर्णिलेले सापडेल. पण ते आमच्या मनावर ठसले नाही. आणि आपण भारतीय दैववादी बनलो. राजा कालाचा नियंता आहे, उत्कर्ष हा मानवी कर्तृत्वावर अवलंबून आहे, हे आम्हाला पटले नाही. आणि मानव कालवश आहे, कलियुगवश आहे हे तत्त्वज्ञान, हा धोंडा उराशी कवटाळून आज शेकडो वर्षे भारतीय जनता कालसमुद्रात खाली खाली जात आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही प्रतिज्ञा भारतीयांनी चार हजार वर्षांपूर्वी केलेली आहे; पण विश्व दूर राहिले, आणि आर्यावर्तात राहणाऱ्या–गिरिवासी, वनवासी, शूद्र, अंत्यज–इ. सर्व जनांना आपल्या श्रेष्ठ वेदसंस्कारांनी पुनीत करून धर्मदीक्षा देणे हेसुद्धा आपल्याला जमले नाही. मग हे केले कोणी ? तर चार हजार मैलांवरून

येणाऱ्या मिशनरी लोकांनी ! येथल्या नगरवासी लोकांची काळजी त्यांना वाटली. भारतीयांना वाटली नाही. त्यांनी ती वाहिली नाही.

युरोपातल्या गेल्या चारशेपाचशे वर्षांतल्या धर्मपंथांचा, धर्मसंघटनांचा इतिहास आपण पाहू लागलो म्हणजे पुन्हा महाराष्ट्रातील संतांच्या धर्मोपदेशाबद्दल हाच विचार मनात येतो. त्यांच्या तत्त्वाप्रमाणे आचरण कोणी केले ? त्यांचा धर्म व्यवहारात कोणी आणला ? युरोपातल्या या धर्मसंघटनांनी. या संघटनांच्या सभासदांनी थोर नीतितत्त्वांचा प्रसार करण्यासाठी विश्वप्रयत्न केले आहेत आणि चालविले आहेत, व त्यायोगे धर्म ही शक्ति जिवंत ठेवून ते समाजाची ऐहिक व पारलौकिक उन्नतीही साधीत आहेत. आणि आपण भारतीयांनी ‘ निधर्मी ’ शब्दाचा अत्यंत वेडगळ अर्थ करून आपले जीवन भकास, उजाड, धर्महीन करून टाकले आहे. तोंडाने आपणच खरे अध्यात्मवादी आहोत, युरोप हा जडवादी आहे असा नित्य जप करण्याचे व्रत मात्र आपण निष्ठेने चालविले आहे.

**जे कां रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले, तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा । ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी । तुका म्हणे सांगो किती । त्याचि भगवंताच्या मूर्ती ।। यथासामर्थ्ये यथावित्ते । चित्ते, भावार्थे जीवितें । सुख द्यावे प्राणिमात्राते । हेचि निश्चित निजभजन । मुख्य पूजेचे आयतन प्राणिमात्रा सुखदान ।।** ही वचने आपल्याकडच्या संतांची आहेत. त्यांचा खरा अर्थ कोणी जाणला हें पहावयाचे आहे काय ? एलिझाबेथ फ्रायरचे चरित्र पहा.

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस-तीस वर्षांत इंग्लंडमधील तुरुंगातील कैद्यांची काय स्थिति होती हे पाहिले की अंगावर काटा उभा राहतो. लहान-मोठी, सर्व वयाची सर्व माणसे एकाच मोठ्या कोठडीत कोंडलेली असत. स्त्रियांना, पुरुषांना भिन्न दालने नव्हती. सर्व एकत्रच. हवा, स्वच्छता यांचा कसलाही संबंध या कोठड्यांशी नसे. सर्वत्र घाण पसरलेली, अस्ताव्यस्त माणसे पडलेली. अंथरापांघरायला जी पटकुरे असतील ती. व्यवस्था अशी काहीच नसे. जमिनी ओल्या, छपरे गळकी, तुरुंगावरचे अधिकारी अत्यंत क्रूर, शुद्ध लांडगेच असत. अन्नपाण्यावाचून माणसे तडफडून मेली तरी त्यांना परवा नसे. मेलेल्यांची प्रेते चार चार दिवस पडून असत. त्या मृतांचे कपडे

काढून घेण्यासाठी कैद्यात मारामाऱ्या होत. मग वरचे पहारेकरी सर्वांनाच चेचून काढीत. अशा रीतीने उकिरड्यावर नासका-कुजका माल टाकून द्यावा आणि तेथे तो आणखी सडून सर्वत्र दुर्गंधी सुटावी तसा प्रकार समाजाने मानवी गुन्हेगारांचा केला होता. हे सर्व गुन्हेगार एकाच प्रकारचे, अट्टल, बदमाष, खुनी, दरोडेखोर असे असत असेही नाही. साध्या चार-दोन रुपयांच्या चोऱ्या करणारे, साधी मारामारी करणारे येथपासून बलात्कार, दरोडा, खून असले गुन्हे करणारे हे सर्व एकत्रच असत. वेडे त्यातच असत. कर्जबाजारी होऊन दिवाणी तुरुंगात पाठविलेले त्यातच असत. अशा या तुरुंगात उपासमार, घाणेरडे रोग, अधिकाऱ्यांचा क्रूरपणा यांनी पिसाळून गेलेले शेकडो हजारो कैदी असत. शरीरे गंजलेली, मने दुभंगलेली, भावना मेलेल्या अशी ती माणसे होत. नित्य भांडणे, मारामाऱ्या, अत्याचार, बलात्कार यांनी मानवतेचा अंशही त्यांच्या ठायी राहिलेला नसे. समाजाने त्यांना पशूहूनही हीन अशा स्थितीला नेऊन ठेवलेले होते.

अशा या तुरुंगातील स्त्रियांची स्थिति सुधारण्याचा निश्चय करून वीस-बावीस वर्षांची, अत्यंत श्रीमंत घराण्यातील एक तरुण स्त्री त्यांच्यात जाऊन मिसळते ही कल्पनाच अंगावर शहारे आणणारी आहे. पण एलिझाबेथ तेथे गेली, एवढेच नव्हे तर पुढे अनेक वर्षे ती तशीच जात राहिली. आणि आयुष्यांतील पुढील तीसचाळीस वर्षे या कामाला अर्पण करून तिने इंग्लंडमधल्याच नव्हे तर कॅनडा, अमेरिका, जर्मनी, रशिया येथल्याही तुरुंगात जमीन-अस्मान सुधारणा घडवून आणली. पहिल्या दिवशी तुरुंगात जाऊन त्या स्त्रियांपुढे ती उभी राहिली तो क्षण तिच्या आयुष्यात मोठा संस्मरणीय होता. त्या स्त्रिया म्हणजे मूर्तिमंत कैदासणी झाल्या होत्या. समाजानेच त्यांना तसे केले होते. नित्याप्रमाणे ही आपल्याला धर्मोपदेश करणार असे वाटून त्या चवताळून उठल्या होत्या. आणि एलिझाबेथच्या मुद्रेवर भीतीचे पुसट जरी लक्षण दिसले असते तरी त्यांनी तिला फाडून खाल्ले असते. पण एलिझाबेथ अविचलित राहिली. चटकन् पुढे होऊन तिने त्यांच्यापैकीच एकीच्या मुलाला जवळ घेतले आणि 'या बाळांच्यासाठी तरी तुम्ही शांत व्हा. त्यांचे पुढले आयुष्य असेच या कोठडीत जाऊ नये म्हणून तरी माझे ऐकून घ्या.' अशी त्यांच्या मातृत्वाला साद घातली. कोठे तरी त्यांच्या अंतरात माता जागी होती.

तिला ती हाक पोचली. आणि त्या एकदम शांत झाल्या, रडू लागल्या. तिच्या-भोवती गोळा होऊन तिच्या पाया पडू लागल्या.

बाहेर येताच एलिझाबेथने तुरुंगसुधारणेसाठी एक समिती स्थापन केली व कार्याला आरंभ केला. तिच्या सहकारी स्त्रियांनी लोकात जागृति केली, सरकारी अधिकाऱ्यांना वश केले, पार्लमेंटमध्ये ठराव आणले आणि शेवटी दीर्घ प्रयत्नाने शेकडो, हजारो, लक्षावधि हतभागी जीवांना मानवत्वाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. १७ व्या वर्षी अमेरिकेतील विल्यम साव्हेरी नावाच्या एका धर्मगुरूच्या प्रवचनाने तिला स्फूर्ति प्राप्त झाली. आणि तेव्हा-पासून तिने तरुणपणाची छानछोकी सर्व टाकून दिली. विसाव्या वर्षी तिचे लग्न झाले आणि त्यानंतर ७-८ मुलांचा प्रपंच संभाळून तिने आपला देह या सर्वस्वी हीन, दीन, पतित स्त्रियांसाठी चंदनासारखा झिजविला. त्या अनाथ अपंगांना तिने हृदयाशी धरले आणि इतक्या हीन स्थितीला मानव पोचू नये अशी कायमची व्यवस्था केली.

ही शेवटची गोष्ट फार महत्त्वाची आहे. धर्मवचनांना हा सामाजिक अर्थ आपल्याकडे निर्माणच झाला नाही. एलिझाबेथच्या चित्ताला या आर्तांच्या दुःखाची जाणीव होताच तिने लगेच आपल्या निकटच्या दहाबारा स्त्रियांची एक समिति स्थापन केली, सर्व समाज हलवून सोडला, लोकसभेपर्यंत गाऱ्हाणे पोचविले आणि धर्मकार्यासाठी सामाजिक शक्ती निर्माण करून तिने लक्षावधी भ्रष्ट, पतित मानवांच्या जीवनांना आलेली अवकळा नष्ट केली. ते लक्षावधि मानव एकदा तुरुंगात गेल्यावर कायमचे पतित, हीन, धर्मशून्य राहिले असते. ही घोर आपत्ती तिने नाहीशी केली. आणि त्यांना धर्ममार्गावर आणून सोडले. भारतवर्षाच्या गेल्या हजारबाराशे वर्षांच्या इतिहासात या दृष्टीने एकही प्रयत्न झालेली दिसत नाही. संत उपदेश करीत होते. आणि लोक धर्महो करीत होते. पण ते धर्माचरण पुण्यासाठी होते, स्वतःच्या परलोकप्राप्तीसाठी, मोक्षा-साठी होते. हतभागी मानवांचे जीवन पुढे कायमचे सुखी व्हावे आणि ज्या समाजव्यवस्थेमुळे लक्षावधी लोक मानवत्वापासून भ्रष्ट होतात, पतित होतात, म्हणजेच धर्मशून्य होतात ती व्यवस्थाच बदलून टाकावी यासाठी कसलेही प्रयत्न येथल्या नागरिकांनी केले नाहीत. वैयक्तिक धर्माचरण येथे होत असे ते पुण्यप्राप्तीसाठी होत असे. ज्या अनाथांना, अपंगांना आपण आज अन्न देत

आहो, त्यांचे दैन्यच मुळात फिटून जावे ही दृष्टि येथे निर्माणच झाली नाही. आणि युरोपात ज्या ज्या धर्मसंघटना निर्माण झाल्या त्यांची हीच एकमेव दृष्टी होती. धर्मवचनांचा सामाजिक अर्थ तो हाच.

विल्यम विल्बर फोर्स याचा जन्म १७५९ साली झाला. १७८४ साली 'धर्माचा उदय आणि प्रगति' हा ग्रंथ वाचून त्याची धर्मभावना जागृत झाली. लगेच तो इव्हँजेलिकल पंथाचा सभासद झाला. आणि थोड्याच दिवसात गुलामांचा व्यापार नष्ट करण्याचा त्याने दृढनिश्चय केला. क्वेकर पंथातील लोकांनी त्यासाठी याच्या आधीच एक समिती स्थापन केली होती. तिच्या साह्याने त्याने कार्य सुरू केले. तो स्वतः अत्यंत श्रीमंत होता व पार्लमेंटचा सभासद होता. त्याने या दुष्ट रूढीविरुद्ध तेथे प्रचार करण्यास प्रारंभ केला. समितीचे लोकही व्याख्याने, हस्तपत्रे, ग्रंथ या मार्गाने समाजजागृति करीत होते. हा झगडा वीस वर्षे चालला होता. शेवटी १८०७ साली पार्लमेंटमध्ये कायदा होऊन इंग्लंडमधून गुलामांचा व्यापार नष्ट झाला. इंग्लंडमध्ये प्रत्यक्ष गुलामगिरी चालू नव्हती. पण इंग्लंडचे हात या कायद्याने निष्कलंक झाले. आणि अशीच अनेकांची पुण्याई साठत जाऊन १८६५ साली अमेरिकेतून प्रत्यक्ष गुलामगिरीच नष्ट झाली. 'दया करणे जे पुत्रासी, तेच दासा आणि दासी' हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन विल्बर फोर्स, अब्राहम लिंकन यांनी तेथे खरे करून दाखविले. आणि कोटयवधि प्राणिमात्र त्यामुळे सुखी झाले. ही धर्मप्रेरणा फार निराळी आहे. येथे ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी जो धर्म सांगितला तसाच धर्म युरोपमध्ये जीजस्ने, पॉल, पीटर यांनी व पुढे झालेल्या अनेक संतांनी सांगितला होता. दोघांची वचने ताडून पाहिली तर त्यात फारसा फरक दिसत नाही. पण पश्चिम युरोपच्या धर्मनिष्ठांनी त्या संतांच्या वचनांतून सामाजिक अर्थ निर्माण केला. तो महाराष्ट्रात किंबहुना हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या पूर्वी येथे कोणीच केला नाही. त्यामुळे येथे धर्माला सामाजिक शक्तीचे स्वरूप प्राप्त झाले नाही. पाश्चात्त्य लोकांच्या धर्मभावना जागृत होताच ते लगेच मंडळ स्थापन करतात व या संघशक्तीच्या जोरावर समाजजागृति करून दुःखाच्या मुळावरच घाव घालतात. रस्त्यात भेटणाऱ्या गरिबाला वा आंधळ्याला ते पैसा देत नाहीत असे नाही. तेही चालूच असते. पण या निराधार लोकांना शिक्षण द्यावे, उद्योगधंदा द्यावा व

तिला ती हाक पोचली. आणि त्या एकदम शांत झाल्या, रडू लागल्या. तिच्या-भोवती गोळा होऊन तिच्या पाया पडू लागल्या.

बाहेर येताच एलिझाबेथने तुरुंगसुधारणेसाठी एक समिती स्थापन केली व कार्याला आरंभ केला. तिच्या सहकारी स्त्रियांनी लोकात जागृति केली, सरकारी अधिकाऱ्यांना वश केले, पार्लमेंटमध्ये ठराव आणले आणि शेवटी दीर्घ प्रयत्नाने शेकडो, हजारो, लक्षावधि हतभागी जीवांना मानवत्वाची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. १७ व्या वर्षी अमेरिकेतील विल्यम सार्व्हेरी नावाच्या एका धर्मगुरूच्या प्रवचनाने तिला स्फूर्ति प्राप्त झाली. आणि तेव्हा-पासून तिने तरुणपणाची छानछोकी सर्व टाकून दिली. विसाव्या वर्षी तिचे लग्न झाले आणि त्यानंतर ७–८ मुलांचा प्रपंच संभाळून तिने आपला देह या सर्वस्वी हीन, दीन, पतित स्त्रियांसाठी चंदनासारखा झिजविला. त्या अनाथ अपंगांना तिने हृदयाशी धरले आणि इतक्या हीन स्थितीला मानव पोचू नये अशी कायमची व्यवस्था केली.

ही शेवटची गोष्ट फार महत्त्वाची आहे. धर्मवचनांना हा सामाजिक अर्थ आपल्याकडे निर्माणच झाला नाही. एलिझाबेथच्या चित्ताला या आर्तांच्या दुःखाची जाणीव होताच तिने लगेच आपल्या निकटच्या दहावारा स्त्रियांची एक समिति स्थापन केली, सर्व समाज हलवून सोडला, लोकसभेपर्यंत गाऱ्हाणे पोचविले आणि धर्मकार्यासाठी सामाजिक शक्ती निर्माण करून तिने लक्षावधी भ्रष्ट, पतित मानवांच्या जीवनांना आलेली अवकळा नष्ट केली. ते लक्षावधि मानव एकदा तुरुंगात गेल्यावर कायमचे पतित, हीन, धर्मशून्य राहिले असते. ही घोर आपत्ती तिने नाहीशी केली. आणि त्यांना धर्ममार्गावर आणून सोडले. भारतवर्षाच्या गेल्या हजारबाराशे वर्षांच्या इतिहासात या दृष्टीने एकही प्रयत्न झालेली दिसत नाही. संत उपदेश करीत होते. आणि लोक धर्मही करीत होते. पण ते धर्माचरण पुण्यासाठी होते, स्वतःच्या परलोकप्राप्तीसाठी, मोक्षा-साठी होते. हतभागी मानवांचे जीवन पुढे कायमचे सुखी व्हावे आणि ज्या समाजव्यवस्थेमुळे लक्षावधी लोक मानवत्वापासून भ्रष्ट होतात, पतित होतात, म्हणजेच धर्मशून्य होतात ती व्यवस्थाच बदलून टाकावी यासाठी कसलेही प्रयत्न येथल्या नागरिकांनी केले नाहीत. वैयक्तिक धर्माचरण येथे होत असे ते पुण्यप्राप्तीसाठी होत असे. ज्या अनाथांना, अपंगांना आपण आज अन्न देत

आहो, त्यांचे दैन्यच मुळात फिटून जावे ही दृष्टि येथे निर्माणच झाली नाही. आणि युरोपात ज्या ज्या धर्मसंघटना निर्माण झाल्या त्यांची हीच एकमेव दृष्टी होती. धर्मवचनांचा सामाजिक अर्थ तो हाच.

विल्यम विल्बर फोर्स याचा जन्म १७५९ साली झाला. १७८४ साली ' धर्माचा उदय आणि प्रगति ' हा ग्रंथ वाचून त्याची धर्मभावना जागृत झाली. लगेच तो इव्हँजेलिकल पंथाचा सभासद झाला. आणि थोडयाच दिवसात गुलामांचा व्यापार नष्ट करण्याचा त्याने दृढनिश्चय केला. क्वेकर पंथातील लोकांनी त्यासाठी याच्या आधीच एक समिती स्थापन केली होती. तिच्या साह्याने त्याने कार्य सुरू केले. तो स्वतः अत्यंत श्रीमंत होता व पार्लमेंटचा सभासद होता. त्याने या दुष्ट रूढीविरुद्ध तेथे प्रचार करण्यास प्रारंभ केला. समितीचे लोकही व्याख्याने, हस्तपत्रे, ग्रंथ या मार्गाने समाजजागृति करीत होते. हा झगडा वीस वर्षे चालला होता. शेवटी १८०७ साली पार्लमेंटमध्ये कायदा होऊन इंग्लंडमधून गुलामांचा व्यापार नष्ट झाला. इंग्लंडमध्ये प्रत्यक्ष गुलामगिरी चालू नव्हती. पण इंग्लंडचे हात या कायद्याने निष्कलंक झाले. आणि अशीच अनेकांची पुण्याई साठत जाऊन १८६५ साली अमेरिकेतून प्रत्यक्ष गुलामगिरीच नष्ट झाली. ' दया करणे जे पुत्रासी, तेच दासा आणि दासी ' हे श्रीतुकाराममहाराजांचे वचन विल्बर फोर्स, अब्राहम लिंकन यांनी तेथे खरे करून दाखविले. आणि कोटयवधि प्राणिमात्र त्यामुळे सुखी झाले. ही धर्मप्रेरणा फार निराळी आहे. येथे ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी जो धर्म सांगितला तसाच धर्म युरोपमध्ये जीजस्ने, पॉल, पीटर यांनी व पुढे झालेल्या अनेक संतांनी सांगितला होता. दोघांची वचने ताडून पाहिली तर त्यात फारसा फरक दिसत नाही. पण पश्चिम युरोपच्या धर्मनिष्ठांनी त्या संतांच्या वचनांतून सामाजिक अर्थ निर्माण केला. तो महाराष्ट्रात किंबहुना हिंदुस्थानात ब्रिटिशांच्या पूर्वी येथे कोणीच केला नाही. त्यामुळे येथे धर्माला सामाजिक शक्तीचे स्वरूप प्राप्त झाले नाही. पाश्चात्त्य लोकांच्या धर्मभावना जागृत होताच ते लगेच मंडळ स्थापन करतात व या संघशक्तीच्या जोरावर समाजजागृति करून दुःखाच्या मुळावरच घाव घालतात. रस्त्यात भेटणाऱ्या गरिबाला वा आंधळ्याला ते पैसा देत नाहीत असे नाही. तेही चालूच असते. पण या निराधार लोकांना शिक्षण द्यावे, उद्योगधंदा द्यावा व

कायमचा आधार निर्माण करून द्यावा या दृष्टीने तेथील लोक प्रयत्न करतात. विल्बर फोर्स यानेच रविवारच्या शाळांसाठी, गरिबांच्या मंडळांसाठी हजारो रुपयांच्या देणग्या दिलेल्या आहेत. पण त्यांतून त्याने संस्था निर्माण केल्या व ज्यांना साह्य द्यावयाचें त्यांना काही शाश्वत आधार मिळावा, ते स्वतंत्र व्हावे, त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी अशी व्यवस्था त्याने केली. युरोपात जे अनेक धर्मपंथ आहेत त्यांचे कार्य या स्वरूपाचें आहे.

रुग्णसेवा हे परोपकाराचे केवढे क्षेत्र आहे. व्याधींनी ग्रस्त झालेल्या मनुष्याला तीतून मुक्त करणे यासारखा श्रेष्ठ धर्म नाही. दैवी संपत्तीची लक्षणे सांगताना ज्ञानेश्वरांनी हे त्यात एक प्रमुख लक्षण म्हणून समाविष्ट केले आहे. भला वैद्य जो आहे तो रोगावर उपचार करताना 'आपपरू न शोधी'—शत्रुमित्र पहात नाही हे सात्त्विकतेचे खरे लक्षण होय. अशा या धर्माचरणाच्या बाबतीत पाश्चात्त्यांनी केवढे पुण्य संपादन केले आहे ते पाहिले आणि मग दृष्टी अंतर्मुख करून आपला ज्ञानेश्वरानंतरचा सहासातशे वर्षांचा इतिहास पाहिला म्हणजे आम्ही काही धर्माचरण करतो असे म्हणणे जरा जड जाईल. फ्रॅन्सिस हा बाराव्या शतकाच्या अखेरीस इटालीत मोठा साधुपुरुष होऊन केला. तो श्रीमंताचा मुलगा होता. पण धर्मभावना जागृत होताच अंगावर एक पटकूर घेऊन तो बाहेर पडला. रस्त्यांत त्याला एक महारोगी दिसताच 'आर्तांचेनि बोरसे' त्याचे हृदय भरून आले. महारोग म्हणताच इतके दिवस त्याला धडकी भरत असे. आता सर्व पालटले व त्याने त्या रुग्णाला अक्षरशः मिठी मारली. इतके दिवस श्रीमंत सरदारांच्या सहवासांत तो सुखोपभोग घेत होता. आता दीन, दुःखी, बहिष्कृत यांसी आपुले म्हणविण्यात त्याला सुख लाभू लागले. तो त्या महारोग्याला म्हणाला, 'अरे तू माझा भाऊच आहेस. तुझे दुःख तेच माझे दुःख, तुझे सुख तेच माझे सुख.' असें म्हणून एक-दोन मित्रांसह तो या हतभागी प्राण्याच्या आळीतच राहू लागला व त्यांची सेवा-शुश्रूषा करू लागला. हळहळू त्याच्याभोवती अनुयायी जमू लागले. फ्रॅन्सिस्कन पंथाची स्थापना झाली. आणि या पंथाने जनसेवा हाच धर्म मानून युरोपात मोठमोठी कार्ये केली. दारिद्र्य आणि लोकसेवा हे त्या पंथाचे ब्रीदवाक्य होते.

१६ व्या शतकापासून ख्रिस्ती मिशनरी 'हे विश्वचि माझे घर' हे महावाक्य डोळ्यापुढे ठेवून जगभर संचार करीत आहेत आणि जेथे जातील

तेथे रुग्णांना, व्याधिग्रस्ताना औषधे देऊन, त्यांच्यासाठी रुग्णालये स्थापून त्यांची अहोरात्र शुश्रूषा करून दीन दुःखितांचा भार हलका करीत आहेत हें प्रसिद्धच आहे. या बाबतींत त्यांना आपपरू ठावेच नाही असे दिसते. हिंदुस्थान, चीन, जपान, आफ्रिकेतील जंगले, अरबस्तानातील वाळवंटे, मध्य आशियातील डोंगरदऱ्या, पॅसिफिक महासागरातील बेटे, सर्वत्र ते हिंडतात. घरदार सोडून दीनदुःखित, अनाथ, अपंग, आंधळे, पांगळे, लुळे, यांच्यात राहतात. आणि त्यांची शुश्रूषा करून त्यांचा दुःखभार हलका करतात. त्यांच्या निराश, भग्न जीवनात काही सुखाचे क्षण निर्माण करतात.

हवाई बेटातील होनोलुलूपासून २०० मैलांवर असलेली मोलोकाई नावाची जी महारोग्यांची वसाहत आहे तिचा इतिहास वाचला म्हणजे युरोपीय लोकांची धर्मसेवा व आपली पूर्वकाळची पुण्यकल्पना यातील महदंतर कळून येईल. १८३० च्यां सुमारास या बेटात हा रोग आला. तो पसरू लागताच सरकारने कडक कायदे केले. आणि संसर्ग पसरू नये म्हणून महारोगाची चिन्हे दिसू लागलेल्या पंचवीस रोग्यांना उचलले, गाडीत घातले आणि मोलोकाईच्या जंगलात नेऊन चक्क सोडून दिले. त्यांची कसलीही वास्तपुस्त सरकारने पुढे केली नाही. त्या हतभाग्यांनी ६-७ वर्षे कसेतरी जीवन कंठले. नंतर बेल्जम-मधील धर्मगुरू फादर डामियन तेथे आले. आणि त्यांना आपंगिता मिळाला. आज मोलोकाई ही एक उत्तम वसाहत आहे. सुमारे ५०० रोगी तेथे राहतात. त्यांना उत्तम झोपडया आहेत, रुग्णालय आहे, डॉक्टर आहेत, दाया आहेत, औषधे आहेत. पण एवढेच नाही. फादर डामियन यांनी व त्यांच्यामागून आलेले फ्रेंच डॉ. पीटर, डॉ. टटल् इत्यादींनी ती एक रम्य वसाहत केली आहे. तेथे बागा आहेत. क्रीडांगणे आहेत. उद्योगकेंद्रे आहेत. लोक कचेरीत काम करतात, दुकाने चालवितात. शाळा चालवितात. तेथे विजेचे दिवे आहेत, मोटारी आहेत. लोक स्वतंत्र घरे बांधतात. विवाह करतात. आणि संसारही चालवितात. ' विश्वचि माझे घर ' 'मुख्य पूजेचे आयतन, प्राणिमात्रा सुखदान ' या वचनांना काही अर्थ असेल तर तो हा आहे. आणि तो पाश्चात्त्य धर्मनिष्ठांनी प्रत्यक्षात आणला आहे. फादर डामियन यांना स्वतःलाच शेवटी महारोग जडला व त्यातच त्यांचा अंत झाला. पण त्यामुळे मिशनरी घाबरले नाहीत. फादर पीटर तेथे आलेच. त्यांनाही महारोग झाला. पण त्यातून ते बरे झाले.

या वसाहतीत तीन-चतुर्थांश रोगी हवाईजनच आहेत. इतर जपानी, पोर्च्युगीज, चिनी, कोरियन असे आहेत. डॉक्टर मात्र बहुतेक पाश्चात्त्य आहेत. कोणी तेथे १० वर्षे आहेत, कोणी १५ तर कोणी ५० वर्षे आहेत. आज सत्तराव्या वर्षीहि डॉ. पीटर या दुःखितांची सेवा निष्ठेने करीत आहेत. या सर्व डॉक्टरांची वाणी अत्यंत गोड, स्वभाव अत्यंत प्रेमळ व धर्मनिष्ठा जाज्वल्य आहे.

रुग्णांची शुश्रूषा करणे, त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था करणे, त्यांच्यासाठी रुग्णालये बांधून तेथे त्यांची राहण्याची सोय करणे हे फार मोठे धर्मकार्य आहे अशा तऱ्हेचा उपदेश आणि त्याचा प्रत्यक्ष व्यवहार हे युरोपात १४ व्या शतकापासून चालू आहे. प्रत्येक गोष्टीसाठी संघटना उभारून सामाजिक दुःखाचे मूलच्छेदन करणे हीहि वृत्ति युरोपात तेव्हापासून दिसते. इटालीतील मिलन, व्हेनिस या शहरीं १३०५ सालापासून रुग्णालयें असल्याचा पुरावा मिळतो. पंधराव्या शतकात फ्लॉरेन्स या एका शहरात ३५ रुग्णालयें होती. आणि ती सरकारी व धनिकांच्या देणग्यांवर चालत असत. लूथर हा जुन्या कॅथॉलिक धर्माचा द्वेष्टा होता. पण कॅथॉलिकांनी चालविलेल्या रुग्णालयांचे त्याने प्रसन्न मनाने वर्णन करून ठेविले आहे. या रुग्णालयात रोग्यांना उत्तम औषधोपचार होत, वैद्य कुशल असत व रोग्यांना चांगले अन्न देण्याचीहि व्यवस्था असे — असें तो म्हणतो. सर्व इटलीभर या काळात रुग्णालये, अनाथगृहे, अन्नछत्रे व शाळा दिसून येत. या सर्व संस्था धर्मार्थ असून त्या धर्मगुरूंनी चालविलेल्या होत्या. मृत्युपत्रात रुग्णालयांसाठी देणग्या देण्याची व्यवस्था करून ठेवणे ही पद्धत त्यावेळी रूढच होती. फ्रॅन्सिस्कन, डॉमिनिकन या धर्मपंथांचे लोक अशा संस्थात अहोरात्र सेवेसाठी तयार असत. सेंट बर्नार्डिनो (जन्म १३८०) व सेंट कॅथॉराइन ही या पंथातील संतांची नावे त्यावेळी प्रसिद्ध होती. त्यावेळी इटलीभर भयंकर साथी येत. त्या साथीत यांनी रात्रंदिवस रोग्यांची शुश्रूषा करण्याचेच व्रत घेतले. (स्टोरी ऑफ सिव्हिलिझेशन–विल्‌ड्युरेन्ट–खंड ५ वा, प्रकरणे १९ व २०) हीच वृत्ति युरोपात पुढे परिणत होत गेली. वैद्यकशास्त्रात पाश्चर, रोनाल्ड रॉस यांसारखे जे मोठेमोठे संशोधक होऊन गेले त्यांची मूळ प्रेरणा आर्तांचे दुःखनिवारण हीच होती. त्यांनी स्वतः व त्यांच्या चरित्रकारांनी हे स्पष्टपणे

लिहून ठेविले आहे. पाश्चर नेहमी म्हणे, 'मला जगात प्रत्येक गोष्ट म्हणजे अनंताचा आविष्कार आहे असे वाटते. माझी दैवी शक्तीवर नितांत श्रद्धा आहे. प्रत्येकाच्या हृदयात ती असतेच. ज्ञानविज्ञानाची मला लालसा आहे. विश्वातील गूढ शक्तीने दिलेली ही प्रेरणा आहे असें मला वाटते.–' तो आपल्या प्रयोगशाळेत प्रयोग करी तेव्हा बायबलच्या उपदेशाचेच आपण आचरण करीत आहो, अशी त्याची श्रद्धा असे. (वन् हंड्रेड ग्रेट लाइव्हज्, पृ. १०६, १०७). मलेरियाच्या जंतूंचा शोध लावणारा विख्यात डॉ. रोनाल्ड रॉस हा हिंदुस्थानातील ब्रिटिश लष्करातला नोकर. प्रथम ललित वाङमय, गणित यांच्या अभ्यासात तो आपला रिकामा वेळ घालवी. पण एक दिवस त्याचा विवेक जागृत झाला. हिंदुस्थानातील ती भयंकर रोगराई पाहून त्याचे हृदय दुभंगून गेले. आपण या मानवी दुःखाचा परिहार करण्यासाठी आतापर्यंत काहीच केले नाही, ही टोचणी त्याच्या मनाला लागली. म्हणून मग त्याने काय केले ? काय करावयाचे ते युरोपीय मनाचे ठरलेले आहे. सामाजिक अन्यायाने होरपळून निघालेला माणूस पाहिला तर त्याला थोडे द्रव्यदान करावे, त्या एका माणसाचें दुःख कमी करून, तेवढ्यावर आत्मसंतोष प्राप्त करून घ्यावा ही पाश्चात्त्य धर्मनिष्ठ पुरुषांची वृत्ति नाही. ते त्या सामाजिक दुःखाच्या मुळावर घाव घालतात हे वर सांगितलेच आहे. रोनाल्ड रॉसने तेच केले. व्याधीने पीडलेली माणसे त्याने पाहिली, त्याची धर्मबुद्धि जागृत झाली. आणि त्याने जंतुशास्त्राच्या अभ्यासास प्रारंभ केला ! व सतत आठदहा वर्षे तपश्चर्या करून मानवजातीच्या शत्रूला– मलेरियाच्या जंतूला – त्याने जिंकले. या जंतूचा शोध लागताच त्याने आपली उपकरणे बाजूला ठेविली व एक स्तोत्र रचले. 'परमेश्वरी योजनेमुळे आज माझ्या हातून एक विलक्षण शोध लागला आहे. त्याच्या कृपेने लक्ष–लक्ष जीवांचा संहार करणाऱ्या यमदूतांची काळी कृत्ये मला उमगली आहेत. यांमुळे आता अनंत जीव वाचतील. यमराजा, आता तुझे पाश व्यर्थ होत !' (सिक्स ग्रेट डॉक्टर्स–क्रोथर.)

आजहि पाश्चात्त्य जगात, विज्ञानवादी, बुद्धिवादी, जडवादी, पाश्चात्त्य जगात हीच धर्मप्रेरणा लोकांना कशी कार्यप्रवृत्त करीत आहे ते डॉ. थॉमस डूले, एम्. डी., यांच्या चरित्रावरून दिसून येईल. फ्रेंच इंडोचायनामध्ये लढाई

होऊन व्हिएटनाममध्ये उत्तर व्हिएटनाम व दक्षिण व्हिएटनाम असे दोन विभाग झाले. उत्तर व्हिएटनाम कम्युनिस्टांच्या ताब्यात गेले. काही काळ दोन्ही विभागातील लोकांना कोणाच्याही विभागात जाऊन स्थायिक होण्यास मुभा देण्यात आली. त्यावेळी उत्तरेस कम्युनिस्टांचे भयानक अत्याचार सुरू झाले. तेव्हा तेथून दक्षिणेत हजारो, लाखो निर्वासित येऊ लागले. त्यांची व्यवस्था लावण्यासाठी अमेरिकन आरमाराने हाइफांग येथे छावण्या उभारल्या होत्या. आणि डॉ. डूले यांना तेथे आरोग्याधिकारी नेमले होते. कम्युनिस्ट अत्याचारांना बळी पडलेल्या व उपासमार, हालअपेष्टा, चिंता यांमुळे अनेक रोगांनी ग्रस्त झालेल्या त्या हजारो रोग्यांना पाहून डॉ. डूले यांचे काळीज फाटून जाई. यांच्या शुश्रूषेचे अपार कष्ट, अतिमानुष कष्ट आपल्याच्याने होणार नाहीत असे कित्येकदा त्यांच्या मनात येई. तेथे राहण्याचे त्यांच्यावर बंधन नव्हते. ते अमेरिकन आरमारातले डॉक्टर होते. कोणाच्याहि क्षणी त्यांना घरी परत जाता आले असते. तेथे गेल्यावर त्यांचा व्यवसाय उत्तम प्रकारे सुरू झाला असता. आणि धनदौलत मिळवून ते प्रपंच करून सुखी झाले असते. पण ते परत गेले नाहीत. जवळ जवळ ६ लाख निर्वासित उत्तरेतून दक्षिणेत आले. तेवढे सगळे हाइफांग छावणीतून सुखरूप जाईपर्यंत ते तेथेच त्यांची शुश्रूषा करीत राहिले. कशासाठी ? प्रारंभी रोज त्यांच्या मनात प्रश्न येई. आपण कशासाठी येथे राहात आहो ? येथे आपले कोण आहे ? यावेळी लहानपणी ते जे स्तोत्र म्हणत त्याची त्यांना आठवण होई. 'देवा, आम्हाला दुःखमुक्त कर, आम्हाला संकटातून सोडव.' या लक्षावधि अपंगांना दुःखमुक्त करणे आपले कर्तव्य आहे असा त्यांच्या मनाचा निश्चय झाला व ते शेवटपर्यंत तेथेच राहिले. दीन, दरिद्री, अनाथ, अपंग असे हे निर्वासित होते. अडाणी होते. अस्वच्छ, घाणेरडे होते. कित्येकांचे पाय कम्युनिस्टांनी तोडले होते, डोळे फोडलेले होते. कित्येकांना ठेचून काढले होते. असे हे अत्यंत भयभीत, भग्न, लोक हजारांनी छावणीत येत. ते दृश्य नुसते पाहूनच सामान्य माणूस खचून गेला असता. अशा लोकांची शुश्रूषा डॉ. डूले शेवटपर्यंत करीत राहिले. कित्येक वेळा ते लोक चवताळून जात. डॉक्टरांना मारहाण करीत. एकदा डूले यांची अशा मारामुळे दोन हाडे मोडली. पण त्यांनी कार्य सोडले नाही. शेवटी त्यांना मलेरिया लागला. आतडी बिघडून गेली. तरी त्यांनी छावणी सोडली नाही.

काम संपले तेव्हाच ते घरी अमेरिकेला परत आले. पण खरे आश्चर्य ते पुढेच आहे. प्रकृति सुदृढ होताच पुन्हा अशाच तऱ्हेचे कार्य करण्यासाठी ते घर सोडून लाओसमध्ये गेले. तेथे जाण्यात त्यांचा हाच हेतु होता. उज्ज्वल भवितव्य व सुखी संसाराची स्वप्नें सोडून हा तीस वर्षांचा तरुण, आपल्या पाच-सहा सहकाऱ्यांसह आशियातल्या त्या अडाणी, मागासलेल्या, हजारो मैल दूर असलेल्या अर्धरानटी प्रदेशात कशाला गेला ? पूर्व-पश्चिमेतले अंतर कमी करण्यासाठी, जगातल्या लोकांचा दुःखभार कमी करण्यासाठी ! विश्वबंधुत्व यावयाचे असेल तर याच मार्गाने येईल अशी डॉ. डूले यांची श्रद्धा आहे. अमेरिका परराष्ट्राना साह्य करते ते रुग्णसेवेच्याच मार्गाने करावे असे त्यांचे मत आहे. आरोग्यदान हे सर्वांत श्रेष्ठ दान होय. ते राष्ट्राच्या अंतरात्म्याला जाऊन भिडते. आरोग्यदान म्हणजे साक्षात् परमेश्वराची, जीजस्‌ची कृपादृष्टीच होय, असे डूले यांना वाटते. आणि याच श्रद्धेने घरदार सोडून ते पूर्ण परकीय अशा समाजाच्या सेवेला वाहून घेतात. 'हे विश्वचि माझे घर' या तत्त्वाचे हेच खरे आचरण नव्हे काय ?

पण मानवाच्या कल्याणासाठी, मानवाच्या आरोग्यसंवर्धनासाठी सर्वस्व अर्पण करावे, प्राणहि वेचावे ही वृत्ति पाश्चात्त्य समाजात किती दिसून येते याचे वरच्यापेक्षाही विलक्षण असे एक उदाहरण सांगतो. ते वाचून तशा तऱ्हेचा उपदेश संतांनी केला असूनही आपल्या इतिहासात तशी उदाहरणे का सापडू नयेत याचा वाचकांनी विचार करावा. कॅन्सर हा रोग किती भयंकर आहे व दिवसेदिवस तो जगाला कसा ग्रासीत चालला आहे, हे सर्वांना माहीतच आहे. त्या रोगाचे निर्मूलन करण्यासाठी अमेरिकन डॉक्टरांचे सतत प्रयत्न चालू आहेत. अशाच डॉक्टरांपैकी डॉ. चेस्टर साऊदॅम हे एक आहेत. त्यांना लसीचे प्रयोग करण्यासाठी काही माणसे हवी होती. स्वतःच्या दण्डात कॅन्सरचे जंतू टोचून घेणारे लोक हवे होते. असे लोक कोठे मिळणार ? त्यांनी ओहिओ संस्थानातील कोलंबस या नगरच्या तुरुंगावरच्या अधिकाऱ्यांना लिहिले की जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्यांपैकी यासाठी कोणी तयार असल्यास चौकशी करावी. अधिकाऱ्यांनी तुरुंगातील फलकावर तशी नोटीस लावली. आणि आश्चर्य असे की पंचवीस लोक हवे अशी नोटीस लावलेली असताना १३० जन्मठेपीच्या कैद्यांनी अर्ज केले. डॉक्टर चेस्टर अगदी चकित झाले. कॅन्सर

म्हणजे यमयातना आहेत, तो जिवंत मृत्यु आहे हे त्यांनी त्या कैद्यांना पुन्हा नीट समजावून दिले. पण एकानेही नाव मागे घेतले नाही. त्यापैकी काहीना डॉक्टरांनी विचारले, 'ह्या मरणयातना सोसायला तुम्ही का तयार होता ?' एकाने उत्तर दिले, 'माझे वडील कॅन्सरने गेले. तेव्हा त्यासाठी काही सेवा करायला मिळाली तर मी स्वतःला भाग्यवान् समजेन.' दुसरा म्हणाला, 'येथे तुरुंगात मी इस्पितळात काम करतो. तेथे मी कॅन्सरच्या यातना पाहिल्या आहेत. तो दुःखभार हलका व्हावा म्हणून मला हे केलेच पाहिजे.' तिसरा म्हणाला, 'इतके दिवस मी पाप केले. आता काही सेवा घडली तर बरेच होईल.' (रीडर्स डायजेस्ट, जून १९५८)

धर्माच्या कोणच्याही क्षेत्रात आपण नजर टाकली तरी आपल्याला असेच दिसेल की ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांनी अत्यंत उदार व उदात्त असा उपदेश केला असूनही त्यातून सामाजिक धर्माची प्रेरणा कोणी घेतलीच नाही. धनाचे दान हे धर्मदृष्टीने केवढे पुण्य आहे ? श्रीमंतांनी गरिबांना दान द्यावे असा उपदेश पावलोपावली संतांनी केला आहे. पण येथल्या श्रीमंतांनी दाने कशी दिली ? त्यांनी मंदिरे बांधली, घाट बांधले, त्यांच्या व्यवस्थेसाठी जमिनी दिल्या. ब्राह्मणांसाठी अन्नछत्रे घातली. त्यांसाठी उत्पन्न नेमून दिले. पण रुग्णालयासाठी, पाटबंधाऱ्यासाठी, शेतीसुधारणेसाठी, तुरुंगसुधारणेसाठी, अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी कोणी दाने दिली नाहीत. याचा अर्थ असा होतो की स्वतःच्या पारलौकिक कल्याणासाठी, पुण्यासाठी ही दाने दिली जात. त्या लोकांना दीनांची दया येत नसे असे नाही. पण त्या दीनांची कायमची उन्नति व्हावी, या क्षणाला कळवळा येऊन आपण त्याला थोडे द्रव्य देण्याने त्याचा प्रश्न सुटत नाही, तो सोडविण्याचा कांही प्रयत्न केला पाहिजे अशी भावनाच कोणाच्या चित्तात येथे उदित झाली नाही. ती झाली असती तर येथे आमूलाग्र क्रांति झाली असती. पाश्चात्त्य समाज उत्कर्ष पावला तो त्या समाजाच्या धर्मबुद्धीला हे वळण मिळाले म्हणून. रॉकफेलर हे नाव आता जगप्रसिद्ध झाले आहे. त्याने केलेले दान या प्रकारचे आहे. नवकोटनारायण हा शब्द त्याच्या वर्णनाला थिटा पडेल. अपार, अगणित संपत्ति येवढेच म्हणता येईल. आणि तरीही त्या संपत्तीची कल्पना येणार नाही. या संपत्तीचे काय करावे असा प्रश्न येताच जॉन रॉकफेलर तरुण वयातच सर्व व्यवसायातून

निवृत्त झाला. आणि आयुष्याची पुढली ४५ वर्षे त्याने संपत्ति दान करण्यातच खर्च केली. रुग्णालये, वैद्यकीय संशोधन, शास्त्रीय संशोधन, ग्रंथालयें, सार्वजनिक इमारती, शांततेसाठी प्रयत्न करणारी मंडळे, धर्मसंस्था या सर्वांना त्याने कोटिकोटि रुपयांचे दान केले. या दानांमध्ये मानवजातीचे कल्याण हा एकच हेतु होता. ' अखिल विश्वातला मानव ' हे त्याचे लक्ष्य होते. जगातल्या ९३ देशांत वरच्यासारख्या संस्था स्थापण्यासाठी त्याने निधि दिलेला आहे. आणि त्याने ठेवलेल्या निधीतून अजूनही जगातल्या अनेक देशांना साह्य मिळत आहे. रॉकफेलरचा चरित्रकार रेमंड फॉसडिक म्हणतो की, सर्व रॉकफेलर घराणे अत्यंत धार्मिक वृत्तीचे होते. जॉन रॉकफेलरचे वडील अत्यंत दानशूर व संयमी होते. त्याच्या आईची शिस्त अत्यंत कडक होती. तमाखू, मद्य, नृत्य हे सर्व तिने मुलांना वर्ज्य केले होते. मुलांनी पण तिच्या आज्ञा शिरसावंद्य मानल्या. अशा या धर्मशिक्षणामुळेच जॉन रॉकफेलरच्या मनातून 'भेदाभेद, भ्रम अमंगळ ' सर्व नष्ट झाला होता. फ्रेडरिक गेट्स् हा रॉकफेलरच्या वडिलांचामित्र. तो त्याला नित्य सांगे की, अरे तुझ्या अपार संपत्तीची तू काही व्यवस्था केली नाहीस तर ही महाशक्ती तुझ्यामागे कोणाच्या तरी हाती जाईल. आणि मग त्याचा आणि समाजाचाहि घात होईल. म्हणून आपल्या हयातीतच तू अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी सामाजिक दृष्टीने दानधर्म होत जाईल अशी या धनाची काहीतरी शाश्वतची व्यवस्था करून ठेव. हा उपदेश रॉकफेलरला मानवला आणि म्हणून ३६ व्या वर्षीच तो निवृत्त झाला व अनेक पंडित, कार्यकर्ते, संशोधक, समाजधुरीण यांच्या साह्याने त्याने तशी व्यवस्था करून टाकली. त्याचे वडील त्याला नेहमी सांगत की, ' जॉन, आपल्याजवळ धन आहे. पण कर्तबगार, कल्पक, सच्चरित व धीमान् लोक शोधून काढून त्यांच्याजवळ ते दिले पाहिजे. नाहीतर मानवहिताच्या दृष्टीने ते शून्यवत् होईल. ' समाजाची ऐहिक उन्नति ज्याला साधावयाची आहे त्याला दान देताना ही चिंता वहावी लागते. वैयक्तिक पुण्यसंपादनासाठी जे दान द्यावयाचे ते देताना अशी काळजी करावी लागत नाही. दुसऱ्याच्या दुःखहरणापेक्षा तेथे स्वतःच्या पुण्याकडे दृष्टी जास्त असते. त्यामुळे धर्म ही त्या समाजात राष्ट्रीय प्रपंचातली एक शक्ति ठरत नाही. त्या वैयक्तिक पुण्यातून सामाजिक पुण्य निर्माण होत नाही. आणि मग वैयक्तिक पुण्यालाहि हळूहळू अनिष्ट असे वळण लागते. पंधराव्या

सोळाव्या शतकात रोमचे पोप लोकांना असलीच पुण्यदृष्टी शिकवीत असत. त्याचा परिणाम काय झाला ते इतिहास सांगतोच आहे.

धर्माला सामाजिक अर्थ प्राप्त करून दिल्यामुळे, मानवाचे इहलोकीचे सुख हेहि धर्माचे एक प्रधान कार्य आहे ही दृष्टि ठेविल्यामुळे पाश्चात्त्य समाजांना केवढे सामर्थ्य प्राप्त झाले त्याचा आपण विचार केला तर आज आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी त्याच मार्गाचा अवलंब केला पाहिजे हे आपल्याला सहज पटेल, असे वाटते. पाश्चात्त्य राष्ट्रात आजही धर्म ही एक अत्यंत प्रभावी शक्ती आहे. विज्ञानयुग निर्माण झाले तेव्हा प्रथम धर्म हा पराभूत होऊ लागला. पण त्याचे कारण असें की त्या वेळच्या धर्मधुरीणांनीच धर्माला अवकळा आणली होती. एक तर हे धर्मधुरीण अत्यंत भ्रष्ट होते आणि दुसरे म्हणजे त्यांनी धर्माला कर्मकांडाचे रूप देऊन शब्दप्रामाण्य, निवृत्ति, संन्यासधर्म यांचे स्तोम माजविले होते. शास्त्रीय सत्याशी त्या आंधळ्या धर्मवेत्त्यांनी वृथा संघर्ष केला. त्यामुळेच त्यांच्या धर्माला हीन, अमंगल रूप प्राप्त झाले. पण लवकरच ख्रिस्तीधर्माचे अनुयायी सावध झाले. आणि धर्म ही प्रामुख्याने समाजसेवा आहे हे ध्यानी घेऊन त्यानी धर्मामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. त्यामुळे विज्ञानयुगातहि धर्मश्रद्धा टिकून राहिली आणि मुख्य म्हणजे तरुण लोक धर्मासाठी म्हणजेच समाजसेवेसाठी रंजल्यागांजल्यांच्या अनाथ-अपंगांच्या सेवेसाठी सज्ज झाले. राष्ट्रावरची फार मोठी आपत्ति त्यामुळे टळली. धर्म ही केवळ वैयक्तिक पुण्याची व म्हणूनच पारलौकिक कल्याणाची बाब आहे असे जेथे ठरते तेथे तरुण रक्त त्याकडे वळत नाही, कारण तो म्हातारपणचा उद्योग आहे अशी त्यांची खात्री झालेली असते. आपल्या समाजात शेकडो वर्षे हीच भावना रूढ झालेली होती. लो. टिळकांच्या मनाला ही गोष्ट अतिशय लागून राहिली असली पाहिजे. 'गीतारहस्या'च्या प्रस्तावनेत त्यांनी मुद्दाम असे सांगितले आहे की, "निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीने संसार करून थकल्या-भागलेल्या लोकांच्या कालक्रमणार्थ, किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनही, गीता सांगितली नसून संसारच मोक्षदृष्ट्या कसा केला पाहिजे व मनुष्यमात्राचे संसारातले खरे कर्तव्य काय, याचा तात्त्विक दृष्ट्या उपदेश करण्यासाठी गीताशास्त्राची प्रवृत्ति झाली आहे. म्हणून पूर्व-वयातच गृहस्थाश्रमाचे हे प्राचीन शास्त्र प्रत्येकाने समजून घ्यावे."

लेखाच्या प्रारंभी सांगितल्याप्रमाणे पाश्चात्त्यांनी हे शास्त्र पूर्वीच समजून घेऊन गीतेचा लोकसंग्रहाचा संदेश प्रत्यक्षातहि आणला होता. भारतीयांनी मात्र शंकराचार्यांच्या काळापासून टिळकांच्या काळापर्यंत गीता म्हातारपणी वाचण्याचा निश्चय केला होता. संसार सोडण्याची तयारी म्हणून धर्माकडे वळावयाचे असेच येथे ठरून गेले होते. तरुण वयात येथे परमार्थाकडे कोण वळणार ? तर 'संसारदुःखे दुखावले, त्रिविध तापे पोळले, तेचि अधिकारी झाले, परमार्थाचे.' संसारात जे यशस्वी होत असतील त्यांचा व परमार्थाचा, धर्माचा काही संबंध नाही असाच समज येथे रूढ होता. धर्मसेवेसाठी आत्मार्पण करणे ही वृत्तीच येथे निर्माण झाली नाही. कारण धर्म हे परलोकप्राप्तीचे साधन होते. मोक्षाचे साधन होते. पण धर्माला सामाजिक अर्थ प्राप्त होताच सर्व दृष्टिकोनच पालटून जातो. दीन-दलितांच्या दुःखाला कारण होणाऱ्या ज्या सामाजिक रूढी, जी सामाजिक बंधने ती नष्ट करावयाची आहेत, त्यासाठी सत्ताधाऱ्यांशी झगडा करावयाचा आहे हा धर्माचा संदेश म्हणजे तरुणांना आव्हानच आहे. हे कार्य राष्ट्रसेवेचे आहे, विज्ञानाशी, बुद्धीशी त्याचा विरोध नाही, हे पहाताच समाजातील तरुण शक्ति तिकडे आकर्षिली जाते. हे कार्य तरुणपणचे आहे हे तिला पटते. यातल्या उदात्त ध्येयवादामुळे तिचा उत्साह द्विगुणित होतो. आणि त्यामुळे समाज समर्थ होतो. कारण ध्येयवादी तरुण हे राष्ट्राचे मोठे सामर्थ्य आहे.

तरुणांना ध्येयवादाची स्फूर्ति देणारी धर्म ही फार मोठी शक्ति आहे. राष्ट्रनिष्ठा, समाजवाद हीही तत्त्वे प्रभावी आहेत. त्याहि शक्ति आहेत. पण धर्माच्या तुलनेने त्या शक्ती दुबळ्याच ठरतात असा इतिहासाचा निर्वाळा आहे. मात्र हा धर्म केवळ मोक्षधर्म असता कामा नये. तो अभ्युदयवादी, इहवादी धर्म असला पाहिजे. समाजकल्याण हे त्याचे उद्दिष्ट असले पाहिजे. संसार, प्रपंच, ऐहिक आकांक्षा यांशी त्याचा विरोध असता कामा नये. विज्ञान, बुद्धिनिष्ठा यांची त्याने अवहेलना करता कामा नये आणि तरुण रक्ताला चेतवील असा दलितांच्या उद्धारार्थ अवश्य असलेल्या संग्रामाचा संदेश त्याने दिला पाहिजे.

क्वेकर पंथाचा संस्थापक जॉर्ज फॉक्स (१६२४ ते १६९१) याने नेमका असाच धर्म स्वजनांना सांगितला. इंग्लंडमध्ये चार्लस् राजाने अनन्वित जुलूम

मांडिला होता. प्रजेची अतोनात पिळवणूक करून त्याने तिचा रक्तशोष चालविला होता. राजकारणाशी ज्यांचा कसलाहि संबंध नाही अशा लोकांनाहि पकडून तो त्यांना वाटेल त्या शिक्षा देत असे. अनेक लोकांचा शिरच्छेद करून त्यांची मुंडकी तो रस्त्यात टांगून ठेवीत असे. एका प्रसंगी सरकारी लांडग्यांनी एका घरात शिरून एका लहान बालकापुढे आईने ठेवलेले अन्नाचे घासच हिरावून नेले. युरोपभर सर्व देशात असाच जुलूम चालू होता. धर्मगुरू व राजे हे जुलूम करण्यात, प्रजेला पिळून काढण्यात एकमेकाशी स्पर्धा करीत होते. हे सर्व भयानक अत्याचार, दलितांचे ते अपार दुःख फॉक्स याला पाहवेना. म्हणून कामधंदा सोडून त्याने देशभर भ्रमण सुरू केले. नंतर चार वर्षे एकान्ती जाऊन त्याने तपश्चर्या केली, अंतर्मुख होऊन अवलोकन केले आणि ईश्वरी प्रसादाची प्राप्ती करून घेतली आणि मग तो संचारार्थ निघाला. ख्रिस्ती म्हणविणाऱ्या देशांना ख्रिस्ताची तत्त्वे मुळीच कळलेली नाहीत आणि त्यामुळे सत्ताधारी व धर्मगुरू सर्व क्रूर व मगरूर झाले आहेत आणि जनता फारच दीन झाली आहे असे प्रतिपादन करण्यास त्याने प्रारंभ केला. अन्यायाचा प्रतिकार करण्याचा संदेश मिळताच शेकडो तरुण त्याच्याभोवती गोळा झाले व दर ठिकाणी खेडचात, शहरात, सरदारांच्या किल्लेकोटात, राजांच्या राजवाडचात जाऊन निर्भयपणे अन्यायाला वाचा फोडू लागले, लोकांना जागृत करू लागले. इतिहासकार सांगतात की सतराव्या शतकात या क्वेकर लोकाइतके शूर व धर्मनिष्ठ लोक दुसरे कोणीच नव्हते. सत्ताधारी लोकांनी सर्व शक्ति खेचून त्याना ठेचून टाकण्याचा प्रयत्न केला पण क्वेकरांचा पंथ वाढतच गेला. त्यावेळचे तुरुंग कसे असत याचे वर्णन वर दिलेच आहे. अशा तुरुंगात क्वेकरपंथीयांना वर्षानुवर्ष यमयातना भोगीत पडावे लागे. स्वतः जॉर्ज फॉक्स याला साठ वेळा शिक्षा झाली. त्याचे निम्मे आयुष्य या नरकवासातच गेले. अर्थातच त्यामुळे त्यांचे शरीर विकल झाले. पण त्याने माघार घेतली नाही. त्या अंधाऱ्या तुरुंगातच त्याने मानवी स्वातंत्र्याचा नंदादीप प्रज्वलित केला, व त्याच्या हजारो अनुयायांनी तो आत्मबलिदान करून तेवत ठेविला.

राजेमहाराजांच्या समोरहि क्वेकर कधी वाकत नसत, टोपी काढून अभिवादन करीत नसत. कारण प्रत्येक मानवामध्ये ईश्वरी अंश असल्यामुळे सर्व

मानव सारखे आहेत, कोणी कोणापुढे वाकण्याचे कारण नाही असे त्यांचे मत होते. यामुळे त्यांना शिक्षा होत, मार खावा लागे, फटके खावे लागत. सभेतहि गुंड लोक त्यांच्यावर हल्ले चढवीत व त्यांना रक्तबंबाळ करीत. पण क्वेकर हे शांततावादी, अहिंसावादी, सत्याग्रही होते. त्यांनी शत्रूंवर कधीही हात उचलला नाही. पण त्यांच्या अन्यायावर भडिमार करण्याचे व्रतही त्यांनी कधी सोडले नाही. सभेत लाठ्याकाठ्यांच्या माराने डोके फुटल्यावरहि जॉर्ज तसाच उठे, रक्त पुसून पुन्हा भाषणास सुरुवात करी. गुंडावर खटले भरावे असे त्याच्या मित्रांनी त्याला सांगितले; पण तो म्हणाला, 'परमेश्वराने क्षमेचे व्रत स्वीकारले असताना मी ते मोडणे उचित नाही. मी बुद्धीच्या शस्त्राने लढणार आहे. इतर शस्त्रे मला त्याज्य वाटतात.' त्यावेळी अमेरिकेतहि त्याला अनुयायी मिळाले होते. तेथे त्यांचा अनन्वित छळ होत होता. ते ऐकताच तो एका साध्या फुटक्या नावेतून अमेरिकेला गेला. क्वेकरांना तेथे सहज उचलून फाशी देत असत. त्यांना कोणी कपभर दूध दिले तर तेवढ्यावरून देणाऱ्याला तुरुंगात टाकीत. तीन क्वेकर स्त्रियांना गाडीला बांधून बर्फाच्या रस्त्यातून फरफटत नेण्याची शिक्षा अधिकाऱ्यांनी दिली. शिवाय दर चौकात त्यांना दहा-दहा फटकेही मारले. अशा या जळत्या खाईत जॉर्ज फॉक्स गेला. आणि स्वतःच्या अनुयायांना त्याने धीर दिला. त्यांचा छळ कमी झाला नाही. पण तो सोसण्यास याच्या शब्दामुळे तेथील क्वेकरांना धीर आला. आणि केवळ क्वेकर पंथ स्वीकारल्यामुळे जेथे इतका अमानुष छळ भोगावा लागे त्या अमेरिकेत १६७० साली जॉर्ज फॉक्सने निग्रो गुलामांच्या बंधमुक्ततेचा जाहीरनामा काढला. हे धाडस, ही निर्भयता खरोखर अतुल आहे. ही निर्भयता, हे नीतिधैर्य काही एक-दोन नेत्यांतच होते असे नाही. संचारार्थ बाहेर पडल्यापासून ८-१० वर्षांतच फॉक्सला ५०,००० अनुयायी मिळाले. आणि पुढे हा पंथ वाढतच गेला. येवढ्या लोकाच्या ठायी हे धैर्य कोठून आले ? जिवंतपणीच रौरव यातना सोसण्याचे त्यांना सामर्थ्य कसे प्राप्त झाले ? त्यांच्या जाज्वल्य धर्मनिष्ठेमुळे ! दीनदलितांना पाहून त्यांच्या चित्तात जे कारुण्य निर्माण झाले त्यामुळे. कार्लाइलने आपल्या 'सॉर्टर रिसार्टस' या ग्रंथात पुढील शब्दांत जॉर्ज फॉक्सचे वर्णन केले आहे. "इतिहासकार ऑस्टरलिझ् किंवा वॉटर्लू असल्या लढायांना महत्त्व देतात. पण जॉर्ज फॉक्सचा क्वेकर पंथ

ही त्यापेक्षाहि महत्त्वाची घटना होय. जॉर्ज फॉक्स हा विश्वातल्या दैवी तत्त्वाचा प्रत्यक्ष आविष्कारच होय. या चर्मकाराचे दुकान हे पोपच्या निवासापेक्षा जास्त पवित्र होते. तेथे त्याने टाकलेला प्रत्येक टाका हा गुलामगिरी, धनसत्ता यांच्या काळजात शिरत होता." त्या वेळी सर्व युरोपात स्वतंत्र पुरुष असा एकच होता व तो म्हणजे जॉर्ज फॉक्स हा होय. पश्चिम युरोपात राष्ट्रनिष्ठा, लोकशाही ही तत्त्वे जनमनात रुजून पुढे विकसित झाली त्याचे इतर राजकीय, सामाजिक चळवळींना जितके श्रेय आहे तितकेच या धार्मिक चळवळींनाहि आहे. अन्यायाचा प्रतिकार हा मानवी सामर्थ्याचा सर्वश्रेष्ठ आविष्कार होय. त्यामुळेच इतिहास घडत असतो, युगपरिवर्तन होत असते. जॉर्ज फॉक्सने क्वेकर पंथाची स्थापना करून प्रतिकाराची शिकवण दिली. त्याचे अनुयायी मदांध, उन्मत्त मालकवर्गाकडे जाऊन, गुलामांना मुक्त करा, असे त्यांना बजावीत, भ्रष्टाचारी धर्मगुरूंच्या समोर जाऊन त्यांच्या मग्रूरीची निर्भर्त्सना करीत आणि लाचार न्यायाधीशापुढे जाऊन त्यांनी केलेल्या अन्यायाचा जाब विचारीत. आणि यामुळे होणारी फटके, तुरुंग, शिरच्छेद, फाशी ही शिक्षा आनंदाने सोशीत. निर्भय सत्याग्रहात जनताजागृतीचे केवढे सामर्थ्य असते हे महात्मा गांधींनी जगाला दाखविलेच आहे. हे सामर्थ्य युरोपातल्या धर्मपंथांनी सतराव्या शतकातच युरोपला दिले होते.

आपल्याकडे महाराष्ट्रात साधारण याच काळात, 'आम्ही विष्णुदास मेणाहुनि मऊ असलो तरी वज्राला भेदून टाकण्याइतके कठिण आहो, आम्ही नाठाळाच्या माथी काठी मारल्यावाचून रहाणार नाही' असा वीरवाणीचा संदेश तुकोबांनी दिला होता. पण येथला वारकरी अखेरपर्यंत दीनदुबळा, नेभळा, प्रतिकारशून्य असाच राहिला. सामाजिक वा धार्मिक अन्यायाचा प्रतिकार करण्याचे व्रत घेऊन तशी धर्मसंघटना येथे कोणी केलीच नाही. वारकरी पंथात अस्पृश्यांचा समावेश संतांनी आग्रहाने करून घेतला. पण त्यामुळे त्यांना मोक्षमार्ग खुला झाला इतकेच. तेथे जी समता संतानी प्रतिपादिली तिला सामाजिक अर्थ कोणी प्राप्त करून दिला नाही. वर सांगितलेच आहे की मोक्षधर्माला सामाजिक अर्थ, ऐहिक उन्नतीचा भाव प्राप्त झाला नाही तर त्याला तेज चढत नाही. त्यातून सामर्थ्य निर्माण होत नाही. जो धर्म इहलोकी होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार हे आपले ब्रीद मानीत नाही तो

धर्म कालांतराने निष्प्रभ होतो. वारकरी पंथाचे तेच झाले. त्यांनी तुकोबांचे निवृत्तीचे बोलच खरे मानले व त्यावरच भर दिला. ‘जेथे अन्याय होतो, जेथे गुंड सज्जनांना मारीत असताना त्यांचे कोणी निवारण करीत नाही, जेथे अविचारी सत्ताधारी प्रजेला बुडवीत असतात, अशा गावी भल्या माणसाने राहूं नये; त्यापेक्षा सुखाने गिरिकंदरांत जाऊन रहावे,’ असे तुकोबांनी एका अभंगात सांगितले आहे. (जोग गाथा–३२२०). वारकऱ्यांनी एवढेच लक्षात ठेविले. ‘नाठाळांच्या काठी हाणू माथा’ हे मात्र ते विसरून गेले. महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास फारसा उपलब्ध नाही पण वाङमयाच्या इतिहासावरून जो थोडासा सामाजिक इतिहास दिसतो त्यात अन्याय झाला, आपत्ति आली की संसाराला विटून, विरक्त होऊन निवृत्त होणाऱ्यांची कितीतरी उदाहरणे सांपडतात. दासोपंतांच्या वडिलांना सरकार-देणे नीट देता आले नाही म्हणून यवन पादशहाने त्यांच्या मुलाला, दासोपंतांना पकडून नेले व त्यांना बाटविण्याची धमकी दिली. पुढे ती आपत्ति टळली. पण येवढ्या तडाख्याने दासोपंत संसारदुःखें दुखावले व परमार्थाचे अधिकारी झाले. त्यांचे समकालीन जनी जनार्दन यांची कथा अशीच आहे. सर्वत्र हीच कहाणी आहे. संकट आले तर त्याला तोंड देऊन त्याच्यावर स्वार व्हावे व समाजशक्ति जागृत करून निर्भयपणे आक्रमणाला तोंड द्यावे ही वृत्ती येथे निर्माण झालीच नाही. छत्रपतींच्या व समर्थांच्या काळी राजकीय क्षेत्रात ती निर्माण झाली. आणि तेवढ्या शक्तीने मोगल सामाज्य नष्ट झाले. पण नीतिधैर्याची जोपासना करून सामाजिक अन्यायावर प्रहार करावा, दीन, दलित, अनाथ, अपंग यांच्यावर जुलूम करणाऱ्यांना जाब विचारावा आणि त्यासाठी होतील त्या क्रूर शिक्षा भोगून पुन्हा प्रतिकारार्थ सिद्ध व्हावे ही क्वेकरांची वृत्ती येथे भारतात कधीच निर्माण झाली नाही. प्रतिकारावाचून अन्याय, विषमता, जुलूम हा कधी दूर होत नाही. अस्पृश्यांना ही प्रतिकाराची चेतावणी त्याच काळात दिली गेली असती तर त्याच वेळी त्यांचे जीवन उजळून जाऊन आपला समाज संघटित व समर्थ झाला असता.

सतराव्या अठराव्या शतकांत युरोपात जे धार्मिक पुनरुज्जीवन झाले त्याने हेच कार्य साधले. क्वेकर, मेथॉडिस्ट, इव्हँजेलिकल, जेसुइट, साल्व्हेशन आर्मी हे आणि असे इतर अनेक पंथ दीन-दलितांच्या जीवनात खरा

धर्म निर्माण करण्यासाठी निर्माण झाले होते. या धर्मात श्रद्धा, ईश्वरभक्ति यांना स्थान होतेच. भगवंताचे अधिष्ठान हा त्यांचा आत्माच होता. पण या अनाथ-अपंगांच्या ऐहिक जीवनात प्रतिष्ठा निर्माण करणे याला त्यांच्या दृष्टीने इतकेच महत्त्व होते. साल्व्हेशन आर्मीचा—मुक्तिफौजेचा—संस्थापक विल्यम बूथ म्हणतच असे की ' उपाशी पोटावर धर्मोपदेश याला अर्थच नाही. ' म्हणून हे धर्मपंथ प्रथम भुकेलेल्यांना अन्न देण्याची व्यवस्था करीत. आणि ही व्यवस्था केवळ तात्कालिक नव्हती. तशी अन्नछत्रे ते उघडीतच. पण ती शाश्वतची व्यवस्था व्हावी म्हणून दलितांच्या बाजूने ते मालकवर्गाशी संग्रामच मांडीत. किंबहुना त्यांच्या चळवळीचे स्वरूपच असे होते की त्यातून हा संग्राम निर्माण होणे अपरिहार्य होते. यामुळेच या पंथांना सत्ताधाऱ्यांकडून कडवा विरोध होत असे. मेथॉडिस्ट पंथाचा संस्थापक वेसले याने धर्मोपदेशाला प्रारंभ केला तो किंग्जवूड येथील खाणीकामगारांच्यापासून. त्यांना हा स्वर्गच भूवर आला असे भासले. कारण त्यांच्याशी एकजीव होऊन राहणारा धर्मगुरू त्यांनी पाहिलाच नव्हता. तेथून प्रारंभ करून मग खेड्यापाड्यातून वेसले हिंडू लागला. लवकरच हजारो लोकांनी या धर्मपंथाची दीक्षा घेतली व इंग्लंड, आयर्लंड, वेल्स येथे सर्वत्र त्यांनी मंडळे स्थापन केली. कोणासाठी ? असहाय, भग्न, जीवितांसाठी ! चोर, दरोडेखोर, दारुडे, मवाली यांच्यात मेथॉडिस्ट मिसळले आणि त्यांचे नैतिक परिवर्तन त्यांनी घडवून आणले. असल्या लोकांना, इतक्या हीन पातळीवरच्या हजारो लोकांना, जीवनांत पुन्हा सुप्रतिष्ठित करणे ही केवढी देशसेवा आहे ! पाश्चात्त्य देशात लोकशाहीचा पाया घातला गेला तो यामुळेच. तुरुंगाच्या रौरवात पिचत पडलेले, गुलामगिरीमुळे पशुवत् झालेले, व्यसनाधीनतेमुळे माणुसकी नष्ट झालेले, नीतिभ्रष्ट झालेले, राजे, मांडवलदार, धर्मगुरू यांच्या जुलमाने दीन झालेले—अशा लोकांच्या जीविताला व्यक्तित्वाची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य या धर्मपंथांनी केल्यामुळेच तेथील समाज लोकशाही पेलण्यास समर्थ झाला. भारतातल्या धर्मधुरीणांनी हे कार्य केले नाही. त्यामुळे येथे प्रजेचे व्यक्तित्व विकसित झाले नाही. आणि लोकशाहीला लागणारा मूलाधारच येथे निर्माण झाला नाही.

विल्यम बूथने स्थापिलेल्या व त्याची कन्या इव्हँजेलाइन बूथ (जन्म

१८६५) हिने जगभर प्रसृत केलेल्या मुक्तिफौजेचा इतिहास असाच आहे. दीन, क्षुधित, भ्रष्ट, पापी, भग्न, निराश, पराभूत, बहिष्कृत, असहाय, यांना दैन्यातून, पशुतेतून मुक्त करण्यासाठी ही फौज उभी होती. आरंभी यांचाहि क्वेकर लोकांप्रमाणेच छळ झाला. विल्यम बूथच्या सभा पोलीस उधळून लावीत, गुंड-मवाली त्याला मारहाण करीत, दारूबंदीचा तो प्रचार करीत असल्यामुळे कलाल लोक संगनमत करून त्याला तुरुंगात धाडीत. पण त्याने माघार घेतली नाही. सतराव्या अठराव्या वर्षी त्याच्या कन्येने त्याची धुरा खांद्यावर घेतली आणि मग त्या धर्मसंघटनेला तेज चढले. तिच्या व तिच्या अनुयायांच्या आत्मक्लेशामुळे जनता जागृत झाली. इंग्लिश नागरिकांना तिच्या कार्याचा अर्थ कळू लागला. त्यांच्या हे ध्यानात आले की भुकेलेल्यांच्या अन्नवस्त्राची सोय करण्यासाठी पार्लमेंटमध्ये नुसते वादविवाद चालू आहेत. पण मुक्तिफौजेने तीस लाखांची सोय करीत आणली आहे. त्यामुळे मग श्रीमंतांनी आपल्या तिजोऱ्या उघडल्या व मुक्तिफौजेला अमाप पैसा मिळू लागला. धर्मसंघटनेतील सामाजिक पुण्याची दृष्टी ती हीच. एखाद्‌दुसऱ्या धनिकाने पुण्यप्राप्तीसाठी केवळ ब्राह्मणांसाठी अन्नछत्र घालणे निराळे आणि लाखो भुकेल्या लोकांची जबाबदारी आपल्यावर आहे हे जाणून सर्व समाजाने धन देणें निराळे. युरोपातल्या धर्मसंघटनांनी हे कार्य घडवून आणले. आणि दीनदलितांना जागृत करून, त्यांना प्रतिकाराला सिद्ध करून, त्यांच्या जीविताची प्रतिष्ठा वाढवून, घडवून आणले. धर्म ही सामाजिक उत्कर्षाची अजूनही युरोप-अमेरिकेत एक मोठी जिवंत शक्ती आहे याचे कारण हेच आहे. भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतर, पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारानंतर स्थापन झालेल्या आर्यसमाज, ब्राह्मसमाज, रामकृष्ण मिशन यांच्या कार्याकडे पाहिले तर याची काहीशी कल्पना येऊ शकेल. या संस्थांकडे एकदम तरुण शक्ती आकृष्ट झाली व समाजसेवेचे व्रत तिने घेतले हे आपण पहातच आहो. धर्म ही जिवंत शक्ती असणे याचा हाच अर्थ आहे. तरुणांना आत्मार्पणाची प्रेरणा देण्याचे सामर्थ्य असणे हेच जिवंतपणाचे लक्षण. आणि दीनदलितांचा ऐहिक उद्धार हे कार्य डोळ्यासमोर असले, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी लढा देण्याचे आवाहन असले, की धर्माला हे सामर्थ्य प्राप्त होते. मुक्तिफौजेच्या यशाचे हेच रहस्य आहे. तुरुंगातील

कैदी, कुमारी माता, रुग्ण, दलित यांच्या सेवेसाठी इव्हँजेलाइन बूथने भराभर मंडळे स्थापन केली. ते कार्य पाहून मुक्तिफौजेला अमेरिकन नागरिक भराभर येऊन मिळू लागले. त्यांच्या हे ध्यानात आले की केवळ कायद्याने समाजाचे रक्षण होत नसते. त्याच्यामागे धर्मशक्ति असली तरच कायदा हा प्रभावी होतो. आणि ही धर्मशक्ती ईव्हा बूथ मुक्तिफौजेच्या रूपाने उभी करीत होती. अमेरिकेत असे यश मिळाल्यानंतर ईव्हा जगभर संचार करू लागली आणि तिने फ्रान्स, नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क, जपान, हिंदुस्थान, या देशांत मुक्तिफौजेच्या शाखा स्थापन केल्या. आपल्या यशाचे रहस्य सांगतांना ती म्हणाली, ' संग्राम, लढा ही मनुष्याची सहजप्रवृत्ती आहे. ती नष्ट करू नका. मात्र त्याचे खरे शत्रू त्याला दाखवून द्या. संघटना करावयाची ती प्रपंचाच्या उत्कर्षासाठी करा. अशा रीतीने धर्मनिष्ठेने केलेला जो लढा असेल त्यातूनच एक दिवस सत्ययुग निर्माण होईल. '

ब्रिटिशपूर्व काळात सतराव्या शतकात समर्थांनी समाजोन्नतीचे हेच मर्म जाणून आपली संघटना उभारली होती. धर्माला त्यानी 'मराठा तेवढा मेळवावा,' असे सांगून सामाजिक दृष्टि दिली होती. आणि सामाजिक संकटाचा परिहार समाजशक्तीने करावयाचा हे धोरण आखले होते. आणि हे सर्व ईश्वराचें अधिष्ठान कायम ठेवून. एवढ्यामुळे महाराष्ट्रात केवढे सामर्थ्य निर्माण झाले होते ते आपल्याला माहीतच आहे. दुर्दैवाने समर्थांच्यासारखा हे धर्मस्वरूप जाणणारा एकही पुरुष त्यांच्या पश्चात् निर्माण झाला नाही. त्यामुळे आपला धर्म हा विकलांगच राहिला. मोक्षधर्म, हेच त्याचे रूप राहिले. संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनच गीता किंवा ज्ञानेश्वरी आणि दासबोध सुद्धा वाचावयाचा, कारण संसाराच्या यशाचा व धर्माचा काही संबंध नाही, असेच लोकांनी ठरवून टाकले होते. त्यामुळे अभ्युदयवादी धर्मसंघटना ही समाजोन्नतीसाठी अवश्य असणारी जी महाशक्ति तिला आपण पारखेच राहिलो.

धर्मनिष्ठा ही आजहि, या विज्ञानयुगातहि, पाश्चात्त्य देशात कशी जिवंत आहे ते सांगून हे विवेचन आता संपवावयाचे आहे. विल्यम कॅमेरोन टाऊनशेंड ऊर्फ अंकल कॅम हे एक मिशनरी आहेत. आज त्यांचे वय ६३ आहे. १९१७ साली वयाच्या एकविसाव्या वर्षी ते ग्वाटेमालामध्ये धर्मप्रसारार्थ गेले. आणि कॅचिक्वेल या रानटी जमातीमध्ये त्यांनी कामाला प्रारंभ केला. त्यांचे कार्य

स्पॅनिश भाषेंत चाले. पण त्या जमातीला ती भाषा येत नव्हती. एक दिवस तेथला एक मनुष्य त्यांना म्हणाला की, 'तुमचा देव जर सर्वज्ञ आहे तर त्याला आमची भाषा कशी येत नाही ? ' या प्रश्नाने अंकल कॅम अस्वस्थ झाले. त्यांनी बायबलपुराण लगेच बंद केले आणि त्या जमातीत राहून प्रथम त्यांनी त्यांच्या भाषेचा अभ्यास केला. मग त्यांनी तिला लिपि लावून दिली, तिचे व्याकरण तयार केले, कोश केला आणि मग त्या कॅचिक्वेल भाषेत बायबल छापून त्या लोकांना साक्षर करून त्यांना जीजस्‌च्या धर्माची दीक्षा दिली. यात पंधरा वर्षे गेली. १९३२ साली त्यांना क्षय झाल्यामुळे ते परत अमेरिकेत गेले. तेथे ते रुग्णावस्थेत असताना त्यांचा एक जुना मिशनरी मित्र त्यांना म्हणाला, की, 'तुम्ही एका भाषेसाठी केले ते दक्षिण अमेरिकेतील• गहन जंगलात ज्या शेकडो रानटी जमाती आहे त्यांच्या भाषेसाठी का करू नये ?' ही झेप फारच मोठी होती. पण हे कार्य अंगीकारावयाचे असा त्या दोघा मित्रांनी निश्चय केला. क्षयातून मुक्त होताच कॅम यांनी १९३४ साली 'समर इन्स्टिटयूट ऑफ लिंग्विस्टिक्स्' या संस्थेची स्थापना केली. दक्षिण अमेरिकेतील हजार दोन हजार भाषांचा अभ्यास करून वरील प्रकारे त्यांची लिपि, व्याकरण व कोश तयार करून त्यांच्यापर्यंत बायबलचा संदेश पोचवावयाचा, व त्यांना श्रेष्ठ धर्माचा उपदेश करून सुसंस्कृत करावयाचे हा त्या संस्थेचा उद्देश आहे. आज ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या देशांत या संस्थेच्या शाखा आहेत. त्यांतून दरसाल पाचशे तरुण विद्यार्थी बाहेर पडतात. आणि ब्राझिल, मेक्सिको, पेरू, अलास्का येथील घनदाट अरण्यातील रानटी जमातीत जाऊन राहतात. त्यांच्या भाषेचा अभ्यास करून त्यात बायबलची भाषांतरे करतात आणि जीजस्‌च्या अमृतवाणीचा लाभ त्यांना करून देतात. भाषाशास्त्राच्या अभ्यासाबरोबरच त्या तरुणांना जंगलच्या राहणीचा अभ्यास व सरावहि करावा लागतो. झाडाच्या फांद्या तोडून टहाळे आणून झोपडी बांधणे, वाटेल त्या हवेत रहाणे, उत्तम प्रकारे पोहणे व सुसरी-मगरीशी झुंज घेणे, सर्व प्रकारच्या विषारी सापांची माहिती करून घेणे, जमिनीवर उघड्यावर निजणे, मिळेल त्या अन्नावर निर्वाह करणे हा सराव त्यांना करावा लागतो; कारण त्यांचे पुढले सर्व आयुष्य दण्डकारण्यासारख्या गहन अरण्यात जावयाचे असते. असे हे खडतर जीवन पुढे दिसत असूनहि शेकडो तरुण विद्यार्थी व विद्यार्थिनी

या संघटनेत सामील होत आहेत. आज या संस्थेचे ४००० तरुण मिशनरी निरनिराळ्या २५ देशांतील जमातीत काम करीत आहेत. त्यांत शेकडो तरुण विद्यार्थिनी पण आहेत. मारिआना स्लोकम या मुलीच्या प्रियकराला त्यांच्या विवाहाच्या आदल्या दिवशीच दुर्दैवाने मृत्यू आला. पण तिने घेतलेले व्रत सोडले नाही. ती तशीच चिआपास प्रदेशातील झेलताल या जमातीत जाऊन १६ वर्षे राहिली आणि शाळा स्थापून, पुस्तके लिहून तिने ५००० झेलताल लोकांना ख्रिस्ती धर्मात आणले, आणि पाश्चात्त्य जगातल्या सर्व अर्वाचीन सुधारणा त्यांच्यात रूढ केल्या. तेथले काम संपल्यावर १९५७ च्या डिसेंबरात ती दुसऱ्या जमातीत रहावयास गेली. मारिआनासारख्या शेकडो कॉलेज-विद्यार्थिनी दक्षिण अमेरिकेच्या गहन अरण्यात आज ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य तनमनधन अर्पून करीत आहेत.

अशा या धर्म-प्रसाराच्या प्रयत्नातच जानेवारी १९५६ मध्ये इक्वोडॉरच्या जंगलात पाच प्रोटेस्टंट तरुणानी जीजस्‌च्या कार्यासाठी आत्मबलिदान केल्याची रोमहर्षक घटना घडली. या इक्वेडोरच्या जंगलात मिशनऱ्यांचे अनेक मठ आहेत. अनेक जमातीत त्यांचे कार्य चालू आहे. औका इंडियन ही जमात अजून तशीच राहिलेली आहे. हे औका अत्यंत क्रूर व हिंस्र आहेत. परका माणूस दृष्टीस पडताच ते विषारी बाणांनी त्याला ठार मारतात, त्यामुळे त्यांच्याकडे जाण्याचे धाडस कोणाला होत नव्हते. पण नॅथनल सेंट, जिम इलियट, पीटर फ्लेमिंग, एड मॅककुली इ. तरुणांनी हे आव्हान स्वीकारावयाचे ठरविले. हे सर्व विद्यापीठातले तरुण होते. एक वैमानिक होता. एक कुस्तीगीर होता. एक फुटबॉल खेळाडू होता. अत्यंत बुद्धिमान म्हणून कॉलेजात त्याची कीर्ती होती. त्यांनी या कार्यासाठी आत्मार्पण करावयाचे ठरविले. जीजस्‌चा धर्म पोचला नाही अशी एकादी जमात पृथ्वीवर असू शकते याची त्यांना नामुष्की वाटू लागली. या सर्वांची लग्ने झाली होती. आपल्या तरुण स्त्रियांना बरोबर घेऊन ते इक्वेडोर जंगलात एका मिशनरी मठात येऊन राहिले. हळूहळू विमानातून टेहेळणी करून त्यांनी औका जमातीचा निवास शोधून काढला. त्यांच्याशी थोडी बोलणीचालणी करून त्यांना विमानातून भेटीदाखल काहीतरी वस्तु टाकून त्यांच्याशी थोडा परिचय करून घेतला. आणि मग त्यांच्या शेजारी झोपडी बांधून रहावयाचे या तरुणांनी ठरविले. हे साहस फार मोठे

होते. औका उलटले तर ? मृत्यु निश्चित होता. तरीहि कार्यावरची त्यांची निष्ठ चळली नाही. एक दिवस आपापल्या तरुण स्त्रियांचा निरोप घेऊन हे पाचहि वीर पुरुष जीजस्‌ची प्रार्थना मुखाने गात तिकडे निघाले. आणि तीच त्यांची शेवटची भेट ठरली. कारण त्या सर्वांचा औकांनी क्रूरपणे संध्याकाळच्या आतच वध करून टाकला. मठात ही बातमी पोचली तेव्हा एकच हाहाकार झाला. पण या स्त्रियांनी परमेश्वराला दोष दिला नाही. उलट, आम्हालाहि असेच मरण येऊ दे म्हणून प्रार्थना केली. अमेरिकेत ही बातमी पोचताच एक हजार तरुण लोकांनी औका जमातीत जाऊन राहण्यासाठी नावे नोंदविली !

भारतात ब्रिटिशांचे राज्य प्रस्थापित होऊन पाश्चात्त्य विद्येचा प्रसार होऊ लागला तसतसा धर्माचा सामाजिक अर्थ आम्हाला प्रतीत होऊ लागला. आणि ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, रामकृष्ण मठ या धर्म-संघटना हिंदुस्थानात निर्माण झाल्या. गेल्या शंभर वर्षात त्यांनी समाजाचे परिवर्तन घडविण्यात फार मोठे कार्य केले यात शंकाच नाही. शब्दप्रामाण्य जाऊन बुद्धिप्रामाण्य आले आणि विज्ञानाचा प्रसार होऊन जुन्या श्रद्धा ढासळून गेल्या. त्यावेळी धर्माचे पुनरुज्जीवन करून या संस्थांनी तरुण मनाला पुन्हा धर्माकडे आकृष्ट करून घेण्यात मोठेच यश मिळविले. पण भारताचा एकंदर विस्तार आणि त्याच्यापुढच्या समस्या पाहिल्या तर हे प्रयत्न अगदीच थिटे पडतात असे दिसते. हिंदुत्ववादी संघटनांचा विचार केला तर असे दिसते की अजूनहि पाश्चात्त्य मिशनरी येथले गिरिवासी, वनवासी, अस्पृश्य, दलित, यांच्यात मिसळून जे कार्य करीत आहेत त्याच्या शतांशही आपल्या हातून होत नाही. हिंदुस्थानाबाहेर तर नाहीच पण हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात जाऊन जेथे जेथे रानटी जमाती राहत आहेत तेथपर्यंत धर्म व संस्कृतीचा संदेश पोचविण्याचे कार्य करील अशी एकहि धर्मसंघटना भारतात नाही. आज भारतात सरकारने देशाच्या उत्कर्षासाठी किती तरी योजना आखल्या आहेत. पण सरकारी अहवालावरून असे दिसते की ही कामे सर्व भाडोत्री लोकांच्या हाती आहेत. 'मोले घातले रडाया, नाही आसू आणि माया' अशी त्यांची स्थिति आहे. अशा वेळी क्वेकर, मेथॉडिस्ट अशांसारख्या धर्म-संघटना स्थापन होऊन किंवा आर्यसमाज, रामकृष्ण मठ, प्रार्थनासमाज या जुन्याच संस्थांनी याकडे लक्ष वळवून या योजनातून जेथे भ्रष्टता, अन्याय,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ...१८०९० ... वि: ...विवेचक
क्रमांक ...१०५३ ... नों. दि. ...६।३।६९

जुलूम, हलगर्जीपणा, अनास्था दिसेल, तेथे तेथे तिच्यावर समाजशक्तीच्या साह्याने घाव घालण्यास प्रारंभ केला तर आपल्या समाजाला सध्या आलेली अवकळा नष्ट होईल आणि ध्येयवादी तरुण राष्ट्राला मिळतील. सध्या हे राष्ट्र अगदी वृद्ध होऊन गेले आहे. कारण तरुणांना आकृष्ट करणारा धर्मच येथे नाही. अमेरिका हे विज्ञानवाद, भौतिक आकांक्षा, सुखसमृद्धि या सर्व गोष्टींनी जगातले अग्रेसर राष्ट्र आहे, तरी पण धर्म ही शक्ती जिवंत ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न तेथे केले जात आहेत. तेथील शिक्षणसंस्थांपैकी दोन–तृतीयांश संस्था धर्मसंघटनांच्या ताब्यात आहेत. आणि प्रत्येक धर्मसंघटना हे एक लहानसे विश्व आहे. या संघटना फक्त बौद्धिक शिक्षण देऊन थांबत नाहीत तर आपल्या सभासदांच्या सर्व प्रकारच्या उन्नतीची चिंता त्या वाहातात. प्रत्येक संस्थेची धर्ममंदिरे आहेत. आणि हजारो सभासद नित्यनियमाने तेथे जातात. आपल्याकडे अजूनहि धर्ममंदिरे ही म्हाताऱ्यांच्यासाठी, बायकांच्यासाठी, संसार सोडून देण्याची तयारी करणारांच्यासाठीच असावी असे त्यांचे स्वरूप आहे. त्यामुळे धर्माचे संस्कार तरुण मनावर करण्याची कसलीहि सोय या धर्मभूमीत नाही. कोणते तरी आचार, कोणती तरी व्रते यांनी मानव बद्ध असणे अवश्य असते. आपल्या समाजातून जुन्या आचाराचे उच्चाटन झाले आहे. जुनी व्रते नष्ट झाली आहेत. म्हणजे त्यांवरची श्रद्धा गेली आहे. पण नवे आचार, नवी व्रते त्या ठिकाणी मुळीच आलेली नाहीत. पाश्चात्त्य देशात नवी व्रते, नवे आचार यांनी जीवन बद्ध करण्याचे कार्य या धर्मसंघटना करीत असतात. आणि या संघटना समाजाला नवी ध्येये, नवी क्षितिजे नित्य दाखवीत असल्यामुळे, व विज्ञान बुद्धिवाद, राष्ट्रीय प्रपंचाची प्रगति याला ते सर्व पोषक असल्यामुळे नवी पिढीहि अतिशय हौसेने, जुन्या निष्ठेने व श्रद्धेने नव्या आचारधर्माचे पालन करीत असते. यामुळे धर्मकार्यासाठी आत्मलिदान करणारे शेकडो-हजारो तरुण स्त्री-पुरुष तेथे कसे निर्माण होतात ते वर सांगितलेच आहे.

लो. टिळकांनी धार्मिक महोत्सवांचे महत्त्व सांगताना म्हटले आहे की, "या उत्सवांचा आपण लोकशिक्षणासाठी उपयोग केला पाहिजे. आपली परिस्थिति काय आहे ते अशा उत्सवात जाऊन लोकांना सुशिक्षितांनी समजावून दिले पाहिजे. सरकार करीत असलेल्या जुलमांची आठवण त्या वेळी

लोकांना या शहाणे म्हणविणाऱ्या मंडळींनी का करू नये? लोकात धर्मबुद्धी जागृत करून आमच्या राष्ट्रीयत्वास बळकटी का आणू नये? आमची धर्मबुद्धी जागृत ठेवण्याचे काम जर शिकलेल्या मंडळींच्या हातून पार पडत नाही तर ही सुशिक्षित मंडळी निष्कारण जिवंत राहिली असेच म्हणावे लागते." यातील भावार्थ हाच आहे की जुन्या धर्माला काळास योग्य असे रूप देऊन धर्म ही महाशक्ती आपण जिवंत ठेविली पाहिजे. राष्ट्र, लोकसत्ता, समाजवाद, मानवता, या निष्ठा आपापल्याला परीने अत्यंत श्रेष्ठ आहेत. त्याहि मोठ्या शक्ती आहेत. पण वर एके ठिकाणी सांगितल्याप्रमाणे या शक्तीशी त्यांची तुलना होणार नाही. धर्मभक्ति ही मानवाच्या रोमारोमात जाऊन भिनलेली आहे. आणि जगात जोपर्यंत अन्याय, अत्याचार, विषमता या मानवी आपत्ती व रोगांच्या साथी, अवर्षण, महापूर, भूकंप आणि मृत्यू या नैसर्गिक आपत्ती आहेत तोपर्यंत तरी या सर्वांतून मुक्त करणाऱ्या शक्तीची उपासना मानव करीत राहणारच. शिवाय मानवी मनाला आत्मार्पणाची, सर्वस्वदानाची एक फार प्रबळ आस असते. तिची तृप्ति धर्मभावनेवाचून कधीच होणार नाही. याहीपलीकडे एक गोष्ट आहे. मानवाला अमरत्वाची, अनंतत्वाची मृत्युंजयत्वाची अत्यंत उत्कट अशी आर्ति असते. आणि प्रत्येक धर्मात जन्ममरणातीत, दिक्कालातीत, अव्यय, अविनाशी अशा ईशरूपाचे वर्णन केलेले असते ते यासाठीच. मानवी जीवनाला जी प्रफुल्लता, जे सौंदर्य, जी माधुरी आलेली असते ती धर्माने दिलेल्या या त्रिविध तृप्तीमुळेच होय. तिच्या अभावी या जीवनाला स्मशानकळा आल्याखेरीज राहणार नाही. ती अवकळा सध्या आपल्या देशाला येऊ पहात आहे. कारण आपण निधर्मी झालो आहो.

ही घोर आपत्ति टाळावयाची असेल तर वैयक्तिक पुण्य एवढाच जो धर्माचा संकुचित अर्थ येथे रूढ झाला आहे तो सोडून थोर सामाजिक पुण्य असा विशाल अर्थ आपण त्याला प्राप्त करून दिला पाहिजे. आज या देशात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि पूर्वीप्रमाणेच अन्याय, अत्याचार, जुलूम हे चालू आहेत. त्यांचा प्रतिकार करणे हे धर्मसंघटनांचे कार्य आहे हे नव्या धर्मवेत्त्यांनी जाणले तरच तरुण मने धर्माकडे आकृष्ट होतील व धर्म ही महाशक्ती जिवंत होईल. अन्यायाचा प्रतिकार येथे काहीसा चालू आहे पण तो पक्षीय दृष्टीने केला

जातो. पक्षहित साधत नाही असे दिसले की नेत्यांची प्रतिकारबुद्धि पांगुळते. म्हणूनच अशा वेळी पक्षातीत धर्मसंघटनांची आवश्यकता असते. क्वेकर, मेथॉडिस्ट, साल्व्हेशन आर्मी या अशा संघटना होत्या. साल्व्हेशन आर्मीच्या इव्हँजेलाइन बूथने तर 'संग्राम, लढा ही मनुष्याची सहजप्रवृत्ति आहे ती जागृत करून हा धर्मसंग्राम चालू ठेवा' असाच शेवटचा संदेश दिला हे वर सांगितलेच आहे. समाज कितीही सुधारला, प्रगत झाला तरी अन्याय, विषमता, जुलूम, अत्याचार हे सर्व चालू राहणारच. म्हणूनच यांचे निर्मूलन करण्यासाठी धर्मसंघटनांचीही आवश्यकता नेहमी राहणार. म्हणूनच पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणे धर्माचा नंदादीप आपण नित्य पाजळत ठेवला पाहिजे. लोकांचे अज्ञान, सत्ताधाऱ्यांचे स्वार्थ, धनिकांचा लोभ यांनी या दीपावर नित्य काजळी येत राहणार हे खरे आहे. म्हणूनच बुद्धिनिष्ठा, विज्ञाननिष्ठा यांच्या प्रकाशात आपण नित्य शोध घेत राहिले पाहिजे. अशी दृष्टि ठेवून धर्माचे पुनरुज्जीवन करणाऱ्या धर्मसंघटना येथे स्थापन झाल्या तरच ध्येयवाद, त्याग, संयम, निग्रह, आत्मार्पण वृत्ति हे मानवतेचे श्रेष्ठ सद्गुण येथे विकसित होतील आणि लोकायत्त समाज निर्माण करण्याचे आपले ध्येय साध्य होईल. त्यायोगेच 'त्रैलोक्य चालिल्या फौजा। सौख्यबंध विमोचने। मोहीम मांडली मोठी आनंदवनभूवनी ।।' हे समर्थांचे स्वप्न खरे होईल.

## २. ते समाजाला विचारा

गडकऱ्यांच्या 'प्रेमसंन्यास' या नाटकातील द्रुमन ही एक तरुण विधवा आहे. कमलाकराच्या मोहजालात ती फसली व तिला दिवस गेले. मूल झाल्यावर बेअब्रू टाळण्यासाठी तिने मुलाचा गळा दावून प्राण घेतला, पण ते उघडकीला आले. तिच्या खोलीत पोलिस आले आणि बाबासाहेबहि आले. तो सर्व प्रकार पाहून बाबासाहेबांना फार संताप आला. ते म्हणाले, "द्रुमन, राक्षसिणी, काय केलस हे ? हे अघोर कृत्य करायला तुझा हात कसा वाहवला?" यावर द्रुमन म्हणाली, "ते राक्षसी रूढीला विचारा, ते राक्षसी समाजाला विचारा."

मुंबईच्या एका महाविद्यालयाचे एक प्राचार्य विद्यापीठाच्या सिंडिकेटचे सभासदही होते. त्यांच्याकडे एकदा एक प्राध्यापक आपल्या एका विद्यार्थ्याचे प्रकरण घेऊन आले. त्या विद्यार्थ्याने परीक्षेत वाममार्गाचा अवलंब केला होता. म्हणून त्यासाठी नेमलेल्या समितीने त्याला तीन वर्षे निष्कासित केले होते. प्राचार्यांनी त्याच्यासाठी काही करावे असा प्राध्यापकांचा आग्रह होता. 'त्या विद्यार्थ्यावर चुकून आरोप आला आहे काय, तो प्रामाणिक असून काही गैरसमजामुळे त्याला शिक्षा झाली आहे काय ?' असे प्राचार्यांनी विचारले. तसे काही नव्हते. मुलगा अप्रामाणिक होता, त्याने फसवणूक निश्चित केली होती. पण प्राध्यापकांचे म्हणणे असे की, 'हा त्याचा दोष नाही. आपणच या विद्यापीठाच्या परीक्षांचे महत्त्व वाढवून ठेवले आहे. विद्यार्थ्यांचे सगळे भवितव्य समाजाने त्यावर अवलंबून ठेवले आहे. म्हणून त्यांना असा मोह होतो. यात त्यांचा दोष नाही. असला तर तो आपला आहे, समाजाचा आहे.' यावर थोडी चर्चा झाली. पण शेवटी प्राचार्यांनी प्राध्यापकांना सांगितले की,

'आपण बोलणे बंद केलेले बरे. कारण तुमची भाषा मला समजत नाही. तुमची विचारसरणी मला अनाकलनीय आहे.'

मुंबईच्या प्राचार्यांनी ही विचारसरणी अगदी त्याज्य ठरविली असली तरी ती आज सर्वत्र मान्यता पावली आहे व आचरली जात आहे असे आपल्याला आढळून येईल. जाळपोळ, खून, बलात्कार असले गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना गुन्हेगार समजू नये तर त्यांना रोगी समजावे असे नवीन शास्त्र आहे. गेल्या पन्नास-साठ वर्षांत गुन्हेगारीच्या शास्त्राचा खूपच विकास झाला असून अनेक शास्त्रज्ञांनी हे मत आग्रहाने मांडले आहे. मनुष्य हा काही जन्मतः गुन्हेगार नसतो. परिस्थितीमुळे तो गुन्हेगार होतो. त्याला खायला अन्न मिळत नसते, तो दारिद्र्याने गांजलेला असतो, त्याच्या वासना काही कारणाने अतृप्त राहतात, त्या तृप्त करावयास त्याला साधन नसते, संयमाचे शिक्षण त्याला मिळालेले नसते, घरची परिस्थिति मोठी उद्वेगजनक असते, त्याला कोणी—माता, पिता, गुरू—असा योग्य मार्गदर्शक मिळालेला नसतो, म्हणून तो गुन्ह्याला प्रवृत्त होतो. अशा वेळी त्याला शिक्षा न करता त्याला रुग्णालयात पाठविणे हेच इष्ट होय. काही शरीराचे रोगी तसे हे मनाचे रोगी. त्यांना मानसिक रोग्यांच्या आलयात पाठवावे, असे हे नवे मत आहे.

ही विचारसरणी, हे नवे शास्त्र शिक्षणक्षेत्रात तर फारच मान्यता पावले आहे. विद्यार्थ्यांना काही शिक्षा करणे हे आता अगदी रानटीपणाचे मानले जाते. अनेक विद्यार्थी व्रात्य, खोडकर असतात. गुंड, मवाली असतात. अभ्यास करीत नाहीत. घरी दारी उद्धटपणा करतात; तरी त्यांना शिक्षा करणे हे योग्य नव्हे. अशा वेळी शिक्षकांनी त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहावे. त्यांच्या मनाचा सखोल अभ्यास करावा. त्यांच्या घरची परिस्थिति समजून घ्यावी. कोणाला आई नसते. कोणाला भाऊबहीण नसतात. हे नातेवाईक असले तरी ते त्याच्याशी प्रेमाने वागत नसतात. अशी एक ना अनेक कारणे विद्यार्थ्यांच्या या अपप्रवृत्तीच्या मागे असतात. म्हणून त्यांच्या अपकृत्यासाठी त्यांना जबाबदार धरताच येणार नाही ! त्यांच्या भोवतालची परिस्थिति हीच याला जबाबदार असते. तेव्हा ती सुधारण्याचा प्रयत्न करणे, तिच्यातील उणीवा भरून काढणे हे इष्ट आहे. शिक्षा करणे हे अगदी गर्ह्य होय. नवे शास्त्र असे आहे.

बऱ्याच लोकांना अजून हे शास्त्र मानवत नाही असे दिसते. एलिझा-

बेथ मॅसि हिल या एका अमेरिकन स्त्रीची तक्रार पाहा. ती म्हणते, " माझी एक मैत्रीण आहे. तिच्या दिराने तिच्या सर्व धनाचा अपहार केला व तो पळून गेला. त्यामुळे ती फार संतापली होती. पण एका मानसशास्त्रज्ञाने तिला उपदेश केला की, 'दिराला दोषी धरून तू त्याच्यावर संतापू नको. आता, तो सधन आहे, त्याला काही कमी नाही हे खरे. पण लहानपणी त्याला केव्हा तरी पैशाची नड फार तीव्रपणे भासली असली पाहिजे. आणि त्या वेळची त्याची ती धनाची तीव्र वासना दडपली गेली असली पाहिजे. ती या रूपाने प्रकट झाली. यात त्याचा दोष काय ? त्याच्याकडे उदार मनाने, सहानुभूतीनेच पाहिले पाहिजे." पुढे तिच्या एका वहिणीची मैत्रीण तिच्या नवऱ्याबरोबर पळून गेली. यातही मानसशास्त्रदृष्टीने रागावण्याजोगे काही नाही. एक-पत्नीत्व हे पुरुषाच्या दृष्टीने अनैसर्गिकच आहे. ते समाजाने त्याच्यावर लादले आहे. त्याला ते संभाळता येत नाही म्हणून तो या स्त्रीबरोबर पळून गेला. यासाठी त्याला जबाबदार कसे धरता येईल ? जाब विचारावयाचाच असेल तर समाजाला विचारा. त्या मैत्रिणीबद्दलही असेच धोरण असणे अवश्य आहे. कोणच्याही वस्तूची चोरी करणे – येथे तिने आपल्या मैत्रिणीचा नवरा चोरला होता–हे योग्य नाही, अशी लहानपणी योग्य वेळी तिला शिकवण दिली गेली नसली पाहिजे. म्हणून तिची अशी प्रवृत्ति झाली. यात तिचा दोष नाही. म्हणून त्या दोघांवरही रागावू नका. उलट त्यांना घरी जेवावयाला बोलवा आणि मुलांना त्या स्त्रीला मावशी म्हणायला शिकवा.

आपल्या अनुभवांतल्या या दोन गोष्टी सांगून एलिझाबेथ हिल अत्यंत उद्वेगून लिहिते, प्रत्येक दुष्ट प्रवृत्तीचे, अपकृत्याचे मूळ लहानपणच्या शिक्षणातील वैगुण्यात शोधावे, किंवा शारीर वा मानसिक अधूपणात आहे असे मानावे, असे हल्ली शास्त्र आहे. व्यक्तीला बुद्धि असते, तिला देवाने अक्कल दिली आहे, तिच्या कृत्याबद्दल तिलाच जबाबदार धरावी, हे कोणाला मान्यच नाही. दर ठिकाणी औदार्य, मृदुता, क्षमा ! मला या उदारमनस्कतेची चीड आली आहे. या पद्धतीने आईबापांवर, परिस्थितीवर वाटेल ते ढकलता येईल ! त्यापेक्षा मुलाला स्वतःला अक्कल आहे असे समजून त्याच्याशी तसे वागणे हेच श्रेयस्कर होईल. तुमच्या या नव्या पद्धतीने समाजाची किंवा व्यक्तीची प्रगति झाली आहे काय ?

१९२९ साली अब्दुल रशीद या मुसलमान तरुणाने स्वामी श्रद्धानंद यांचा खून केला. त्या वेळी गोहत्ती येथे काँग्रेसचे अधिवेशन चालू होते. त्या सभेत गांधीजी म्हणाले, ' मी अबदुल रशीदला माझा भाऊच मानतो. पुन्हा सांगतो, तो मला भावासारखा आहे. त्याला मी गुन्हेगार मानीतच नाही. हिंदु-मुसलमानांमध्ये वैर पेटवून ज्यांनी हा प्रक्षोभ घडविला तेच खरे गुन्हेगार आहेत. स्वामींच्या खुनाची जबाबदारी त्यांच्यावर आहे, रशीदवर नाही. '

व्यक्ति ही स्वतःच्या अपकृत्याला स्वतः जबाबदार नाही, परिस्थितीमुळे तिच्या ठायी पापप्रवृत्ती गुन्हेगारी वृत्ती निर्माण होते, आणि ती परिस्थिति समाजाने निर्माण केलेली असते, म्हणून अंती व्यक्तीच्या गुन्ह्यांची, तिने केलेले खून, बलात्कार या गुन्ह्यांची–जबाबदारी समाजावर आहे. अशी ही अद्ययावत् विचारसरणी आहे. असे हे मानसशास्त्र आहे. आणि मुलांचे गृहशिक्षण, शालेय शिक्षण, गुन्हेगारांचे न्यायदान, त्यांचा तुरुंगवास या सर्व क्षेत्रात या मानसशास्त्राचा प्रभाव आता पडलेला दिसत आहे. भारतानेही सर्व क्षेत्रात या उदार धोरणाचाच अवलंब केला आहे. पण गेल्या बारा-पंधरा वर्षात सर्व क्षेत्रात गुन्हेगारी मात्र भयानक प्रमाणात वाढत आहे. तेव्हा याचा समाजधुरीणांनी जिव्हाळ्याने विचार केला पाहिजे, असे वाटते.

गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत युरोपात स्वतःच्या बऱ्यावाईट अवस्थेला, उत्कर्षाला, भवितव्याला व्यक्ति ही संपूर्णपणे, सर्वस्वी स्वतःच जबाबदार आहे, असे तत्त्वज्ञान रूढ होते. १७७६ च्या सुमारास ॲडम स्मिथ या थोर इंग्रज अर्थकोविदाचा ' वेल्थ ऑफ नेशन्स् ' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. आणि तेथून पुढे इंग्लंड-अमेरिकेतील जीवनावर स्मिथच्या आर्थिक सिद्धान्तांचे शंभरसव्वाशे वर्षे अप्रतिहत वर्चस्व चालू होते. व्यक्तिवादी अर्थशास्त्र म्हणून हे शास्त्र प्रसिद्ध आहे. त्यातील इतर अंगोपांगांशी आपल्याला या ठिकाणी काही कर्तव्य नाही. आपल्याला त्यातला लक्षणीय सिद्धान्त एकच. आणि तो म्हणजे व्यक्तीच्या उत्तरदायित्वाविषयीचा ! वर निर्देशिलेली आजची जी शास्त्रपूत विचारसरणी तिच्या बरोबर उलट तो सिद्धान्त आहे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत व्यक्तीची जी बरीवाईट परिस्थिति असेल, तिला जे दारिद्र्य वा श्रीमंती प्राप्त झाली असेल, समाजात तिला जो हीन वा श्रेष्ठ दर्जा प्राप्त झाला असेल त्याला तीच सर्वस्वी उत्तरदायी आहे, त्याशी समाजाचा वा परिस्थितीचा

काही संबंध नाही असे मत सर्वत्र रूढ होते. कामगारांचे त्या काळात भयंकर हाल होत असत. त्यांचे जीवन म्हणजे नरकवास होता. पण समाजाचे त्या बाबतीत काही कर्तव्य आहे हे व्यक्तिवादी अर्थशास्त्राला मान्यच नव्हते. 'ज्याचा तो' हे त्याचे तत्त्व होते. यावर गेल्या शतकाच्या उत्तरार्धात चौफेर हल्ले होत होते हे खरे आहे. कार्ल मार्क्स, रस्किन, कार्लाइल यांनी आपापल्या परी त्याच्यावर भडिमार चालविला होता. इंग्लंडमध्ये व जर्मनीत कामगारांच्या कल्याणाचे काही कायदे सरकारने केलेही होते. पण अजून व्यक्तिवादी तत्त्वज्ञान जोर करूनच होते. डार्विनच्या 'नैसर्गिक निवडी'च्या व '–जीवनकलहा–'च्या सिद्धान्तांनी त्याला काही काळ पाठिबात्र मिळाला. त्यामुळे व्यक्ती अगदी असहाय व निराधार होऊन समाजात अनर्थ घडत होते. यालाच उद्देशून रस्किनने आपला 'अर्थशास्त्र की अनर्थशास्त्र ?' हा ग्रंथ लिहिला होता. तरी त्या वेळी त्याचा प्रभाव पडला नाही. उलट त्यालाच पंडितांनी प्रतिगामी ठरविले.

पण हळूहळू व्यक्ती आपल्या स्थितीला, उन्नति-अवनतीला सर्वस्वी जबाबदार नाही, तिचे भवितव्य बरेचसे सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असते, हे मत प्रभावी होऊ लागले आणि आता लंबकाला जबरदस्त हेलकावा बसलेला असून तो दुसऱ्या टोकाला गेला आहे, असे आपल्याला दिसत आहे. प्रारंभी दिलेली उदाहरणे व वचने त्याचीच निदर्शक आहेत. ती पाहता आज आपण दुसऱ्या अनर्थयुगात प्रविष्ट झालो आहोत असे वाटू लागते.

या दुसऱ्या अनर्थयुगाला प्रामुख्याने मार्क्स व फ्रॉईड यांचे तत्त्वज्ञान कारणीभूत झालेले आहे. मार्क्सचा आर्थिक नियतिवाद प्रसिद्धच आहे. समाजात जी अर्थोत्पादनसाधने असतात, अर्थाच्या, वाटपाच्या व विनिमयाच्या ज्या पद्धती समाजाने रूढ केलेल्या असतात, त्यांवर त्या समाजाची सर्व संस्कृती अवलंबून असते, असा मार्क्सचा सिद्धान्त आहे. जुन्या काळी परमेश्वर सूत्रधार असून मानव म्हणजे त्याच्या हातातील कळसूत्री बाहुली आहेत, असे मत बहुतेक सर्व धर्मग्रंथांत सांगितलेले असे. मार्क्सचा हा आर्थिक नियतिवाद त्याहून फारसा निराळा नाही. मानवाचे कर्तृत्वच मार्क्सवाद अमान्य करतो असे नाही. पण ते कर्तृत्व कसे घडावयाचे, त्याचे स्वरूप काय, यशापयश काय, हे सर्व त्याच्या आर्थिक परिस्थितीने निश्चित होते, असे मार्क्स सांगतो.

शेतकरी, कामकरी, बुद्धिजीवी, व्यापारी, भांडवलदार, कारखानदार असे मार्क्सने समाजातील लोकांचे आर्थिक दृष्टीने भिन्न वर्ग कल्पिले आहेत. आणि जुन्या चातुर्वर्ण्यातील जन्मसिद्ध गुणांप्रमाणेच यांचेही वर्गसिद्ध गुण सांगून टाकले आहेत. कामकरी हाच क्रांतीला अवश्य असणाऱ्या गुणांनी संपन्न असावयाचा, बुद्धिजीवी वर्ग हा नेहमी भांडवलदार-कारखानदारांचा दास, गुलाम असावयाचा, भांडवलदार, जमीनदार हे नेहमी क्रांतीचे विरोधक असावयाचे, असा गुणनिश्चय त्याने एकदाच करून टाकला आहे. चातुर्वर्ण्य-व्यवस्थेत ज्याप्रमाणे जन्माने मनुष्याची गुणसंपदा व त्यामुळे नियती निश्चित होते त्याचप्रमाणे साम्यवादी व्यवस्थेत वर्गाने मनुष्याची नियती निश्चित होते असे मार्क्सवाद मानतो. अवतारकल्पनाही मार्क्सला मान्य आहे. पृथ्वीला पापकृत्यांचा फार भार झाला की परमेश्वर साधूंच्या परित्राणासाठी व दुष्कृतांच्या विनाशासाठी अवतार घेतो अशी भारतीयांची श्रद्धा आहे. मार्क्स-वादीचीही आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने न्यूटन, नेपोलियन, गॅलिलिओ, गांधी यांसारख्या विशिष्ट कर्तृत्वाच्या पुरुषांची ऐतिहासिक आवश्यकता निर्माण झाली की ते त्या त्या देशात निर्माण होतात व आपापले ऐतिहासिक कार्य करून निघून जातात अशी श्रद्धा आहे. या सगळ्याचा अर्थ असा की, मान-वाच्या हातून जे काही बरेवाईट कार्य घडते ते त्याच्या विशिष्ट वर्गामुळे, आणि त्या वेळच्या ऐतिहासिक परिस्थितीमुळे घडते; त्याची स्वतंत्र इच्छा-शक्ती अशी काही नसते, किंवा असलीच तर ती संपूर्णपणे बद्ध अशी असते; त्यामुळे अर्थातच त्याच्या हातून घडलेल्या कृत्यांचे जे बरेवाईट परिणाम त्यांना तो जबाबदार नसतो.

स्वतः मार्क्स व त्याचे अनुयायी यांची या सिद्धान्तांवर इतकी दृढ श्रद्धा आहे आहे की ते ज्योतिष्याप्रमाणे भविष्यही वर्तवितात आणि कोणत्या देशात केव्हा कशा प्रकारची क्रांती घडेल, कोठे घडणार नाही, कोठे परागति होईल हे आपण अचूक सांगू शकतो असे त्यांचे मत आहे. माणूस जेव्हा भविष्य वर्तवितो तेव्हा भावी घटनांच्या मागच्या मानवासुद्धा सर्व प्रेरक शक्ती या नियतिबद्ध आहेत, त्यांना स्वातंत्र्य म्हणून कसलेही नाही हे त्याने गृहीत धरले असलेच पाहिजे. त्यावाचून मानवी इतिहासाविषयी रविचंद्रांचे अस्तोदय, ग्रहणे यांच्याइतकी निश्चित भविष्ये वर्तविण्याचा विचारहि त्याला करता येणार नाही. आणि

मार्क्सवाद भविष्ये वर्तवितो हे सर्वश्रुत आहे. कम्युनिस्ट क्रांती प्रथम ब्रिटन, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स या औद्योगिक दृष्टीने प्रगत असलेल्या देशात घडेल असे भविष्य मार्क्स एंजल्स यांनी वर्तविले होते हे प्रसिद्धच आहे. मानवाच्या ठायी काही स्वतंत्र शक्ती आहे, त्याच्या अंगी अज्ञात, अनाकलनीय, तर्कसिद्ध कार्यकारणात न बसणारे असे काही सामर्थ्य असू शकते, त्याच्या जोरावर तो परिस्थितीला एकदम हवी ती कलाटणी देऊ शकतो, अनपेक्षित, अपूर्वज्ञात असे काही घडवू शकतो, हे मार्क्सला मान्य नाही हे यावरून उघड दिसते. तसे नसते तर भविष्य वर्तविण्याचे धैर्य त्याला झाले नसते.

मनुष्याने वाममार्गाचा अवलंब केला, गुन्हा केला, खून केला तरी त्याला गुन्हेगार मानू नये, परिस्थितीमुळे त्याच्या हातून ते कृत्य घडले, त्याला तो जबाबदार नाही, असे मानून त्याला सहानुभूतीने वागवावे, भाई म्हणावे, आपल्या हातून भ्रूणहत्येसारखे पाप घडले आणि त्यासाठी आपल्याला कोणी जाब विचारला तर, 'ते समाजाला विचारा' असे उत्तर त्याला द्यावे, यामागे जी विचारसरणी आहे ती समाजमनात दृढमूल होण्यास मार्क्सवाद कसा जबाबदार आहे हे यावरून कळून येईल. मनुष्याला काही स्वतंत्र अशी मनःशक्ती नाही, जडाप्रमाणे त्याची बुद्धी अगदी तर्कसिद्ध, कार्यकारणबद्ध आहे, त्याला आत्मस्वातंत्र्य म्हणून काही नाही हा पक्ष एकदा स्वीकारल्यानंतर 'ते समाजाला विचारा' ही विचारसरणी क्रमप्राप्तच आहे.

मनुष्याला सर्वस्वी परतंत्र करून टाकण्यास, त्याचे आत्मस्वातंत्र्य हिरावून घेण्यास मार्क्सवाद जसा कारणीभूत झाला आहे त्याचप्रमाणे अर्वाचीन काळातले मानसशास्त्रातले दोन पंथ कारणीभूत झाले आहेत. ते पंथ म्हणजे डॉ. वॉटसन यांचा वर्तनवाद व डॉ. फ्रॉइड यांचा मनोविश्लेषणवाद. वर्तनवादाचा प्रवर्तक डॉ. वॉटसन हा मनाचे अस्तित्वच मानण्यास तयार नाही; विचार, कल्पना, स्मृती, रागद्वेष इ. भावना या सर्व शरीरप्रकृती होत, असे त्यांचे मत आहे. रुधिराभिसरण, काही ग्रंथींचे चलनवलन, मेंदूतील व इतर अवयवांतील नसांची व धमन्यांची हालचाल यांची ही केवळ निदर्शके होत, हे स्वतंत्र असे मनोव्यापार नव्हत, असे वर्तनवाद मानतो. त्यामुळे लाकूड, लोखंड, माती यांचे रूप व स्थिती ही ज्याप्रमाणे बाहेरून आपण त्यांवर जे संस्कार करू त्यावर अवलंबून असतात त्याप्रमाणे मानवांचे सर्व भवितव्य

त्याच्यावर जे बाह्य संस्कार होतील त्यांवर अवलंबून असते, त्याचे निराळे स्वत्व, त्याची अंत:शक्ती असे काही नसते, असा या पंथाचा सिद्धान्त आहे. हे मत डॉ. वॉटसनने इतक्या टोकाला नेले आहे की कोणत्याही व्यक्तीवर इष्ट ते संस्कार करून तिचे जीवन वाटेल त्या नमुन्याप्रमाणे घडविता येईल अशी तो ग्वाही देतो. 'मला एक डझन निरोगी मुले आणि त्यांचे योग्य व इष्ट ते संगोपन करण्यासाठी आवश्यक ती परिस्थिति व सामग्री द्या. मी तुम्हाला त्या मुलांतून वाटेल त्या प्रकारचा मनुष्य–वैद्य, वकील, शास्त्रज्ञ, व्यापारी, भिकारी, चोर, गुन्हेगार निर्माण करून दाखवीन,' असे आव्हानाचे उद्‌गार त्याने काढले आहेत. याचा अर्थ असा की न्यूटन, नेल्सन, टिळक, गांधी यांच्यासारखे थोर पुरुष किंवा टाटा-बिर्ला यांसारखे कारखानदार, किंवा भूपत, डिलिंजरसारखे दरोडेखोर हुकमी निर्माण करणे समाजाच्या हाती आहे. हा परिस्थितिवाद मार्क्सवादापेक्षाही जास्त धाडसी आहे. अमक्या परिस्थितीमुळे अमका मनुष्य निर्माण होणारच असे मार्क्सवाद म्हणतो, तर वाटेल त्या कर्तृत्वाचा मनुष्य, भोवती इष्ट ती परिस्थिती कायम राखून, इच्छेप्रमाणे निर्माण करता येईल असा वर्तनवादाचा विश्वास आहे. जगाच्या सुदैवाने किंवा दुर्दैवाने इष्ट तो मनुष्य निर्मिण्याचा हा प्रयोग अजून वर्तनवादी लोकांनी केलेला नाही. एवढे सामर्थ्य आपल्या ठायी आहे असा आत्मविश्वास असूनहि डॉ. वॉटसन याने मानसशास्त्राचा व्यवसायच पुढे सोडून दिला आणि तो व्यापारात शिरला. त्याच्या अनुयायांनीही हे विधात्याचे कार्य पुढे कधी करण्याचे मनात आणले नाही. कारण आपल्याला मन आहे हेच त्यांना मान्य नव्हते.

गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याच्या जबाबदारीतून मुक्त करणारा दुसरा मानसशास्त्रातला पंथ म्हणजे फ्रॉइडचा पंथ होय. डॉ. वॉटसनचा वर्तनवाद एकेकाळी बराच गाजला असला तरी लोकमतावर त्याचा फारसा प्रभाव कधी पडला नाही. कारण प्रत्येकाला स्वानुभूतीने जाणवणारे मन अस्तित्वातच नाही, असा विचित्र दावा त्याने मांडला होता. डॉ. फ्रॉइडच्या मनोविश्लेषणपंथाचे मात्र तसे नाही; आज मार्क्सवादाइतकेच याचे जगावर वर्चस्व आहे. वॉटसन मन नाहीच असे मानतो, आणि फ्रॉइड मनच सर्व आहे असे मानतो. पण आत्मस्वातंत्र्याच्या, मनुष्याच्या स्वतंत्र इच्छाशक्तीच्या दृष्टीने

दोन्ही सारखेच नियतिवादी आहेत. गुन्हेगारांना रोगी मानावे हे तत्त्व जगाने फ्रॉइडच्या सांगण्यावरून स्वीकारले आहे आणि प्रत्यक्ष आचरणांत आणले आहे.

मानवाच्या स्वाभाविक प्रवृत्ती या समाजविघातक आहेत. पण समाजात राहावयाचे तर त्या प्रवृत्ती मानवाला नियंत्रित कराव्या लागतात, दडपून टाकाव्या लागतात. यांतल्या काही अपप्रवृत्तींचे उन्नयन होते आणि त्यामुळे व्यक्ती श्रेष्ठपदाला जाते व समाजाचीही प्रगति होते. पण बऱ्याचशा प्रवृत्ती राखेखाली अग्नि राहावा तशा सुप्त अवस्थेत राहतात, आणि अनेक मार्गांनी मनुष्याचे वर्तन नियत करतात असे थोडक्यात फ्रॉइडचे मानसशास्त्र आहे. 'सायकोपॅथॉलजी ऑफ एव्हरी-डे लाइफ' असा एक ग्रंथ त्याने लिहिला आहे. त्यात आपल्या दैनंदिन व्यवहारातील नाव विसरणे, काम विसरणे, वाचताना शब्द चुकणे, लिहिताना तो चुकीचा लिहिणे, एखाद्या विशिष्ट आकड्याकडे विशेष कल असणे, मनात एक विचार असून नकळत कृती दुसरीच होणे, या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण लहानपणी दडपलेल्या भावना, आकांक्षा अप्रीती यांच्या संदर्भातून त्याने दिले आहे. तीन हा आकडा तुम्ही विसरला तर लहानपणी तीन नंबरच्या बहिणीशी तुमचे भांडण होत असे हे त्याचे कारण. केळी आणायची असून तुम्ही आणली नाहीत तर लहानपणी केव्हा तरी वडिलांच्या हातचा केळ्यावरून तुम्ही मार खाल्ला असावा, किंवा केळ्यावरून तुम्ही घसरून पडला असावा हे त्याचे कारण. सावली हा शब्द लिहिताना तुम्ही चुकलात तर लहानपणी अस्पृश्यांची सावली घेऊं नये हा विचार तुमच्या मनावर ठसविला गेला होता, हे त्याचे कारण. असे प्रत्येक कृतीचे मूळ कारण या निरुद्ध भावनात असते हेच त्याने या सर्व ग्रंथात दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक वाचीत असताना, ते लिहिताना लेखक शुद्धीवर नसावा अशी शंका येते. एरवी ती बोलून दाखविण्याचे धैर्य मला झाले नसते. पण अनेक मोठमोठ्या शास्त्रज्ञांनी याच शब्दांत त्याची संभावना केली आहे. प्रा. जोसेफ जॉस्ट्रो यांनी फ्रॉइडने मानवी मनाच्या अभ्यासाची एक नवी दिशा दाखविली हे मान्य करूनहि त्याची स्वप्नांची व दैनंदिन व्यवहारातील चुकांची शेकडो स्पष्टीकरणे केवळ हास्यास्पद व वेडगळ आहेत असे म्हटले आहे. या तर्क-प्रणालीने वाटेल ते सिद्ध करता येईल आणि त्यामुळे अनेक अनर्थ घडतील

त्याच्यावर जे बाह्य संस्कार होतील त्यांवर अवलंबून असते, त्याचे निराळे स्वत्व, त्याची अंतःशक्ती असे काही नसते, असा या पंथाचा सिद्धान्त आहे. हे मत डॉ. वॉटसनने इतक्या टोकाला नेले आहे की कोणत्याही व्यक्तीवर इष्ट ते संस्कार करून तिचे जीवन वाटेल त्या नमुन्याप्रमाणे घडविता येईल अशी तो ग्वाही देतो. 'मला एक डझन निरोगी मुले आणि त्यांचे योग्य व इष्ट ते संगोपन करण्यासाठी आवश्यक ती परिस्थिति व सामग्री द्या. मी तुम्हाला त्या मुलांतून वाटेल त्या प्रकारचा मनुष्य – वैद्य, वकील, शास्त्रज्ञ, व्यापारी, भिकारी, चोर, गुन्हेगार निर्माण करून दाखवीन,' असे आव्हानाचे उद्‌गार त्याने काढले आहेत. याचा अर्थ असा की न्यूटन, नेल्सन, टिळक, गांधी यांच्यासारखे थोर पुरुष किंवा टाटा-बिर्ला यांसारखे कारखानदार, किंवा भूपत, डिलिजरसारखे दरोडेखोर हुकमी निर्माण करणे समाजाच्या हाती आहे. हा परिस्थितिवाद मार्क्सवादापेक्षाही जास्त धाडसी आहे. अमक्या परिस्थितीमुळे अमका मनुष्य निर्माण होणारच असे मार्क्सवाद म्हणतो, तर वाटेल त्या कर्तृत्वाचा मनुष्य, भोवती इष्ट ती परिस्थिती कायम राखून, इच्छेप्रमाणे निर्माण करता येईल असा वर्तनवादाचा विश्वास आहे. जगाच्या सुदैवाने किंवा दुर्दैवाने इष्ट तो मनुष्य निर्मिण्याचा हा प्रयोग अजून वर्तनवादी लोकांनी केलेला नाही. एवढे सामर्थ्य आपल्या ठायी आहे असा आत्मविश्वास असूनहि डॉ. वॉटसन याने मानसशास्त्राचा व्यवसायच पुढे सोडून दिला आणि तो व्यापारात शिरला. त्याच्या अनुयायांनीही हे विधात्याचे कार्य पुढे कधी करण्याचे मनात आणले नाही. कारण आपल्याला मन आहे हेच त्यांना मान्य नव्हते.

गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्याच्या जबाबदारीतून मुक्त करणारा दुसरा मानसशास्त्रातला पंथ म्हणजे फ्रॉइडचा पंथ होय. डॉ. वॉटसनचा वर्तनवाद एकेकाळी बराच गाजला असला तरी लोकमतावर त्याचा फारसा प्रभाव कधी पडला नाही. कारण प्रत्येकाला स्वानुभूतीने जाणवणारे मन अस्तित्वातच नाही, असा विचित्र दावा त्याने मांडला होता. डॉ. फ्रॉइडच्या मनोविश्लेषणपंथाचे मात्र तसे नाही; आज मार्क्सवादाइतकेच याचे जगावर वर्चस्व आहे. वॉटसन मन नाहीच असे मानतो, आणि फ्रॉइड मनच सर्व आहे असे मानतो. पण आत्मस्वातंत्र्याच्या, मनुष्याच्या स्वतंत्र इच्छाशक्तीच्या दृष्टीने

दोन्ही सारखेच नियतिवादी आहेत. गुन्हेगारांना रोगी मानावे हे तत्त्व जगाने फ्रॉइडच्या सांगण्यावरून स्वीकारले आहे आणि प्रत्यक्ष आचरणांत आणले आहे.

मानवाच्या स्वाभाविक प्रवृत्ती या समाजविघातक आहेत. पण समाजात राहावयाचे तर त्या प्रवृत्ती मानवाला नियंत्रित कराव्या लागतात, दडपून टाकाव्या लागतात. यांतल्या काही अपप्रवृत्तींचे उन्नयन होते आणि त्यामुळे व्यक्ती श्रेष्ठपदाला जाते व समाजाचीही प्रगति होते. पण बऱ्याचशा प्रवृत्ती राखेखाली अग्नि राहावा तशा सुप्त अवस्थेत राहतात, आणि अनेक मार्गांनी मनुष्याचे वर्तन नियत करतात असे थोडक्यात फ्रॉइडचे मानसशास्त्र आहे. 'सायकोपॅथॉलजी ऑफ एव्हरी-डे लाइफ' असा एक ग्रंथ त्याने लिहिला आहे. त्यात आपल्या दैनंदिन व्यवहारातील नाव विसरणे, काम विसरणे, वाचताना शब्द चुकणे, लिहिताना तो चुकीचा लिहिणे, एखाद्या विशिष्ट आकड्याकडे विशेष कल असणे, मनात एक विचार असून नकळत कृती दुसरीच होणे, या सर्व गोष्टींचे स्पष्टीकरण लहानपणी दडपलेल्या भावना, आकांक्षा अप्रीती यांच्या संदर्भातून त्याने दिले आहे. तीन हा आकडा तुम्ही विसरला तर लहानपणी तीन नंबरच्या बहिणीशी तुमचे भांडण होत असे हे त्याचे कारण. केळी आणायची असून तुम्ही आणली नाहीत तर लहानपणी केव्हा तरी वडिलांच्या हातचा केळ्यावरून तुम्ही मार खाल्ला असावा, किंवा केळ्यावरून तुम्ही घसरून पडला असावा हे त्याचे कारण. सावली हा शब्द लिहिताना तुम्ही चुकलात तर लहानपणी अस्पृश्यांची सावली घेऊं नये हा विचार तुमच्या मनावर ठसविला गेला होता, हे त्याचे कारण. असे प्रत्येक कृतीचे मूळ कारण या निरुद्ध भावनात असते हेच त्याने या सर्व ग्रंथात दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. हे पुस्तक वाचीत असताना, ते लिहिताना लेखक शुद्धीवर नसावा अशी शंका येते. एरवी ती बोलून दाखविण्याचे धैर्य मला झाले नसते. पण अनेक मोठमोठ्या शास्त्रज्ञांनी याच शब्दांत त्याची संभावना केली आहे. प्रा. जोसेफ जॉस्ट्रो यांनी फ्रॉइडने मानवी मनाच्या अभ्यासाची एक नवी दिशा दाखविली हे मान्य करूनहि त्याची स्वप्नांची व दैनंदिन व्यवहारातील चुकांची शेकडो स्पष्टीकरणे केवळ हास्यास्पद व वेडगळ आहेत असे म्हटले आहे. या तर्क-प्रणालीने वाटेल ते सिद्ध करता येईल आणि त्यामुळे अनेक अनर्थ घडतील

हे त्यांनी दाखवून दिले आहे. ते म्हणतात की, ज्यामुळे काहीही सिद्ध होते, त्याने काहीही सिद्ध होत नाही, हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. शेवटी फ्रॉइडचा नियतिवाद हा प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीला टिकणे शक्य नाही, त्याच्यावर फ्रॉइडने टाकलेला भार पेलण्यास तो असमर्थ आहे असा त्यांनी निर्णय दिला आहे. (फ्रॉइड – हिज ड्रीम अँड सेक्स थिअरीज् –प्रकरण ७ वे) 'लिमिटेशन्स् ऑफ सायन्स' या आपल्या ग्रंथात फ्रॉइडविषयी चर्चा करताना प्रख्यात शास्त्रज्ञ जे. डब्ल्यू. एन्. सुलिव्हान म्हणतात की, 'मनुष्याच्या अत्यंत विविध प्रकारच्या कृति, त्याच्या वागणुकीतल्या सर्व लहानमोठ्या गोष्टी या कामगंडाने प्रेरित आहेत असे म्हणणे आणि त्या परमेश्वरप्रेरित आहेत असे म्हणणे एकच आहे. ज्या स्पष्टीकरणाने प्रत्येक गोष्ट स्पष्ट होते त्याने काहीच स्पष्ट होत नाही. –' (पृ. २०१).

फ्रॉइडमताविषयीचा हा अभिप्राय फार महत्त्वाचा आहे. मानवी जीवन संपूर्णपणे कधीच उलगडून दाखविता येणार नाही. जडसृष्टीप्रमाणे शास्त्रीय नियमांच्या किंवा कार्यकारणांच्या कैचीत ते बसवून दाखविणे हे अगदी अशक्य आहे, असा त्याचा अर्थ आहे. अशा स्थितीत कोणी तसा प्रयत्न केला तर जुन्या काळच्या परमेश्वराचाच त्यांना आश्रय करावा लागतो. हे शास्त्रज्ञ त्याला प्रत्यक्ष परमेश्वर म्हणणार नाहीत हे खरे. आपण काही शास्त्र सांगत आहो अशीच प्रौढी ते मिरवीत राहणार. पण त्यांनी मानलेली प्रेरकशक्ती ही सर्वंकष आहे, प्रत्येक गोष्ट तिने स्पष्ट करता येते, हे दाखविण्यासाठी ते जी ओढाताण करतात, वाटेल तसे धागेदोरे जोडतात, जे कार्यकारणसंबंध जुळवितात, ते पाहिले की, धर्मभोळे लोक प्रत्येक गोष्ट परमेश्वराशी नेऊन भिडविताना जी ओढाताण करतात ती व ही एकच आहे असे दिसू लागते. मार्क्सची ऐतिहासिक आवश्यकता ही अशीच अंबाभवानीसारखी आहे. ती सर्वव्यापी, सर्वसमर्थ, सर्वसाक्षी आहे. आर्थिक प्रगति खुंटताच ती अवतार घेते आणि जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी भक्तांना दर्शन देते. शास्त्रज्ञांचा अभिप्राय असा की मानवी जीवनाच्या संबंधात अशी शक्ती मानणे आणि परमेश्वर मानणे यात फरक नाही.

या दोघाही थोर शास्त्रज्ञांनी मानसशास्त्र हे शास्त्र नव्हे असे तर सांगितले आहेच. पण शिवाय जडशास्त्रांच्या ज्ञानालाहि आज मर्यादा पडत आहेत आणि

अनेक घटना शास्त्रीय कक्षेत येण्याचे नाकारीत आहेत, शास्त्र त्यांच्यापुढे हतबुद्ध होऊन बसले आहे, हे ते जगाच्या निदर्शनाला आणीत आहेत. यावरून आपण हे जाणले पाहिजे की मानवी मन अजून बव्हंशी अज्ञात आहे. कार्यकारणाच्या कैचीत ते कधीही बसणार नाही. आणि याचाच अर्थ असा की व्यक्तीला आत्म-स्वातंत्र्य आहे. व्यक्तीच्या मनावर अनुवंश, भौगोलिक परिस्थिति, घर, शाळा, धर्मपीठ येथे होणारे विविध संस्कार या सर्वांचा परिणाम होत असतो. पण त्याच्याही पलीकडे मनुष्याचे मन म्हणून काही राहतेच. कारण या सर्व संस्कारांच्या अगदी विरुद्धही अनेक वेळा त्याची ठेवण झालेली असते, हे व्यव-हारांत पदोपदी आपल्या अनुभवास येते. अमकी परिस्थिति म्हणजे असा मनुष्य, हे मुळीच ठरलेले नाही. धनाच्या साह्याने काही माणसे श्रेष्ठपदी जातात, काहींचा अधःपात होतो. संकटातच काही माणसांचे कर्तृत्व उमलून येते तर काहींचे संकटाने करपून जाते. यावरून असे स्पष्ट दिसते की परिस्थितीला उलट सुलट कलाटण्या देणारी, तिच्या निरपेक्ष मानवी भवितव्याला वळण लावणारी अशी मनुष्याच्या ठायी एक अंतस्थ शक्ती आहे. आणि कोणत्याहि नियमात ती बसत नसल्यामुळे ती स्वतंत्र आहे हे मान्य करावेच लागते.

हे मान्य करताच, मनुष्याच्या बऱ्यावाईट कृत्यांच्या परिणामांना तो जबाबदार नाही, परिस्थिति जबाबदार आहे, तेव्हा गुन्हेगारांना गुन्हेगार न मानता रुग्ण मानावे व त्यांना शिक्षा न करता त्यांच्यावर मानसोपचार करावे, या सगळ्या अर्वाचीन कल्पना म्हणजे वाऱ्यावरच्या वावड्या आहेत, त्यांना शास्त्रीय आधार कसलाहि नाही, हे आपल्या ध्यानात येईल.

ही सर्व शास्त्रीय चर्चा झाली. मनुष्य स्वतःच्या बऱ्यावाईट कृत्यांच्या परिणामांना जबाबदार आहे की नाही हा केवळ तात्त्विक चर्चेचा विषय असता तर त्याचा एवढा खल करण्याचे कारणही पडले नसते. पण तसे नाही. हा विषय समाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. कारण समाजाचा उत्कर्षापकर्ष, यांपैकी कोणते मत लोक स्वीकारतात, त्यावर फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. भारताने अनेक शतके कर्मतत्त्वाचा स्वीकार केला होता. पूर्वजन्मीच्या कर्माने मनुष्य बद्ध आहे. त्यातून मुक्त होणे त्याला जवळ जवळ अशक्य आहे, असे मत येथे हजारो वर्षे रूढ आहे. परमेश्वर जगाचा सूत्रधार आहे आणि सर्व मानवप्राणी तो लीलानाटक बाहुल्याप्रमाणे खेळवीत असतो, त्यांना

स्वातंत्र्य असे काही नसते हेही मत वरच्याप्रमाणेच येथे दृढमूल झालेले आहे. किंबहुना ही दोन्ही मते एकच आहेत असे पुष्कळ लोक मानतात.

ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति
भ्रामयन् सर्व भूतानि यंत्रारूढानि मायया —गीता १८.६१

ईश्वर हा सर्व प्राणिमात्रांना यंत्रावर चढवून आपल्या मायेने त्यांना फिरवीत असतो, असे गीता सांगते. परमेश्वराची ही माया म्हणजेच कर्म होय. या कर्माने मनुष्य बद्ध आहे. परमेश्वराची त्याने भक्ती केली तर त्यातून तो मुक्त होईल. पण भक्ति करावी ही बुद्धी होणे न होणें हे सुद्धा कर्मावर अवलंबून आहे. कारण 'बुद्धिः कर्मानुसारिणी ! ' केवळ मानवच या कर्माने बद्ध आहे असे नव्हे तर ब्रह्मा, विष्णु, शंकर, सूर्य, इन्द्र इ. सर्व देवहि या चक्रात सापडलेले आहेत, अशा अर्थाची अनेक वचने संस्कृतात आहेत. भर्तृहरीने तर म्हटले आहे की, सर्व देव असे कर्मवश असल्यामुळे त्यांना नमस्कार करण्यात अर्थ नाही. त्यापेक्षा कर्माला करावा हे बरे.

मनुष्य कर्माने बद्ध आहे याचाच अर्थ असा की त्याला इच्छा-स्वातंत्र्य किंवा प्रवृत्ति-स्वातंत्र्य नाही. आणि मग अर्थातच त्याच्या भवितव्याला तो जबाबदार नाही. हे मत आपल्या समाजात रूढ झाल्यामुळे या देशाला सात आठ शतके कोणची दुर्गती प्राप्त झाली होती हे इतिहास सांगतोच आहे. कर्मतत्त्वावरील श्रद्धेमुळे माणसे दैववादी होतात आणि त्यांच्या ठायीचे सर्व कर्तृत्व नष्ट होते. यातूनच निवृत्तिवाद निर्माण होऊन त्याने सर्व समाजाला एकदा ग्रासले की तमोयुग निर्माण होऊन समाज शतकानुशतके अज्ञान, दारिद्र्य, पारतंत्र्य या नरकवासात खितपत पडतो. ब्रिटिश येथे येण्यापूर्वी सात आठ शतके भारत असाच तमोयुगात निश्चेष्ट होऊन पडला होता, त्याचे कारण हेच आहे. मानव बद्ध आहे, त्याला प्रवृत्तिस्वातंत्र्य नाही या तत्त्वावरील श्रद्धा !

येथे एक खुलासा करणे अवश्य आहे. भारतातल्या कर्मतत्त्वाचा असा अर्थ आहे की नाही याविषयी मतभेद असणे शक्य आहे, नव्हे तसे आंहेतच. तसेच मार्क्सचे ऐतिहासिक आवश्यकतेचे तत्त्व व फ्रॉइडचे (लिबिडो) कामगंडाचे तत्त्व याबद्दलहि मतभेद आहेत. वर या दोन तत्त्ववेत्त्यांच्या मतांचे जे अर्थ केले आहेत तसे ते नाहीत आणि त्यामुळे त्यातून जर काही अनर्थ झाले

असतील तर त्याला ते मुळीच जबाबदार नाहीत, असे अनेक पंडितांचे मत आहे. आपल्या प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने याला महत्त्व नाही. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा समाजाने काय अर्थ केला, याला महत्त्व आहे. कारण मूळ तत्त्व कसेही असले तरी समाज त्याचा अर्थ व आचार काय करील यावर त्याचा उत्कर्षापकर्ष अवलंबून राहणार हे उघड आहे. गीतेच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होईल. श्रीकृष्णाच्या मनात गीतातत्त्वाचा एकच अर्थ असेल. पण आज गीतेचे अनेक तऱ्हांनी अर्थ लावले जातात. गीता निवृत्तिपर आहे की प्रवृत्तिपर हा मोठाच वाद आहे. आणि मूळ गीतेची जेव्हा चर्चा करावयाची असेल तेव्हा त्याला फारच महत्त्व आहे. प्रस्तुत विचाराच्या दृष्टीने कोणच्या काळी समाजाने त्याचा कोणता अर्थ केला आणि त्याचे परिणाम काय झाले एवढ्याच प्रश्नाला महत्त्व आहे. 'जे का रंजले गांजले त्यांसी म्हणे जो आपुले', 'मुख्य पूजेचे आयतन प्राणिमात्रा सुखदान', 'दया करणे जे पुत्रासि तेचि दासा आणि दासी' अशी अनेक वचने आपल्या संतवाङ्मयात आहेत. तशी धर्मग्रंथातही आहेत. पण आपण फक्त वैयक्तिक पुण्याच्या दृष्टीनेच त्यांचा विचार केला आणि युरोपीय लोकांनी, सामाजिक पुण्याच्या दृष्टीने त्यांचा अर्थ लावला. त्यामुळे त्यांच्या व आपल्या वैभवात जमीनअस्मानाचे अंतर पडले. ते सर्व जगाचे जेते झाले व आपण सर्व जगाचे दास झालो. तेव्हा मूळ तत्त्वज्ञानाचा कोणता अर्थ समाजात रूढ होतो त्यालाच फक्त प्रस्तुतच्या विवेचनाच्या दृष्टीने महत्त्व आहे, हे ध्यानी घ्यावे.

त्या दृष्टीने पाहता पूर्वकर्म ही नियती आहे, मनुष्य स्वतःचे भवितव्य ठरविण्यास असमर्थ आहे, त्याला कसलेहि इच्छास्वातंत्र्य नाही, कर्माच्या रहाटगाडग्यात सापडल्यावर गाडग्याप्रमाणे वरखाली फिरत राहणे एवढेच मनुष्याच्या हाती आहे, हे तत्त्वज्ञान भारतात आणि एकंदर पूर्वेकडच्या बहुतेक देशात अनेक शतके रूढ झाले होते आणि त्यामुळेच हे देश या काळात जीवहीन, चैतन्यहीन होऊन गेले होते, हे कोणालाही मान्य करावे लागेल असे वाटते. या काळात मधूनमधून काही पराक्रमी महापुरुष निर्माण झाले हे खरे; पण त्यांनी हे कर्मतत्त्व, ती निवृत्ती, ती कालवशता, ती जन्मवशता, हे सर्व उधळून दिले होते असे इतिहास सांगतो. त्यांच्या हातून पराक्रम झाले आणि काही काल त्यांचा समाज उत्कर्ष पावला याचे कारण हेच आहे. पण

सामान्यतः या देशात या दीर्घकालखंडात 'आपण बद्ध आहो, पराधीन आहो, दैवायत्त आहो, प्रवाहपतित आहो, प्राक्तनात असेल तसे होणार आहे, विधिलिखित चुकत नाही', हेच तत्त्वज्ञान जनमानसात दृढमूल झाले होते, याविषयी दुमत होईलसे वाटत नाही.

आपण परिस्थितिवश आहो, आपल्या हाती काही नाही, आपल्या अपकर्षाची जबाबदारी आपल्यावर नाही, आपला उत्कर्ष साधणे आपल्या हाती नाही हे तत्त्वज्ञान ज्या समाजाने पत्करले त्याचा कसा अधःपात होतो, तो कसा कर्तृत्वहीन होतो हे पाहण्यासाठी अगदी नजीकचे उदाहरण घ्या. ते म्हणजे महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर समाजाचे. १८५० पासून या समाजाने असले तत्त्वज्ञान पत्करले आहे. आपल्या नाशाला, अधःपाताला दरवेळी ब्राह्मण कारणीभूत झाले आहेत, असे हा समाज आज शंभर वर्षे मानीत आला आहे आणि अजूनही मानीत आहे. कौरवपांडवांपासून आज हजारो वर्षे क्षत्रिय राजे आपसात लढत आहेत व स्वतःचा नाश करून घेत आहेत. पण महात्मा फुले व त्यांचे अनुयायी यांचे मत असे की क्षत्रिय लढले ते ब्राह्मणांच्या चिथावणीमुळे लढले. लढू नये हे त्यांना कळत होते. पण ब्राह्मणांनी त्यांच्यात कलह लावून दिला. दशरथाने रामाला वनात हाकलून दिले व रामाने पुढे सीतात्याग केला हे सर्व ब्राह्मणांनी घडवून आणले. आपल्या समाजात अस्पृश्यता आहे. जातिभेद आहे. चातुर्वर्ण्य आहे. या सगळ्यांचे सर्व क्षत्रिय राजांनी अट्टाहासाने रक्षण केले आहे. म्हणजे समाजातील या विषमतेला क्षत्रिय फार जबाबदार आहेत. पण ब्राह्मणेतर पंडितांचे म्हणणे आहे की ब्राह्मणांनी हा विषमतेचा धर्म लिहिला व मग त्यांच्यावर कृपा म्हणून क्षत्रियराजांनी त्याला पाठिंबा दिला! तेव्हा त्यातून जी अनर्थपरंपरा ओढवली तिला आम्ही जबाबदार नाही. ते अपश्रेय ब्राह्मणांचे आहे. अनेक क्षत्रिय राजे, सरदार स्वामिद्रोही झाले. देशद्रोही झाले. पण ते ब्राह्मणांचेच कारस्थान. क्षत्रिय भोळे असतात, ब्राह्मण त्यांना सहज फसवितात. तेव्हा स्वामिद्रोहाची, देशद्रोहाची जबाबदारी त्यांच्यावर येत नाही. (या विषयाचे सविस्तर विवेचन 'भारतीय लोकसत्ता" या माझ्या ग्रंथात 'ब्राह्मण–ब्राह्मणेतरवाद' या प्रकरणात केलेले आहे.) मागल्या काळाविषयी असे लिहून ब्राह्मणेतर पंडित थांबले नाहीत. १८५० च्या नंतरच्या काळातहि मराठा समाज व इतर ब्राह्मणेतर समाज

मागासलेला राहिला, त्याला कारणहि त्यांच्या मते ब्राह्मणच. ब्राह्मणांनी त्यांना शिक्षण घेऊ दिले नाही. सावकारी करून त्यांना छळले व भारताचे कल्याणकर्ते जे इंग्रज त्यांच्या राज्याला विरोध केला. वास्तविक ब्राह्मणेतरांना शिक्षण देणे न देणे हे या काळात ब्राह्मणांच्या हाती मुळीच नव्हते. महात्मा फुले यांनी अस्पृश्यांसाठीसुद्धा शाळा काढली होती, त्यावरून हे स्पष्ट आहे. राजर्षी शाहू, सयाजीराव गायकवाड, ग्वाल्हेरचे शिंदे यांनी, मराठ्यांनी शिकावे यासाठी फार प्रयत्न केले. पण त्या समाजाला त्याचे महत्त्व वाटले नाही. त्याने शिकावयाचे ठरविले असते तर त्याला अडविणे ब्राह्मणांना कालत्रयी शक्य झाले नसते. पण आपल्या मागासलेपणाला ब्राह्मणच जबाबदार आहेत, असे या पंडितांनी कायमचे ठरवून टाकले आहे. आणि दुर्दैव असे की या दुरवस्थेतून आपण आपल्या हिमतीवर सुटू शकणार नाही, इंग्रजच आपल्याला सोडवू शकतील हाही विचार त्यांनी बहुजनसमाजात दृढमूल करून टाकला. या एवढ्या काळात ब्राह्मण सावकार व गुजराती वाणी खेड्यातल्या कुणब्याला नागवीत होता हे खरेच आहे. पण हा अनर्थ टाळण्यासाठी मराठा सावकार, मराठा दुकानदार निर्माण करण्याचा प्रयत्न ब्राह्मणेतर धुरीणांनी मुळीच केला नाही. विज्ञानाच्या अभावामुळे, सृष्टि-घटनांच्या अज्ञानामुळे, लोकभ्रमामुळे, बुद्धिवादाच्या अभावामुळे, गरीब जनता पुरोहितवर्गाच्या वर्चस्वाखाली येते. त्यातून तिला सोडविण्यासाठी भौतिक ज्ञानाचा प्रसार करणे हा एकमेव उपाय आहे. पण ब्राह्मणेतरांनी हा प्रयत्न मुळीच केला नाही. तरीपण आपल्या अधःपाताला आपण जबाबदार आहो असे त्यांना वाटत नाही. त्यामुळे या समाजातून ब्रिटिशांच्या आगमना-पूर्वी जसे कर्तृत्वशाली पुरुष निर्माण झाले तसे गेल्या शंभर वर्षात झाले नाहीत. भारतातील इतर प्रांतातून महात्माजी, वल्लभभाई, विठ्ठलभाई, स्वामी विवेकानंद, स्वामी श्रद्धानंद, लजपतराय, डॉ. राजेंद्रप्रसाद हे जसे अखिल भारताचे नेतृत्व करण्यास समर्थ असलेले पुरुष ब्राह्मणेतर समाजात निर्माण झाले तसे महाराष्ट्रात झाले नाहीत. इतिहासकार, तत्त्ववेत्ते, वक्ते, कवी, नाटककार, गणितज्ञ, अर्थवेत्ते हेही त्या समाजातून उदयास आले नाहीत. १९३० नंतर, इंग्रज आपले त्राते, ही भावना या समाजातून गेली. पण अजूनही हा समाज अंतर्मुख होऊन आत्मसंशोधन करीत नाही. आपल्या अधःपाताला

आपण जबाबदार आहो ही जाणीव स्वतःला व स्वसमाजाला करून देण्यास तो अजूनही सिद्ध नाही. हे नाही तोपर्यंत वरील वैभवशाली कर्तृत्व तो निर्माण करू शकणार नाही.

सुदैवाने डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला हे महनीय तत्त्व पटवून देण्याची शिकस्त केली आहे. सर्व समाज व विशेषतः ब्राह्मण यांच्यावर ते भडिमार करतात, आग पाखडतात. आणि ते करणे योग्यच आहे. कारण अस्पृश्यांच्या हीनावस्थेला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे त्रैवर्णिक निश्चितच जबाबदार आहेत. पण काही झाले तरी अंती स्वतःच्या उत्कर्षापकर्षाला ज्याचा तोच जबाबदार असतो, अंतिम जबाबदारी त्याचीच असते, हा कटु पण सत्य विचार आंबेडकर अस्पृश्यांच्या मनावर ठसवीत असत. त्या समाजापुढे बोलताना शत्रू वापरणार नाही, अशा कटु आणि मर्मभेदक शब्दात ते लोकांना बोलत. सवर्ण समाजाने खूप छळले पण तुम्ही ते का सोसले, तुम्ही अन्यायाचा प्रतिकार करताना मरून का गेला नाहीत ? असा सवाल ते करीत; आणि त्यांच्यापुढे जगायचे असेल तर वाघ म्हणून, नेते म्हणून जगा, शेळी म्हणून, गुलाम म्हणून, जगू नका, असा उपदेश करीत.

विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर हे पदोपदी इंग्रजी राज्यामुळे भारतात कसे अनर्थ होत आहेत, हे भारतीय जनतेला समजावून देत असत. टिळकांनी तर त्या ब्रिटिश राज्याविरुद्ध भारतात असंतोष निर्माण केला. येथल्या दारिद्र्याला, येथल्या विघटनेला आणि भारताच्या हरएक प्रकारच्या विपन्नावस्थेला ब्रिटिशच जबाबदार आहेत असे या धुरीणांचे निश्चित मत होते. पण असे असले तर अंती आपल्या पारतंत्र्याला, दैन्याला, दुबळेपणाला आपले आपणच कारण आहो या विचाराचा त्यांना कधीही विसर पडला नव्हता. इंग्रजांवर त्यांनी एकपट टीका केली असली तर स्वसमाजावर दसपट केली आहे. आपले अज्ञान, आपली देशाभिमानशून्यता, कूपमंडूक वृत्ती, आपल्या रक्तात भिनलेली निवृत्ती, आपली विषम समाजरचना, शास्त्रज्ञानाचा अभाव, हे आपले दुर्गुणच सर्व अनर्थाच्या बुडाशी आहेत हे ते कंठरवाने सांगत असत. हा दृष्टिकोनच समाजाचा उदय घडवून आणीत असतो. आपल्या सर्व अधःपाताचे खापर ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या माथी फोडून ते थोर पुरुष स्वस्थ बसले असते, तर शतकानुशतके आपण पारतंत्र्यातच राहिलो असतो. केमालपाशा

नेहमी म्हणत असे की, जगात जुलूम चालतो, किंवा जुलूम करणारे लोक असतात, हे मला मान्यच नाही. मला एकच सत्य माहीत आहे. जगात जुलमापुढे मान वाकविणारे, भेकडपणे अन्याय सोसणारे लोक फक्त असतात !

जे समाजाच्या बाबतीत तेच व्यक्तीच्या बाबतीत खरे आहे. कोणत्याही कारणाने व्यक्तीने परिस्थितिवाद स्वीकारला, आपल्या अध:पाताचे उत्तरदायित्व आपल्याकडे नाही, अशी समजूत करून घेतली, 'ते समाजाला विचारा' अशी वृत्ति स्वीकारली की, तिला व म्हणूनच समाजाला झपाट्याने अवकळा येऊ लागते. याबाबत अमेरिकेचे उदाहरण अत्यंत उद्बोधक आहे. नवी तत्त्वज्ञाने अंधपणे स्वीकारण्यापूर्वी भारताने सध्याच्या अमेरिकन समाजाचा फार बारकाईने अभ्यास करणे अवश्य आहे.

अमेरिकेत आज गुन्हेगारी किती वाढली आहे याची सहजासहजी आपल्याला कल्पना येणार नाही. पण आपला समाज सर्वनाशाच्या कडेवर येऊन ठेपला आहे, असे तेथले विचारवंत आज सांगू लागले आहेत. दर १९ सेकंदाला तेथे एक गुन्हा घडतो. म्हणजे वर्षाला १६ लक्ष गुन्हे होतात. त्यात १२९६० खून असतात. दिवसाला तेथे ३६ खून होतात ! हे आकडे १९४९ सालचे आहेत. आता हे प्रमाण दुपटीवर सहज गेले असेल. वेड्या माणसांचे प्रमाण तेथे असेच वाढत आहे. १८८० साली दर लाखात ६४ माणसे वेडी असत. १९४६ साली हे प्रमाण ३७५ वर आले आहे. चोरी, सुरामारी, बलात्कार, दरोडेखोरी याला तेथे सीमाच राहिली नाही. त्या समाजाचा हा भयानक अध:पात कशामुळे झाला आहे ?

आज पन्नाससाठ वर्षे अमेरिका नवे अर्थशास्त्र, नवे मानसशास्त्र, नवे गुन्हेगारीचे शास्त्र यांच्या आधारे समाजावर उपचार करीत आहे. शिवाय गुन्हा अपरिहार्य करून टाकणारी परिस्थिति तर तेथे आता मुळीच नाही. दारिद्र्य, अन्नान्न दशा, बेकारी, उपासमार यांमुळे मनुष्य गुन्ह्याला प्रवृत्त होतो असे पूर्वी रूढ मत होते; पण सध्या अमेरिकेत ऋद्धीसिद्धी पाणी भरीत आहेत. कामगारांना ४०० रु. महिना हे किमान वेतन आहे. अमुक एक सुखसोय तेथल्या जीवनात नाही, असे नाहीच. कामवासनेच्या तृप्तीचा तेथे प्रश्नच उद्भवत नाही. तारुण्यात पदार्पण करताच, किंवा त्याच्या आधीच तरुणतरुणींना एकमेकांचा सहवास, अगदी निकट सहवास लाभतो. सत्तेपासून

वंचित असा समाज, असा वर्ग तेथे नाही. प्रत्येक व्यवहार लोकायत्त असल्यामुळे आणि हजारो सार्वजनिक संस्था प्रत्येक प्रांतात असल्यामुळे आपल्या अहंगंडाची तृप्ती प्रत्येकाला करून घेता येते. खेळ, नाटय, नृत्य, काव्य, यातून वासनांचे उन्नयन व निचरा करण्याची संधि जगात कोठे नसेल इतकी तेथे आहे. असे असूनही तेथे दरसाल गुन्हेगारांची, बालगुन्हेगारांची, घटस्फोटांची, वेडयांची, भ्रष्टांची, पतितांची, अफीणांची, जुगाऱ्यांची संख्या वाढतच आहे.

या सर्वाला कारण नवा परिस्थितिवाद, नवे मानसशास्त्र, हे आहे असे अमेरिकेतील विचारवंतच आता सांगू लागले आहेत. 'ते समाजाला विचारा' ही वृत्ती या अनर्थाला कारण झालेली आहे. 'नॅशनल शेरीफ असोसिएशन-' पुढे बोलताना डॉ. रूथ अलेक्झांडर यांनी हेच विचार मांडले आहेत. "बाल गुन्हेगारांना मायाळूपणे वागवावे, त्यांना गुन्हेगार न मानता रोगी मानावे, त्यांच्या मनोव्यापाराचे मानसशास्त्रीय अवगाहन करावे, या विचारसरणीतून हे अनर्थ निर्माण झाले आहेत. याचा परिणाम असा झाला की आपल्याला कसलीही शिक्षा होत नाही हे ध्यानात आल्यामुळे बाळांच्या मनातला दैवी अंश जागा होण्याऐवजी सैतान फक्त जागा झाला आहे," असे त्या म्हणतात. न्यायमूर्ति विल्फ्रेड वॉल्टमेड यांच्या मते या गुन्हेगारीच्या वाढीला सध्याची शिक्षणपद्धति म्हणजे तेथले **मानसशास्त्र** हे कारण आहे. मुलांना स्वातंत्र्य द्यावे, त्यांचे मानसशास्त्र पाहावे, त्यांचा आत्माविष्कार होऊ द्यावा, हे जे थोतांड माजले आहे त्याचे हे परिणाम आहेत. घरी, दारी, शाळेत, कोठेही मुलांच्यात अपप्रवृत्ती दिसताच त्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे, असे त्यांचे मत आहे. यावरून मुलांना त्यांच्या गुन्ह्याबद्दल जबाबदार धरावे असे न्यायमूर्तींचे मत आहे हे स्पष्ट दिसते. जेन व्हाईट ब्रेड या बाईंनी नव्या मानसशास्त्राने अमेरिकन घरात काय अनर्थ घडविला आहे त्याचे सविस्तर वर्णन केले आहे. मुलांना दटावावे, काही गोष्टी त्यांना मना कराव्या, हे कोठे राहिलेच नाही. कारण त्यांच्या वासना दडपल्या जातील; आणि मग त्यांच्या नेणीवेत अनिष्ट गंड तयार होतील ! माझा मुलगा जिम याला त्या अमक्या चित्रपटाला जायचे आहे. तो चित्रपट घाणेरडा आहे हे आम्हाला – त्याच्या मातापित्यांना – माहीत आहे. पण आपल्या मनाईने त्याची इच्छा दडपणे योग्य नव्हे म्हणून

आम्ही गप्प बसतो व जिम त्या घाणेरड्या चित्रपटाला जातो. सॅली चार वर्षांची आहे. धाकट्या बाळाला दूध पाजू लागताच ती रोज बाटली हिसकून घेते. मग आईने काय करावे? ती बाहेर गेल्यावर बाळाला बाटली द्यावयाची! कारण सॅलीला रागावले तर बहिणीबद्दल तिला वाटणारा मत्सर दडपला जाईल! एका स्त्रीचा १० वर्षांचा मुलगा फिलिप घरात चोऱ्या करू लागला. त्याने वडिलांच्या खिशातील नोटा लांबविल्या. पुढे चोरी उघडकीला आल्यावर आईने त्याला जाब विचारला. तो म्हणाला, 'मला निष्णात चोरी करता येते की नाही हे पहावयाचे होते.' त्याला शिक्षा करण्याचे धैर्य आईला झाले नाही. कारण ती व्हिक्टोरियन युगातली ठरली असती! ही उदाहरणे सांगून, आम्हा मातापित्यांच्या दुबळेपणाला फ्रॉईडचे मानसशास्त्र कारणीभूत आहे, असे जेन व्हाइट ब्रेडने म्हटले आहे.

अलेक्सिस कॅरेल या थोर शास्त्रज्ञाने हेच मत दिले आहे. त्याने सर्वच परिस्थितिवादी पंथांचा विचार केला आहे. तो म्हणतो की, अर्थवादी लोकांनी हे ध्यानात घ्यावे, की रोजगार, अन्न, विश्रांती यांखेरीज आणखीही कशाची तरी मनुष्याला गरज असते. शरीर-गरजांप्रमाणेच आत्मिक गरजाहि मनुष्याला असतात. आणि आर्थिक आपत्तींना नैतिक व वैचारिक कारणेही असू शकतात. मनुष्याला अर्थबद्ध यंत्र मानणे हे जसे घातक तसेच, तो केवळ मनोगंडाधीन आहे असे मानणे हेही घातक आहे, हा विचार सांगून कॅरेल म्हणतो की, फ्रॉइडने जडवादी लोकांपेक्षाही समाजाचा घात केला आहे. (मॅन दि अन्नोन, पृ. २५८) अमेरिकन पंडित हळूहळू भ्रामक परिस्थितिवादातून बाहेर पडत आहेत असे दिसत आहे. 'सोसायटी इन ट्रॅंझिशन' या आपल्या ग्रंथात हॅरी बार्नेस याने सविस्तर विवेचन केले आहे. तो म्हणतो की, मनोदौर्बल्यामुळे गुन्हे घडतात किंवा गरिबीमुळे मनुष्याची तिकडे प्रवृत्ती होते हे मत आता मागे पडत आहे. कारण वस्तुस्थिती त्याला आधार देत नाही. बहुतेक गुन्हेगार चांगले बुद्धिमान व धूर्त असतात. आणि अमेरिकेतील संघटित गुन्हेगारीचा व गरिबीचा काहीच संबंध नाही. बहुतेक गुन्हेगार चांगले प्रतिष्ठित व सुस्थित असे असतात (पृ. ७२०).

अर्वाचीन काळात लोकायत्त देशात शास्त्राच्या आधाराने मानवाच्या मानवत्वाचा, त्याच्या व्यक्तित्वाचा, त्याच्या इच्छास्वातंत्र्याचा, प्रवृत्ति-

स्वातंत्र्याचा जो समाजाने अवमान केला आहे, त्याचे हे सर्व दुष्परिणाम आहेत. जुन्या कर्मतत्त्वाचीच ही नवी रूपे आहेत. नियतीच्या, कर्माच्या हातचे मनुष्य हे बाहुले आहे, असे सनातन पंडित मानीत. आता आर्थिक परिस्थितीच्या किंवा सुप्त मनोगंडांच्या हातचे ते बाहुले आहे, असे नवे पंडित सांगतात. दोन्हींचा तात्पर्यार्थ एकच होतो. मानवाला आत्मस्वातंत्र्य नाही! वास्तविक मानवाच्या जीवनाची सर्व प्रतिष्ठा त्याच्या आत्मस्वातंत्र्यात आहे. आणि मानवी जीवनाची प्रतिष्ठा हा तर लोकशाहीचा पाया मानला जातो. तरी सर्वात पुढारलेल्या लोकायत्त देशांनी ती प्रतिष्ठा धुळीस मिळवावी यापरता दैवदुर्विलास कोणता? मानवाला त्याच्या कृत्याबद्दल जबाबदार धरणे, यातच खरोखर त्याची प्रतिष्ठा राखली जाते. नाहीतर त्याच्यात आणि दगडात फरक तरी कोणता? त्याच्यावर परिस्थितीचे परिणाम होत नाहीत असे कोणीच म्हणत नाही. वर सांगितलेच आहे की, आनुवंश, भौगोलिक परिस्थिती, शिक्षणसंस्कार, सर्व सर्व गोष्टींचा त्याच्यावर परिणाम होत असतो. पण जडवस्तूप्रमाणे अमक्या संस्काराचा अमुक परिणाम, अमक्या परिस्थितीचे हे फल असे मुळीच सांगता येत नाही. यावरून मानवाच्या अंतरात बाह्य संस्कारांच्या परिणामाचे, स्वतःच्या इच्छेप्रमाणे वाटेल ते रसायन तयार करणारी अशी एक स्वतंत्र शक्ती आहे हे उघड दिसते. या शक्तीच्या आधारावरच धर्म, नीति, या निष्ठा आजपर्यंत जगत आल्या आहेत. आता या नव्या शास्त्रांनी त्यांचा तो आधार काढून घेतला आहे. म्हणून मानवाचे चारित्र्य, त्याची नीति, त्याचा धर्म हे सर्व निराधार झाले आहे.

अलेक्सिस कॅरेलच्या मते पाश्चात्त्य संस्कृतीचा, अमेरिकन संस्कृतीचा झपाट्याने ऱ्हास होत आहे. आणि जडसृष्टीचे नियम मानवाला लावणे हे त्याचे त्याच्या मते प्रधान कारण आहे. गणिताने, फूटपट्टीने, तराजूने जे मोजता येत नाही, ज्याचा काटेकोर हिशेब करता येत नाही, ज्याचे बिनचूक मापन करता येत नाही, ते गौण होय, त्याला महत्त्व नाही असे शास्त्रज्ञ मानतात. कोणी कोणी त्याचे अस्तित्वच नाकारतात. कॅरेलच्या मते विज्ञानाने हा अत्यंत मोठा प्रमाद केला आहे. मानवाच्या बाबतीत तर जे मापनीय आहे, गण्य आहे, त्याच्यापेक्षा जे अमापनीय, अगण्य आहे तेच जास्त महत्त्वाचे आहे. आणि मानवाची धर्मनिष्ठा, नीतिनिष्ठा, त्याच्या भावना, त्याची सुखदुःखे,

त्याची ज्ञानलालसा, सौंदर्याभिरुची हे सर्व अगण्य असे आहे. याची अवहेलना केल्यामुळे मानवाचा अध:पात होत आहे.

या अगण्य अशा अंत:शक्तीच्या बळावरच मानव हा मानव झाला आहे. आणि तिच्यामुळे स्वत:च्या अंत:सृष्टीवर व बाह्यसृष्टीवर मनुष्याने प्रभुत्व प्रस्थापित केले आहे. असे असताना, माझा मी प्रभु नाही, माझ्या हातून जे घडले त्याला मी जबाबदार नाही, ही भूमिका मानवाने घेणे हा त्याचा कमालीचा अध:पात आहे. परिस्थिति म्हणजे तरी काय ? अन्य मानवांनी आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर ठरवलेले कायदे, प्रसृत केलेले विचार, दृढमूल केलेल्या रूढी आणि रूढविलेली समाजाची रचना. हे सर्व जर वाईट असले तर दुसऱ्या मानवांनी आपल्या इच्छाशक्तीने ते हाणून पाडणे, बदलणे, हाच त्यावर उपाय आहे. परिस्थिति म्हणजे दुसऱ्या कोणाची तरी इच्छाशक्तीच असते. आणि ती सुधारण्यास दुसरी इच्छाशक्तीच अवश्य असते. अशा स्थितीत एखाद्याची इच्छाशक्ती कमजोर झाली आणि तो परिस्थितीला बळी पडला तर त्याच्याविषयी सहानुभूती दाखविणे, त्याला साह्य करणे योग्य ठरेल इतकेच. पण त्याचे समर्थन करणे म्हणजे मानवत्वाचा पायाच उखडून टाकणे होय. गडकऱ्यांची द्रुमन ही अबला आहे. असहाय आहे. तिला संयम, मनोनिग्रह साधला नाही. ती दुष्टाच्या कारस्थानाला बळी पडली. तिच्याबद्दल अनुकंपा वाटणे, तिला जवळ घेणे सर्वथैव योग्य आहे. पण ती असहाय स्त्री बळी पडली म्हणून ही सहानुभूती आहे. पण ती जर 'ते समाजाला विचारा' 'ते राक्षसी रूढीला विचारा' असे म्हणून आपले समर्थन करू लागली तर तितकी अनुकंपा वाटणार नाही. कारण संयम करणे, निग्रह करणे याचें आत्म-स्वातंत्र्य असलेली ती एक मानव-व्यक्ती आहे, याच कल्पनेला त्यामुळे धक्का बसतो. तरी तिच्या बाबतीत सर्वच क्षम्य वाटणे हे शक्य आहे. पण परीक्षेत वाममार्गाचा विद्यार्थ्याने अवलंब केला आणि त्यात त्याचा दोष नाही, असे त्याचे प्राध्यापक म्हणू लागले तर ते दोघेही गुन्हेगार आहेत असे म्हणावे लागेल. कारण तेथे मनुष्याला त्यांनी लाकडाचा ओंडका मानले, असे होते. परीक्षेला महत्त्व आहे तर जास्त अभ्यास करणे, कसून मेहनत करणे आणि परिस्थितीवर मात करणे हे सामर्थ्य मानवाच्या ठायी आहे. असे असताना परिस्थितीला दोषी ठरवून त्या विद्यार्थ्याला दोषमुक्त करणे म्हणजे

मानवाचे मानवत्वच नाकारणे होय. महात्माजींनी केलेले अबदुल रशीदचे समर्थन तर अत्यंत विपरीत आणि तितकेच समाजघातक आहे. महात्माजी म्हणाले की, तो गुन्हेगार नाही. तर ज्यांनी प्रक्षोभ माजविला ते गुन्हेगार! ते तरी गुन्हेगार काय म्हणून? प्रक्षोभ माजवावा अशी त्यांना बुद्धी झाली. हाही दुसऱ्या परिस्थितीचा परिणामच होय. किंवा त्यांच्या मनातल्या पूर्वीच्या सुप्त गंडांनी त्यांना प्रेरित केले असेल; म्हणून ते गुन्हेगार नाहीत. आणि महात्माजी मोठ्या औदार्याने त्याला भाई म्हणाले हाही त्यांच्या ठायीच्या कोठल्या तरी सुप्त अहंगंडाचा परिणाम होय असे म्हणावें लागेल. एका खून करणाऱ्या मानवाला जबाबदारीतून मुक्त करून भागणार नाही. सर्वांनाच ओंडके करून टाकावे लागेल. म्हणजे त्यांना आत्मस्वातंत्र्य नाही असे म्हणावे लागेल. अमेरिकेचा अधःपात या नव्या उदार दृष्टीमुळेच झाला आहे असे अलेक्सिस कॅरेलचे म्हणणे आहे. (मॅन दि अन्नोन, पृ. २५०)

सध्या स्वतंत्र अवलोकन व शास्त्राभ्यास यांचा भारतात अभाव असल्यामुळे आपणही अमेरिकेतले औदार्याचे प्रयोग करीत आहोत. शाळेत मुलांना शिक्षा करावयाची नाही, घरी धाक दाखवावयाचा नाही, आणि समाजात, सभा-संमेलनात, युवक-महोत्सवात त्यांचा आत्माविष्कार होऊ द्यावयाचा. याचा परिणाम काय होतो आहे ते दिसतेच आहे. विद्यार्थी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे बंद पाडीत आहेत. संमेलने, युवकमहोत्सव उधळून लावीत आहेत. आणि समाजाचे धुरीण मानसशास्त्रात याचे मूळ शोधीत आहेत! गुन्हेगारांवरही मानवतेचे महान् प्रयोग चालू आहेत. आटपाडीजवळ मध्यंतरी काही खुनी माणसांची मुक्त वसाहत केली होती. त्यांना जमिनी दिल्या होत्या. 'मानवतेचा महान् प्रयोग' म्हणून त्याचा वृत्तपत्रात गौरव झाला. आचार्य विनोबांनी मध्यप्रांतातील खुनी, दरोडेखोर यांच्यावर असेच मानवतेचे प्रयोग केले. वास्तविक हृदयपरिवर्तनाचे कसब आपल्या ठायी आहे असे विनोबांना वाटत होते तर काळा बाजारवाले, प्राप्तिकर चुकविणारे, दारूभट्ट्या चालविणारे, लाच खाणारे सरकारी अधिकारी, भारतातल्या सर्व सरकारी रुग्णालयातले डॉक्टर, परिचारिका, गडी यांच्यावर, त्यांनी प्रयोग करावयाचा होता. तो तरी महागात पडला नसता. पण त्यांनी खुनी दरोडेखोर यांच्याकडे आपल्या सहानुभूतीचा ओघ वळविला आणि मध्य-

प्रदेशातली गुन्हेगारी वाढवून ठेवली. सध्या आपला हाच उद्योग चालू आहे ! तुरुंगात आपण गुन्हेगारांना मायेने वागवून त्यांचे जिणे सुसह्य करीत आहोत. त्यामुळे गुन्हेगारी वाढत आहे आणि जनतेला मात्र जिणे असह्य होत आहे. भारताला सामान्य व्यवहाराच्या पातळीवर राहणे कधीच आवडत नाही, हे त्याचे मुख्य दुर्दैव आहे. राजकारणात राष्ट्रीय पातळीवरून विचार न करता आपण नेहमी आंतरराष्ट्रीय पातळीवरून बोलतो. त्याचप्रमाणे हृदयपरिवर्तन, मानसशास्त्र या मार्गांनी मानवातला परमेश्वर जागा करण्याचा आपल्याला कायमचा हव्यास लागला आहे. प्रत्यक्षात मात्र शिक्षेचे भय नाहीसे झाल्यामुळे त्याच्यातला पशु जागा होत आहे. अमेरिकेतल्या मानसशास्त्रीय प्रयोगामुळे हेच घडत आहे, हे डॉ. रुथ अलेक्झांडर यांचे मत वर दिलेच आहे. मला वाटते आपण हे महान् आणि भव्य प्रयोग बंद करून मानवातला मानवच जागा करण्याचा प्रयत्न केला तर बरे होईल. तसे करावयाचे म्हणजे मानवाचे प्रवृत्तिस्वातंत्र्य किंवा आत्मस्वातंत्र्य मान्य केले पाहिजे. कारण तेच मानवत्वाचे मुख्य लक्षण आहे. सध्या भारतात कोणावरही कसलीही जबाबदारी नाही. वाटेल ते अनर्थ येथे घडत आहेत. पण त्याला जबाबदार कोणीही नाही. प्रत्येक जण 'ते समाजाला विचारा' असे म्हणत आहे. आत्मस्वातंत्र्याचे महत्त्व आपल्याला कळले तर 'ते मला विचारा' असें म्हणण्याचा कणखरपणा आपल्या ठायी निर्माण होईल; आणि त्यातच राष्ट्राच्या उत्कर्षाची गुरुकिल्ली आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
अनुक्रम 120270 वि: निबंध
क्रमांक 9243 नों. दि. 6.1.3.69
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 93066
(स्थळ प्रत)

# ३. श्रीशिवछत्रपतींचे क्रांतिकार्य

**आता अवधारा कथा गहन ।**
**जे कळा कौतुका जन्मस्थान ।**
**की अभिनव उद्यान । विवेक तरूंचे ।**
**ना तरी सकळ धर्मांचे माहेर । सज्जनांचे जिव्हार, ।**
**लावण्यरत्न भांडार । शारदेचे ।।**

श्रीशिवछत्रपतींच्या क्रांतिकार्याचा विचार करू लागताच ज्ञानेश्वरांच्या वरील ओव्या मनापुढे उभ्या राहतात. ज्ञानेश्वरांनी त्यांत महाभारताच्या वैभवाचे वर्णन केले आहे. आपण छत्रपतींच्या चरित्राचा अभ्यास केला तर शिवभारताच्या वर्णनातही ही शब्दश्री तितकीच सार्थ होईल हे आपल्या ध्यानी येईल. आणि पंधराव्या वर्षी हिंदवी स्वराज्याची भव्य आकांक्षा चित्तामध्ये सामावून घेणाऱ्या महापुरुषाच्या चरित्राचे निरूपण करण्यास पंधराव्या वर्षीच भावार्थदीपिका रचणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या रसिक, अमृत अक्षराहून अन्य शब्द तरी कोठून आणावे ?

'हिंदवी स्वराज्य' या महासंकल्पाचे जे स्फुरण महाराजांच्या चित्तात झाले त्यानेच सतराव्या शतकापासून पुढचा भारताचा सर्व इतिहास पालटून गेला. पूर्वीच्या काळी हिंदूंची अत्यंत विशाल अशी साम्राज्ये होती. चंद्रगुप्त, अशोक यांच्या साम्राज्यात बलुचिस्तान, अफगाणिस्तान व त्यालगतचा प्रदेश यांचा अंतर्भाव झालेला होता. पुढे शक, यवन, युएची, हूण यांचा पराभव करून त्यांची आक्रमणे मोडून काढणारे पु'यमित्र, गौतमीपुत्र शातकर्णी, समुद्र-गुप्त, श्रीहर्ष यांनीहि हिंदुस्थानात मोठमोठी साम्राज्ये स्थापन केली होती. त्यामुळेच भारतात त्या काळात सुवर्णयुग निर्माण झाले होते. आणि भारती-

यांची कीर्ति दिगंत पसरली होती. या काळात हिंदूंच्या वैदिक धर्माच्या जोडीला बौद्ध व जैन हे धर्म भारतात नांदत होते. त्या धर्मांचे अनुयायी असलेले राजे आणि सम्राटहि भारतात अधिराज्य चालवीत होते. सम्राट् अशोक, कलिंग-राज खारवेल, श्रीहर्ष, महानंदपाल हे बौद्ध सम्राट् होते. अमोघवर्ष हा जैन होता. चंद्रगुप्त मौर्य, शातवाहन राजे, मगधाचे चंद्रगुप्त हे सम्राट्, चालुक्य घराण्यातील पुलकेशी, विक्रमादित्य हे सर्व हिंदु असून वैदिक धर्मानुयायी होते, गोब्राह्मणप्रतिपालक होते, यज्ञकर्ते होते हे प्रसिद्धच आहे. पण आपले राज्य हिंदूंचे आहे, आर्यांचे आहे असा घोष त्यांनी कधीच केला नव्हता. त्यांना तसे करण्याचे कारणच नव्हते. कारण वर उल्लेखिलेले सर्व सम्राट् हे इतर धर्मांचा व त्यांच्या अनुयायांचा स्वधर्मीयांइतकाच प्रतिपाळ करीत व त्यात भूषण मानीत. राजे वैदिक असले तरी बौद्धांना विहार बांधून देणे, त्यांना वर्षासने देणे, त्यांच्या मंदिरांचा जीर्णोद्धार करणे व सर्व प्रकारे त्यांची प्रतिष्ठा राखणे हे ते कटाक्षाने कर्तव्य म्हणून करीत. जैन व बौद्ध राज्यकर्त्यांचे धोरणहि असेच सहिष्णुतेचे होते. अशोकाने सहिष्णुतेचे व्रत चालविलेच पण शिवाय सर्वांनी परपंथीयांचा गौरव करावा, त्यात कमी-पणा मानू नये असे एका शासनात त्याने सांगून ठेवले आहे. सम्राट् हर्ष दर पाच वर्षांनी आपल्या संपत्तीचा दानधर्म करी. या उत्सवात एक दिवस बुद्धाची, दुसरे दिवशी सूर्याची तर तिसऱ्या दिवशी शिवाची पूजा होई. या वेळी बौद्ध भिक्षूंप्रमाणेच वैदिक ब्राह्मणांचीही संभावना तो उदार मनाने व मुक्त हस्ताने करीत असे. अशा रीतीने सहिष्णुता व सहजीवन हे धोरण सर्व राज्यकर्त्यांनी अवलंबिले असल्यामुळे हे अमक्या धर्माचे राज्य आहे अशी द्वाही फिरविण्याची त्यांना आवश्यकताच भासली नाही.

ग्रीक, शक, यवन, युएची, हूण यांची उल्लेखिलेली आक्रमणे झाली ती याच काळात. हे लोक सर्व बाह्य होते आणि यांची आक्रमणेही फार प्रचंड होती. या हजार-बाराशे वर्षांच्या काळात शक-यवन–हूणांच्या जमातीचे लाखो लोक हिंदुस्थानात आले आणि मगध, सौराष्ट्र, महाराष्ट्र येथपर्यंत घुसून तेथे स्थायिकही झाले. यावेळी आर्य व आर्येतर किंवा वैदिक व वैदिकेतर असा भेद प्रकर्षाने जाणवण्याचा संभव होता. पण या जमातींना स्वतःचा विशेष रूपास आलेला असा धर्म नव्हता. त्या लुटारू म्हणून येत, लूट, जाळ-

पोळ, कत्तल, विध्वंस हे सर्व करीत. येथे राज्येही स्थापीत. पण वैदिक वा बौद्ध धर्माचा नाश करावा, त्या धर्माचे मठ, विहार, त्यांची मंदिरे, त्यांच्या मूर्ति, त्यांची विद्यालये, त्यांचे पूज्य ग्रंथ यांचा विध्वंस करावा असे त्यांचे धोरण नव्हते. उलट हळूहळू त्यांनीच हिंदू वा बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. कोणी भागवत झाले, कोणी शैव झाले आणि कालांतराने हिंदूंनी या सर्वांना आत्मसात् करून टाकले. त्यांना चातुर्वर्ण्यात स्थाने देऊन-ब्राह्मण, क्षत्रिय अशी प्रतिष्ठेची स्थाने देऊन-येथल्या समाजाशी एकरूप करून टाकले. त्यांचा परकेपणा नष्ट झाला, भिन्नपणा लुप्त झाला. त्यामुळे हिंदू सम्राटांना आमचे राज्य हे 'हिंदवी राज्य' आहे असा घोष करण्याचे कारणच नव्हते.

१००१ साली गझनीच्या महंमदाने अटक ओलांडून हिंदुस्थानवर स्वारी केली त्यावेळी हे कारण प्रथम निर्माण झाले आणि त्यानंतर उत्तरोत्तर असा घोष करण्याची आवश्यकता तीव्रतेने निर्माण होत होती, उत्कटतेने भासमान होत होती; पण दुर्दैव असे की, साडेसहाशे वर्षांत असा महाघोष भारतात कोणी केला नाही. तसे स्फुरण कोणाच्याहि चित्तात झाले नाही! साडेसहाशे वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर, या तमोयुगानंतर शिवछत्रपतींच्या मुखाने भारत-वर्षाने हा घोष केला. हिंदवी स्वराज्य!

मुसलमानी आक्रमणापासून असा घोष करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली याचे कारण अगदी उघड आहे. हिंदू धर्म, हिंदू संस्कृति, हिंदू परंपरा व हिंदू जनता यांचा संपूर्ण नायनाट करण्याच्या प्रतिज्ञा करूनच इस्लामीयांनी भारतात पाऊल टाकले. गझनीच्या महंमुदानेच या भीषण हत्याकांडाला प्रारंभ केला. नगरकोट, स्थानेश्वर, मथुरा, कनोज, सोमनाथ येथील देवालये त्याने लुटली, मूर्ति फोडल्या, त्यांची विटंबना केली. लाखो हिंदूंच्या कत्तली केल्या, लाखोंना बाटविले. हाच भयानक प्रलय पुढे सातआठशे वर्षे चालू होता. आणि आजही इस्लामीयांची तीच वृत्ती कायम आहे याचा पाकिस्तानात हरघडी प्रत्यय येत आहे. महंमुदानंतरच्या अनेक सुलतानांनी हिंदु-मुसल-मानांना सहजीवन अशक्य आहे, हिंदूंचा नायनाटच केला पाहिजे, त्यांच्या धर्माचा नाश केला पाहिजे हेच धोरण, हेच ब्रीद मिरविले. त्यांनी हिंदूवर जिझिया कर बसविला. त्यांची मंदिरे, विद्यालये, धर्मग्रंथ व स्त्रिया यांची विटंबना केली, मुसलमानी कायदा त्यांच्यावर लादला. मूर्तिपूजा हा गुन्हा

ठरवून तो करणाऱ्यांना कित्येकदा जिवंत जाळले, इस्लामच्या अभिमानाने लाखो हिंदूंच्या कत्तली केल्या आणि हिंदूंना हिंदू म्हणून जगणे अशक्य करून टाकण्याचे सर्व प्रयत्न केले. हिंदवी स्वराज्याची आवश्यकता निर्माण झाली ती त्यासाठी. हिंदू धर्म, हिंदू संस्कृति, परंपरा, भाषा, विद्या – म्हणजे एकंदर अस्तित्वच टिकवावयाचे असेल तर इस्लामी साम्राज्य नष्ट करून भारतात हिंदवी स्वराज्य स्थापन झालेच पाहिजे, असे इतिहास आक्रंदून सांगू लागला. हिंदू, जैन, बौद्ध, यांची राज्ये झाली. पण दोघांपैकी एकालाच जगता येईल, दुसऱ्याचा नष्टांशच झाला पाहिजे अशी वृत्ती भारतात केव्हाच निर्माण झाली नव्हती. मुसलमानांच्या आक्रमणानंतर असा बिनतोड प्रसंग निर्माण झाला. ही भूमी निर्हिंदू झाली पाहिजे अशी भीषण मनीषा इस्लामीयांनी धरली होती.

अलीकडे इतिहास-विवेचन करताना आणि शिवकार्याचे विवरण करताना छत्रपतींच्या आधीच्या काळात महाराष्ट्रात व दक्षिणेत तरी निदान हिंदूंचा धार्मिक छळ होत नव्हता, हिंदु धर्माचा उच्छेद करणारी अशी राजसत्ता येथे नव्हती, राजदरबारी, लष्करामध्ये आणि सर्वत्र मराठा सरदारांचे प्राबल्य असल्यामुळे हिंदूंचा धार्मिक छळ होणे संभवनीयच नव्हते, असा सिद्धान्त मांडला जातो. आणि त्याला रानडे, राजवाडे, सरदेसाई, पारसनीस यांचे आधार दिले जातात. (धर्म की क्रांति—लालजी पेंडसे, पृ. १३, १४) या थोर पंडितांनी अशी वाक्ये लिहिली आहेत हे खरे. पण त्यांचे समग्र ग्रंथ वाचले म्हणजे त्यांचा अभिप्राय इतका एकांतिक नव्हता हे सहज कळून येईल. आणि प्रत्यक्ष इतिहास पाहिल्यावर या भ्रमाचा तत्काळ निरास होईल. १६३७ ते १६४० या तीन वर्षांत विजापूरच्या आदिलशाहीचा सरदार रणदुल्लाखान याने कर्नाटकावर तीन स्वाऱ्या केल्या. त्या अत्यंत यशस्वी झाल्या. या स्वारीत मुख्य पराक्रम शहाजी राजे यांनी केला. आणि त्याचे फलित काय ? तर 'आम्ही दक्षिणचे सर्व राजे-महाराजे जिंकले, मोठमोठी मंदिरे धुळीस मिळविली, आणि तीन वर्षांच्या अवधीत सेतुबंध रामेश्वराची भक्ती करणाऱ्या हिंदूंच्या शेंड्या कापून काफरांचे निर्मूलन केले.' असा सार्थ अभिमान आदिलशहाने मिरविला. मराठे सरदार मुसलमानांच्या लष्करात असल्याचा हा फायदा ! आणि ज्यांना दक्षिणेत मुसलमानांनी धर्मच्छल केला की नाही याविषयी शंका असेल त्यांनी सरदेसाई यांच्या 'मुसलमानी रियासत' (भाग १ ला) या

ग्रंथातील 'गुजराथच्या इतिहासाचे पर्यालोचन' (पृ. २११), बहामनी राज्याचे समालोचन (पृ. २३८) आणि 'गतकालचे पर्यालोचन' (पृ. ३६०, ३६३, ३६६, ३६८, ३७२,) ही प्रकरणे पाहावी. उत्तर हिंदुस्थानात हिंदू-धर्म व हिंदू जाती यांचे जे भीषण शिरकाण झाले त्या मानाने दक्षिणेत कमी झाले इतकाच त्या थोर इतिहासपंडितांचा विधानांचा अर्थ घेतला पाहिजे. पण ते जे कमी प्रमाणाचे हत्याकांड होते तेच इतके भयंकर होते की हिंदवी स्वराज्याचा उद्घोष झाला नसता तर त्यानेच हिंदू जातीचे निर्मूलन झाले असते. दक्षिणेत हिंदुधर्माचा उच्छेद घडत नव्हता, धर्म या प्रकाराचे रक्षण करण्याची तीव्रता शिवाजीला भासावी अशी परिस्थितीच त्या काळी नव्हती, असे म्हणणे हे हिंदूंना मुस्लीम आक्रमणाचे स्वरूप अजूनहि कळलेले नाही, आणि बहुधा यापुढे कधीही त्याचे आकलन होण्याची शक्यता नाही याचे निदर्शक होय. शिवछत्रपतींचे अलौकिकत्व यात की त्यांनी त्या आक्रमणाचे स्वरूप बरोबर ओळखले होते. आणि 'हिंदवी स्वराज्य' हाच त्यावर उपाय होय हेही त्यांनी जाणले होते. म्हणून वयाच्या पंधराव्या वर्षीच या हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा महासंकल्प त्यांनी चित्तात केला होता. 'श्रीरोहिरेश्वर तुमचे खोरियांतील आदि कुलदेव, तुमचा डोंगरमाथा शेंद्रीलगत स्वयंभू आहे. त्यांणी आम्हास यश दिल्हे व पुढे तो सर्व मनोरथ हिंदवी स्वराज्य करून पुरविणार आहे' असा आत्मविश्वास छत्रपतींनी वैशाख शु।। प्रतिपदा, शके १५६७ (इ. स. १६४५) या शुभदिनी दादाजी नरसप्रभु देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रात प्रगट केला आहे. येथून पुढे त्यांनी केलेल्या प्रत्येक कृतीतून आणि पत्रातून हिंदुपदपातशाहीचा संकल्प पुनः पुन्हा प्रगट होत असल्याचे दिसून येते. लोकांनाहि महाराजांच्या ह्या संकल्पाची चांगली जाणीव झाली होती. मिर्झा राजे जयसिंह यांची त्या काळी एकाने प्रशस्ति रचली आहे तीत 'दिल्लीच्या सिंहासनाची आकांक्षा बाळगणाऱ्या शिवाजीला त्याने जिंकले' असा त्याचा गौरव केला आहे. छत्रपतींनी आपले बंधु व्यंकोजी यास लिहिलेल्या पत्रात त्यांचे मानस अगदी स्पष्ट दिसते. ते म्हणतात, 'तुम्ही असा विचार करावा होता (करावयास हवा होता) की श्रीदेवाची व श्रीची कृपा त्यावरी (शिवछत्रपतीवर) पूर्ण आहे. दुष्ट तुरुकाला ते मारितात. मग आपल्या (व्यंकोजीच्या) सैन्यात तुरुक लोकच असता जय कैसा होतो, आणि तुरुक

लोक कैसे वाचू पाहातात, हा विचार करावा होता, आणि युद्धप्रसंग पाडावा नव्हता.' पुढे समेटाच्या कलमामध्यें दुष्ट, हिंदुद्वेषी यास आपले राज्यात ठेवू नये, विजापूरकरांची चाकरी करू नये, त्यास फार तर सैन्याची मदत करावी इ. कलमे छत्रपतींनी मुद्दाम घातली आहेत. औरंगजेबाने हिंदूंवर जिझिया कर बसविला त्यावेळी त्याची कडक शब्दात छत्रपतींनी निर्भर्त्सना केली. या पत्रात त्यांनी लिहिले आहे की, 'पातशाही पुरातन हिंदूंची आहे. पातशाही तुमची नाही. गरीब, अनाथ (हिंदू) त्यास उपसर्ग करण्यात आपला मोठेपणा नाही. (शककर्ता शिवाजी–सरदेसाई, पृ. २०२. छत्रपतींच्या मनात हिंदुपदपातशाहीचा संकल्प कसा होता त्याचे विवेचन याच ग्रंथात सरदेसाई यांनी पृ. २२१ वर केले आहे.) सकल अवनिमंडल यवनमुक्त करावयाचे आहे ही आकांक्षा प्रारंभापासूनच छत्रपतींनी मराठ्यांच्या ठायी दृढमूल करून टाकिली होती यात शंकाच नाही. अत्यंत पडत्या काळातसुद्धा छत्रपति राजाराम यांच्या मनातील हे अनुसंधान सुटले नव्हते. त्यांच्या काही फौजा नर्मदा उतरून पलीकडे गेल्याही होत्या. हणमंतराव व कृष्णाजी घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रात छत्रपति राजाराम म्हणतात–'महाराष्ट्रधर्म पूर्ण रक्षावा, हा तुमचा संकल्प स्वामींनी जाणून तुम्हास सहा लक्ष होनांची नेमणूक चालविण्याचा निश्चय करून दिधला असे. पैकी रायगड प्रांत, विजापूर, भागानगर व औरंगाबाद हे चार प्रांत काबीज केल्यावर तीन लाख व बाकीचे तीन लाख प्रत्यक्ष दिल्ली काबीज केल्यावर द्यावयाचे, असा निश्चय केला आहे.' पुढल्या काळच्या पत्रातून तर हिंदुस्थानच्या पलीकडे काबूल, कंदाहार, इराण, तुराण, इस्तंबूल येथपर्यंत मराठ्यांच्या आकांक्षा धावत होत्या हे स्पष्ट दिसून येते. हे सर्व सविस्तर सांगण्यात हेतू हा की, मराठ्यांच्या यशाचे मर्म छत्रपतींच्या हिंदवी स्वराज्याच्या या संकल्पात आहे हे ध्यानी यावे. तत्पूर्वीच्या लोकांनी पराक्रम केले, नाही असे नाही. पण त्यांचे संकल्पच लहान होते. त्यांची झेप अल्प होती. अखिल हिंदुस्थान यावनी सत्तेपासून मुक्त करण्यात त्या महापराक्रमी लोकांना यश आले नाही त्याचे हे प्रधान कारण आहे. इतर कारणे तितकीच बलवत्तर आहेत. छत्रपतींनी जी राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक–सर्वांगीण क्रांति घडवून आणली तिची त्यांना कल्पनाही नव्हती. आणि तिच्याविना भारतात नवी शक्ती निर्माण होण्याची शक्यताच

नव्हती. यामुळे ते अपयशी झाले हे उघडच आहे. पण या क्रांतीची प्रेरणा त्यांना झाली नाही, याचे कारणहि माझ्या मते, विश्वव्यापी संकल्पाचा अभाव हे आहे. ते स्फुरण चित्तात झाले की त्याच्या सिद्धीचे मार्गही सुचू लागतात, दिसू लागतात. पण तेच जेथे नाही तेथे हे मार्ग दिसत नाहीत आणि तसे प्रयत्नही होत नाहीत. 'हिंदवी स्वराज्या'च्या संकल्पाचे असामान्य महत्त्व वाटते ते यासाठी.

शिवछत्रपतींच्या पूर्वी इस्लामी आक्रमणाला तोंड देऊन त्याला पायबंद घालण्याचे, आणि हिंदूंचे स्वतंत्र राज्य स्थापण्याचे दोन फार मोठे प्रयत्न झाले. आणि ते अंशतः सफलही झाले. राजस्थान आणि विजयनगर यांनी आपल्या खड्गांचे अडसर इस्लामीयांच्या मार्गात आडवे केले नसते तर चवदाव्या शतकाच्या अखेरीलाच हिंदुस्थान निर्हिंदू झाला असता. रजपूत सतत आठशे वर्षे आणि कर्नाटकी अडीचशे वर्षे या आक्रमणाशी झुंजत राहिले हा त्यांचा अत्यंत मोठा पराक्रम होय यात शंका नाही. विजयनगरचे साम्राज्य तर एके काळी कृष्णेच्या खाली सर्व दक्षिणेत रामेश्वरापर्यंत पसरले होते. आणि राज्यलक्ष्मी आपल्या वैभवानिशी त्यावेळी या प्रदेशात प्रगट झाली होती याविषयी इतिहासवेत्त्यात दुमत नाही. पण इतके होऊनहि यावनी सत्तेचे सर्व भारतातून निर्मूलन करण्यात या दोन्ही शक्तींना यश आले नाही. उलट सोळाव्या शतकात इस्लामच्या चांदापुढे त्याच नामोहरम झाल्या. आणि १५६५ साली विजयनगर व १५६८ साली चितोड पडल्यावर भारतात पुन्हा असा काळ आला की, या महापराक्रमी लोकांचे कार्य जणु झालेच नाही. पुढच्या काळात मराठ्यांना जे यश आले ते राजस्थान व विजयनगर यांना आले नाही. ते का आले नाही याची मीमांसा प्रथम आपल्याला केली पाहिजे. या पार्श्वभूमीवाचून छत्रपतींच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट होणार नाही.

वरील अपयशाची कारणे शोधण्यासाठी आपण इतिहास पाहू लागलो आणि त्यांची चिकित्सा करू लागलो की, मन उद्वेगाने भरून जाते, बुद्धी मूढ होऊन जाते. अगदी वरवर पाहिले तरी मुसलमानी आक्रमणाचा हा इतिहास मुसलमानांच्या पराक्रमाचा नसून हिंदूंच्या नादानीचा, कमालीच्या नादानीचा आहे असे स्पष्ट दिसू लागते. इसवी सनाच्या पहिल्या सहस्रकात परक्यांची आठदहा प्रचंड आक्रमणे आपल्या बाहुबलाने सहज लीलया मोडून काढून

त्या परक्या हिंस्र जमातींना आपल्या अंतरात पचवून, आत्मसात् करून टाकणारे जे त्या वेळचे शौर्य-धैर्यसंपन्न हिंदू लोक त्यांचेच हे पुढच्या काळातले हिंदू वंशज आहेत का, असा प्रश्न मनापुढे उभा राहतो. त्यांचे ते अतुल रण-पांडित्य, ती मुत्सद्देगिरी, ती सावधता, ती स्वधर्मनिष्ठा, ते संघटनाकौशल्य हे कोठे गेले आणि का गेले, या प्रश्नांनी मन कासावीस होते. विचार करता करता बुद्धी कुंठित होते, एक एवढा समर्थ समाज एकाएकी इतका पराक्रमहीन, विकल, दुर्बल आणि नादान होईल यावर विश्वास बसत नाही; पण इतिहासात तसे प्रत्यक्ष घडलेच आहे. तेव्हा त्याचा विचार करणे प्राप्त आहे.

इ. स. १००० पासून भारतावर आलेले इस्लामीयांचे आक्रमण हिंदूंना भारी होते असे कोणच्याही अर्थाने म्हणता येणार नाही. सतराव्या शतकात इंग्रजांचे आक्रमण भारतावर आले. त्यावेळी इंग्रज हे अत्यंत संघटित व राष्ट्र-निष्ठ असे होते. त्यांच्या राज्यात बलिष्ठ अशी मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित झाली होती. आणि ती आपल्या प्रजाजनांच्या निग्रहानुग्रहाला पूर्णपणे समर्थ होती. तसा कसलाहि प्रकार मुसलमानांच्या बाबतीत नव्हता. विघटनेची, दुहीची, यादवीची जी जी म्हणून कारणे असू शकतात, समाज विशीर्ण, भग्न होऊन जाण्यास जे जे भेद,-धर्मभेद पंथभेद, सामाजिक भेद, वांशिक भेद-कारणीभूत होतात ते ते सर्व मुसलमान समाजात होते. तुर्क, अफगाण, मोंगल, इराणी, हबशी, अरबी, हिंदी असे अनेक वंशांचे लोक इस्लामीयात होते. आणि त्यांच्यात आपसात नित्य घनघोर रणकंदने होऊन भयानक कत्तलीही होत असत. १२९५ पासून १३०५ पर्यंत अमीर दाऊद, त्याचा मुलगा कुतलघ-खान, तुर्घाय खान, आणि ऐबकखान या मोंगल सरदारांनी दिल्लीवर अनेक वेळा लाख लाख फौजा घेऊन स्वाऱ्या केल्या. अल्लाउद्दीन खिलजीच्या सैन्याशी त्यांचे भीषण रणकंदन झाले. दर वेळी सुलतानास जय मिळाला. तरी प्रत्येक स्वारीच्या वेळी प्रारंभी बिकट प्रसंग आला होता. पण या वेळी आणि पुढे असल्या कोणच्याही वेळी या आलेल्या संधीचा फायदा हिंदूंनी घेतला नाही. गुलामवंश, घोरीवंश, खिलजी, मोगल, लोदी, सूरवंश यांच्या दिल्लीच्या स्वामित्वासाठी सारख्या लढाया चालू होत्या. दिल्लीची सत्ता स्थिर, दृढ, दुर्भेद्य अशी एवढ्या दीर्घ काळात फारच थोडा वेळ होती. कोणीही यावे

आणि पहिल्या सुलतानाला हुसकून आपण राज्य बळकवावे अशी स्थिती अकबराच्या आधी नित्याची झाली होती. पण दिल्लीसाठी भांडणारे हे लोक कोणी सय्यद होते, लोदी होते; घोरी, खिलजी, तुर्क, मोंगल होते. हिंदू कधीही नव्हते. स्थानेश्वराच्या लढाईत एकदा ११९२ साली पराभूत झाल्यानंतर हिंदूंनी हस्तिनापूरच्या या सिंहासनासाठी प्रयत्न केलाच नाही. दिल्लीची सत्ता दीर्घकाळ डळमळत्या स्थितीत होती. ती राज्यलक्ष्मी यांना सहज वश झाली असती. पण हिंदू स्थितप्रज्ञच राहिले. तिच्याकडे डोळा उचलून पाहण्याचे पापसुद्धा त्यांनी केले नाही. मग मुसलमानांनी तेथे राज्य न करावे तर काय करावे !

वंशभेदाप्रमाणे धर्मभेदही या आक्रमकात होते. शिया आणि सुनी पंथांच्या लोकात एकमेकांविषयी अगदी कडवा, जहरी द्वेष असे. दक्षिणेतील सर्व मुस्लिम राज्ये नष्ट करावी असा औरंगजेबाचा अट्टाहास चालला होता याचे कारण हेच की ती शियापंथी होती व औरंगजेब सुनी होता. बहामनी राज्यात दक्षिणी, व परदेशी असे तट होते. ते स्थानिक मुसलमान व इराण-अफगाणिस्थानातून आलेले अशा भेदामुळे होते. पण त्यांच्यात शिया-सुनी हा भेद होताच. या दोन पक्षात कधीही ऐक्य झाले नाही. दक्षिणेतल्या बहामनी राज्यांचा इतिहास या दक्षिणी व परदेशी लोकांच्या आपसातील लोकांच्या मारामाऱ्या, रक्तपात बंडाळ्या यांनी भरलेला आहे. काही काही दिवस राजधानीत वीस वीस दिवस रक्तपात चाले, त्यामुळे राजसत्ता किती दुबळी होत असेल याची सहज कल्पना येईल. पण हिन्दूंना ही संधि साधता आली नाही. त्यांना इहलोकीचे ऐश्वर्यभोग नकोच होते.

अकबराच्या आधी दिल्लीची मुस्लिम मध्यवर्ती सत्ता अत्यंत प्रबळ अशी बव्हंशी नव्हतीच. नंतरहि दूरच्या प्रांतांवरचे सुभेदार या मध्यवर्ती सत्तेला भीक घालीत नसत. अयोध्येचा नबाब, बंगालचा सुभेदार, हे जवळ जवळ स्वतंत्रच होते. दक्षिणेत बहामनी राज्य स्वतंत्र झाले आणि त्याची पुन्हा पाच शकले झाली हे प्रसिद्धच आहे. म्हणजे सर्वत्र अंदाधुंदी व बेबंदशाही होती. वायव्य सरहद्दीवर बंडाळ्यांना तर कधीच खळ पडला नाही. दिल्लीच्या सत्तेवर तिकडून धाड कोसळायची हा नियमच होता. यामुळेही सत्ता दुबळी होत असे. एक सुलतान मेला म्हणजे त्याच्या मुलात राज्यासाठी लढाया व्हावयाच्या, तो जिवंत असतानाही त्याच्या मुलांनी राज्यपदासाठी बंडे

करावयाची, त्यांच्याशी बापाच्या लढाया व्हावयाच्या, ही परंपरा निरपवादपणे अविच्छिन्न चालू होती. मोठमोठे सरदार हे राज्याचे आधारस्तंभ असत. पण ते मोठे झाले की पातशहांना डोईजड वाटत. आणि त्यांचा नाश करून टाकण्याची कारस्थाने नित्य चालू असत. असा कित्येक सरदारांचा नाश दिल्लीच्या बादशहांनी व बहामनी सुलतानांनी केला आहे. त्यात हिंदू सरदारांचा केला तसा मुसलमानांचाही केला. या घातपातांमुळे राज्याचे बळ कितीतरी कमी होत असले पाहिजे. याचा अर्थ असा की, ज्या ज्या कारणामुळे सत्ता दुबळी होईल, समाजात विघटना माजेल, राज्यात दुही उद्‌भवून त्याला कमजोरी येईल ती सर्व कारणे मुस्लिम आक्रमक सत्तेमध्ये अखंड रुजून राहिली होती. त्यामुळे राजसत्ता अत्यंत कमजोर होऊन जात असे. आणि ती संधि साधून अनेक पराक्रमी पुरुष दिल्ली सहजासहजी खेळता खेळता जिंकून घेत असत. पण ते सर्व मुस्लिम होते. हिंदूंनी असा प्रयत्न केल्याचे सुद्धा इतिहासात नमूद नाही. हे कशाचे लक्षण ? असल्या आक्रमकांनासुद्धा हिंदूंना उलथून टाकता आले नाही एवढी घोर अवकळा या समाजाला आली तरी कशाने ? इतके निर्वीर्य, निःसत्त्व हे लोक झाले कशाने ? आणि शिवछत्रपतींनी असे काय केले की ज्यामुळे एकाएकी मन्वंतर होऊन मोगली सत्तेचे निर्मूलन करण्यास मराठे समर्थ झाले ?

वर सांगितलेले दुहीचे, यादवीचे, अराजकाचे, बंडाळ्यांचे सर्व प्रकार अकबरानंतरही चालू होते, हे एका जहांगीरच्या इतिहासावरून स्पष्ट होईल. मोंगली राज्याची त्यावरून चांगली कल्पना येईल, म्हणून तो इतिहास थोडक्यात सांगतो. जहांगीर १६०५ साली राज्यावर आला व १६२७ साली मृत्यू पावला. त्याला मुलगे चार. खुश्रू, पर्वीझ, खुर्रम् (शहाजहान) आणि शहर्यार. जहांगीर राज्यावर आल्यानंतर सहा महिन्यांच्या आतच खुश्रूने बंड केले. त्या वेळी दरबारात रजपूत व मुसलमान असे दोन तट उघड पडले होते. रजपूत पक्षाच्या साहाय्याने बापाला तख्तावरून काढून आपण राज्य घ्यावे असा खुश्रूचा विचार होता. पण त्याचा पराभव झाला. बादशहाने त्याला जीवदान दिले, पण त्याच्या पक्षाच्या हजारो लोकांना जिवंत जाळून, सोलून, बुडवून हाल हाल करून ठार मारिले. बेगम नूरजहान हिची पहिल्या नवऱ्यापासून झालेली एक मुलगी होती. तिला जो पत्करील त्याला गादी देऊन

बाकीच्या तीन शहाजाद्यांचा नायनाट करावा असे तिचे कारस्थान चालू होते. आसफखान, खानखानान व महाबतखान हे बादशाहीचे तीन मातबर सरदार यांचे आपसात वैर होते. बादशहाच्या कानी लागून एकाने दुसऱ्यास कैदेत घालावे असे प्रकार नित्य चालत. आसफखानाचा जावई शहाजहान. खुश्रूनंतर त्याने बादशाही तख्तासाठी बंडाळी उभारली. त्याला मधून मधून वरीलपैकी कोणातरी सरदाराचे साह्य असेच. त्याने दक्षिणेत जाताना खुश्रूस बरोबर नेऊन तिकडे त्याचा खून करविला. नंतर आग्ऱ्याला असलेला बादशाही खजिनाच लुटावयाचा असे ठरवून त्याने किल्ल्यावर हल्ला केला. यात आसफखान त्याला सामील होता. बादशहा शहाजहानवर चालून आला. दिल्लीनजीक बापलेकांची निकराची लढाई झाली. बादशहा पकडला गेला होता, पण दैववशात् सुटला व शहाजहानला पळून जावे लागले. पुन्हा क्षमा मागावी, पुन्हा बंड करावे असे त्याचे नित्य चाले. महाबतखान या सरदारावर पुढे बादशहाची इतराजी झाली. जहांगीर अत्यंत व्यसनासक्त होता. सर्व कारभार नूरजहान पहात असे. यावर चिडून महाबतखानाने झेलमनजीक बादशाही छावणीवर हल्ला करून त्याला पकडले आणि नूरजहानलाही पकडले. बादशहाने बाह्यत: गोडीने वागून आपली कशीतरी सुटका करून घेतली व महाबतखानाच्या नाशाचे उपाय तो योजू लागला. तेवढ्यात त्याचा अंत झाला. खुश्रूचा मुलगा बुलकी याला तख्त द्यावे असे त्याने मरताना सांगून ठेविले होते. त्याप्रमाणे आसफखानाने बुलकीला तख्तावर बसविले. लगेच त्याने चुलता शहर्यार यास पकडून त्याचे डोळे काढले. इकडे शहाजहान काही स्वस्थ बसला नव्हता. मोठ्या फौजा घेऊन तो लाहोरास आला. रजपूत सेनाही त्यास मिळाली, त्यामुळे बुलकीचा पराभव झाला. मग शहाजहानने आपली माणसे पाठवून बुलकी, शहर्यार यासकट राजघराण्यातील सर्व पुरुषांची कत्तल करविली. दानियल, मुराद, पर्वीझ यांचे मुलगे होते. त्यांचीही मुंडकी कापून आणली. अशा रीतीने सर्व निर्वेध झाल्यावर तो तख्तनशीन झाला. त्याच्या उत्तर आयुष्यात त्याच्या मुलांनी हेच केले. मोंगली राज्याचा इतिहास पाहिला तर ही कोणा एका सुलतानाची विकृती नसून त्या रियासतीची प्रकृतीच होती असे दिसेल. (मुसलमानी रियासत–गो. स. सरदेसाई) अशी बेबंदशाही प्रत्येक सुलतानाच्या वेळेस चालू असताना रजपुतांना मोगली

आक्रमण पराभूत करता आले नाही याचे आश्चर्य वाटते. मधूनमधून काही लढायात रजपूत मोंगलांचा पराभव करीत. जहांगीरच्या फौजेचाच रजपुतांनी १६०८ साली दिनेर येथे, १६१० साली राणपूर येथे आणि नंतर खानमेर येथे असा तीनदा पराभव केला होता. पण अखेरीस ते हरले. आणि मेवाडच्या राण्याला शरणागती पतकरावी लागली.

आणि हीच कथा याच्या आधी चालू होती. मधूनमधून हिंदू राजे, हिंदू सेनापती खूप पराक्रम करीत. पण आत्मसंरक्षणार्थ प्रत्येक समाजात लढाईची रग अखंड असावी लागते. ती हिंदूंच्यातून नष्ट होत चालली होती असे दिसते. सेनासंघटना, शौर्य, धैर्य, नाना प्रकारचे डावपेच असलेली युद्धकला, मुत्सद्देगिरी, सावधता, हे सर्व या हिंदुसमाजातून नष्ट होत चालले होते. गझनीचा महमूद येताच १०१८ साली कनोजचा राज्यपाल पळून गेला. १०२४ साली अजमीरचा राजा पळून गेला. तेथून महंमूद तसाच अनहिलपट्टणवर गेला. तेथील राजा पळून गेला. महंमद घोरीचा सरदार बख्त्यार खिलजी हा बंगालवर स्वारी करून आला. राजधानी नदिया येथे तो येताच राजा लक्ष्मणसेन बायका-पोरांना सोडून पळून गेला. आणि पुढील आयुष्य त्याने देवसेवेत घालविले ! इतर अनेक लढायात राजे प्रथमच पळून गेले नाहीत. पण लढाईला तोंड लागल्यानंतर ते पळाले. जयपाळ, आनंदपाळ व इतर अनेक रजपूत राजे यांची ही कथा आहे. एकटचा एक मलिक काफूर या अल्लाउद्दीन खिलजीच्या सेनापतीने नर्मदेच्या दक्षिणचा सर्व हिंदुस्थान पंधरा वर्षात धुळीस मिळविला. यादव, चालुक्य, होयसळ, बल्लाळ सर्व सर्व राजे व त्यांची राज्ये त्याने चुरमुऱ्याच्या पोत्यासारखी आपटली आणि रामेश्वराला मशीद बांधून हिंदुधर्माचे थडगे रचले. हा मलिक काफूर मूळचा हिंदू होता, हलक्या कुळातला होता. गुलाम होता. हिंदूमधल्या थोर क्षात्रकुळातल्या राजांना जो पराक्रम करता आला नाही तो या हीन जातीयाने मुसलमान होताच करून दाखविला. ही घटना विशेष चिंतनीय आहे. कारण हा प्रकार नित्य घडत होता. मलिक काफूर हा मूळ हिंदू गुलाम. अल्लाउद्दीनच्या मागून दिल्लीचा सुलतान झालेला मलिक खुश्रू हा मूळचा गुजराथी अंत्यज होता. तो हिंदू राहिला असता तर कधीहि सुलतान झाला नसता. लोदी सुलतान शिकंदर, निजामशाहीचा संस्थापक निजाम उलमुल्क बहिरी, गुजराथच्या राज्याचा संस्थापक मुजफरखान,

इमादशाहीचा संस्थापक फत्तेउल्ला, फिरोझशहाचा वजीर मक्बुलखान, जहांगीरचा वर निर्देशिलेला सेनापति महाबतखान हे सर्व मूळचे हिंदू होते. त्यांना हिंदू असताना जे करता आले नाही ते त्यांनी मुसलमान झाल्यावर करून दाखविले. ते सेनापति झाले, सुलतान झाले. त्यांनी स्वतंत्र राज्ये स्थापिली. अनेक हिंदू राज्ये सहज धुळीस मिळविली.एवढेच नव्हे तर दिल्लीच्या सुलतानी सत्तेलाही पाणी पाजले. जे हिंदूमधल्या मोठ्या घराण्यातल्या चंद्रसूर्य, रामकृष्ण यांचा वारसा सांगणाऱ्या पुरुषांना करता आले नाही ते मुसलमान झाल्यानंतर कोणीही, अगदी कोणीही सहज करून दाखवीत असे. मोठमोठ्या सेना उभारणे, मोठेमोठे प्रदेश पादाक्रांत करणे, स्वतंत्र राज्ये स्थापणे, हिंदु व मुस्लिम राज्येंहि सहज बुडविणे, दिल्ली हादरून टाकणे हा कर्त्या मुस्लीम पुरुषांचा नित्याचा खेळ होता. हिंदूंना हा खेळ कधीही खेळता आला नाही.

इ. स. १००० पासून साडेसहाशे वर्षांची भारताच्या इतिहासाची कहाणी ही अशी आहे. या काळात हिंदूंच्यावर आक्रमण न करील, त्यांना न लुटील, त्यांच्यावर अत्याचार न करील, त्यांच्या धर्माची, स्त्रियांची, मंदिरांची विटंबना न करील तो करंटा ! आरब, तुर्क, अफगाण, मोंगल, सिद्दी, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज—कोणीही यावे आणि भारतातल्या कोणच्याही प्रदेशाची वाटेल ती धुळधाण करावी, लोकांना गुलाम म्हणून परदेशी नेऊन विकावे, त्यांच्या कत्तली कराव्या, घरादारांवरून नांगर फिरवावे, गावाची होळी करावी, नगरांची राखरांगोळी करावी ! दक्षिणेत, उत्तरेत, पूर्वेला, पश्चिमेला, वायव्येकडे, ईशान्येकडे, कोठेहि हा प्रलय विध्वंस करावा; आणि सत्ता बळकावून दीर्घकाल राज्य करावे. उदार, सहिष्णू, आतिथ्यशील हिंदूंनी हे सर्व सहन केले, चालू दिले, त्या अनर्थाला हातभारहि लावला.

इतिहासातला हा खरोखर मोठा चमत्कार आहे. एके काळी महापराक्रमी असलेला एखादा समाज दुसऱ्या काळी इतका नादान होईल, इतका अधोगामी, पौरुषहीन, कर्तृत्वशून्य, स्वत्वशून्य होईल याच्यावर विश्वास ठेवणे सुद्धा कठिण जाते. पण प्रत्यक्ष हे घडलेले आहे. याच भूमीत घडले आहे. आणि आपलेच इतिहासकार हे वृत्त सांगत आहेत. तेव्हा त्याबद्दल नुसते खेदोद्गार काढण्यात काहीच अर्थ नाही. अर्थ आहे तो त्याची मीमांसा करण्यात, असे का घडले

हे पाहण्यात, या दुर्दैवाची कारणमीमांसा करण्यात, त्यातून भविष्यकाळासाठी काही ऐतिहासिक सत्ये शोधून काढण्यात. तेच आता करावयाचे आहे.

ही कारणमीमांसा एका वाक्यात सांगावयाची तर असे म्हणता येईल की या काळात हिंदूंच्या धर्मसंस्थेला अत्यंत अवकळा आली होती. हा धर्म अगदी हीन पातळीला आला होता. या धर्माला पराकाष्ठेची ग्लानी आली होती. 'धारणाद्धर्म इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः।' या वचनातील धर्म शब्दाचा अर्थ येथे अभिप्रेत आहे. समाजाचे धारण-पोषण करणे, त्याच्या योगक्षेमाची चिंता वाहणे, त्याला सामर्थ्य, समृद्धी, वैभव प्राप्त करून देणें, त्याला आत्मरक्षणाला व पराक्रमाला समर्थ करणे, हे धर्माचे कार्य आहे. नागरिकांच्या मनात थोर आकांक्षा, विजिगीषा जागृत करून त्यांना स्फूर्ती देणें, प्रेरणा देणें हे धर्माचे कार्य आहे. हिंदुधर्माला या काळात इतके हीन रूप प्राप्त झाले होते की, तो यातले काहीहि करू शकत नव्हता. उलट पराक्रम महत्त्वाकांक्षा, विजिगीषा यांची हत्या करतील अशीच तत्त्वे या धर्माने उराशी कवटाळली होती. इतिहास वरवर चाळला तरी कोणालाही हे स्पष्ट दिसेल की, मुसलमानांनी जो पराक्रम केला, आक्रमणे केली, राज्ये स्थापिली, येथे विध्वंस केला, कत्तली केल्या, हिंदूंना जुलमाने बाटविले, त्यांची मंदिरे लुटली, जाळली, विद्यापीठे धुळीला मिळविली, येथे जे जे केले त्याच्या मागे त्यांच्या धर्माची प्रेरणा होती. इस्लामी सुलतान आक्रमण करून येत ते लूट करण्यासाठी, राज्यासाठी, वैभवासाठी येत हे खरे. पण स्वधर्माचा प्रसार करावा हाही तितकाच प्रबळ हेतु त्यांच्या मनात असे आणि या भावनेने प्रत्येक मुसलमान शिपाई चेतलेला असे. म्हणजे प्रत्यक्षांत दिसणारी, प्रत्यक्ष हातात येणारी धनधान्य-स्त्रिया यांची लूट आणि धर्मकार्य, धर्मसेवा या दोन प्रेरणा एकत्र झाल्या आणि त्यातून एक महाभयंकर संहार-सामर्थ्य इस्लामी-यांच्या ठायी निर्माण झाले. काफरांच्या कत्तली, मंदिर, विध्वंस, त्यांच्या धर्मग्रंथाची, घरादारांची जाळपोळ हे धर्मकृत्य आहे, अशीच सर्व सुलतानांची व शिपायांची श्रद्धा होती. म्हणजे मुसलमानांच्या या कृत्यामागे वासनांची तृप्ती आणि ध्येयाची पूर्ती या प्रेरकशक्ती उभ्या असत. हा संयोग फार भयंकर आहे. यामुळे माणसे पिसाट होतात, त्यांच्या अंगात संचार होतो आणि या धुंदीतून, बेहोषीतून जी विध्वंसशक्ती निर्माण होते तिला तोंड देणें अशक्य-

प्राय होऊन बसते. आरब, तुर्क, मोगल, अफगाण हे येथे आले ते असले वादळी, झंझावाती, तुफान सामर्थ्य घेऊन आले. त्यांच्यापुढे उभे राहणारे जे हिंदू त्यांच्या ठायी हे धुंद सामर्थ्य, ही पिसाटशक्ती याच्या सहस्रांशाइतकीसुद्धा नव्हती ! असे का ? असली शक्ती निर्माण करण्याचा हिंदुधर्माने प्रयत्न केला नव्हता. इतकेच नव्हे तर वैभव, समृद्धी, पराक्रम यांसाठी अवश्य असणाऱ्या सर्व प्रेरणांची अगदी टिपण घेऊन हत्या करण्याचा विक्रम मात्र अनेक शतके हदूंनी चालविला होता. हिंदूंच्या वर सांगितलेल्या, लांच्छनास्पद अपयशाची सर्व कारणे या धर्मनाशात आहेत, धर्मग्लानीत आहेत.

इस्लामी धर्म आक्रमण, साम्राज्य, विश्वसंचार, जगज्जेतृत्व, शत्रूंचा संहार, यांची प्रेरणा देत होता, तर हिंदुधर्म या काळात मायावाद, निवृत्ती, संसाराचे क्षणभंगुरत्व यांचा उपदेश करून मनुष्याच्या मनातल्या या आकांक्षा समूळ नष्ट करण्याचा कसून प्रयत्न करीत होता. 'गीतारहस्या'च्या पहिल्या प्रकरणात लो. टिळकांनी या प्रयत्नाचा इतिहास दिला आहे. गीता हा हिंदुधर्माचा महाग्रंथ. त्याचा अर्थ श्रीशंकराचार्यांच्या पूर्वीच्या काळी भाष्यकारांनी महाभारतकारांप्रमाणे ज्ञानकर्मसमुच्चयात्मक म्हणजे ज्ञानाबरोबरच ज्ञानी मनुष्याने आमरणान्त स्वधर्मोक्त कर्म केले पाहिजे – असा प्रवृत्तिपर लावला होता, असे टिळक सांगतात. श्रीशंकराचार्यांपासून मात्र प्रकरण उलटले आणि तेथून पुढे श्रीरामानुजाचार्य (इ. स. १०१६), श्रीमध्वाचार्य (११९८), श्रीवल्लभाचार्य (१४७९), निंबार्क (११६२) या आचार्यांनी, एकजात सर्वांनी गीतेचा अर्थ केवळ निवृत्तिपर, आणि संन्यासपर लावला. त्यांच्यात जगाच्या मूलकारणाविषयी व मोक्षमार्गाविषयी मतभेद होते. पण निवृत्तिविषयी, संन्यासमार्गाच्या श्रेष्ठतेविषयी, संसार, राज्य, साम्राज्य, ऐहिक वैभव यांच्या क्षणभंगुरत्वाविषयी त्यांच्यात मतभेद नव्हता. त्यांनी केवळ गीतेचाच नव्हे, तर उपनिषदे, ब्रह्मसूत्रे यांचाहि अर्थ तसाच लावला आणि त्याच धर्माचा उपदेश करून हिंदूंना धन, वैभव, समृद्धी, स्वराज्य, भौज्य, वैराज्य, साम्राज्य यांची इतकेच नव्हे तर वैयक्तिक संसारातील स्त्रीपुत्रादिकांच्या उत्कर्षाची सुद्धा, अणुमात्र इच्छा राहू नये असा अट्टाहास चालविला. गीता हा हिंदुधर्माचा प्राण आहे. जनमनावर त्याचे किती वर्चस्व आहे हे भारतीयांना सांगावयास नको. त्यातूनच भाष्यकारांनी हे कश्मल, अनार्यजुष्ट, अस्वर्ग्य असे हे तत्त्वज्ञान

निर्माण केल्यावर समाजाचे काय होईल, त्याला किती दौर्बल्य येईल हे सांगावयास पाहिजे असे नाही. या भाष्यकारांच्या जोडीला दहाव्या-अकराव्या शतकापासून संतमंडळ आले आणि, मोक्षासाठी संसार सोडण्याची जरूर नाही असे म्हणत असताहि त्या संसाराची, स्त्री-पुत्र, धनवैभव, राज्य, साम्राज्य यांची इतकी हिडीस, ओंगळ चित्रे त्यांनी रंगविली, त्या संसाराविषयी उत्साह दाखविणाऱ्यांची इतकी निर्भर्त्सना केली की आचार्यांच्या संस्कृत ग्रंथांनी व प्रवचनांनी कर्तृत्वनाशाचे प्रारंभिलेले कार्य यांनी प्रांतिक भाषात ग्रंथ लिहून पुरे करून टाकले. शतकानुशतक समाजाला निवृत्तीचे, संन्यासधर्माचे, संसारनिंदेचे असे अखंड पाठ मिळत राहिल्यामुळे, स्वराज्य, साम्राज्य, समाजसंघटना, व्यापार, विद्येची, विज्ञानाची उपासना, जगप्रवास, याविषयीची भारतीयांच्या मनातली उभारीच नष्ट झाली. अशा स्थितीत परकी आक्रमणाला ते बळी पडत राहिले तर नवल काय ?

ज्या धर्माला निवृत्तिप्रधान रूप येते तो धर्म समाजसंघटनेचे तत्त्व म्हणून उपयोगी पडू शकत नाही हे उघडच आहे. इस्लामी धर्म जसा अत्यंत प्रवृत्तिपर होता तसाच संघटकही होता. प्रारंभीची अनेक शतके तरी इस्लामी शिपाई परधर्मीयांच्या बाजूने दुसऱ्या इस्लामी शिपायाशी लढणार नाही एवढी धर्मनिष्ठा मुसलमानात जाज्वल्य स्वरूपात दिसून येत होती. सिंधच्या दाहीर राजाचा आरब सरदार आलाफी हा महंमद कासिमविरुद्ध लढला नाही. पण मोक्वा बसैया या हिंदूजवळ मात्र ही निष्ठा नव्हती. त्याने हिंदु राजा दाहीर याच्याविरुद्ध जाऊन महंमदाला होड्या, वाटाड्ये, इ. सर्व प्रकारचे साह्य केले. भारताचा पुढील इतिहास असल्याच उदाहरणांनी भरलेला आहे. (आणि आजही तो रिकामा झालेला नाही !) राष्ट्रनिष्ठा त्या काळात उदयास आली नव्हती. पण धर्मप्रेम हे तर लोकांच्या ठायी जगातल्या प्रत्येक देशात जागृत होते. त्याचा संघटनेसाठी उपयोग करून ज्यांनी समाजात ऐक्यभाव व कडवा आपपरभाव निर्माण केला त्यांना पराक्रम करता आला. हिंदूमधल्या तत्त्ववेत्त्यांनी धर्माचा या दृष्टीने कधी विचारही केला नाही. आणि समाजसंघटनेचे दुसरेही कोणते तत्त्व निर्माण केले नाही. जेथले तत्त्ववेत्ते, म्हणजेच धर्मवेत्ते इतके दरिद्री, दृष्टिशून्य व कर्तृत्वहीन झाले तेथला समाज

असंघटित नेभळा, दुबळा झाला आणि परकी आक्रमणाला शतकानुशतक बळी पडत राहिला तर त्यात नवल काय ?

समाजातल्या घडामोडींवर जागरूकपणे नजर ठेवणारा, समाजावर कोसळणाऱ्या आपत्तींचा विचार करणारा, समाजरचनेची तत्त्वे फलदायी होत आहेत की त्यांना विपरीत फले येत आहेत याचा सतत अभ्यास करणारा, समाजाचा अपकर्ष होत असेल तर त्याची कारणे शोधून काढून समाजाला नवा धर्म सांगणारा, असा एक तत्त्ववेत्त्यांचा, धर्मप्रवक्त्यांचा, ग्रंथकारांचा, स्मृतिकारांचा वर्ग समाजात असावा लागतो. दुर्दैवाने हा वर्ग भारतातून नष्ट झाला होता. जे धर्मवेत्ते होते ते ऐहिक प्रपंचाविषयी उदासीन होते आणि तसे सर्वांनी व्हावे, असा उपदेश करीत होते. आठव्या शतकापर्यंत आपल्या समाजात नव्या नव्या स्मृतींची रचना होत होती आणि पुढे ती बंद पडली हे त्याचेच लक्षण होय. देवलस्मृतीची रचना इ. स. ७३२ च्या सुमारास झाली. महंमद कासीमाने हजारो हिंदूंची कत्तल केली आणि हजारो बाटविले. या आपत्तींतून समाजाला सोडविण्यासाठीच या स्मृतीची रचना झाली होती हे तिच्या प्रस्तावनेवरून स्पष्ट दिसते. ऋषींनी देवलमुनींना, म्लेंच्छांनी धर्मभ्रष्ट केलेल्या ब्राह्मणक्षत्रियादि चातुर्वर्णीयांना शुद्ध कसे करून घ्यावे याबद्दल प्रश्न विचारला, असा देवलस्मृतीच्या प्रस्तावनेत उल्लेख आहे आणि प्रत्यक्ष स्मृतीमध्ये निरनिराळ्या लोकांसाठी अनेक प्रकारची प्रायश्चित्ते सांगितली आहेत. ही जागरूकता पुढे नष्ट झाली. धर्मवेत्ता ग्रंथकार हा समाजाचा कर्णधार आहे. तोच नष्ट झाल्यामुळे ही समाजनौका महासागरात वाटेल त्या दिशेला लोटली जाऊ लागली आणि दर वेळी खडकावर आपटून भग्न होऊ लागली. समाजाच्या ऐहिक हिताविषयीचे औदासीन्य हेच त्याच्या बुडाशी आहे. पुढल्या धर्ममार्तंडांनी स्वत: समाजचिंतन तर केले नाहीच, पण मागल्या धर्मवेत्त्यांनी समाजहिताची जी तत्त्वें सांगितली होती ती कलिवर्ज्य-प्रकरण निर्माण करून नष्ट करून टाकली. पतितशुद्धी हे त्यांपैकी एक आहे. शिवछत्रपतींनी पतितांच्या शुद्धीचे देवलप्रणीत तत्त्व पुन्हा अंगिकारले. यावरून समाजधुरीणाला अवश्य जागरूकता त्यांच्या ठायी कशी होती ते दिसून येईल. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्या महापुरुषाने रूढ तत्त्वज्ञान उलथून टाकून नवधर्मतत्त्व प्रस्थापिले हेच त्याचे महान् क्रांतिकार्य होय. पण त्या कार्याचे

स्वरूप नीट आकळण्यास शिवपूर्व धर्मवेत्त्यांनी धर्माला अत्यंत घातक रूप कसे दिले होते ते पाहणे अवश्य आहे.

यो यच्छ्रद्धः स एव सः । असें भगवद्वचन आहे. जशी ज्याची श्रद्धा तसे त्याचे भवितव्य असा त्याचा अर्थ आहे. समाज जो धर्म किंवा जे तत्त्वज्ञान स्वीकारतो त्याप्रमाणे त्याचे नशीब ठरत असते. भारतीयांनी या काळात कलियुगाचे तत्त्वज्ञान स्वीकारले होते. सत्ययुगात उन्नती होत जाते आणि कलियुगात अधःपातच व्हावयाचा, अशी श्रद्धा त्या वेळी समाजमनात घर करून राहिली होती आणि त्या वेळचे धर्मप्रवक्ते ती दृढमूल करून टाकीत होते. त्यामुळे मुसलमानी आक्रमणाला तोंड द्यावे, ते मोडून काढावे ही उभारी जनमनातून नाहीशी होत चालली होती. कारण आता म्लेंच्छांचाच जय व्हावयाचा, त्यांचेच राज्य चालावयाचे, आपल्या प्रयत्नाला यश येणार नाही हीच हीन भावना लोकांच्या मनात रुतून बसली होती. महाराष्ट्रातून हिंदू राज्ये नष्ट झाली याविषयी महिकावतीची बखर लिहिणारा लेखक म्हणतो, ‘कलियुगात असा प्रकार होणार अशी भाक लक्ष्मीनारायणाने कलीस दिली होती. ती शके १२७० त (इ. स. १३४८) खरी ठरली. हरिहर गुप्त झाले. ऋषि बदरिकाश्रमी गेले, वसिष्ठहि गेले. सूर्यवंशी, चंद्रवंशी क्षत्रिय यांची शस्त्रविद्या लुप्त झाली.’ विश्वाचे त्राते जे देव आणि ऋषि यांनीच पाठ फिरविली आणि हिंदूंना कलीच्या स्वाधीन केले ! मग आपल्याला जय मिळेल असा आत्मविश्वास त्यांनी कशाच्या बळावर धरावा ? मल्हारराव रामराव चिटणीस यांनी शिवाजीमहाराजांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र लिहिले आहे. त्यात कलियुगकल्पना छत्रपतींनी कशी हेटाळून टाकिली त्याचे वर्णन केले आहे. महाराजांनी विचार केला, ‘आपण हिंदु, सर्व दक्षण देश म्लेंच्छांनी ग्रासिला. धर्म बुडविला. हा रक्षणार्थ प्राणहि वेचून धर्म रक्षू व आपले पराक्रमाने नवीन दौलत संपादूं. नवे साधावे हे या कुलात जन्मल्याचे सार्थक’ असे ठरवून महाराजांनी दादोजी कोंडदेव यास सल्ला विचारला. त्यांनी उत्तर केले, ‘आपण म्हणता परंतु याचा शेवट लागणे परम दुर्घट आहे. साहेब मनात आणतात याचा विचार म्हणता तरी हे युग विपरीत. तेव्हा दिवसेंदिवस धर्म क्षयास जाणार, तेव्हा हे घडणे दुरासाद.’ गुरुजींचा असा नाउमेदकारक सल्ला मिळाला तरी ‘धर्म वृद्धिगत करण्यासाठी प्राण दौलत गेली

तरी जावो. प्रयत्न करावा.' असेच महाराजांनी ठरविले. 'पुरुषप्रयत्न बलवत्तर, दैव पंगू आहे, यास्तव प्रयत्ने अलबल करावे, त्यास दैव जसजसे सहाय होईल तसतसे अधिक करीत जावे. देव परिणामास नेणार समर्थ आहे.' अशी छत्रपतींची श्रद्धा होती. देव आपल्याला साह्य करणार नाही, परमेश्वरानेच पाठ फिरविली आहे, अशी अत्यंत घातक श्रद्धा हिंदू मनात रुजली होती. महाराजांनी प्रथम ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. थोर पुरुषांचे हेच वैशिष्ट्य आहे. ते प्रथम धर्मक्रांति करतात. लोकांच्या श्रद्धा, लोकांचे तत्त्वज्ञान यात प्रथम परिवर्तन घडवितात. कारण सामर्थ्य तेथे आहे हे त्यांना कळलेले असते. परमेश्वर आपणास प्रतिकूल आहे ही अमंगल कल्पना नाहीशी करण्याचा महाराजांचा प्रयत्न जागोजाग दिसून येतो. दादाजी नरस प्रभूला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, 'हे राज्य व्हावे हे श्रींचे मनात फार आहे. श्रीरोहिरेश्वराने आम्हास यश दिले. तोच सर्व मनोरथ, हिंदवी स्वराज्य करून, पुरविणार आहे.' प्रारंभीच्या दिवसांत स्वतःस राजे म्हणविण्याचा अधिकार कोणास आहे हा वाद निघाला असता 'आम्हास पादशहाने राजे किताब मेहेरवान होऊन दिधले.' असे रावराजे मोरे यांनी महाराजांना लिहिले. महाराजांची श्रद्धा अशी की, 'आम्हास श्रीशंभूने राज्य दिधले आहे.'

कलियुग कल्पनेप्रमाणेच हिंदुधर्मीयात इतरहि अनेक आत्मघातकी कल्पना शिरल्या होत्या. 'कलावाद्यन्तयोः स्थितिः'। आणि 'नदान्तं क्षत्रियकुलम्।' ही त्यापैकीच विपरीत कल्पना होय. या वचनांमुळे कलियुगात आदि-ब्राह्मण व अन्त-शूद्र येवढेच वर्ण शिल्लक आहेत, पुराणातील नन्दवंशाबरोबरच क्षत्रियकुले—एकंदर क्षत्रियवर्णच नष्ट झाला, त्यामुळे, हिंदूंमध्ये राजा होण्यास कोणीच पात्र नाही, असा समज सर्वत्र रूढ होऊ लागला. शब्दप्रामाण्यबुद्धीने समाजाचा केवढा नाश होतो हे यावरून दिसेल. ज्यांनी ही वचने रूढ केली त्यांनी क्षणभर समाजाचे प्रत्यक्ष अवलोकन केले असते तरी यातील वेडगळपणा त्यांच्या ध्यानी आला असता. नन्दांच्यानंतर शातवाहन, वाकाटक, गुप्त, राष्ट्रकूट, चालुक्य, गोहिलोत, ही केवढाली क्षत्रियकुले पराक्रम करीत होती. राज्ये स्थापित होती. अश्वमेध करून सार्वभौमत्वाची ग्वाही फिरवीत होती. नंदपूर्व क्षत्रियांपेक्षा यांचे पराक्रम अणुमात्र कमी नव्हते. पण समाजातील घडामोडी पाहून काही निर्णय करावा ही ऐपतच येथील

तत्त्ववेत्त्यात राहिली नव्हती. ही वचने ब्राह्मणांनी लिहिली आणि त्यापेक्षाहि वाईट म्हणजे क्षत्रियांनी त्यावर श्रद्धा ठेवली. वास्तविक भारतात तत्त्वज्ञान व धर्म सांगण्याचा क्षत्रियांचा अधिकार ब्राह्मणांइतकाच मोठा आहे. श्रीकृष्ण भीष्म, गौतमवुद्ध, महावीर, मनु हे सर्व क्षत्रिय होते. उपनिषद्‌कार ऋषींमध्ये अनेक क्षत्रिय होते. मध्यंतरीच्या काळात ललितादित्य, भोज, भर्तृहरी, श्रीहर्ष, मुंज हे क्षत्रिय राजे चांगले विद्वान् होते, शास्त्रज्ञ होते. पण खरे जीवन पाहून प्रत्यक्ष सामाजिक प्रपंच पाहून, समाजाच्या उत्कर्षापकर्षाचे चिंतन करून धर्मप्रवचन करण्याची क्षत्रियांची परंपराहि पुढे नष्ट झाली. आणि सर्व महापराक्रमी क्षत्रिय वीर परक्यांची राज्ये वाढवीत बसले, इस्लामी साम्राज्यांचा विस्तार करीत राहिले. महंमदशहा सूर यांचा सेनापति हिमू, अकबराचे सेनापति भगवानदास व मार्नासग, औरंगजेबाचे सेनापति मिर्झाराजे जयसिंग व जसवंतसिंग, सवाई जयसिंग, शहाजी, मुरार जगदेव हे सर्व महापराक्रमी सरदार होते. मोगल, अफगाण, तुर्क यांच्या मोठ्या मोठ्या सेनांना यांनी धूळ चारिली आहे. इस्लामी सुलतानाच्या राज्याचा विस्तार मध्य आशियापासून दक्षिणेत रामेश्वरापर्यंत करण्यास यांचेच प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. पण या पराक्रमी पुरुषांनी स्वतःचे राज्य स्थापिले नाही, हिंदवी स्वराज्याचे स्फुरणच त्यांना झाले नाही. या यवनसेवेत धर्महानि नाही, हिंदुधर्म कलियुगात क्षयासच जाणार, स्वतंत्र राज्याचा अधिकार आपणास नाही असल्या कल्पनांनी या कर्त्या पुरुषांना स्वत्वहीन करून टाकले होते. मुसलमानाप्रमाणे धर्म व राजकारण यांची सांगड क्षत्रियांनी घातली असती, स्वराज्य, साम्राज्य, शत्रूंचा निःपात, आक्रमकांची कत्तल, ही धर्मकृत्येच आहेत, अशी श्रद्धा त्यांनी जोपासली असती तर त्यांना स्वराज्य स्थापता आले असते. ते शिवछत्रपतींच्या इतकेच शूर होते, रणनिपुण होते. पण छत्रपतींनी ती श्रद्धा जोपासली आणि 'नदान्तं क्षत्रियकुलम्' 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' या महामूर्ख वचनांना हेटाळून क्षत्रियकुलावतंस सिंहासनाधीश्वर महाराज छत्रपति' अशी पदवी धारण केली. आणि स्वतःचा शक सुरू केला. दुर्दैवाने त्या वेळच्या मोहिते, घोरपडे, मोरे, सावंत, दळवी, सुर्वे, निंबाळकर आदि सरदारांना ही कल्पना झेपली नाही. या सिंहासनाधीश्वराला ते कायम विरोध करीत राहिले. त्याच्याशी लढत राहिले. प्रत्यक्ष छत्रपतींचा भाऊ आणि त्यांचा युवराज यांनाहि या धर्म-

क्रांतीचा अर्थ समजला नाही, हे केवढे दुर्दैव होय ! छत्रपतींनी घडविली ती राज्यक्रांती होतीच. पण त्याच्या आधी ती धर्मक्रांती होती. वर सांगितलेल्या धर्मकल्पना केल्यावाचून राज्यक्रांती होणेच शक्य नव्हते. त्या घातकी कल्पना नष्ट करण्याचे मन:सामर्थ्य साडेसहाशे वर्षांच्या काळात कोणाहि धर्मवेत्त्याच्या ठायी – ब्राह्मणाच्या वा क्षत्रियाच्या ठायी – निर्माण झाले नाही. यामुळेच हिंदुसमाज कमालीचा दुबळा, नेभळा, दरिद्री व नि:सत्त्व होऊन गेला. पण मला यापेक्षा जास्त मोठे दुर्दैव वाटते ते हे की, छत्रपतींनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात जी क्रांति घडविली तिचा अर्थ आकळून, त्यातून तत्त्वज्ञान निर्माण करून समाजाला ते शिकविणारा ग्रंथकार कोणी झाला नाही! गौरव करणारे बखरकार, शाहीर झाले हे तरी नशीबच. पण एवढ्याने भागत नाही. शिवप्रभूंनी निर्माण केलेला नवा धर्म त्यावेळच्या किंवा नंतरच्या पंडितांनी ग्रंथनिविष्ट करावयास हवा होता. पण ते दुसऱ्या उद्योगात होते. धर्मसिंधु, निर्णयसिंधु हे ग्रंथ पाहिले म्हणजे त्या वेळचे शास्त्री-पंडित कशात गुंतले होते, त्यांच्या मताने धर्माचे महत्त्वाचे घटक कोणते होते, हे कळून येईल. श्राद्धपक्ष, प्रायश्चित्त, ग्रहणातील आचार, वर्षातल्या २४ एकादश्यांचे पृथक् माहात्म्य, महिन्यातील प्रत्येक तिथीला काय खावे याबद्दलचे विधिनिषेध, हे सर्व कर्मकांड हाच त्यांच्या मते धर्माचा आत्मा होता. आणि दुर्दैव असे की, हीच विचारपरंपरा त्यापूर्वी ४।५ शे वर्षे चालू होती. हेमाद्रीने 'चतुर्वर्गचिंतामणि' हा ग्रंथ लिहिला त्यात हाच विचार आहे. या सर्व ग्रंथांतून इतकी व्रते-वैकल्ये सांगितली आहेत आणि इतके विधिनिषेध, इतकी प्रायश्चित्ते आहेत की, ती आचरताना मनुष्याला समाजसेवा, समाजावर येणाऱ्या आपत्ती, राष्ट्रात निर्माण होणारे भेद, दुही, अराजक, धर्मावर येणाऱ्या आपत्ती, परचक्र, समाजरक्षण, भौतिक विद्या, यांचा विचार करण्यास क्षणभरहि वेळ सापडणार नाही. पण त्याहिपेक्षा मोठी हानि म्हणजे असल्या कर्मकांडात्मक जड आचारधर्मालाच लोक खरा धर्म मानतात ही होय. समाजाचा घात झाला तो यामुळेच. हे आचार पाळले की यवनांची सेवा, फितुरी, स्वजनद्रोह यातले काहीहि केले तरी अधर्म होत नाही, त्यांचा धर्माशी काही संबंध नाही, असा अत्यंत घातकी समज लोकांच्या मनात रूढ झाला. आचारकांडावर संतांनी खप टीका केली आहे. पण तोच धर्म होय, हा समाजाचा भ्रम कधीच नष्ट

झाला नाही. आणि यामुळे हिंदुधर्मामध्ये व्रते-वैकल्ये, सोवळे-ओवळे, टिळे-टोपी, तिथिवार नक्षत्रांचे विधिनिषेध, प्रायश्चित्ते यांनाच प्राधान्य मिळून त्याला अत्यंत हीन व अमंगळ रूप प्राप्त झाले. त्याचे गमक हेच की, या धर्माने राष्ट्रीय प्रपंचाची, समाजाच्या उत्कर्षापकर्षाची, त्याच्या योगक्षेमाची, त्याच्या रक्षणाची, पारतंत्र्यस्वातंत्र्याची या काळात पूर्वीसारखी कधीच दखल घेतली नाही. हरिहर पाठमोरे झाले, ऋषी निघून गेले, असे त्या वेळी लोक म्हणत होते. खरा अर्थ असा की लोक धर्माला पाठमोरे झाले होते. आणि म्हणूनच देवहि पाठमोरे झाले; लोक गुलाम झाले म्हणून त्यांचे देवहि गुलाम झाले. सोमनाथ, नगरकोट, मथुरा, कनोज येथील देवांचे उपासक नतद्रष्ट, दळभद्रे, भेकड, धर्महीन झाले म्हणून तेथील देवांना मृत्यु आला. लोक मात्र देवांना मृत्यु आला म्हणून आपला ऱ्हास झाला असा समज करून घेऊन, दळे होऊन, दैववादी होऊन स्वस्थ बसले होते. आपण देवांचे व धर्माचे रक्षण केले पाहिजे, म्हणजे धर्म आपले रक्षण करितो,' 'धर्मो रक्षति रक्षितः ।' या महावाक्यांचा त्यांना विसर पडला. 'धर्म वृद्धिंगत करण्यासाठी प्राण दौलत गेली तरी जावो, प्रयत्न करावा' हा विचार महाराजांच्या मनात ज्या दिवशी आला त्या दिवशी भारतात धर्मक्रांतीची आणि पर्यायाने राज्य-क्रांतीची बीजे रोवली गेली.

शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्य स्थापन करताना, धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक सर्व प्रकारची क्रांती केली, म्हणूनच त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन मराठ्यांना पुढे मोगली सत्तेची पाळेमुळे भारतातून खणून टाकण्यात यश आले, हा या निबंधाचा प्रतिपाद्य विषय आहे. शिवछत्रपतींनी ही जी क्रांती घडविली ती कृतींनी घडविली, ग्रंथाने, तत्त्वज्ञानाने नव्हे. त्यांच्यामागे समर्थ रामदासांच्यासारखा एकटा एक ग्रंथकार उभा होता. पण त्यांचीही परंपरा पुढे चालली नाही. त्यांच्याबरोबर ती समाप्त झाली. छत्रपतींच्या प्रत्येक कृतीचे रहस्य जाणून तीत समाजाच्या सर्वांगीण क्रांतीची बीजे कशी आहेत, ते स्पष्ट करून क्रांतीचे तत्त्वज्ञान सांगणारे अनेक ग्रंथकार त्या वेळी होणे अवश्य होते. पण तसे झाले नाहीत हे या देशाचे दुर्दैव होय. युरोपात याच काळात असे ग्रंथकार झाले, शेकड्यांनी झाले म्हणून तेथला समाज प्रगत झाला, समर्थ झाला. धर्म आणि भौतिक विद्या या दोन्हींची जोपासना करून जग जिंकण्या-

इतके बल त्याला प्राप्त झाले. भारतात हे झाले नाही. येथे ग्रंथकार झाले नाहीत असे नाही. पण श्राद्ध, पक्ष, प्रायश्चित्ते, शेंडी, हजामत, ग्रहणांची फले त्यांचे हे विषय होते. निवृत्ती, संसाराची असारता, भेसुरता, मोक्ष हे त्यांचे विषय होते. समाज, राष्ट्र, संघटना, स्वराज्य, साम्राज्य यांसाठी अवश्य तो धर्म, ते तत्त्वज्ञान हा कोणाचाच विषय नव्हता. इतक्या दीर्घ कालखंडात असा धर्मप्रवक्ता, असा स्मृतिकार भारतात होऊ नये, हे मोठे आश्चर्य आहे. पण भारतात शंकराचार्यांपासून पुढे शतकानुशतक दृढमूल होत गेलेला निवृत्ति-वाद हेच याचे प्रधान कारण होय. त्याचा विचार मागे केलाच आहे. आता निवृत्तिवादातून 'अदृष्टफल-प्रधान' असा जो अत्यंत घातकी धर्म पोसला जातो त्याचे रूप पाहावयाचे आहे.

आपण जी धर्मतत्त्वे स्वीकारतो ती योग्य की अयोग्य हे प्रत्यक्षात त्याची फळे काय मिळतात, ते पाहून ठरविले पाहिजे, असा एक पक्ष आहे. दुसऱ्या पक्षाला हे मान्य नाही. त्याच्या मते धर्माची फळे स्वर्गात, परलोकात मिळा-वयाची असतात. ती अदृष्ट असतात. तेव्हा फलप्राप्ती पाहून धर्मतत्त्वांची पारख करणे हे योग्य नाही. तसा मनुष्याला अधिकारच नाही. त्याने श्रुति-स्मृतीत सांगितलेले धर्माचरण करीत राहावे. फळ पाहून, श्रुतिस्मृतिप्रणीत धर्माचे यशापयश मोजणे हे सर्वथा गर्ह्य होय. या दुसऱ्या म्हणजे अदृष्टफल-धर्माचा स्वीकार समाजाने केला की त्याचा नाश ठरलेलाच आहे. नवव्या-दहाव्या शतकात भारतातल्या शास्त्री–पंडितांनी, ब्राह्मण-क्षत्रियांनी आणि एकंदर समाजाने या अनर्थकारी धर्माचा स्वीकार केला हे इतिहासावरून स्पष्ट दिसते. परदेशगमनाचीच गोष्ट पहा. कलिवर्ज्यप्रकरणात द्विजांना समुद्र-गमनाला बंदी केलेली आहे. पूर्वीच्या काळात १०।१२ शतके भारतीय लोक व्यापारासाठी व दिग्विजयासाठी विश्वसंचार करीत आणि त्यात भूषण मानीत. असे असताना कोणातरी शास्त्रीपंडितांच्या कुजलेल्या मेंदूत समुद्रयानाला हिंदूंना बंदी करावी असा विचार आला. यामुळे व्यापार बुडाला, विजि-गीषा नष्ट झाली आणि हिंदू लोक घोर अंधारात पडले. पण ही सर्व दृष्ट फले होत. ती पाहून म्हणजे प्रत्यक्ष समाजाचा हानिलाभ पाहून धर्मनियम ठरवि-ण्याची प्रथा असती तर पुढल्या कोणातरी धर्मशास्त्रज्ञाने या सिंधुबंदीचा निषेध केला असता. पण या काळात अदृष्टफल–धर्मावर भारतीयांनी श्रद्धा ठेविली

म्हणून त्यांचा नाश झाला. आक्रमक जो मुसलमान तो सर्व जग हिंडलेला, अनेक देश पाहिलेला आणि म्हणूनच चतुरस्त्र व हुषार असा होता. अकबर-जहांगीर यांच्या दरबारी रोमहून, बगदादहून, तुर्कस्थानातून लोक येत. त्यांपैकी कित्येक येथेच राहत आणि आपल्या जगाच्या अवलोकनाचा फायदा मुसलमानांना देत. आणि हिंदूंना तर एका नियमाअन्वये, अंग, वंग (बंगाल) कलिंग (आंध्र), सौराष्ट्र, मगध या प्रांतात सुद्धा जाण्यास बंदी होती. समुद्र-पर्यटनास तर होतीच होती. समाजाचा जेवढा नाश करता येईल, त्याला जेवढा नेभळा, बावळा, निःसत्त्व बनविता येईल तेवढा बनवावयाचा अशी प्रतिज्ञा करूनच त्या वेळचे शास्त्री-पंडित धर्मशास्त्र सांगत होते, असे दिसते. राजाने लढाई केलीच पाहिजे आणि ब्राह्मणाने प्रवास केलाच पाहिजे असा महाभारतात कटाक्ष दिसतो. त्यांनी हे कर्तव्य न केले तर त्या दोघांना गळचात मोठा धोंडा बांधून पाण्यात बुडवावे असे महाभारतकार सांगतात. (द्वावभसि निवेष्टव्यौ गले बध्वा दृढां शिलाम् । राजानं च अयोद्धारं ब्राह्मणं च अप्रवासिनम् ।) ही दृष्टि कोठे आणि आत्मघातकी सिंधुबंदी घालणाऱ्या, अदृष्ट-फल-वादी शास्त्रीपंडितांची दृष्टि कोठे ? (तर्कतीर्थ कोकजे यांनी अदृष्ट-फल-धर्माचे विवेचन आपल्या ‘ धर्मस्वरूपनिर्णय ’ या ग्रंथात विस्ताराने केले आहे.)

श्रीधरशास्त्री पाठक, पंडित सातवळेकर, चिंतामणराव वैद्य यांच्या मते हिंदुसमाजाला घातक असे अनेकविध धर्मनियम नवव्या-दहाव्या शतकातच जारी करण्यात आले. जातीजातीत पूर्वी अनुलोम तरी विवाह होत. शूद्राच्या हातचा स्वैपाक खाण्यास व त्याच्या पंक्तीस बसण्यास ब्राह्मणांना बंदी नसे. बालविवाह, विधवाविवाह-निषेध या घातकी रूढी पूर्वी नव्हत्या. जातीजातींची खाण्यापिण्याची, सोवळ्या-ओवळ्याची बंधने याच सुमाराला कडक करण्यात आली. त्यामुळे समाज अत्यंत छिन्नभिन्न झाला. वर्ण व जाति एकमेकांपासून पूर्वीपेक्षा जास्त दुरावल्या आणि नित्य उपेक्षा होत राहिल्याने बहुसंख्य समाज व स्त्रिया समाजउत्कर्षाविषयी हळू हळू उदासीन होऊ लागल्या. राजकारण, देशातले राष्ट्रीय व्यवहार यांविषयी कमालीचे औदासीन्य हा त्या काळच्या हिंदुसमाजातला अत्यंत घातक असा दोष होय. निवृत्तिधर्माने तो प्रथम निर्माण झाला, कलियुग-कल्पनेने तो पोसला गेला आणि कडक जातिबंधनामुळे—रोटीबंदी, बेटीबंदीमुळे—सर्व समाजात तो रोगबीजासारखा पसरला.

('अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ'–श्रीधरशास्त्री पाठक, 'मध्ययुगीन भारत, ३ रा खंड'–चिं. वि. वैद्य, 'स्पर्शास्पर्श'–पं. सातवळेकर). समाजात आपल्या उन्नतीला अवसर नाही असे ज्या जमातीला वाटते ती राष्ट्रीय प्रपंचाविषयी उदासीन होणारच. चांडाळ स्त्रीपासून झालेला पराशर, कोळणीपासून झालेला व्यास, गणिकेपासून झालेला वसिष्ठ हे सर्व मागल्या काळात उच्च-पदाला जाऊ शकत होते. तसा त्या वेळी धर्म होता. तसे शास्त्र होते. म्हणूनच समाजहिताविषयी त्या जमाती त्या काळी उदासीन नसत. स्त्रियांच्याविषयी हाच विचार ध्यानी घेतला पाहिजे. बालविवाहाने आणि विधवाविवाह–निषेधाने स्त्रीला या अदृष्ट-फलधर्माने प्रपंचातून उठविल्यासारखेच केले. स्वतःचे जीवनच जिला भारभूत झाले ती समाजहितचिंतन काय करणार ? अशा रीतीने शास्त्री-पंडितांनी जो अमंगल कर्मकांडात्मक, जड, अंध, अज्ञाना-त्मक धर्म भारतात प्रसृत केला त्यामुळे बहुसंख्य समाज राजकारण, सामाजिक प्रपंच, त्याचा उत्कर्षापकर्ष याविषयी पराकाष्ठेचा उदासीन आणि म्हणून कर्तृत्वशून्य झाला. याला जागृत केल्यावाचून कोणत्याहि परकी आक्रमणास तोंड देण्यास, ते मोडून काढण्यास हा हिंदुसमाज समर्थ झाला नसता.

श्रीशिवछत्रपतींनी नेमके हेच जाणले आणि 'मराठा तेवढा मेळवावा,' सर्व समाज हिंदवी स्वराज्याच्या आकांक्षेने चेतवून द्यावा, ती महान् शक्ती आपल्या पाठीशी उभी करावी, यासाठी प्रयत्नाची शर्थ केली. याविषयी प्रत्यक्ष कागदोपत्री पुरावे थोडे उपलब्ध आहेत. पण त्यांची मुळीच जरूर नाही. छत्रपतींच्या भोवती उदयास आलेल्या कर्त्या माणसांची नुसती नावे पाहिली तर क्रांतीमुळे नव्या सामाजिक थरातून, आजपर्यंत ओसाड पडलेल्या जमिनीतून, नवीन कर्तृत्व कसे उदयास येते हे सहज कळून येईल. जेधे, मालुसरे, पालकर, कंक, नरसाळा, पानसंबळ, डबीर, कोरडे, हणमंते, गुजर, मोहिते पिंगळे, रांझेकर, लोहकरे, काकडे, नाईक, चिटणीस, प्रभु, भंडारी अशी कर्त्या पुरुषांची घराणीच्या घराणी आपल्याला त्या काळी राजकारणोन्मुख झालेली दिसतात. हे लोक पूर्वी वतनासाठी भांडत बसले होते, शेती करून गुजारा करीत होते, पातशाही नोकरी करून पोट जाळीत होते. ते राष्ट्रीय प्रपंचाविषयी सर्वस्वी उदासीन होते. छत्रपतींनी त्यांना धर्माचा नवा अर्थ सांगितला. 'यवन, दुष्ट तुरुक याचे कृत्यास अनुकूल होणे हा अधर्म होय,' 'धर्मरक्षणार्थ प्राणही अर्पावा,'

'गोरगरीब, अनाथ यांचा अभिमान धरावा,' 'हिंदवी स्वराज्याची स्थापना करावी' हा संदेश त्यांना दिला. त्याबरोबर हे लोक आक्रमकाशी प्रणपणाने झुंजू लागले. मोठमोठ्या मोहिमा यशस्वी करू लागले, गड-किल्ले घेऊ लागले, आरमार बांधू लागले, शत्रूंच्या फौजांची लांडगेतोड करू लागले, त्याचा मुलूख उद्ध्वस्त करू लागले, आणि दिल्ली हस्तगत करण्याची स्वप्ने पाहू लागले. मुसलमानांच्या फौजेपुढे हिंदू जसे पूर्वी हाय खात तसे आता मुसलमान मराठ्यांपुढे हाय खाऊ लागले. कोप्पल ताब्यात घेण्यासाठी हुसेन मियाना याशी हंबीररावाची लढाई झाली. त्या वेळी 'हंबीररावाने हत्यार चालविताच शेकडो मनुष्य जाता येता मारले, खान नामोहरम होऊन पळू लागले, त्यास धरून आणले, मग चहूकडून लांडगेतोड करून बेजार केले. त्यामुळे 'पुनः मराठ्यांच्या लढाईची गाठ ईश्वरा घालू नको' असेच ते लोक म्हणू लागले. खासा औरंगजेब दक्षिणेत सर्व सरंजामानिशी, सर्व इस्लामी सामर्थ्य पणास लावून, २५ वर्षे मराठ्यांना चिरडून टाकण्याची कसम खाऊन महाराष्ट्रात उतरला होता. कनोज, नगरकोट, सोमनाथ येथल्या पूर्वीच्या लढायात एकेका दिवसात अफाट हिंदू फौजांना आक्रमकांनी धुळीस मिळविल्याचे आपण वाचतो. सिंधू, मुलतान, गुजराथ, बंगाल, बिहार हे प्रांत एकदोन महिन्यांच्या अवधीत, काहीतर दोनचार दिवसात म्लेंछांनी कब्ज केले. मलिक काफुराने सगळी दक्षिण दहाबारा वर्षात धुळीस मिळविली. आणि आता ? पंचवीस वर्षे सर्व सेनापती, सर्व फौज, सर्व सल्तनत घेऊन औरंगजेब महाराष्ट्रात राहिला होता. पण मराठ्यांनी हा सर्व सरंजाम दस्त केला, गारद केला, धुळीस मिळविला. या वेळी त्यांना राजा नव्हता, सेनापति नव्हता, नेता नव्हता. पण त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या चित्तात छत्रपति होते. नवा धर्म होता. हे लोक राजकारणाविषयी उदासीन असते तर दोनचार महिन्यात, फारतर दोनचार वर्षात महाराष्ट्र पडला असता. तसे तर झाले नाहीच, उलट याच मराठ्यांनी मोगली सत्तेची पाळेमुळे भारतातून थोड्याच अवधीत खणून काढली. छत्रपतींनी जी धर्मक्रांती घडविली, राजकारणामागे जी धर्मशक्ति उभी केली, समाजाचे सर्व थर हलवून तेथून कर्तृत्व निर्माण करून जी सामाजिक क्रांति केली, तिची ही फळे आहेत.

पण जनशक्ती आपल्या पाठीशी उभी करण्यासाठी, अखिल महाराष्ट्र-समाज स्वराज्यवादी, स्वातंत्र्योन्मुख करण्यासाठी छत्रपतींनी आणखी एक फार

मोठी क्रांती केली. आणि ती म्हणजे सरंजामदारीचा नाश ही होय. इस्लामी सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापित होताच त्या सुलतानांनी मनसबदार, तर्फदार किंवा वतनदार यांचा एक मोठा वर्ग निर्माण केला आणि गरीब रयत त्यांच्या स्वाधीन करून टाकली. हे मनसबदार म्हणजे लहान लहान राजेच असत. आणि दिवाणी, मुलकी, फौजदारी व लष्करी वगैरे सर्व अनियंत्रित अधिकार त्यांजकडे असत. त्यांना रोकड वेतन नसे, जहागिरी असत. आणि त्या त्या परगण्याचा ठराविक वसूल बादशहाकडे दिला की मग त्यांची जबाबदारी संपली, अशी व्यवस्था असे. प्रजेला त्यांनी कसे वागविले हे बादशहा कधीच पाहत नसत. याचा परिणाम काय होत असेल त्याची कल्पना करणे अवघड नाही. महसूल दहा हजार असला तर हे मनसबदार एक लाख सहजच उकळणार. त्यांना विचारता कोणी नव्हता. पुन्हा बादशहा, जो जास्त महसूल देईल त्याला, वतन देण्याविषयी दक्ष असत. त्यामुळे रयतेला पिळून काढणे यात मनसबदारांची अहमहमिका लागत असल्यास नवल नाही. इस्लामी राज्यापूर्वी महाराष्ट्रात व भारतातही अशी रक्तपिपासू राक्षसी सुलतानी केव्हाच नव्हती. अर्थातच शेतकरी, कुणबी यांना शेत कसण्यात कसलाहि उत्साह राहिला नव्हता. त्यामुळे गावेच्या गावे ओसाड पडत, रयत परागंदा होई ! त्यात लढाया, जाळपोळ, लूट, अत्याचार हे नित्याचेच होते. त्यामुळे सर्व देश उजाड होऊन गेला होता. देशाला ही अवकळा मुसलमानी राज्यामुळे आली हे खरे पण अनेक वतनदार हिंदू होते, मराठे होते. त्यांची रीत कोणत्याही प्रकारे निराळी नव्हती. त्यामुळे रयतेला सर्व सारखेच झाले होते. आपल्या राज्यात काही निराळे होईल ही आशा करण्यास तिला जागाच नव्हती. मग तिने हिंदवी स्वराज्यासाठी का झटावे ? अशा रीतीने जनता ही महाशक्तिच स्वातंत्र्याविषयी उदासीन होती. मग इस्लामी सत्तेला विरोध करावयाचा कोणी आणि का ?

छत्रपतींनी याचे उत्तर दिले यातच त्यांची असामान्यता, त्यांचा समाजव्यापी आलोक, त्यांचा द्रष्टेपणा दिसून येतो. त्यांनी मध्यस्थ असलेली ही वतनदारी सफाई नष्ट केली आणि राजसत्ता व प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी, कष्ट करणारी रयत यांचा संबंध जोडला आणि हिंदवी स्वराज्यासाठी ही महाशक्ती प्रसन्न करून घेतली. शिवछत्रपतींचे गुरुजी दादोजी कोंडदेव यांनी

पुण्याला येताच ही पद्धत सुरू केली. प्रतिवर्षी जमिनीची पाहणी करून उत्पन्नाप्रमाणे वसूल घेण्याची पद्धत त्यांनी रूढ केली. पीक बुडाले असेल तर दादोजी वसूल घेत नसत. त्यामुळे लोक भराभर लागवड करू लागले. केल्या कष्टाचे फळ मिळेल हे कुणब्याला दिसू लागताच त्याने पुण्याभोवती दहा वर्षात नंदनवन निर्माण केले. हे करीत असताना जे वतनदार आडवे येत त्यांना रयतेच्या साह्याने दादोजींनी भरडून काढले. शिवछत्रपति बालवयांत हा अद्भुत प्रयोग, ही अलौकिक क्रांती पहात होते. ती पहात असताना हा शेतकरी, हा कुणबी, म्हणजे राष्ट्राचा खरा कणा आहे हे त्यांच्या ध्यानी आले आणि हाती सूत्रे येताच गुरुजींच्याच पावलावर पावले टाकून, सर्व मनसबदारी, सर्व मक्तेबाजी नष्ट करून ‘ लोक ’ ही अमोघ शक्ती हिंदवी स्वराज्याच्यासाठी त्यांनी सिद्ध केली. महाराजांची जी काही पत्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यातून या कुणब्याची ते अहोरात्र कशी चिंता वाहात असत ते स्पष्ट दिसून येते. लष्कराचे लोक चढेल असतात, ते कुणब्यापासून भाजी, पाला, गवत, फाटी घेतात आणि पैसे देत नाहीत, हे जाणून महाराजांनी सक्त ताकीद दिलेली असे की, प्रत्येक वस्तु विकतच घेतली पाहिजे. नाहीतर काय अनर्थ झाला असता ? ‘ गरीब कुणबी आहेत त्यास असे होईल की मोगल मुलकात आले त्याहून अधिक तुम्ही ! ’ त्या सुलतानी सत्तेहून हे राज्य निराळे आहे, येथे केल्या कष्टाचे चीज होते, राजा प्रजेच्या योगक्षेमाची काळजी वाहतो, हे रयतेच्या निदर्शनास आले तरच तिला हिंदवी स्वराज्याचा अर्थ कळेल आणि मग ती त्यासाठी झुंज घेण्यास सिद्ध होईल हे महाराजांनीं जाणले आणि सरंजामशाहीचा, वतनदारीचा नाश हे आपले पहिले उद्दिष्ट ठेवून अल्पावधीतच ते सिद्धीस नेले. छत्रपतींना घाटगे, खंडागळे, घोरपडे, मोहिते, निंबाळकर, मोरे, सावंत, सुर्वे, खोपडे, कोकणचे देसाई, मावळचे देशमुख यांनी कडवा विरोध केला तो या कारणासाठी. ते सर्व पातशाही सरदार होते आणि वर सांगितल्याप्रमाणे त्यांच्या जहागिरी म्हणजे लहान लहान स्वतंत्र राज्ये होती. तेथे त्यांची सत्ता अनियंत्रित होती. ही सत्ता व तिच्यापासून प्राप्त होणारे धनैश्वर्य याला ते स्वराज्यांत मुकणार होते. छत्रपतींच्या उज्ज्वल चारित्र्याचा परिणाम होऊन त्यांच्यातील काही मिरासदार महाराजांना वश झाले. पण बव्हंशी मिरासदारांनी छत्रपतींना शेवटपर्यंत विरोधच केला. पण या क्रांतीमुळे ज्याचे कल्याण होणार

होते त्या समाजातून हजारो कर्ते पुरुष निर्माण झाले व प्रारंभापासून या तरुण राजाच्या पाठीशी उभे राहून त्यांनी स्वराज्याच्या शपथा घेतल्या. मोगली सत्तेच्या अस्मानी सुलतानीला पराभूत करण्यासाठी महाराजांनी तितकीच समर्थ अशी शक्ती निर्माण केली तिचे रहस्य हे आहे. (छत्रपतींनी केलेल्या या क्रांतीचे विस्तृत आणि अतिशय सुगम वर्णन श्री. लालजी पेंडसे यांनी आपल्या 'धर्म की क्रांति' या पुस्तकात केले आहे.)

श्रीशिवछत्रपतींनी फार मोठी धर्मक्रांती केली असे आरंभापासून वर सांगितले आहे, त्याचा अर्थ आता स्पष्ट होईल. महाराजांनी कलियुगकल्पना नष्ट केली, हरिहर हिंदूंना पाठमोरे झाले आहेत, आपले देवच मुस्लीमांना वश आहेत हा घातकी समज जनमनातून समूळ काढून टाकला. त्याचप्रमाणे अदृष्ट फलप्रधान धर्म उच्छिन्न करून टाकून पतितांची शुद्धी, परदेशगमन, समुद्र-प्रवास हे नवे धर्माचार सुरू केले. आरमार बांधून स्वतः बेदनूरवर समुद्रमार्गे स्वारी करून शतकाशतकांची सिंधुबंदी रद्द केली. तिच्यामुळे समाजाचा घात होतो हे त्यांनी प्रत्यक्ष लोकव्यवहार पाहून जाणले. हिंदूंचे अवलोकन करून निर्णय काढण्याचे सामर्थ्यच शास्त्रीपंडितांच्या अदृष्टफल-धर्माने नष्ट करून टाकले होते. महाराजांनी ते तत्त्वच झुगारून दिले. ब्राह्मण. मराठे हे जन्मतःच श्रेष्ठ या कल्पना छत्रपतींनी हेटाळून टाकल्या. जो लढेल तो क्षत्रिय, जो विद्वान् असेल तो ब्राह्मण ही कल्पना त्यांनी आदरिली. त्यामुळेच मागे सांगितल्याप्रमाणे सर्व जातीजमातीतून कर्तृत्व फुलारून वर आले. जिवाजी विनायक सुभेदार यांना लिहिलेल्या पत्रात, 'ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करू पाहतो ? ऐशा चाकरास ठाकठीक केले पाहिजे' असे महाराजांनी बजाविले; त्याचप्रमाणे 'ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल त्या मराठीयाची तो इज्जत वाचणार नाही' असे कडक धोरण त्यांनी ठेवले होते. इतकेच नव्हे तर चिंचवडच्या देवांना सुद्धा मिठावरचा कर घेण्याबद्दल जरब बसविण्यास छत्रपतींनी कमी केले नाही. धर्माचा व राजकारणाचा, स्वराज्याचा, स्वातंत्र्याचा संबंध जोडून देणे व धर्मनिष्ठेची शक्ती स्वातंत्र्याच्या कार्याच्या मागे उभी करणे ही तर सर्वात मोठी क्रांती होय. 'बाजी घोरपडे मुधोळकर याणी स्वधर्मसाधनता सोडून यवन दुष्ट तुरुक याचे कृत्यास अनुकूल झाले. त्यामुळे जो प्रसंग गुजरला तो श्री तुमचा मनोरथ सिद्धीस नेणे व स्वधर्म

व राज्यवृद्धी करणे म्हणोन पार पडला ' असा उपदेश प्रत्यक्ष जिजामाताच महाराजांना करीत होती. यवन-सेवा हा अधर्म होय आणि स्वधर्म व राज्यवृद्धी ही अभिन्न आहेत हा या पत्रातील आशय उघड आहे. मुसलमानी आक्रमणामागे वर सांगितल्याप्रमाणे, त्यांच्या लुटीच्या, जाळपोळीच्या, कत्तलीच्या, विध्वंसाच्याही मागे त्यांची जळती धर्मभावना त्यांच्या सुलतानांनी नित्य उभी ठेवली होती, या महाशक्तीचे स्वरूप महाराजांनी जाणले आणि धर्म म्हणजे मोक्ष, धर्म म्हणजे परलोक, धर्म म्हणजे मायावाद, निवृत्ति, धर्म म्हणजे स्वातंत्र्यधनाविषयीची उदासीनता या अनर्थकारक कल्पनेचे निर्मूलन करून टाकले. अंध, जड धर्माच्या जनमतावरच्या शृंखला याप्रमाणे तुटून पडताच जनतेच्या सुप्त शक्ती जागृत झाल्या, नव्या आकांक्षा व नवी सामर्थ्ये तिच्या ठायी उदित झाली आणि त्यामुळे मुस्लिम आक्रमण तोडून काढून स्वराज्याची व पुढे साम्राज्याची स्थापना करणे ही दुर्घट वाटणारी गोष्ट मराठ्यांना सहज साध्य झाली. मराठ्यांच्या पूर्वी मुस्लिम आक्रमणाला तोंड देण्याचे प्रयत्न राजपूत व कर्नाटकी यांनी केले पण त्यांनी अशी धार्मिक व सामाजिक क्रांती करून जनतेची शक्ती आपल्या पाठीशी उभी करण्याचे प्रयत्न मुळीच केले नाहीत. म्हणून त्यांनी काही काळ अत्यंत गौरवास्पद असे जरी यश मिळविले तरी अखिल हिंदुस्थान यवनमुक्त करण्यात त्यांना यश आले नाही; इतकेच नव्हे तर आपले स्वतःचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठाही टिकविता आली नाही. मोठी कार्ये साधावयाची तर समाजात मोठी निष्ठा, मोठे संघटन-तत्त्व दृढमूल करणे अवश्य असते, हे त्या पराक्रमी लोकांनी जाणले नाही. शिवछत्रपतींनी हे जाणले होते. एके प्रसंगी प्रत्यक्ष शहाजी राजे याविषयी बोलताना त्यांनी हा विचार व्यक्त केला आहे. ‘आमुचे वडील शहाजी राजे परमशूर आणि योगवंतहि. त्यानी केली कामे ही निर्मल मने करून केली; परंतु त्यात थोडा भाव सुचतो. तो असा की, ते प्रथम निजामशाहीच्या संगतीत होते. ते अल्ली अदलशहाचे बोलावण्यावरून त्याच्याकडे गेले. परतून निजामशहांनी बलाविताच त्याकडे गेले. पुनः अल्ली यदलशहाकडेहि आले. ऐशा दोन तीन येरझारा जाल्या. थोर मनुष्यांनी येकाची संगति धरिल्यावरी त्याशी बिडताच नये, हे तो नीति प्रसिद्ध आहे.'

छत्रपतींनी जी क्रांती केली ती आणि तिची फले पाहता समर्थांनी ' शिवरायाचे आठवावे रूप, शिवरायाचा आठवावा साक्षेप, शिवरायाचा आठवावा

प्रतार्प भूमंडळी ! शिवरायाचे कैसे बोलणे, शिवरायाचे कैसे चालणे, शिवरायाची सलगी देणें, कैसी असे ' असे म्हटले ते किती यथार्थ आहे ते आपणांस सहज कळून येईल आणि स्वामींचा तो उपदेश आजही हृदयावर कोरून ठेवून आजही आपण अहोरात्र 'शिवरायाचे रूप' आठवणे किती अवश्य आहे हे ध्यानी येईल. आजही आपला ओढा अदृष्टफलधर्माकडे कसा आहे ते महशूर आहे. राष्ट्रविकास योजनेसाठी कोटी रुपये खर्चावयाचे ठरल्यावर सरकारी अधिकारी वर्षअखेर तेवढे खर्च झाले की नाही एवढेच पाहतात आणि ते झाले की धन्यता मानतात. यामुळे समाजाला प्रत्यक्ष उपयोग किती झाला, शेतीचे पीक किती वाढले, ग्रामजनांच्या काही सुखसोयी झाल्या की नाही, याविषयी ते सर्वथा उदासीन असतात. नियोजन सुरू होऊन दहा वर्षे झाली. पण त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात जी वाढ झाली ती कोठे गेली, तिचा उपयोग काय झाला, हे पाहण्याचे इतक्या वर्षांत कोणाला सुचलेच नाही. कारण फलाविषयी आपण बेफिकीर आहो. भूदान यज्ञवाले तर आता पूर्ण अदृष्टफलधर्मवादी झाले आहेत. जमिनीच्या वाटणीचे परिणाम काय झाले, जमिनीचा कस सुधारला काय, शेतमजुरांना किती जमिनी मिळाल्या, ग्रामीण बेकारी हटली काय, हे प्रश्न त्यांचे नव्हतच. त्यांना एकामागोमाग एक नवीन स्वर्गीय कल्पना सुचत आहेत. भूदान, संपत्तिदान, श्रमदान, जीवनदान (जीवनदान दोन प्रकारचे – एक म्हणजे लोकांनी चळवळीसाठी जीवनदान करावयाचे आणि दुसरे म्हणजे आचार्य विनोबांनी डाकू, खुनी, लुटारू यांना फासावरून उतरून त्यांना जीवनदान द्यावयाचे), सर्व प्रकारचे दान ! हे सर्व कार्य लवकरच हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणीतील दानखंडासारखे होणार असा रंग दिसतो. शिक्षणाच्या, दारूबंदीच्या, सर्वच बाबतीत हेच चालले आहे. फलाची आसक्ती आपल्याला नाही. ते सर्व परलोकात मिळेल अशी आपली श्रद्धा आहे.

दुसरे असे की, त्या मागल्या काळाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात मनसबदारी, वतनदारी, मिरासदारी निर्माण झाली आहे, आणि आपल्या सत्ताधीशांनी जनतेला या मिरासदारांच्या स्वाधीन केले आहे. कापडवाले, कागदवाले, साखरवाले, रॉकेलवाले यांना सरकार एक आणा भाववाढ करण्यास परवानगी देते. ते एक रुपया वाढवितात. मोगली सुलतानांचे मिरासदार हेच करीत. 'जे गावी दोनशे तीनशे होन खंडणी सरकारास द्यावी, ते गावी मिरास-

दारांनी दीड दोन हजार होन घ्यावे.' (सभासद बखर) सध्या असेच चालू आहे. अप्रत्यक्ष करांची सरकार भरमसाट वाढ करणार आहे. अजून करण्यास खूप अवसर आहे अशी त्याची श्रद्धा आहे, याचा हाच अर्थ होतो. तो कर वसूल करणारे मध्यस्थ हे व्यापारी, उद्योगपती, कारखानदार हे असतात. सरकारने एक पैसा कर ठेवला तर ते चार आणे घेतात. मग सरकार मध्ये पडून दोन आण्यांवर तडजोड करून प्रजेचे कल्याण साधते. पण त्यामुळे गरीब रयतेस वाटते की, 'इंग्रेज मुलकात आले त्याहूनहि हे अधिक.'

आपल्याला परकीय आक्रमणाचे स्वरूप ओळखण्याचे सामर्थ्य नाही. आक्रमण येणार आहे याची आपल्याला आगाऊ कल्पना येऊ शकत नाही. रामदेवरावांची देवगिरी संपत्तीने तुडुंब भरलेली होती. सातशे मैलांवरून अल्लाउद्दीन खिलजीला तिचा वास आला. आणि तो ती लुटण्यासाठी निघाला. पण रामदेवरावाला मात्र ही टोळधाड किल्ल्याच्या तटावर येऊन धडकेपर्यंत तिची कल्पना नव्हती. आजही चीन आक्रमण करील असे आपल्याला वाटले नव्हते. आक्रमण झाल्यावरही ते क्षुद्र आहे अशीच आपली श्रद्धा होती. त्याचे स्वरूप अजूनही आपण ओळखू शकलेलो नाही. दर वेळी आपण अजून विस्मितच होत आहो. जुने कागदपत्र काढून त्यांच्या आधाराने, पुराव्याने, प्रमाणाने, हिंदभूमीवरचा आपला हक्क आपण शाबीत करताच चीनला माघार घ्यावी लागेल याविषयी आपल्याला शंका नाही.

धर्मनिष्ठा व राष्ट्रनिष्ठा या शक्ती आपण आज राजकारणातून काढूनच टाकल्या आहेत. चिनी आक्रमक आले आहेत ते मागल्या मोगल शिपायां-प्रमाणे पिसाट संहारशक्तीने प्रेरित झालेले आहेत. आक्रमण करणे, लूट, जाळ-पोळ, अत्याचार हा त्यांचा राष्ट्रधर्म आहे. त्यांच्यापुढे आम्ही भारतीय पंचशील, अहिंसा, सत्य, विश्वशांती ही श्रेष्ठ धर्मतत्त्वे उभी करीत आहोत. आक्रमक राष्ट्रधर्माला तितक्याच कडव्या, जहरी, जळत्या राष्ट्रधर्माने उत्तर दिले पाहिजे हे आपल्या नेत्यांना मान्यच नाही. आमचे राज्य निधर्मी आहे, आम्ही मानव-तेचे पुजारी आहो यातच ते समाधान आणि भूषण मानीत आहेत. त्यामुळे मागल्याप्रमाणेच भारतावर आक्रमणे होऊ लागली आहेत. पाकिस्तानचे आक्रमण आले, चीनचे आले. त्यांच्यापुढेच नव्हे तर नागांच्यापुढेसुद्धा आपण हतबल ठरणार असा रंग दिसत आहे. भारतावर विमाने तर कोणाकोणाची

येऊन जातात त्याचा आपल्याला पत्ताच लागत नाही. हे असेच चालले तर आणखीही नेपाळ, सीलोन, यांची अशीच आक्रमणे येतील यात शंकाच नाही. यामुळे मागल्या अकराव्या शतकातील इतिहासाची पुनरावृत्ती होईल की काय अशी शंका येते. म्हणून या वेळी सतराव्या शतकातील पुनरावृत्ती त्वरेने घडवून आणण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे आणि त्या प्रयत्नांना यश यावे अशी इच्छा असेल तर आपण अहोरात्र मंत्र जपला पाहिजे की, 'शिवरायाचे आठवावे रूप। शिवरायाचा आठवावा साक्षेप। शिवरायाचा आठवावा प्रताप। भूमंडळीं ॥'

## ४. मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्य

हिंदू समाजात चातुर्वर्ण्य संस्था अत्यंत दृढमूल झालेली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण समाजात असतात अशी हिंदूंची श्रद्धा आहे. हे सर्व वर्ण जन्मसिद्ध आहेत. ब्राह्मण हा जन्मतःच ब्राह्मण, क्षत्रिय जन्मतःच क्षत्रिय असतो. त्या त्या वर्णाचे जे गुण ठरलेले आहेत ते जन्मतःच त्या वर्णात जन्मलेल्या व्यक्तीच्या ठायी असतात असा प्राचीन शास्त्रकारांनी सिद्धान्त केलेला आहे. आणि आपसात विवाह केल्यास ते जन्मसिद्ध गुण नष्ट होतील अशी कल्पना असल्यामुळे तसा विवाह हा हिंदुशास्त्रकारांनी निषिद्ध मानलेला आहे. असे असूनही असे विवाह होत राहिले. आणि या वर्णसंकरातून व इतरही अनेक कारणांनी सध्याच्या जाती, पोटजाती निर्माण झाल्या. त्या जातीही विशिष्ट गुणांनी संपन्न आहेत अशी श्रद्धा पुढे रूढ झाली आणि त्यातही आपसात विवाह करणे निषिद्ध ठरले. आणि अशा रीतीने हिंदुसमाजाची अनेक शकले होऊन त्याची संघटना मोडली.

विशिष्ट वर्णात आणि जातीत विशिष्ट गुण असतात हा भ्रम आहे हे इतिहासाने व अलीकडें विज्ञानवेत्त्यांनी दाखवून दिले आहे. पण आपला समाज रूढी नष्ट करण्यास अजून फारसा तयार नाही. अलीकडे जाति-पोटजाती मोडल्या पाहिजेत, वर्णव्यवस्था घातक आहे, हे मत रूढ होत चालले आहे. पाश्चात्यांनी निर्माण केलेली भौतिकशास्त्रे, अनुवंशाचे त्यांनी केलेले संशोधन, या नव्या शास्त्रातून निर्माण झालेला व्यक्तिवाद, त्यावर आधारलेल्या लोकसत्तेच्या कल्पना यांमुळे जन्मनिष्ठ उच्चनीचतेच्या आधारावर पोसलेली जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था कोलमडून पडत असून कालांतराने तरी ती नष्ट होईल अशी आशा वाटू लागली आहे.

पण दैवविलसित असे विचित्र आहे की याच वेळी कार्ल मार्क्स याने एका नव्या चातुर्वर्ण्याची प्रस्थापना करून ठेवली आहे. अमक्या जातीचे अमके गुण ही कल्पना जुन्या चातुर्वर्ण्याच्या बुडाशी होती तर अमक्या आर्थिक स्थितीचे अमके गुण ही कल्पना नव्या चातुर्वर्ण्याच्या बुडाशी आहे. आणि जुनी चातुर्वर्ण्य व्यवस्था जितकी समाजाला घातक ठरली तितकीच ही नवी ठरणार आहे – नव्हे ठरली आहे. ब्राह्मण-क्षत्रियांच्या अंगी श्रेष्ठ गुण असणारच असे गृहीत धरून त्यांना तसे गुण अंगी नसतानाही समाजाने श्रेष्ठ पदवी दिल्यामुळे समाजाचा घात झाला. आणि त्या ब्राह्मण-क्षत्रियांचाही झाला. ब्राह्मण, विद्वान् असो की अविद्वान् असो, तो वंद्य मानलाच पाहिजे, आणि राजा कसाही असला तरी तो विष्णूचा अंश असतोच, असा मनूचा दंडक आहे. या अत्यंत भ्रामक व अशास्त्रीय आज्ञा समाजाच्या विनाशाला कारण झाल्या हे इतिहास सांगत आहे. गुण नसतानाहि ब्राह्मणाला वंद्य मानल्यामुळे त्या जातीचा अधःपात झाला आणि खालच्या वर्णाच्या ठायी गुण असूनही त्यांना ब्राह्मण-क्षत्रियांची पदवी न मिळाल्यामुळे त्यांची कर्तृत्वशक्ती कुजून गेली. मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्यामुळे हेच घडत आहे. पण जुने शास्त्री-पंडित त्या चातुर्वर्ण्याला जसे अंधश्रद्धेने कवटाळून बसले होते तसेच कम्युनिस्ट शास्त्री-पंडित या नव्या चातुर्वर्ण्याला तशाच भोळचा अंधश्रद्धेने कवटाळून बसलेले आहेत. ही नवी भोळी अंधश्रद्धा समाजाला तितकीच घातक ठरणार असल्यामुळे मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्याचे येथे विवेचन करावयाचे आहे.

मोठे भांडवलदार (बूर्झ्वा), लहान व्यापारी-दुकानदार (पेटी बूर्झ्वा), सुशिक्षित बुद्धिजीवी (इंटेलिजेन्सिया) आणि गिरणी कारखान्यांतील कामगार असे मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्यात चार वर्ण आहेत. मार्क्स त्यांना वर्ग म्हणतो. पण त्या वर्गांना त्याने वर्णरूपच दिले असल्यामुळे वर्ण शब्द तितकाच अन्वर्थक आहे. या वर्गांशिवाय मोठा शेतकरी, लहान शेतकरी, शेतमजूर असे जातिपोटजातीप्रमाणेच, अनेक वर्गोपवर्ग नव्या चातुर्वर्ण्यात आहेत.

जुन्या व्यवस्थेत ब्राह्मण हा जसा सर्वश्रेष्ठ होता तसा नव्या व्यवस्थेत कामगार हा सर्वश्रेष्ठ आहे. सर्व वर्गांचा तो अग्रणी आहे. मार्क्सवादात जे अनेक महत्त्वाचे सिद्धान्त आहेत त्यांत, सध्याच्या युगात जी क्रांती व्हायची तिचा नेता कामगारच असणार, कामगारांच्या नेतृत्वाखालीच ती क्रांती

यशस्वी होईल, जुनी भांडवलशाही समाजरचना नष्ट करून तिच्या जागी साम्यवादी समाजरचना निर्माण करण्यास कामगार हाच समर्थ आहे, असा एक सिद्धान्त आहे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टो या मार्क्सवादाच्या आद्यग्रंथापासून आजपर्यंत झालेल्या देशोदेशींच्या बहुतेक सर्व ग्रंथांमध्ये हा सिद्धान्त आवर्जून सांगितलेला आढळतो. गेल्या शतकामध्ये जगातील बहुतेक देशांत भांडवलशाहीची सत्ता प्रस्थापित झाली होती, आशिया खंडातील चीन, तुर्कस्थान, अरबस्थान, यांसारख्या देशांत जुन्या सरंजामशाहीचे अवशेष अजूनही होते. पण तेथेही भांडवलशहांचेच अधिराज्य स्थापन झाले होते. अशा या सर्व सत्ताधीश भांडवलशहाला प्रतिकार करून त्याच्याशी सामना देऊन, लढा करून त्याचे निर्दालन करण्याचे सामर्थ्य मार्क्सच्या मते फक्त अर्वाचीन शहरांतील गिरण्याकारखान्यांतून भांडवलशाहीबरोबर निर्माण झालेला जो कामगारवर्ग त्याच्याच ठायी असू शकते. बुद्धिजीवी वर्ग, व्यापारी, शेतकरी इ. वर्ग हे या कार्याची धुरा अंगावर घेण्यास कोणत्याही दृष्टीने लायक नाहीत. धनसत्तेला वश होऊन यापैकी बहुतेक भांडवलाचे दास होतात. किंवा अज्ञान, दुफळी, उदासीनता यांमुळे या मोठ्या कार्याला लागणारे सामर्थ्य त्यांच्या ठायी निर्माण होऊ शकत नाही, असे मार्क्सचे मत होते.

मार्क्स, एंगल्स यांनी हे मत सांगितल्याला शंभर वर्षे होऊन गेली; तेवढ्या अवधीत जगाच्या एकंदर स्वरूपात जमीन-अस्मानाचे अंतर पडले आहे. अनेक देशांत क्रांत्या झाल्या, अनेक साम्राज्ये रसातळास गेली, कित्येक नवी राष्ट्रे उदयास आली. विज्ञानाची कल्पनातीत प्रगती होऊन जीवनाविषयीचा मानवाचा दृष्टिकोनच पालटून गेला; धनसत्ता, वांशिक, गुण, भौगोलिक परिस्थिती याचे नव्याने मूल्यमापन झाले, आणि या सर्वांमुळे भिन्न जमाती, वंश, वर्ग यांच्या अंगच्या सुप्त गुणांची प्रतीती आली व पूर्वी मानलेल्या कल्पना फोल ठरल्या. एवढे परिवर्तन झाल्यावर ‘कामगार हाच क्रांतीचा नेता’ या मार्क्समतात काही फरक पडला असेल, त्याच्या अनुयायांनी त्याला काही मुरड घातली असेल, असे वाटणे साहजिक आहे. पण तसे फारसे झालेले नाही. मार्क्सच्या मूळ तत्त्वज्ञानालाच जगातल्या पंडितांनी हटकले आहे. आणि कित्येकांनी त्याचे खंडनही केले आहे. पण मार्क्सचे अनुयायी म्हणून जगात

जे प्रसिद्ध आहेत त्यांनी हे मत सोडलेले तर नाहीच. पण त्याला त्यांनी मुरडही घातलेली नाही. म्हणून त्या मताचे परीक्षण करणे अवश्य आहे.

'कामगार' हा शब्द प्रॉलिटरियट किंवा वर्किंग क्लास या अर्थी मराठीत रूढ झालेला आहे. शहरातला गिरण्या-कारखान्यातला मजूर असा मार्क्स-वादाला त्याचा अर्थ अभिप्रेत आहे. खाणी, गिरण्या, कारखाने, त्यांतील सर्व यंत्रसंभार ही सर्व धननिर्मितीची साधने होत. यांचे मालक ते भांडवलदार. आणि स्वतःच्या शरीरशक्तीवाचून ज्याच्याजवळ अर्थोत्पादनाचे, उप-जीविकेचे कसलेही साधन नाही तो कामगार. शहरातला लहानसहान कारागीर व खेड्यातील शेतकरी हा कष्ट करूनच पोट भरीत असतो. तोही गरीबच असतो. पण कामगारापेक्षा तो निराळा आहे. अरी, रापी, कुऱ्हाड, करणी, चाक, गाढव, गाडा, बैल अशी काही तरी मालकीची साधने शहरातल्या इतर श्रमजीवी वर्गाजवळ असतात. आणि नांगर, कुळव, कासरे, अवजारे, बैलजोडी व थोडी जमीन अशी धनसाधने खेड्यातल्या शेतकऱ्याजवळ असतात. कामगाराजवळ यातले काहीही नसते. किंवा असे कोणतेही अर्थसाधन ज्याला नाही त्यालाच मार्क्स कामगार म्हणतो. क्रांतीचा नेता, आघाडीचा लढवय्या तो तोच. कसल्याहि प्रकारची जिंदगी अशी त्याच्याजवळ नसते. जगातल्या सर्व जिंदगीहीनांच्या मूर्धस्थानी तो असतो. आणि असा हा पूर्ण निर्धन कामगार मार्क्समताने क्रांतीचा नेता असतो.

कम्युनिस्टांचे पुढारी भाई डांगे यांनी भारताच्या प्राचीन इतिहासाची मीमांसा एका पुस्तकात केली आहे. त्यात प्रारंभी रानडे, राजवाडे, टिळक इ. महाराष्ट्रीय पंडितांनी राष्ट्राभिमानाची जी प्रेरणा भारताला दिली व त्यासाठी जी इतिहास-मीमांसा केली तिचा विचार केला आहे. इंग्रजांविरुद्ध लढण्यास त्यांनी येथल्या जाती-जमातींना सर्व वर्गांना – श्रीमंतांना, गरिबांना, कामगारांना, शेतकऱ्यांना आवाहन केले होते. यावर डांगे म्हणतात की अशा रीतीने हे सर्वच वर्ग क्रांतिकारक आहेत असे या पंडितांनी मानले, हा त्यांचा भ्रम होता. पुढच्या घडामोडीत या भ्रमाचा निरास होऊ लागला. आणि पुढच्या काळात शेतकरी व कामगार हे खरे क्रांतिकारक वर्गापुढे आले. बाकीच्या वर्गांनी लढा दिला असेल. पण तो स्वार्थासाठी; राष्ट्रासाठी नव्हे.

हे कामगारांच्या ध्यानी आले, व मग हा वर्ग राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संग्रामात आघाडीवर येऊन इतर वर्गांच्या हेतूंचे स्वरूप स्पष्ट करू लागला.

चिनी क्रांतीचे नेते माओ त्से तुंग, लिऊ शा ओ ची, चौ एन् लाय हे आपल्या भाषणात हाच सिद्धान्त मांडीत असतात. कामगारवर्ग ही चीनच्या क्रांतीची मूलशक्ति आहे. आमच्या क्रांतिसेनेचा तो अग्रदूत आहे. त्याच्या साह्यावाचून क्रांती यशस्वी होणार नाही. १९११ साली झालेली क्रांती अयशस्वी झाली याचे कारण हेच. त्या वेळी कामगारवर्गाने त्या लढ्यात जाणिवेने भाग घेतला नव्हता. पुढे यश येत गेले ते कामगारांच्या व कम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वामुळेच होय इ. विचार नेहमी आपल्याला चीनमधून आजही ऐकू येतात.

माझ्या मते कामगारांची ही स्तुतिस्तोत्रे अंती त्यांच्याच नाशाला कारणीभूत होतील. आज चीन-रशियामध्ये तशी झालीच आहेत. तुम्ही नेते, तुमची सत्ता, तुमचे राज्य अशी कामगारांची स्तोत्रे गाऊन या देशातील सत्ताधाऱ्यांनी कामगारांना गुलामापेक्षाहि खालच्या अवस्थेला नेऊन सोडले आहे. पूर्वी याच देशात असलेले संपाचे, संघटनेचे, नोकरी सोडण्याचे, कसलेही स्वातंत्र्य आता कामगारांना तेथे नाही. तशी त्यांनी जरा चळवळ केली तर त्यांना सैबेरियातील कोंडवाड्यात इहलोकीचा नरक भोगावा लागतो. भांडवलदारांच्या विरुद्ध चिथावणी देण्यासाठी म्हणूनच केवळ अशी कामगारांची अमर्याद स्तुती मार्क्सवादी लोकांनी केली असती तर ते एकवेळ क्षम्य झाले असते. पण शेतकरी व कामगार यांच्यासंबंधी तुलना करताना मार्क्सवादी हीच वृत्ती ठेवतात. क्रान्तीसाठी शेतकऱ्यांचे साह्य कामगारांना हवे पण राजसत्ता ही कामगारांच्या हातीच राहिली पाहिजे. शेतकरी हा कामगाराच्या अधिकाराखालीच राहिला पाहिजे असा लेनिनचा दण्डक होता. (लेनिन, सिलेक्टेड वर्क्स, खंड २ रा–पृ. ८५३. फॉरिन लँग्वेज पब्लिशिंग हौस, मॉस्को) [ या लेखात फॉरिन लँग्वेज पब्लिशिंग हौस, मॉस्को या संस्थेने प्रकाशित केलेल्या (१) मार्क्स-एंगल्स-सिलेक्टेड वर्क्स, खंड पहिला (२) खंड २ रा, (३) लेनिन–थर्ड इंग्लिश एडिशन आणि (४) लेनिन–सिलेक्टेड वर्क्स, खंड २ रा–या चार ग्रंथांतून मी उतारे देणार आहे. एवढाली नावे पुन्हा देणे त्रासाचे असल्यामुळे दर वेळी कंसातल्या आकड्यांचा फक्त निर्देश केलेला आहे. ] यामुळे कामगारवर्गाची अपरिमित हानी झाली आहे. बुद्धिजीवी

वर्ग, शेतकरी, व्यापारी यांना असाध्य असलेली क्रांती आपण करणार आहो, आपल्या अंगी काही अलौकिक सामर्थ्य आहे अशा मार्क्सप्रणीत भ्रमात कामगार राहिला तर रशियातल्या प्रमाणेच त्याची सर्वत्र स्थिती होईल अशी भीती वाटते.

कामगारांच्या ठायी खरोखरच असे काही अद्‌भुत सामर्थ्य असते तर ती मोठी भाग्याची गोष्ट होती. पण दुर्दैवाने तसे नाही हे गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासाकडे पाहताच सहज ध्यानात येईल. ते ध्यानी येऊन मार्क्सनिर्मित गंधर्वनगरीतून वास्तव जगात कामगारांनी उतरणे त्यांच्याच हिताच्या दृष्टीने अवश्य आहे.

१९१४ साली युरोपात पहिले महायुद्ध सुरू झाले. त्या वेळी युरोपातल्या कामगारांकडून मार्क्सवादाच्या काय अपेक्षा होत्या व त्या त्यांनी कितपत खऱ्या केल्या हे पाहणे उद्‌बोधक होईल. हे महायुद्ध म्हणजे लेनिनच्या मते साम्राज्यशाही युद्ध होते. जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन – कोणचाही देश घ्या. तेथल्या भांडवलदारांनी हे युद्ध पेटविले होते. आपापल्या साम्राज्याचे रक्षण व विस्तार हा त्यांचा स्वार्थी हेतू त्यामागे होता. त्यात कोणाचाही जय झाला असता तरी कोणच्याही देशातल्या कामगारवर्गाचा काहीच फायदा व्हावयाचा नव्हता. म्हणून १९१२ साली व त्याच्याही आधीपासून लेनिनने युरोपांतल्या कामगारांना असा आदेश दिला होता की युद्ध सुरू होताच प्रत्येक देशातील कामगारवर्गाने आपल्या देशाच्या सरकारचा पराभव घडवून आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. (४–४६). सरकारशी सहकार्य करून कामगारांनी युद्धात सामील होणे हे तर सुतराम् वर्ज्य होते. कारण राष्ट्रनिष्ठा ही संकुचित भावना आहे. कामगारांचे दुःख हे जागतिक दुःख आहे. इंग्लिश कामगाराला इंग्लिश भांडवलदार हा जवळचा नाही. तोच त्याचा शत्रू आहे. जर्मन, फ्रेंच कामगार हा त्यांचा मित्र आहे. फ्रेंच कामगारांचा हाच दृष्टिकोन असला पाहिजे. राष्ट्रभावनेला त्यांनी बळी पडता कामा नये. त्यांना आंतरराष्ट्रीय दृष्टी असली पाहिजे. याच हेतूने मार्क्सने १८६४ साली प्रथम आंतरराष्ट्रीय कामगार संघ (फर्स्ट इंटरनॅशनल) स्थापना केला होता. तो मोडल्यावर पुन्हा १८८९ साली सेकंड इंटरनॅशनलची स्थापना त्याच्या अनुयायांनी केली होती. आणि

तेव्हापासून पश्चिम युरोपातल्या देशांतील कामगारांना कम्युनिझमचे, आंतरराष्ट्रीय भावनेचे व नेतृत्वाचे शिक्षण दिले जात होते. लेनिनने हे कार्य अगदी थेट १९१४ पर्यंत युद्ध सुरू झाल्यानंतरही चालविले होते.

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिका ही औद्योगिक दृष्टचा अत्यंत प्रगत अशी राष्ट्रे होती. पहिल्या तीन देशांत मार्क्स व एंगल्स यांनी स्वतःच कार्य केले होते. आणि आपल्या अनेक भाषणांतून तेथील कामगारवर्गाला त्यांनी अनेक प्रशस्तिपत्रे दिलेली होती. इंग्लंडमधील कामगारवर्ग हा तर औद्योगिक क्रान्तीचा पहिला पुत्र. तो अत्यंत वर्गजागृत, संघटित व नेतृत्वगुणांनी संपन्न असा होता. जर्मन, फ्रेंच कामगारांची थोडीफार याच शब्दात मार्क्सने स्तुती केली आहे. फ्रेंच कामगारांनी तर १८७० साली क्रांती घडवून एक दोन महिने आदर्श समाज निर्माणही केला होता. तो ७२ दिवसच टिकला हे खरे. पण क्रांतीचा प्रत्यक्ष अनुभव तेथील कामगारांना मिळाला होता, हे आपण विसरता कामा नये. असे असल्यामुळे कम्युनिस्ट क्रांती प्रथम या देशात होणार असे भविष्य मार्क्सने वर्तविले होते. तात्पर्यार्थ असा की महायुद्धात पडलेल्या ब्रिटन फ्रान्स, जर्मनी इ. देशांतील कामगारवर्ग क्रांतीला अवश्य त्या सर्व गुणांनी १९ व्या शतकाच्या अखेरीलाच संपन्न झालेला होता.

अशा या कामगारवर्गाने पहिले महायुद्ध सुरू झाले तेव्हा काय केले ? त्याने मार्क्सवादाला शोभेसे काहीही केले नाही. त्या त्या देशातील कामगार, क्रांतीचा विचारही मनात न आणता, लेनिनचा संदेश दुसऱ्या कानाने सोडून देऊन राष्ट्रभावनेने प्रेरित होऊन आपल्या साम्राज्यशाही सरकारच्या सैन्यात देशातल्या इतर नागरिकांच्या इतक्याच आवेशाने लढू लागले. आणि शेवटपर्यंत लढत राहिले. या देशांतून मार्क्सच्या संस्था स्थापन झाल्या होत्या, कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली होती, कामगारांच्या चळवळी कार्य करीत होत्या, असा वासही युद्ध संपेपर्यंत आला नाही. युद्ध संपल्यावर वर्ष सहा महिने मार्क्सवादी उठावणीची थोडी लक्षणे दिसू लागली होती. पण ती खोटी होती. आणि ती थोड्याच अवधीत नाहीशी झाली. १८६४ पासून पन्नास वर्षे मार्क्स, एंगल्स, लेनिन, रोझा लक्झेंबर्ग इ. नेते या कामगारांना शिक्षण देत होते. त्यांना क्रांतीचे नेते, आघाडीचे पथक इत्यादी पदव्यांनी गौरवीत होते. पण त्यांनी नेतृत्व केले नाही. आणि आश्चर्य असे की त्यानंतर पंचवीस वर्षांनी

झालेल्या दुसऱ्या महायुद्धातही या क्रांतीच्या नेत्यांचा कोठे पत्ता लागला नाही.

मध्यंतरी पंचवीस वर्षांच्या काळात कम्युनिस्ट पक्ष पुन्हा सगळ्या देशात स्थापन झाले होते. रशियन क्रांतीचे यश त्यांना प्रेरणा देत होते. थर्ड इंटर-नॅशनल स्थापन होऊन तिचे जाळे सर्वत्र विणले गेले होते. नेते आता जास्त अनुभवी व मुरब्बी झाले होते. पण इटली व जर्मनी या देशात सर्व कामगार ८।१० वर्षांतच फॅसिस्ट झाले. मार्क्सने कामगारांचे एक वैशिष्टय़ असे सांगितले आहे की, ते क्रांती करतात ती केवळ स्वतःसाठी करीत नाहीत. साम्राज्य-शाहीच्या, भांडवलशाहीच्या गुलामगिरीतून सर्व समाज मुक्त करणे हे त्यांचे ध्येय आहे. इतर वर्ग केव्हा केव्हा क्रांतीत सामील होतात. पण ते केवळ स्वार्थी दृष्टीने. स्वतःच्या वर्गाचे कल्याण एवढीच संकुचित दृष्टि त्यांना असते. कामगारांचे तसे नाही. समाजातला प्रत्येक अन्याय, जुलूम, विषमता, पाशवी सत्ता नष्ट करणे यासाठीच कामगारांचा अवतार आहे (१.४२). धार्मिक, सामाजिक, कसलाही जुलूम ते सहन करणार नाहीत. धर्माचे तत्त्वज्ञान, वंश-श्रेष्ठतेचे तत्त्वज्ञान या सर्व कल्पना भांडवलशाहीने जनतेला फसविण्यासाठी, तिला अधिकच दास्यात गुंतविण्यासाठी, तिची क्रांतिवृत्ती नष्ट करण्यासाठी पसरविलेल्या आहेत, हे फक्त कामगारच जाणतात. आणि म्हणूनच ते साम्राज्यशाहीचे कट्टे वैरी झालेले असतात. क्रांतीचे नेतृत्व करण्याचे त्यांना सामर्थ्य आलेले असते ते यामुळेच. पण १९३९ साली इटालियन व जर्मन कामगारांच्या ध्यानात हा आपला श्रेष्ठ गुण आला नाही. व ते दोघेही आपा-पल्या साम्राज्यशाही फॅसिस्ट सरकारच्या मागे निष्ठावंत सेवकांसारखे उभे राहिले. जर्मनीत १९३० सालापासून १९४५ साली युद्धात पराभव होईपर्यंत मार्क्सवादाने अत्यंत गर्हणीय ठरविलेल्या तत्त्वज्ञानाचा—वंशश्रेष्ठता, राष्ट्र-भावना, साम्राज्यविस्तार, आक्रमक राष्ट्रवाद, यांचा—नंगा नाच चालू होता. पण अत्यंत वर्गजागृत, अनुभवी, मार्क्सवादात मुरलेले आणि संघटनाकुशल असे तेथले कामगार जर्मन समाजाचे नेतृत्व करू शकले नाहीत. अत्यंत निष्ठेने वंशश्रेष्ठतेच्या कल्पना आत्मसात करून ते हिटलरच्या मागे उभे होते. ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका येथे दण्डसत्ता प्रस्थापित झाली नाही. पण तेथे कम्युनिस्ट-प्रणीत क्रान्तीही झाली नाही. ब्रिटनमध्ये तर निवडणुकीत कम्युनिस्ट पक्ष

नामशेषच झाला. कामगारांच्या नेतृत्वाची ससेहोलपट झाली. तेथे दहादहा लाखांच्या कामगारांच्या संघटना आहेत. पण त्यांनी मार्क्सवादाचा कधीही स्वीकार केला नाही. आणि भांडवलशाहीला मार्क्सच्या दृष्टीने पाहता, त्यांनी कसलाच धक्का दिलेला नाही. फ्रान्समध्ये प्रकार थोडा निराळा आहे. पण तो जास्त लाजिरवाणा आहे. फ्रान्समध्ये बलिष्ठ व प्रभावी असा कामगारांचा पक्षच कधी निर्माण होऊ शकला नाही. दुफळी, फाटाफूट, यादवी यांनी हा पक्ष नेहमी चिरफळलेला व म्हणून बलहीन व निस्तेज असा असतो. जगातल्या सर्व कामगारांची आर्थिक स्थिती सारखी, दुःखे सारखी, त्यांचे कार्य एक, ध्येय एक; म्हणून त्यांची एकी होणारच असा मार्क्सचा सिद्धान्त आहे. फ्रान्सच्या लहानशा परिसरातसुद्धा तो खरा ठरत नाही. कारण तो मुळातच भ्रामक आहे.

रशियात १९१७ साली क्रांती झाली. त्या आधी १९०५ साली अशीच जोराची उठावणी झाली होती. या दोन्ही उत्थापनांत शहरातील कामगारवर्गच प्रामुख्याने दिसत होता हे खरे आहे. लक्षावधि कामगारांनी या वेळी संप केले. सरकारी यंत्रणा ढिली केली आणि शेवटी ही चळवळ वाढत जाऊन तीतच झारशाहीचा बळी पडला. हे सर्व खरे आहे. पण याला कामगारांचे नेतृत्व म्हणावयाचे ते कोणत्या अर्थाने ? नेतृत्व म्हणजे काय ?

नेतृत्वाचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. जुन्या समाजाची रचना कोणच्या तत्त्वावर झाली आहे, कोणची धर्मतत्त्वे, अर्थतत्त्वे, वंशतत्त्वे राजकीय तत्त्वे तिच्या बुडाशी आहेत, ती तत्त्वे समाजाच्या उत्कर्षाच्या आड का येतात, दुसऱ्या कोणच्या तत्त्वाअन्वये समाजरचना करणे अवश्य आहे, तशी समाजरचना इतिहासात केली असल्यास तिला कितपत यश आले, आले नसल्यास का आले नाही, इत्यादि समाजशास्त्रातील मूलमहातत्त्वांचा अत्यंत सखोल अभ्यास करून नवसमाजनिर्मितीचे तत्त्वज्ञान सिद्ध करणे हे नेतृत्वाचे पहिले कार्य आहे. आणि त्यानंतर हे तत्त्वज्ञान निर्भयपणे समाजाला शिकविणे, त्यासाठी व्याख्याने देणे, ग्रंथ लिहिणे, संस्था स्थापणे, वृत्तपत्रे चालविणे हे दुसरे कार्य आहे. हे करीत असताना सत्ताधाऱ्यांचा रोष अर्थातच होणार. तेव्हा त्यामुळे ओढवणाऱ्या सर्व आपत्तींना—तुरुंग, हद्दपारी, फाशी, संसाराचा उच्छेद—या सर्व आपत्तींना तोंड देण्याचे धैर्य या नेत्यांच्या ठायी असले

पाहिजे. इतके सर्व गुण ज्यांच्या ठायी आहेत त्यांनाच नेतृत्व करता येते. समाज त्यांच्याच मागे जातो.

आता प्रश्न असा की हे नेतृत्व कामगारांना करता येईल काय ? साडेतीन हातांच्या देहाखेरीज कसलीही जिंदगी ज्याच्याजवळ नाही, कसलेहि शैक्षणिक धन ज्याच्याजवळ नाही (तसे असले तर तो कामगार राहणारच नाही, तो कसलीतरी जिंदगी प्राप्त करून घेईलच) त्या कामगाराला जुने तत्त्वज्ञान काय, नवे काय असावयास पाहिजे याचे ज्ञान होणे शक्य आहे काय ? लेनिन-नेच सांगितले आहे की ते शक्य नाही. 'व्हॉट इज टु बी डन् ?' या आपल्या प्रसिद्ध लेखात त्याने अत्यंत स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, कामगारांना स्वतः नेतृत्व कधीही करता येणार नाही. ते इतर बुद्धिजीवी वर्गाकडून आले पाहिजे. कामगार फारतर कमी तास, वेतनवाढ एवढ्यापुरत्या संघटना स्वतःहून करू शकतील. यापलीकडे त्यांची मजल जाणे शक्य नाही. नवतत्त्वज्ञान निर्माण करण्यास इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान यांचे सम्यक् आकलन होणे अवश्य आहे. हे तत्त्वज्ञान सुशिक्षित धनसंपन्न वर्गातूनच निर्माण होणे शक्य आहे. मार्क्स, एंगल्स हे स्वतः धनिक बुद्धिजीवी वर्गातलेच होते हे लेनिनने मुद्दाम येथे निदर्शनास आणून दिले आहे. रशियातही याच वर्गाने प्रथम समाजवादाचे तत्त्वज्ञान सिद्ध केले आणि नंतर कामगारवर्गात प्रसृत केले (३.१२६). कामगारांना या तत्त्वाची शिकवण देताना ओढवणाऱ्या आपत्तींना लेनिन, स्टॅलिन, ट्रॉट्स्की, झिनेव्हिफ्, रॅडेक् इ. नेते डरले नाहीत. तळहाती शिर घेऊनच त्यांनी ही आग रशियाभर पसरून दिली. आणि म्हणूनच ते नेते ठरले.

नेतृत्व याचा अर्थ असा आहे. लेनिननेच तो स्पष्ट केला आहे. आणि जगा-तल्या प्रत्येक देशात इतिहासाने तो दाखवून दिला आहे. ज्ञानसंपन्नता हा नेतृत्वाचा पहिला गुण आहे. हे ज्ञानधन कामगारांच्या जवळ मुळीच नसते, आणि सध्याच्या स्थितीत ते असणेही शक्य नाही. चीनच्या क्रांतीचे नेतृत्व करणारे सर्व लोक पाश्चात्त्यविद्याविभूषीत होते. त्यातले बहुसंख्य लोक पाश्चात्त्य विद्यापीठाचे पदवीधर होते. तुर्कस्थान, अरबस्थान, हिंदुस्थान, जपान, इंडोनेशिया यांपैकी प्रत्येक देशाच्या नेतृत्वाचा हाच इतिहास आहे. आणि नेतृत्वाचा जो अर्थ वर दिला आहे त्यावरून दुसरे काही असणे शक्य नाही हे सहज ध्यानात येईल. लेनिनचे जे पंधरा-वीस निकटचे सहकारी होते

त्यात कामगार किंवा त्या वर्गातून आलेला असा एकही नव्हता. असे असूनही कम्युनिस्ट क्रांतीचे नेतृत्व कामगारच करू शकतील, इतरांना ते शक्य नाही हा आपला हेका सोडण्यास लेनिन तयार नाही. कारण त्या त्या वर्गाचे गुण मार्क्सने ठरवून दिलेले आहेत ! तसे वेदवचन आहे.

कामगारांप्रमाणेच बुद्धिजीवी वर्गाचे गुणही मार्क्सवादाने सांगून टाकले आहेत. नेतृत्व त्यांनाच शक्य आहे इत्यादि सिद्धान्त सांगूनही हा वर्ग नेहमी भांडवलाचा दास असणार, तो क्रांतिविरोधी, प्रतिगामी वृत्तीचाच असणार, तो कामगार-क्रांतीला दगा देणार हे कम्युनिस्टांचे तत्त्वज्ञान अबाधितच आहे ! जातींच्या बाबतीत बोलताना ज्याप्रमाणे 'त्याचा जातगुणच तो' असे म्हणतात त्याचप्रमाणे त्याचा वर्गगुणच तो असे मार्क्सवादात म्हणण्याची चाल आहे. बुद्धिजीवी वर्गच नेतृत्व करू शकेल, कामगारांना ते शक्य नाही असे एके ठिकाणी म्हणून रशियातील बुद्धिजीवी वर्गाने कामगारांना दगा देऊन भांडवलाचे दास्य पत्करले असेही लेनिनने म्हटले आहे. आणि येथेच न थांबता हा त्याचा वर्गगुणच आहे असेही त्याने म्हटले आहे; (३.४१३). या संबंधात लेनिनने इतकी परस्परविरुद्ध व विसंगत विधाने केली आहेत की शास्त्रवचन व प्रत्यक्ष व्यवहार यांचा समन्वय करताना जुन्या सनातन शास्त्रीबुवांनी सुद्धा इतकी केली नसतील (पहा ३ पृ. ११५, १२६, ४१३). अमक्या वर्गाचे अमके गुण, तमक्याचे तमके असा मार्क्सप्रणीत भ्रामक सिद्धान्त अंधश्रद्धेने स्वीकारल्या-नंतर दुसरे काय होणार ? जन्मावर माणसाचे गुण अवलंबून असतात हा सिद्धान्त जुन्यांनी केला होता, तर आर्थिक स्थितीवर ते अवलंबून असतात असा नवब्रुवांनी केला आहे. दोघेही सारखेच अंध, सारखेच अविवेकी !

रशियात १७ साली क्रांती झाली. त्यानंतर नवरचना करावयाची होती. त्यासाठी शास्त्रज्ञ, इंजिनीयर, डॉक्टर, तत्त्वज्ञ, पंडित यांची आवश्यकता होती. त्यांच्यावाचून जीवनाची पुनर्घटना करणे अशक्य आहे, हे लेनिनने कामगारांना स्पष्ट बजावले आहे. आता हे बुद्धिजीवी भांडवलाचे दास असल्यामुळे त्यांना विश्वासार्ह कसे मानावे, असा कामगारांपुढे – खरे म्हणजे कामगारांच्या बुद्धिजीवी नेत्यांपुढे – प्रश्न होता. त्या वेळी लेनिन म्हणाला की "आपले कार्य पाहून हे विद्यावंत लोक हळूहळू आपल्याकडे आकृष्ट होत आहेत. आणि काही दिवसांनी ते आपल्याशी समरस होतील. आपलेच होतील" (४.४४८). आता

हे जर लेनिनला दिसत होते तर बुद्धिजीवी वर्गाचा जातगुणच क्रांतिविरोधी आहे, ते भांडवलदाराचे दास असतात अशी त्यांची निर्भर्त्सना पावलोपावली जी त्याने केली आहे ती कशासाठी ? काही वेळा या विद्यावंतांनी कम्युनिस्ट क्रांतीला विरोध केला होता हे खरे. पण तसा कामगारांनीही केला होता. आणि इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स येथे तर त्यांनी कम्युनिस्ट क्रांतीची पाळेमुळे खणून टाकली आहेत. यावरून आर्थिक स्थितीवर गुण अवलंबून नसतात हे लेनिनच्या व इतर कम्युनिस्टांच्या ध्यानात येण्यास हरकत नव्हती. पण भगवान् मार्क्सने हे धर्म समस्त प्रजांना, आणखी, लावून दिलेले आहेत, त्याला कम्युनिस्ट काय करणार ? वचनात् प्रवृत्तिः, वचनान्निवृत्तिः। अशी त्यांची विचाऱ्यांची स्थिति आहे ! बुद्धिजीवी विद्यासंपन्न वर्ग हा नेहमी दगलबाज, प्रतिगामी, गुलामी वृत्तीचा, लाचार असतो व कामगारवर्ग पुरोगामी, क्रांतिकारक आणि नेतृत्व-गुणसंपन्न असतो हे त्यांनी घोकलेच पाहिजे. पां. वा. गाडगीळ हे मार्क्सवादी आहेत. त्यांनी ‘ रशियन राज्यक्रांति ’ या आपल्या पुस्तकात कामगारांचा पुढीलप्रमाणे गौरव केला आहे. “ यांत्रिक उत्पादनाने औद्योगिक क्रांती घडून आल्यावर तिच्या पोटी उदय पावलेल्या संघटित, वर्गजागृत व कार्यतत्पर अशा मजूरवर्गाने ध्येयवादी व क्रांतिशास्त्रनिपुण अशा पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आणि शेतकऱ्यांचे साह्य घेऊन रशियात क्रांती घडवून आणली.” यावर भाष्य करण्याची जरूर नाही असे वाटते. एका छापखान्यांतील कामगारांनी प्रकाशकाच्या साह्याने, पां. वा. गाडगिळांच्या नेतृत्वाखाली, ‘ रशियन राज्यक्रांति ’ हा ग्रंथ रचला असे म्हणण्यासारखेच हे आहे. स्तुतीच्या नावाखाली आपली ही चेष्टा चालविलेली आहे, हे कामगारांच्या सहज ध्यानात येईल.

रशियात बोल्शेव्हिकांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन कामगारांनी प्रचंड उठावणी केली हे खरे आहे. पण त्या उठावणीत त्यांच्याइतक्याच संख्येने सैनिकही सामील झाले होते हे आपण विसरता कामा नये. पुढे त्याच्या दसपट संख्येने रशियन शेतकरीहि या चळवळींत प्रविष्टं झाला तेव्हा क्रान्तीचे यश प्रत्यक्षांत येऊ लागले. शेतकऱ्याच्या साह्यावाचून कोणतीहि क्रान्ति कधीही यशस्वी होणार नाही हें मार्क्स व त्याचे लेनिनसुद्धा सर्व अनुयायी यांना पूर्ण मान्य आहे. शेतकऱ्यांचे साह्य मिळवा असा लेनिनने ठायी ठायी आपल्या

अनुयायांना उपदेश केला आहे. असे असूनही क्रान्तीचे नेते म्हणजे कामगारच असा मार्क्सचा, लेनिनचा व एकंदर मार्क्सवाद्यांचा आग्रह मात्र कायम आहे. शेतकऱ्याला क्रान्तीचे सामर्थ्य आहे हे ते कधीही मान्य करणार नाहीत.

मार्क्सवादाने कामगारांच्या सामर्थ्याची जी भरमसाट वर्णने केली आहेत त्यांत त्याच्या कल्पनेच्या शतांश जरी तथ्य असते तरी लेनिनच्या मागून स्टॅलिनने एकंदर रशियन जनतेची जी दुर्दशा करून टाकली ती त्याला शक्य झाली नसती. कामगार हे स्वतः भांडवलशाहीच्या मगरमिठीतून मुक्त होणारच; पण येथे त्यांचे कार्य संपत नाही. ते सर्व समाजाला त्यातून मुक्त करणार. भांडवलशाही, जमीनदारी, जातीय सत्ता, धर्मसत्ता यांचा ते नायनाट करणार. कसल्याही प्रकारचा अन्याय, जुलूम, विषमता ते सहन करणार नाहीत. आपल्या संघटनेच्या जोरावर ते सर्व प्रकारची विषमता नष्ट करून समता, व्यक्तिस्वातंत्र्य या पायावर लोकायत्त समाजाची निर्मिती करणार. कामगाराचे हे ऐतिहासिक कार्य आहे. आणि रशियन कामगार ते निश्चयाने पार पाडणारच याविषयी कुणीही शंका घेता कामा नये अशी त्यांची स्तोत्रे मार्क्सवादाने गायिली आहेत.

अशा या सर्वगुणसंपन्न, सर्वसत्ताधीश कामगारवर्गाची आज रशियात काय स्थिति आहे हे पाहिले म्हणजे मार्क्सच्या सिद्धान्ताची अशास्त्रीयता आपल्या ध्यानात येते. विषमता, जुलूम, अन्याय हेच रशियाच्या शासनाचे सध्या लक्षण आहे. लक्षावधि कामगार सैबेरियात कोंडवाड्यात पशूच्याही खालच्या अवस्थेत जीवन कंठीत आहेत. सत्ताधाऱ्यांची मर्जी फिरताच कोणालाही मध्यरात्री बायकामुलांतून कुत्र्यासारखे ओढून नेऊन फाशी देण्यात येते. विरोधी पक्ष स्थापण्याची कोणालाही परवानगी नाही. मुद्रणस्वातंत्र्याचें तर नावही नाही. सर्व मुद्रण सरकारच्या नियंत्रणात आहे. कामगारांना संघटना करण्याचे अथवा साधा संप करण्याचेही स्वातंत्र्य नाही. इतकेच नव्हे तर एक नोकरी सोडून दुसरी करण्याचे वा एक प्रांत सोडून दुसरीकडे जाण्याचेही स्वातंत्र्य नाही. कामगार हा साम्राज्यशाहीचा कट्टा शत्रू. त्याच्या देखतच व त्याच्या शरीरशक्तीला वेठीला धरूनच रशियाने हंगेरी, पोलंड, रुमानिया इ. देशांवर साम्राज्य स्थापन केले आहे. तेथील जनतेला ते कितपत मान्य आहे ते तेथे वरचेवर होणाऱ्या बंडाळ्यांवरून

दिसतेच आहे. रशियन कामगार व तेथील एकंदर जनता सध्या किती दीन, किती पराधीन, किती व्यक्तित्वशून्य आहे हे स्टॅलिनच्या मरणानंतर फारच स्पष्टपणे दिसून आले. स्टॅलिन हा कामगारांचा परमेश्वर होता. अनन्य-भावाने ते त्याला भजत होते. त्याची स्तोत्रे गात होते. त्या स्टॅलिनवर ऋुश्चेव्हने चोर, बदमाष, डाकू, दरवडेखोर, खुनी, यांच्यावर करावे तसे आरोप केले. त्याचे पुतळे हलविले, प्रतिमा नष्ट केल्या आणि त्याचे नावहि वृत्तपत्रांतून नष्ट करून कामगारांच्या या परमेश्वराला त्याने गटारात फेकून दिले. पण सर्व रशियात या परमेश्वराचा कैपक्ष घेऊन उठण्याचे, त्याच्या बाजूने एक शब्द उच्चारण्याचे धैर्य एकाही कामगाराने दाखविले नाही. कामगारांचा कणखर-पणा, त्यांचे असामान्य सामर्थ्य, त्यांची प्रतिकारशक्ती ती हीच काय? झारशाही उलथून पाडण्याचे श्रेय घेणाऱ्या रशियन कामगारांच्या नेतृत्वानेच हे सर्व चालले आहे ना?

वास्तविक रशियन कामगारांचा यात फारसा दोष नाही. पिढ्यान् पिढ्या ते झारशाहीच्या जुलमाखाली होते. त्यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी १९१७ साली संग्राम केला व त्यात यश मिळवले हेच विशेष होय. पण त्यांचे नेते मार्क्सवादी होते हे त्यांचे दुर्दैव होय. सर्वथा अशास्त्रीय व भ्रांतिष्ट अशा आर्थिक तत्त्वांचा अवलंब त्यांनी केला आणि त्यामुळे आज रशियात काम-गारांची दयनीय अशी अवस्था झाली आहे. लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या मार्क्सप्रणीत अत्यंत विकृत कल्पना इंग्लिश, अमेरिकन कामगारांनी स्वीकारल्या नाहीत. त्यामुळे रशियन कामगारांपेक्षा ते कितीतरी बलिष्ठ, स्वतंत्र व सुखी आहेत. व्यक्तित्वाची ती रग रशियन कामगारात कधीच निर्माण झाली नाही. ती निर्माण होण्यास दीर्घकाळ लागत असतो. पण माणसाच्या आर्थिक स्थितीवरच त्याची संस्कृती अवलंबून असते आणि ती अगदी हिशेबाने असते असल्या विकृत तत्त्वज्ञानाचा रशियन नेत्यांनी स्वीकार केला आणि त्यामुळे आज रशियन कामगार हा नेता तर नव्हेच पण त्याच्याच नावाने सत्ता चालविणाऱ्या दण्डशहांचा दास होऊन बसला आहे.

येथवर पश्चिम युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी हे देश आणि रशिया यांच्या इतिहासावरून मार्क्सच्या वर्गपुराणाचे परीक्षण आपण केले. काम-

गारांनी क्रांतीचे नेतृत्व कितपत केले, बुद्धिजीवी वर्गाचे गुण कोणचे ह्याचाहि विचार केला. आता चिनी क्रांतीचा इतिहास काय सांगतो ते पाहू.

चिनी क्रांती ही चिनी शेतकऱ्यांनी केलेली आहे. चीनमधल्या कामगार-वर्गाचा तिच्याशी फार थोडा संबंध आहे. कामगारांच्याकडे तिचे नेतृत्व कधीच नव्हते. तेथील कम्युनिस्टांनी निर्माण केलेल्या लाल सेनेशी काही बाबतीत सहकार्य करून तिला साह्य करणे येवढेच तेथल्या कामगारांचे क्रांतिकार्य ! प्रारंभी माओ, चुतेह, लिलिसान इ. नेत्यांनी मार्क्सवादाच्या पढिक ज्ञानामुळे कामगार-संघटनांवर भर दिला होता. पण यात कांही अर्थ नाही हे लवकरच त्यांच्या ध्यानी आले आणि त्यांनी आपले सर्व लक्ष ग्रामीण विभागातील शेतकऱ्यांवर केंद्रित केले. त्यांची आठवी सेना ही शेतकऱ्यात जागृति निर्माण करणारी एक फार मोठी किसानसंघटना होती. तिने सर्व चीन जागृत केला आणि या जागृत किसानांच्या साह्यानेच कम्युनिस्टपक्षाने चीनमध्ये क्रांती यशस्वी केली. आज चीनचे नेते इतर मार्क्सवाद्यांप्रमाणे 'कामगारच येथल्या क्रांतीचे यशस्वी नेते आहेत,' अशी भाषणे करीत आहेत. पण त्यांच्या चळवळीचा इतिहास व त्यांची पूर्वीची भाषणे ही याच्या सर्वस्वी विरुद्ध आहेत. आज ते तशी भाषणे करीत असले तर सत्य लपवून दुसरे काही साधण्याचा त्यांचा हेतू असला पाहिजे. किंवा आम्ही मार्क्सवादीच आहोत हा भ्रम सोडणे त्यांना कठीण जात असले पाहिजे. ते काहीही असले तरी चीनच्या क्रांतीच्या नेतृत्वाशी तेथल्या कामगारवर्गाचा कसलाही संबंध नव्हता हे ऐतिहासिक सत्य आहे. चीनची क्रांती शेतकऱ्यांनी केली आहे. जमिनीच्या आसक्तीमुळे त्यांच्यात क्रांतिकारकत्व असणे शक्य नाही असे मार्क्स म्हणाला होता. याच श्रद्धेमुळे लेनिनने ज्यांच्यांत जागृती करण्याचा प्रारंभी फारसा प्रयत्न केला नाही, (४.४५४,५५), देशभर विखुर-लेले असल्यामुळे ज्यांच्यात संघटना करणे अवघड आहे असे मार्क्सने सांगून ठेविले होते, शेतात काम करतांना तो श्रमजीवी असतो पण धान्य विकताना तो 'पेटी बूर्झ्वा' होतो आणि अशा द्विधा वृत्तीमुळे तो क्रांतीला नकळत विरोध करतो, असे ज्या शेतकऱ्याबद्दल लेनिन म्हणाला होता, (४.४७९), त्याच शेतकऱ्यांनी चीनमध्ये क्रान्ती घडवून आणली. आमची क्रान्ती आम्ही मार्क्स-लेनिन-स्टॅलिन यांच्या तत्त्वाअन्वये घडविली असे चीनचे नेते आज म्हणत

आहेत, पण तो त्यांचा भ्रम आहे. चातुर्वर्ण्य या शब्दाचा मोह जसा भारतीय नेत्यांना कधी टाकता येणार नाही त्याचप्रमाणे मार्क्सवाद या शब्दाचा मोह चिनी कम्युनिस्टांना टाकता येणार नाही, असे वाटते. वास्तविक मार्क्सची आंतरराष्ट्रीय दृष्टी त्यांनी प्रारंभापासूनच सोडून देऊन राष्ट्रनिष्ठेला प्राधान्य दिले, कामगारांच्या नेतृत्वाचा छंद थोड्याशा प्रयोगानंतर सोडून दिला आणि पुनर्घटनेला लागल्यानंतर वर्गविग्रहाचे मार्क्सचे अत्यंत प्रिय तत्त्व दूर ठेविले. असे असूनही आपण मार्क्सवादी आहोत असा उद्घोष ते करीत असतात. तेव्हा त्यांचे कामगारांचे नेतृत्वही याच जातीचे असले पाहिजे हे उघड आहे.

हिंदुस्थानात कामगारांचे क्रान्तिकारकत्व कितपत अनुभवास आले हे जगजाहीर आहे. रशिया, चीन, युगोस्लाव्हिया येथे कामगारांनी नेतृत्व केले नसले तरी निदान क्रान्तीत त्यांनी बहुसंख्येने भाग तरी घेतला होता. हिंदुस्थानात क्रान्तीला विरोध हेच कामगारसंघटनेचे लक्षण होऊन बसले होते. ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या एकाही लढ्यांत कामगारांनी भाग घेतला नाही. आणि १९४२ च्या लढ्यात तर ब्रिटिशांशी सहकार्य करण्यातच त्यांनी भूषण मानले. येथल्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वामुळे असे झाले असे कोणी म्हणतात. मलाही ते मान्य आहे. पण याचाच अर्थ असा की कामगार नेतृत्व करू शकत नाहीत. रशियन कम्युनिस्ट पक्षाने साम्राज्यशाही आरंभिली, तिला तेथल्या कामगारांनी साथ दिली. चिनी कम्युनिस्टांनी वर सांगितल्या-प्रमाणे मार्क्सवादाचा त्याग करून राष्ट्राची पुनर्घटना केली तेव्हाही त्यांनी सांगि-तले ते सहकार्य कामगारांनी केले आणि हिंदी कम्युनिस्टांनी राष्ट्रीय लढ्याला विरोध करून ब्रिटिश साम्राज्यशाहीशी सहकार्य करण्याची त्यांना शिकवण दिली तेव्हा त्याही मार्गाला ते गेले. कामगार ही शेतकऱ्यासारखीच एक प्रचंड शक्ती आहे. या शक्ती जागृत झाल्या की कोणचेही क्रांतिकार्य सिद्धीला जाते. या शक्तीच्या साहाय्यावाचून क्रांती यशस्वी होणे शक्य नाही. पण किसानकामगार ज्या परिस्थितीत काम करीत असतात ती परिस्थितीच अशी आहे की नेतृत्वाला लागणाऱ्या गुणसंपदेची जोपासना त्यांना करता येत नाही. लेनिन हा कामगारांचा कट्टा अभिमानी असूनही त्याने हा विचार स्पष्टपणे मांडला आहे. अर्थात् त्यालाही तात्त्विक दृष्टीने अर्थ नाही. कारण अमेरिकन व ब्रिटिश

२३ ६०१ दा. क्र.

कामगारांनी अवसर सापडताच नेतृत्व करून दाखविलेच आहे. आणि भारतीय कामगारांनाही ते पुढे शक्य होईल यात शंका नाही.

असो. मार्क्सच्या सिद्धान्ताचा ऐतिहासिक दृष्टीने येथवर विचार केला. आता थोडी तत्त्वचिकित्सा करू.

भांडवलदार, व्यापारी, बुद्धिजीवी, जमीनदार, शेतकरी, शेतमजूर, कामगार या सर्व वर्गांतून कामगार हेच फक्त खरे क्रांतिकारक, तेच क्रांतीचे नेते असे मार्क्स का म्हणाला ? इतर वर्गांच्या अंगी कोणचे अवगुण त्याला दिसले ? कामगारांच्या अंगी कोणचे विशेष गुण दिसले ?

समाजातील अर्थनिर्मितीची साधने हीच समाजाच्या संस्कृतीची निर्णायक असतात हा मार्क्सवादाचा जो पायाभूत सिद्धान्त तोच या कल्पनेच्या बुडाशी आहे. कामगारांच्या जवळ कोणच्याही प्रकारचे धन नसते. जमीन, नांगर, कुऱ्हाड, पटाशी, रांधा, चाक, इंजिने, यंत्रे यांपैकी एकाही धन-निर्मितीच्या साधनांवर त्याची मालकी नसते, तो सर्वस्वी धनहीन असतो, हाच मार्क्सच्या दृष्टीने त्याचा सर्वांत मोठा गुण होय. जगातील कामगारांना संघटनेचा त्याने जो संदेश दिला आहे त्यात त्यांच्या त्याच गुणाचा त्याने निर्देश केला आहे. 'या लढ्यात तुम्हाला काही गमवावे लागणार नाही. कारण दास्याच्या श्रृंखलांखेरीज गमावण्याजोगे तुमच्याजवळ काहीच नाही.' यातील तत्त्वज्ञान असे : इतर वर्गाचे काही ना काही तरी हितसंबंध प्रस्थापित राज्यात, शासनात गुंतलेले असतात. आहे ही व्यवस्था उलथून पाडली तर आपल्या त्या हिताला बाधा येईल अशी भीति या वर्गांना वाटत असते. म्हणून ते नेहमी प्रस्थापित राज्याचाच पक्ष घेतात. भांडवलदार, जमीनदार, व्यापारी हे क्रान्तिविरोधी असतात याचे कारण हेच. सरकार त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करीत असते. ते सत्ताच्युत झाले तर आपली सर्व जिंदगी जाईल हा धसका त्यांच्या मनात असतो. कामगारांना ही भीती नसते; कारण त्यांना जिंदगीच नसते. मार्क्सने त्यांना जिंदगीहीनांचा राजा म्हटले आहे. आणि जिंदगीच्या कमीजास्त प्रमाणावरच त्याने क्रांतिकारकत्वाची प्रतवारी लावली आहे. भांडवलदार, जमीनदार, हे क्रांतीचे कट्टे वैरी. पूर्ण प्रतिगामी. बुद्धिजीवी हे बहुधा त्यांचे गुलाम. शेतकरी हा गरीब असतो पण जमिनीचा तो मालक असतो. एखाद्या तुकड्यावर तरी त्याचे स्वामित्व असते. म्हणन त्याचा जीव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
नवुक्रम ५४०२० वि. निबंध

आहेत, पण तो त्यांचा भ्रम आहे. चातुर्वर्ण्य या शब्दाचा मोह जसा भारतीय नेत्यांना कधी टाकता येणार नाही त्याचप्रमाणे मार्क्सवाद या शब्दाचा मोह चिनी कम्युनिस्टांना टाकता येणार नाही, असे वाटते. वास्तविक मार्क्सची आंतरराष्ट्रीय दृष्टी त्यांनी प्रारंभापासूनच सोडून देऊन राष्ट्रनिष्ठेला प्राधान्य दिले, कामगारांच्या नेतृत्वाचा छंद थोड्याशा प्रयोगानंतर सोडून दिला आणि पुनर्घटनेला लागल्यानंतर वर्गविग्रहाचे मार्क्सचे अत्यंत प्रिय तत्त्व दूर ठेविले. असे असूनही आपण मार्क्सवादी आहोत असा उद्घोष ते करीत असतात. तेव्हा त्यांचे कामगारांचे नेतृत्वही याच जातीचे असले पाहिजे हे उघड आहे.

हिंदुस्थानात कामगारांचे क्रान्तिकारकत्व कितपत अनुभवास आले हे जगजाहीर आहे. रशिया, चीन, युगोस्लाव्हिया येथे कामगारांनी नेतृत्व केले नसले तरी निदान क्रान्तीत त्यांनी बहुसंख्येने भाग तरी घेतला होता. हिंदुस्थानात क्रान्तीला विरोध हेच कामगारसंघटनेचे लक्षण होऊन बसले होते. ब्रिटिशांविरुद्ध झालेल्या एकाही लढ्यांत कामगारांनी भाग घेतला नाही. आणि १९४२ च्या लढ्यात तर ब्रिटिशांशी सहकार्य करण्यातच त्यांनी भूषण मानले. येथल्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वामुळे असे झाले असे कोणी म्हणतात. मलाही ते मान्य आहे. पण याचाच अर्थ असा की कामगार नेतृत्व करू शकत नाहीत. रशियन कम्युनिस्ट पक्षाने साम्राज्यशाही आरंभिली, तिला तेथल्या कामगारांनी साथ दिली. चिनी कम्युनिस्टांनी वर सांगितल्याप्रमाणे मार्क्सवादाचा त्याग करून राष्ट्राची पुनर्घटना केली तेव्हाही त्यांनी सांगितले ते सहकार्य कामगारांनी केले आणि हिंदी कम्युनिस्टांनी राष्ट्रीय लढ्याला विरोध करून ब्रिटिश साम्राज्यशाहीशी सहकार्य करण्याची त्यांना शिकवण दिली तेव्हा त्याही मार्गाला ते गेले. कामगार ही शेतकऱ्यासारखीच एक प्रचंड शक्ती आहे. या शक्ती जागृत झाल्या की कोणचेही क्रांतिकार्य सिद्धीला जाते. या शक्तीच्या साहाय्यावाचून क्रांती यशस्वी होणे शक्य नाही. पण किसानकामगार ज्या परिस्थितीत काम करीत असतात ती परिस्थितीच अशी आहे की नेतृत्वाला लागणाऱ्या गुणसंपदेची जोपासना त्यांना करता येत नाही. लेनिन हा कामगारांचा कट्टा अभिमानी असूनही त्याने हा विचार स्पष्टपणे मांडला आहे. अर्थात् त्यालाही तात्त्विक दृष्टीने अर्थ नाही. कारण अमेरिकन व ब्रिटिश

९३ १०१

कामगारांनी अवसर सापडताच नेतृत्व करून दाखविलेच आहे. आणि भारतीय कामगारांनाही ते पुढे शक्य होईल यात शंका नाही.

असो. मार्क्सच्या सिद्धान्ताचा ऐतिहासिक दृष्टीने येथवर विचार केला. आता थोडी तत्त्वचिकित्सा करू.

भांडवलदार, व्यापारी, बुद्धिजीवी, जमीनदार, शेतकरी, शेतमजूर, कामगार या सर्व वर्गांतून कामगार हेच फक्त खरे क्रांतिकारक, तेच क्रांतीचे नेते असे मार्क्स का म्हणाला ? इतर वर्गांच्या अंगी कोणचे अवगुण त्याला दिसले ? कामगारांच्या अंगी कोणचे विशेष गुण दिसले ?

समाजातील अर्थनिर्मितीची साधने हीच समाजाच्या संस्कृतीची निर्णायक असतात हा मार्क्सवादाचा जो पायाभूत सिद्धान्त तोच या कल्पनेच्या बुडाशी आहे. कामगारांच्या जवळ कोणच्याही प्रकारचे धन नसते. जमीन, नांगर, कुऱ्हाड, पटाशी, रांधा, चाक, इंजिने, यंत्रे यांपैकी एकाही धन-निर्मितीच्या साधनांवर त्याची मालकी नसते, तो सर्वस्वी धनहीन असतो, हाच मार्क्सच्या दृष्टीने त्याचा सर्वांत मोठा गुण होय. जगातील कामगारांना संघटनेचा त्याने जो संदेश दिला आहे त्यात त्यांच्या त्याच गुणाचा त्याने निर्देश केला आहे. 'या लढ्यात तुम्हाला काही गमवावे लागणार नाही. कारण दास्याच्या श्रृंखलांखेरीज गमावण्याजोगे तुमच्याजवळ काहीच नाही.' यातील तत्त्वज्ञान असे : इतर वर्गाचे काही ना काही तरी हितसंबंध प्रस्थापित राज्यात, शासनात गुंतलेले असतात. आहे ही व्यवस्था उलथून पाडली तर आपल्या त्या हिताला बाधा येईल अशी भीति या वर्गांना वाटत असते. म्हणून ते नेहमी प्रस्थापित राज्याचाच पक्ष घेतात. भांडवलदार, जमीनदार, व्यापारी हे क्रान्तिविरोधी असतात याचे कारण हेच. सरकार त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करीत असते. ते सत्ताच्युत झाले तर आपली सर्व जिंदगी जाईल हा धसका त्यांच्या मनात असतो. कामगारांना ही भीती नसते; कारण त्यांना जिंदगीच नसते. मार्क्सने त्यांना जिंदगीहीनांचा राजा म्हटले आहे. आणि जिंदगीच्या कमीजास्त प्रमाणावरच त्याने क्रांतिकारकत्वाची प्रतवारी लावली आहे. भांडवलदार, जमीनदार, हे क्रांतीचे कट्टे वैरी. पूर्ण प्रतिगामी. बुद्धिजीवी हे बहुधा त्यांचे गुलाम. शेतकरी हा गरीब असतो पण जमिनीचा तो मालक असतो. एखाद्या तुकड्यावर तरी त्याचे स्वामित्व असते. म्हणून त्याचा जीव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ७४०७० वि: निबंध

तेथे गुंततो. आणि तेवढ्या प्रमाणांत तो क्रांतिविरोधी, प्रतिगामी वृत्तीचा असतो. जमीन नसलेला पण खेड्यात शेतीवर मोलाने राबणारा शेतमजूर हा कामगारासारखाच पूर्ण अकिंचन असतो. त्यामुळे तो मार्क्सच्या मते कामगारांचा खरा विश्वासार्ह मित्र. पण तो कामगारांसारखा स्वयंसिद्ध क्रांतिकारक मात्र नव्हे. कारण तो खेड्यांत रहातो. त्यामुळे दहा ठिकाणी विखुरलेला, पांगलेला असा असल्यामुळे तो संघटित होऊ शकत नाही. गिरण्या-कारखान्यात कामगार रात्रंदिवस एकठाय येत असल्यामुळे त्यांची संघटना करणे सहज शक्य असते. पण हा गौणभाग होय. गमविण्याजोगे काही नाही, 'स्व' कशातच नाही, हा प्रधान गुण होय. यात पहिला क्रम कामगाराचा असल्यामुळे तों खरा क्रान्तिकारक होय. बाकीचे या स्थितीच्या जवळ ज्या प्रमाणात येतील त्या प्रमाणात ते कामगाराचे मित्र व क्रांतिकारक असे मार्क्सचें तत्त्वज्ञान आहे. (१-५८३-५८५)

मार्क्सचे व आज शंभर वर्षानंतरही त्याच्या या सिद्धान्ताचा पाठपुरावा करणाऱ्या त्याच्या अनुयायांचे मानवी स्वभावाचे अज्ञान या विचारसरणीतून अगदी स्पष्ट होते. या अज्ञानामुळेच त्यांनी मानवाला एका आर्थिक साच्यात दडपून बसविण्याचा अट्टाहास चालविला आहे आणि त्यामुळे पदोपदी मार्क्सवाद अपयशी होत आहे. काही गमविण्याजोगे नाही म्हणून माणूस क्रांतीला सिद्ध होईल ही मोठी अजब मीमांसा आहे. आणि ती क्षणभर खरी धरली तरी गमविण्याजोगे काही आहे, जिंदगी आहे, जमीन आहे, तिला धोका आहे हे दिसताच माणूस तितक्याच त्वेषाने उसळून उठतो एवढे तरी मार्क्स-वादाला कळावयास हवें. इतिहासाने हे अनेक वेळा सिद्ध करून दिले आहे. कुल, वंश, धर्म, राष्ट्र, या निष्ठांसाठीही माणसे सर्वस्व-त्यागास तयार झालेली आहेत. याचा अर्थाशी, धनाशी काहीही संबंध नाही. पण नाही कसा ? मार्क्समताने त्याचा घनसंबंध आहे. धननिर्मितीच्या साधनांतूनच समाजाच्या निष्ठा जन्म पावत असतात. आणि त्या साधनाचे स्वामी जे जमीनदार, सरंजामदार, भांडवलदार तेच कामगारांना भुलविण्यासाठी धर्म, वंश, राष्ट्र या निष्ठांचा प्रचार करीत असतात. कामगारांचा विशेष गुण हा की तो एकदा वर्गजागृत झाला की यातल्या कोणाच्याही निष्ठा तो मानीत नाही.

तो जिंदगीपासून जसा मुक्त तसाच व त्यामुळेच असल्या सर्व प्रकारच्या निष्ठापासूनही मुक्त असतो.

पण मार्क्सच्या दुर्दैवाने कामगारांनी त्याचे हेही सिद्धान्त उधळून लावले. भांडवलदार, जमीनदार, शेतकरी यांच्या इतक्याच तीव्रपणें या निष्ठा आपल्याठायी आहेत हे त्यांनी पदोपदी दाखवून दिले. कामगार हा स्फूर्तीसाठी पूर्वेतिहासाकडे कधी पहात नाही; त्याची नजर नेहमी भविष्यकाळाकडे असते असे एक मार्क्सवचन आहे. पण त्याच्याच तत्त्वज्ञानाने प्रेरित झालेल्या सोव्हिएट रशियातील कामगारांना दुसऱ्या महायुद्धात जर्मनीशी लढण्याची स्फूर्ती यावी म्हणून स्टॅलिन हा सारखी कुटुसाफ, नेव्हस्की, पीटर इत्यादि पूर्वजांच्या पराक्रमाची गाणी गात होता. मार्क्सचे वर्गकलहाचे, कामगारजीवनाचे, कम्युनिझम्चे तत्त्वज्ञान त्यांना युद्धप्रेरणा देण्यास सर्वस्वी असमर्थ ठरले. आंतरराष्ट्रीय दृष्टि हे कामगारांचे पहिले लक्षण. ते औषधालाही या युद्धात दिसले नाही. रशियन राष्ट्राच्या कडव्या अभिमानानेच ते लढत होते आणि सोव्हियेट नेते तोच अभिमान चेतवीत होते. मार्क्सच्या वचनांनी अंकित असलेले ध्वज या वेळी फेकून देण्यात आले होते. आणि रशियन राष्ट्राभिमान चेतविणारी, जर्मनीचा द्वेष भडकवणारी वचने असलेले ध्वज उभारण्यात आले होते. त्या युद्धात मार्क्स एंगल्स यांचे अत्यंत प्रिय असे जर्मन कामगार हे राष्ट्रनिष्ठा व आर्यरक्तनिष्ठा यांनी प्रेरित, नव्हे पिसाट झाले होते. रशियन कामगार आपले बंधू आहेत आणि जर्मनीचे सत्ताधारी हे खरे आपले शत्रू आहेत हा मार्क्सविचार त्यांनी रशियन कामगारांच्या रक्तांत बुडवून टाकला. आणि मार्क्सच्या तत्त्वज्ञानांत मुरत ठेवलेल्या रशियन कामगारांनीही तेच केले. नव्या भावी कम्युनिस्ट-साम्यवादी समाजरचनेचे भव्य दर्शन ही निष्ठा, त्यांना प्रेरणा देती झाली नाही, राष्ट्रवादापेक्षा ती निष्ठा श्रेष्ठ ठरू शकली नाही. अत्यंत गर्ह्य, त्याज्य, निषिद्ध अशा जर्मन-द्वेषाचाच त्यांना आश्रय करावा लागला.

वर्णद्वेष, धर्मद्वेष यांची हीच कथा आहे. कोणच्याही देशातले कामगार यातून मुक्त आहेत असे दिसत नाही. अमेरिकन कामगार इतर अमेरिकनांप्रमाणेच तेथील निग्रोचा द्वेष करतात. शाळा, उपहारगृहे, वाहने यांत त्यांना बरोबरीने अमेरिकन सत्ताधारी बसू देत नाहीत म्हणून तेथील काम-

गारांनी कधीही त्यांचा पक्ष घेतला नाही. इतकेच नव्हेतर त्यांचा छळ करण्यात तेही हौसेने भाग घेतात. ब्रिटनमध्येही तेच आहे. एका हिंदी माणसाला बस-कंडक्टर म्हणून नेमतांच बाकीच्या ब्रिटिश कामगारांनी संप केला. संप हे कामगारांचे मोठे अस्त्र. त्याचा त्यांनी दुसऱ्या कामगाराची भाकरी तोडण्यासाठी उपयोग केला ! विश्वाचे कल्याण हे जे त्यांचे मार्क्सप्रणीत ध्येय त्यासाठी नाही ! जर्मन कामगार इतर जर्मन लोकांबरोबर ज्यू-द्वेषाने अंध झाले होते ही कथा काही जुनी नाही. सर्व जगाच्या शरीरावर त्याच्या खुणा अजून आहेत. आणि मार्क्सची स्मृती कदाचित् नष्ट होईल, पण यांची होणार नाही.

धर्मनिष्ठा, धर्मांधता, असहिष्णुता, परधर्मद्वेष यांतून कामगार मुक्त आहेत काय ? हिंदुस्थानात पाकिस्तानची चळवळ चालू होती. अंध धर्मश्रद्धा हाच तिचा पाया होता. मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, कानपूर इत्यादि शहरांतल्या कामगारांना त्यांच्या कम्युनिस्ट नेत्यांनी कित्येक वर्षे मार्क्सवाद शिकवला होता. आंतरराष्ट्रीय दृष्टी दिली होती. धर्माच्या अफूपासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला होता. पण मुस्लिम कामगारांनी पाकिस्तानला विरोध केला काय ? ते हिंदुधर्माच्या, भारतराष्ट्राच्या द्वेषापासून अलिप्त राहिले काय ? आणि आजही ती प्रगती झाली आहे काय ? क्षुल्लक कारणावरून अजूनही भारतात दंगे पेटतात. मुस्लिम कामगार त्यांचा निषेध करीत नाहीत. त्यांचा सगळा ओढा अन्यत्र आहे. उलट काश्मीरमध्ये मुस्लिम किसान आहेत. त्यांनी भारतात सामील होण्याचा अट्टाहास धरला आणि त्या बाबतीत आपल्या सरकारला सक्रिय पाठिंबा दिला. कामगारांपेक्षा ते किसानच ज्यास्त क्रांतिकारक ठरले. रशियन कामगारांनीही आपली धर्मश्रद्धा मार्क्सवादाच्या डोहात अर्धशतक उभे राहिल्यानंतर पहिल्याइतकीच उज्ज्वल आहे, हे दाखवून दिले आहे. धर्मप्रचार करणे हा प्रारंभी सोव्हियेट सरकारने गुन्हा ठरविला होता पण अटीतटीचे प्रसंग येताच ते कायदे ढिले करावे लागले. आणि लोकांना लढण्यास स्फूर्ती यावी म्हणून सोव्हियेट सरकारला त्यांच्या धर्मभावनेला आवाहन करावे लागले. मार्क्सवाद हा शिळोप्याच्या वेळी उपयोगी पडतो. निकराचे प्रसंग आले की कामगार त्याला मूठमाती देतात असा इतिहास आहे.

कामगार क्रांती करतात ती केवळ स्वतःसाठी नसून सर्व समाजासाठी

असते, भांडवली सत्तेपासून सर्व समाज मुक्त करणे हे कामगारांचे ध्येय असते, इतर वर्ग कधी क्रांतीत भाग घेतात पण ते स्वार्थासाठी; तो साधताच ते भांडवलदारांचे दास होतात, कामगारांना दगा देतात, असा एक विचार मार्क्सवादात नेहमी सांगितला जातो. त्याचा उल्लेख वर आलाच आहे. पण स्वार्थ साधताच कामगार तरी कामगारांशी एकनिष्ठ राहतात, क्रांतीला दगा देत नाहीत असे दिसते काय ? मुळीच नाही. कामगारांची वृत्ती याही बाबतीत इतरांहून निराळी नाही. आणि आश्चर्य असे की याला मार्क्सनेच पुरावा देऊन ठेवला आहे. इंग्लंडचे साम्राज्य वाढू लागले. तेथल्या भांडवलदारांना अमाप धन मिळू लागलें. अर्थातच त्याचा काही अंश कामगारांना देणे त्यांना प्राप्तच होते. त्यामुळे कामगारांची स्थिती जरा सुधारली आणि त्यामुळे त्यांची क्रांतिवृत्ती नाहीशी होऊ लागली. त्यांच्यावर टीका करताना मार्क्सने मार्क्सवादातील सर्वात तिरस्करणीय असा जो 'बूर्झ्वा' हा शब्द, तो वापरला आहे. हे कामगार बूर्झ्वा झाले, त्यांच्यात भांडवली वृत्ती आली, इत्यादी निर्भर्त्सना त्याने केली आहे. यावरूनच कामगार म्हणजे काही विषेशगुणसंपन्न वर्ग आहे या आपल्या सिद्धान्ताचा मार्क्सने फेरविचार करावयास हवा होता. पण आज शंभर वर्षांनी मार्क्सचे सिद्धान्त इतिहासाने फोल ठरविल्यानंतरही त्याचे अनुयायी फेरविचार करीत नाहीत; तेव्हा मार्क्सने तो केला नाही यांत नवल नाही.

कामगार, विद्याजीवी व शेतकरी यांच्याविषयी मार्क्सवादाने जे सिद्धान्त मांडले ते कसे भ्रामक व अनैतिहासिक आहेत ते येथेवर सांगितले. मोठे भांडवलदार व लहान व्यापारी – बूर्झ्वा व पेटी बूर्झ्वा – यांच्याविषयीचे त्याचे सिद्धान्त याच मासल्याचे आहेत हे वरवर पाहताही दिसून येईल. ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, जपान या पाच देशांत बड्या भांडवलदारांची सत्ता दीर्घ काळ चालू होती. त्यांपैकी पहिल्या दोन देशांतील भांडवलदार इतरांच्या तुलनेने अतिशय विवेकी व राष्ट्रनिष्ठ असे दिसतात. ते तसे असल्यामुळेच त्या देशात कोणतीही रक्तपाती क्रांती न होता संपत्तीची पुष्कळशी वाटणी होऊन समाजवाद बऱ्याच प्रमाणात आला आहे. फ्रान्सच्या भांडवलदारांनी गेल्या महायुद्धात आपल्या देशाचा विक्रयच केला. मातृभूमी त्यांनी हिटलरच्या ताब्यात देऊन टाकली. जर्मन भांडवलदार

हिटलरच्या दंडसत्तेच्या आहारी गेले. भांडवलाबरोबर व्यक्तिस्वातंत्र्य उदयास येते, कारण कारखानदारांना मजुरांचा पुरवठा होणे अवश्य असते, असा एक सिद्धान्त मार्क्सवादाने ठोकून दिला आहे. जर्मनी, जपान, इटली येथला इतिहास मार्क्सचा हा सिद्धान्त मान्य करीत नाही. जपानमध्ये १९१२ नंतर सर्व सत्ता भांडवलदारांनी काबीज केली. पण व्यक्तिस्वातंत्र्य त्यांनी कधी क्षितिजावरही येऊ दिले नाही. तरी त्यांना मजुरांचा तुटवडा पडला नाही. आर्थिक स्थितीवर गुण अवलंबून असता, भांडवलदार, म्हणजे अमक्या वृत्तीचा, अमक्या गुणाचा, असा त्याचा वर्गगुण ठरलेला असता, तर सर्व देशांतले भांडवलदार सारख्या प्रवृत्तीचे दिसले असते. पण तसे मुळीच दिसत नाही. कोणी रूझवेल्ट, चर्चिल यांचे नेतृत्व पतकरून राष्ट्रनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, आर्थिक समता ही तत्त्वे मान्य करतात तर कोणी हिटलर, मुसोलिनी यांच्यापुढे नमून व्यक्तिस्वातंत्र्य, समता, यांचा खुशाल बळी देतात. त्यांचा स्वार्थ हा पराकोटीला गेलेला असतो. त्यासाठी ते वाटेल ती अनन्वित कृत्ये करतात हे खरे आहे. पण हे लक्षण कोणच्या वर्गाला लागू नाही ? चीन, रशिया, येथील सत्ताधारी कामगारांनी कोणची अनन्वित कृत्ये, कोणचे अत्याचार करावयाचे ठेवले आहेत ? थोडी शक्ती आली, थोडे रान मोकळे मिळाले की कामगार, विद्याजीवी, शेतकरी, व्यापारी, हे वर्ग वाटेल ते अत्याचार करण्यास प्रवृत्त होतात हे दरघडीला दिसून येत असतांना भांडवलदारांनाच त्या गुणाची मक्तेदारी देण्यात काय अर्थ आहे ? हाती सत्ता आहे की नाही येवढाच प्रश्न असतो. धनामुळे ती सुलभ असते येवढेच. पण संघशक्तीनेही ती मिळू शकते. आणि संघशक्तीने ती बुद्धिजीवी, कामगार, शेतकरी यांना कोणालाही मिळू शकते. ती मिळताच हेही वर्ग भांडवलदारांप्रमाणेच तिचा क्रूर वापर करतात. आज केरळमध्ये कम्युनिस्टांचे राज्य आहे, पण कामगार, विद्यार्थी यांवर गोळीबार, टाटा सारख्यांशी सहकार्य, हे तेथे चालू आहे.

पेटी बूर्ज्वा वर्गाविषयी मार्क्सची मते याच प्रकारची आहेत. जातिगुणाप्रमाणेच यांच्या वर्गगुणाविषयी तो ठाम सिद्धान्त सांगतो. दुकानदार, लहान व्यापारी, कारागीर इत्यादि व्यवसाय करणाऱ्यांचा त्याने या वर्गात समावेश केला आहे. मार्क्सच्या मते हा वर्ग अत्यंत दगलबाज आहे. कामगारांशी सहकार्य करण्यासाठी हा हात पुढे करील. पण स्वार्थ साधताच तो फुटून निघेल.

याच्याशी कामगारांनी कधीच ऐक्य करता कामा नये. हा वर्ग कधी कामगारांचे हितही करतो. पण कामगारांची क्रांतिवृत्ती नष्ट व्हावी या उद्देशाने दिलेली ही लाच आहे असे समजावे. हा मध्यम व्यापारीवर्ग नेहमी अस्थिर, चंचल दोन्ही डगरीवर हात ठेवणारा, अनिश्चित मनाचा असा असतो. आणीबाणीच्या वेळी हा भांडवली सत्तेला मिळणारच म्हणून कामगारांनी यावर कधीच विसंबून राहू नये. (१. १०१, १०३, ५८४) हा वर्ग हळूहळू नाहीसा होऊन शेवटी कामगारवर्गात त्याचे रूपांतर होणार असे याच्याविषयी मार्क्सने भविष्य वर्तविले होते. (१. ४०). मार्क्सच्या इतर भविष्यांची जी गत झाली तीच याचीही झाली.

चवदाव्या-पंधराव्या शतकात युरोपात विद्येचे पुनरुज्जीवन होऊन मानवाच्या व्यक्तित्वाला काही प्रतिष्ठा प्राप्त झाली. पुढे व्यक्तिस्वातंत्र्य, समता, लोकसत्ता इत्यादि थोर तत्त्वांचा प्रसार होऊन व्यक्तित्व हे अंतिम मूल्य आहे हे सर्वत्र मान्य होऊन अखिल जगतातील मानव त्या दिशेने हळूहळू वाटचाल करू लागला. पण याच सुमारास मार्क्सवाद निर्माण होऊन त्याने या मानवी मूल्यांची होळी केली. ब्राह्मण, मराठा, वाणी, कुंभार, परीट, तेली अशा जातिवाचक नावाने पूर्वी माणसाला ओळखीत. तोच प्रकार मार्क्सवादाने पुन्हा सुरू केला. हा भांडवलदार, हा दुकानदार, हा कामगार, हा शेतकरी, हा शेतमजूर या अभिधानांनी माणसांला ओळखावे, व्यक्ती म्हणून तिला महत्त्व देऊ नये ही सनातन प्रतिगामी चाल त्याने रूढ केली. पशूंचे कळप असतात. आरंभी माणसांच्या तशाच टोळ्या होत्या. तेथून प्रवास करीत करीत मानव व्यक्तित्वापर्यंत आला होता. मार्क्सवादाने त्याला फिरून कळपसंस्कृतीकडे नेले आहे. मनुष्याला कळपातला एक म्हणूनच मार्क्सवाद ओळखतो. बूर्झ्वा, पेटीबूर्झ्वा, इंटेलिजेन्सिया (त्यातहि बूर्झ्वा इंटेलिजेन्सिया, सोशलिस्ट इंटेलिजेन्सिया, कम्युनिस्ट इंटेलिजेन्सिया), प्रॉलिटॅरियट, लंपन प्रॉलिटॅरियट, पेझंट, स्मॉल पेझंट, आर्टिझन असे अनेक वर्ग सांगून मार्क्सवादाने त्यांच्या कपाळावर, गुरांच्या कपाळी मारतात तसे, गुणवाचक शिक्के मारून टाकले आहेत आणि मागे सुलतानी वृत्तीचे क्रूर अघोरी राजे, हा अमक्या जातीचा समाज, अमक्या धर्माचा समाज म्हणूनच त्यांची कत्तल करीत; त्याचप्रमाणे रशिया, चीन, या देशांत मानवी समाजांची कत्तल करण्याची चाल आहे.

१९३०, ३१ साली बुद्धिजीवी लोकांची स्टॅलिनने कशी कत्तल केली ते सर्वश्रुतच आहे. पुढे सामूहिक शेतीच्या जमान्यात शेतकऱ्यांचे त्याने असेच हत्याकांड केले. चीनमध्ये माओच्या हाती सत्ता येताच प्रारंभीच्या वर्षांत अशी अनेक हत्याकांडे झाल्याच्या वार्ता ताज्याच आहेत.

या अनर्थाला स्टॅलिन, क्रुश्चेव्ह किंवा माओ हे जबाबदार आहेत, मार्क्स-वादाशी यांचा काही संबंध नाही, असे कोणी म्हणतात, ते खरे नाही. मार्क्सचे तत्त्वज्ञानच या घोर अनर्थाला कारण झालेले आहे. व्यक्तित्व, मानवत्व हे अंतिम मूल्य त्यानेच नष्ट केले आहे. भिन्न आर्थिक परिस्थितीतल्या भिन्न वर्गांचे विशिष्ट गुण असावयाचे असे ठरवून त्यांच्याविषयी अत्यंत विपरीत, अविवेकी व इतिहासशून्य असे सिद्धान्त मार्क्सने सांगून ठेवले. आणि त्याच्या जोडीला अत्यंत क्रूर व असहिष्णु अशी वृत्ती त्यानेच निर्माण करून ठेविली. धर्माला अवकळा आल्यानंतर तो जसा असहिष्णु, क्रूर, अंध बनतो तसा मार्क्सवाद मुळातच आहे. विरोधी पक्षांची वैरे मृत्यूनेच संपावयाची, क्रांती ही रक्तपातानेच व्हावयाची हे त्याचे तत्त्वज्ञान आहे. समन्वय, सलोखा, औदार्य, दिलदारी, सहिष्णुता हे मानवी संस्कृतीने वाढवीत आणलेले सद्‌गुण मार्क्सवादाने निर्दाळून टाकले आहेत आणि मानवाला पुन्हा एकदा कळपसंस्कृतीकडे नेण्याचा मार्ग आखला आहे.

मार्क्सप्रणीत चातुर्वर्ण्याचा हा असा अर्थ किंवा अनर्थ आहे. आपल्याला लोकशाही निष्ठांची जोपासना करावयाची असेल तर जुन्या चातुर्वर्ण्या-प्रमाणेच हे नवे चातुर्वर्ण्यही आपण समूळ उच्छिन्न करून टाकले पाहिजे. तसे केले नाही तर भारतात लोकसत्ता यशस्वी करण्याची आशा कधीच धरता येणार नाही.

## ५. मार्क्सचे भविष्यपुराण

आपले भविष्य जाणण्याची उत्सुकता हा मानवी मनाचा फार प्राचीन काळापासूनचा धर्म आहे. या उत्सुकतेबरोबरच ती पुरविण्याची, तृप्त करण्याची सिद्धता म्हणजेच भविष्य सांगण्याचे सामर्थ्य हेही फार प्राचीन काळापासून मानवाने प्राप्त करून घेतले आहे, असे जगातल्या सर्व देशांच्या प्राचीन इतिहासावरून दिसते. भविष्यज्ञान असणाऱ्या लोकांचे त्या काळी दोन वर्ग असत. रवि, बुध, शनि, मंगळ, गुरू, इ. आकाशस्थ ग्रहगोलांचा अभ्यास करून त्यावरून भविष्य वर्तविणारे फलज्योतिषशास्त्रज्ञ हा एक आणि दुसरा म्हणजे अंतर्ज्ञानी, त्रिकालज्ञानी साधुपुरुषांचा. यांना शनिमंगळांचा अभ्यास करण्याची आवश्यकता नव्हती. परमेश्वरी कृपेने त्यांना काही दैवी सामर्थ्य प्राप्त होत असे. आणि त्यामुळे भूतभविष्यवर्तमान या सर्वांचे त्यांना ज्ञान सहज होत असे. शंभर वर्षांपूर्वीपर्यंत भविष्यकाल जाणण्याचे व भविष्य वर्तविण्याचे सामर्थ्य असणारे हे दोनच वर्ग असत. मार्क्सवादाच्या उदयाबरोबर या सामर्थ्याने संपन्न असा तिसरा वर्ग जगात दिसू लागला. मात्र तोपर्यंतचे वर सांगितलेले जे दोन वर्ग त्यांना हे सामर्थ्य असते हे मार्क्सवादाला मान्य नाही. जगातील घडामोडींचे शास्त्रीय ज्ञान फक्त आपल्यालाच आहे, आपल्याच पद्धतीने फक्त ते मिळू शकते, म्हणून भविष्य सांगण्याचा अधिकार फक्त आपल्यालाच आहे असा या वर्गाचा दावा आहे. फलज्योतिषी किंवा अंतर्ज्ञानी हे मार्क्सच्या मते भोंदू, ढोंगी, समाजाला फसवून त्याला लुबाडणारे किंवा निदानपक्षी अज्ञ, भोळसट व अंध असे लोक आहेत. आपण मात्र पूर्ण तर्कनिष्ठ, शास्त्रपूत, बुद्धिवादी व सत्यनिष्ठ आहो असे मार्क्सवाद्यांचे मत आहे.

जुन्या काळी पुष्कळसा भर वैयक्तिक जीवनातील भविष्य जाणण्यावरच असे. विवाह, पुत्रप्राप्ती, धनलाभ, सत्ता, राजकृपा यांची प्राप्ती यांचा आपल्या आयुष्यात योग केव्हा आहे, हे जाणण्याचीच माणसांची उत्सुकता जास्त असे. आणि ज्योतिषी त्याचाच अभ्यास जास्त करीत. पण एकंदर समाजाच्या भवितव्याचा अभ्यास मुळीच नसे असे मात्र नाही. पुढे कलियुग येईल, चातुर्वर्ण्याचा नाश होईल, लोक पापी होतील इ. सामाजिक भविष्येही मागे वर्तवीत असत. भविष्यपुराणात अशी भविष्यें सांगितलेली आहेत आणि शिवाय 'व्हिक्तूरिया, एडवर्डो यांचे राज्य होईल' यासारखी भविष्येहि वर्तविलेली आहेत. एके ठिकाणी 'राज्ञी च विकटावती' असा व्हिक्टोरियाचा उल्लेख आहे. अन्यत्र ॲडॅम आणि ईव्ह यांचाही 'आदमो नाम पुरुषो, राज्ञी हव्यवती तथा' असा उल्लेख आढळतो. म्हणजे एकंदर समाजाच्या भविष्याचेही ज्ञान तेव्हा शास्त्रज्ञांना होत असे, असे दिसून येईल. मार्क्सवाद मात्र फक्त सामाजिक भविष्येच सांगतो. क्रांती केव्हा होईल, भांडवलदारांचा नाश केव्हा होईल, कामगारांना राज्यलाभ होईल की नाही, सत्तेचा लाभ कोणाला होईल, या तऱ्हेचीच भविष्ये मार्क्सवादी वर्तवितात. विवाह, पुत्रलाभ, धनलाभ, नोकरी, व्यापारात बरकत इ. घटनांविषयी भविष्ये ते सांगत नाहीत. म्हणजे आज तरी सांगत नाहीत. पुढे ते काय करतील याचे भविष्य मला आज वर्तविता येणार नाही.

आपल्या पंथाच्या संस्थापकांना व त्यांच्या अनुयायांना प्राप्त झालेल्या या सिद्धीविषयी अनेक मार्क्सवादी पंडितांनी सविस्तर लिहून ठेवलेले आहे. "भविष्यकाळातील इतिहासाच्या घडामोडी कशा होणार हे आधी जाणण्याचे शास्त्र निर्माण करणारा कार्ल मार्क्स हा आद्य पुरुष होय. त्याचा मित्र एंगल्स यालाही भविष्यकाळ अगदी बिनचूक व तपशिलासह जाणण्याची प्रज्ञा होती. लेनिनचीही प्रतिभा या शास्त्रात निरंकुश होती. मार्क्सची सर्व भविष्ये अगदी तंतोतंत बरोबर आलेली पाहून आपण आश्चर्याने थक्क होतो." अशी डिबॉरिन या लेखकाने साम्यवादातील श्रेष्ठ भाईची प्रशंसा केलेली आहे. (मार्क्सिझम अँड मॉडर्न थॉट—पृ. ९१-९७) मार्क्सने भांडवलशाहीच्या विकासाचा सिद्धान्त शोधून काढला आणि त्यावरून तिच्याविषयी जे भविष्य वर्तविले ते आज पन्नास वर्षांनी अक्षरशः खरे ठरत आहे असे त्याच ग्रंथात टिमेनिव्ह या लेखकाने म्हटले आहे. (पृ. ३१६) निकोलाय बुखारिन हा सोव्हियेट

रशियातील मोठा नेता. लेनिनचा सहकारी. 'हिस्टॉरिकल मटीरियालिझम्–' हा त्याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यात तो म्हणतो की, ग्रहज्योतिषशास्त्रात सूर्य-चंद्राची ग्रहणे, ग्रहांच्या गती या जशा बिनचूक सांगता येतात तशीच मार्क्स-वादात समाजस्थितीविषयी भविष्ये–(अमक्या लढाईच्या वेळी कोणचा पक्ष कसा वागेल, कोणचा वर्ग पुढाकार घेईल इ.) बिनचूक सांगता येतात. मार्क्सने सांगितलेली अनेक भविष्ये तशी खरी ठरली आहेत. (पृ. ४९, ५०) मात्र 'आम्हाला काळ निश्चित सांगता येत नाही. आम्ही गतीची दिशा सांगू शकतो पण वेग मात्र सांगू शकत नाही,' असे पुढे त्यानेच सांगून ठेविले आहे. 'गणितशास्त्रात मुळात दिलेल्या सिद्धान्तावरून पुढील निगमने जितक्या निश्चितपणे सांगता येतात तितक्याच निश्चयाने, भोवतालची परिस्थिती व अर्थशास्त्राची तत्त्वे यांचे सम्यक् ज्ञान झाले तर सामाजिक क्रांती वर्तविता येते' असे एंगल्सचे मत आहे.

आपल्या भविष्यज्ञानाबद्दलचा मार्क्सवाद्यांचा हा आत्मविश्वास पाहिला म्हणजे यांना ही भविष्ये कशी सांगता येतात याविषयी आपल्याला कुतुहल वाटू लागते. फलज्योतिषामध्ये रवि, मंगळ, बुधादि आकाशस्थ ग्रहांची मानवी जीवनावर सत्ता आहे, तेच मानवाचे भवितव्य निश्चित करतात असा निश्चित सिद्धान्त आहे. त्यामुळे व्यक्तीच्या कुंडलीमधील या ग्रहांचा अभ्यास केला की भविष्य सांगणे सहज शक्य आहे, असे ते शास्त्र म्हणते. अंतर्ज्ञानी साधु-पुरुषांचा दुसरा आधार होता. मनुष्य जन्मतो त्याच वेळी ब्रह्मदेव त्याचे सर्व भविष्य त्याच्या कपाळी लिहून ठेवितो असे त्यांचे मत आहे, तपश्चर्येने, परमेश्वरी कृपेने ते जाणण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले की भविष्यकथन सुलभ होते. अशा प्रकारचे कोणचे शास्त्र कम्युनिस्टांना लाभले आहे असा प्रश्न आपल्या मनात येतो. 'ऐतिहासिक जडवाद' हे ते शास्त्र होय. विरोधविकास-वाद, ऐतिहासिक जडवाद, वर्गविग्रह व श्रममूल्यसिद्धान्त ही मार्क्सवादाची मूलतत्त्वे होत. त्यांत ऐतिहासिक जडवादाला फार महत्त्व आहे. कोठल्याही समाजाचे भवितव्य जाणता येते, त्याचे भविष्य वर्तविता येते ते याच शास्त्राच्या आधारे. असे असल्यामुळे या ऐतिहासिक जडवादाचे स्वरूप प्रथम आपणांस समजून घेतले पाहिजे; त्यावाचून मार्क्सच्या भविष्यपुराणाची आपल्याला कल्पना येणार नाही. म्हणून या तत्त्वाचे थोडे स्पष्टीकरण करू.

प्रत्येक समाजात भिन्न भिन्न काळी धननिर्मितीची काही विशिष्ट साधनें माणूस वापरीत असतो. अगदी प्रारंभीच्या काळी मनुष्याला शेती माहीत नव्हती. त्या वेळी ससा, हरिण, डुक्कर, यांची शिकार करावी, मासे पकडावे व त्यांवर निर्वाह करावा अशी स्थिती होती. ससा, हरिण, मासा हेच त्या वेळचे धन व बाण किंवा कोयता ही त्याच्या प्राप्तीची साधने. पुढे जमीन हे धनसाधन मानवाला उपलब्ध झाले. नांगर, कुळव, दोरखंडे, बैल, घोडा ही त्याची त्या वेळी अर्थोत्पादनाची साधने होती. अरण्ये, खाणी, हीही धनसाधने पुढे उपलब्ध होत गेली. पुढे मग कोष्टी, चांभार, गवंडी, पाथरवट हे लोक भिन्न प्रकारचे धन-निर्वाहसाधन निर्माण करू लागले. पुढे व्यापार सुरू झाला. गिरण्या, कारखाने सुरू झाले. यंत्र, वाफ, वीज यांचा शोध लागून अनंत प्रकारची अवजारे धन निर्माण करू लागली. मोटार, आगगाडी, आगबोट ही वाहने यांचा या अवजारांत आणि म्हणून अर्थोत्पादनाच्या साधनांतच समावेश होतो. धनसाधने बदलतात तशी माणसाची अर्थविनिमयाची साधने व पद्धतीहि बदलतात. पूर्वी नाणी नव्हती. ऐन जिनसी व्यवहार होई. पुढे नाण्यांची पद्धती आली. पेढ्या, हुंड्या यांचे अनंत प्रकार सुरू झाले. आणि अर्थविनिमय पहिल्यापेक्षा अगदी भिन्न प्रकारे होऊ लागला. म्हणजे अर्थोत्पादनाची साधने बदलली की विनिमयसाधनेही बदलतात. येथेच हे चक्र थांबत नाही. प्रत्येक प्रकारच्या अर्थसाधनांनी समाजातल्या भिन्न भिन्न गटांचे, वर्गांचे, जातींचे संबंधही निश्चित होत असतात, व त्यामुळे साधने बदलली की हे संबंधही बदलतात. शेतकरी व जमीनदार यांचे जे संबंध असतात त्यांहून मजूर व कारखानदार यांचे संबंध फार निराळे असतात हे आपण आज पाहतोच. गुलाम आणि धनी यांचे नाते त्याहीपेक्षा भिन्न असते हेही उघड आहे. ज्या समाजात वस्तूची देवघेव करणे एवढाच व्यापार असतो त्याहून जेथे मोठमोठे कारखाने महायंत्रोत्पादन करीत असतात त्या समाजातले भिन्न गटांचे परस्परसंबंध फार वेगळे असतात. आणि अर्थ व विनिमय यामुळे कुळ व सरंजामदार, मजूर व कारखानदार, गुलाम व धनी यांच्यातील संबंधच फक्त निश्चित होतात असे नव्हे तर त्या समाजातील राजा व प्रजा, सत्ताधारी व बहुजन, नेते व अनुयायी यांचेही संबंध या अर्थोत्पादन व्यवस्थेमुळेच ठरत असतात असे मार्क्सवादाचे म्हणणे आहे. पण मार्क्स एवढेच म्हणून

थांबत नाही; तर धर्मव्यवस्था, कायदा, विद्या, विवाहसंस्था, स्त्रीपुरुषसंबंध, परमार्थविषयक मते, प्रवृत्ती, निवृत्ती म्हणजे एकंदर मानवी संस्कृतीच या अर्थोत्पादन-साधनामुळे निश्चित होत असते असे मार्क्सचे मत आहे, आणि त्यातूनच त्याचे भविष्यज्ञान निर्माण होत असल्यामुळे हा सिद्धान्त काय आहे ते जरा तपशिलाने पाहू.

पूर्वी लढाईत जिंकलेल्या माणसांची सर्रहा कत्तल करीत असत. पुढे दया-धर्माचा उदय झाला. कोणातरी धर्मवेत्त्याने मानवाला, सेनापतीला, राजांना दया हा श्रेष्ठ धर्म आहे, मनुष्याची हिंसा करू नये असा उपदेश केला आणि म्हणून या कत्तली थांबल्या असे आपल्याला वाटते. पण मार्क्सवादी म्हणतात, तसे नाही. जिंकलेल्या लोकांना गुलाम करून त्यांना शेतीला वा इतर अन्य कामाला लावून त्यांच्यापासून धनोत्पादन करून घेण्याची व्यवस्था होत नव्हती तोपर्यंत जेते लोक जितांची कत्तल करीत. पुढे शेतीला माणूसबळ हवेसे झाले तेव्हा कत्तली थांबल्या. त्या वेळी दयाधर्माचा उपदेश, अहिंसेचा उपदेश, एखाद्या बुद्धाने केला असेल. पण त्या दयाधर्माचे याच वेळी स्फुरण झाले ते शेतीला कष्टकरी माणसांची आवश्यकता निर्माण झाली म्हणूनच. उत्पादनसाधनांत बदल झाला म्हणून दयेचे तत्त्व उदयास आले, व त्यामुळेच बुद्धाचा जन्म झाला. पुरुष हे एकापेक्षा जास्त बायका करू लागले त्याचेही कारण असेच आहे. त्यांची कामवासना हे कारण नव्हे. शेतीला हुकमी मनुष्यबळाची आवश्यकता भासू लागली की मग लोकांना अनेक लग्ने करण्याची बुद्धी होते. तोपर्यंत होत नाही. आणि झाली तरी तशी प्रथा यशस्वी होणार नाही. समुद्रगुप्त, हर्ष यांसारखे राजे इतर राजांची लहानलहान राज्ये नष्ट करून तेथे एकछत्री साम्राज्य स्थापतात. यापाठीमागे त्यांची साम्राज्यलालसा आहे, असे आपण म्हणू. पण ही मीमांसा मार्क्समते योग्य नाही. लहान लहान राज्ये असली की ते राजे आपसात सारखे लढत राहतात. कृषि, वाणिज्य इत्यादि व्यवसायांची हानी होते. मग त्यांची भरभराट व्हावी येवढ्यासाठी एकछत्री राज्याची आवश्यकता निर्माण होते. मग कोणीतरी समुद्रगुप्त निर्माण होतोच. आणि उत्पादनसाधनांची भरभराट व्हावी अशी परिस्थिती म्हणजे एकछत्री साम्राज्य निर्माण करतो. संन्यास, प्रवृत्ती, निवृत्ती, व्यक्तिस्वातंत्र्य, एकपत्नी, बहुपत्नी ही सर्व तत्त्वे अशीच अर्थोत्पादन-साधनांवर अवलंबून

आहेत. अर्थसाधनांचा विकास होण्यास व्यक्तिस्वातंत्र्य अनुकूल असेल तर ते प्रस्थापित होईल. नसेल तर होणार नाही. आणि झाल्यास टिकणार नाही. एकोणिसाव्या शतकात कारखानदारी व भांडवलशाही यांच्या वाढीला व्यक्तिस्वातंत्र्य अवश्य होते. लगेच पाश्चात्त्य देशांत त्याचा पुरस्कार करणारे तत्त्ववेत्ते निर्माण झाले. त्याचा प्रसार झाला. ते दृढमूल झाले. त्याआधी ते होणे शक्यच नव्हते. त्याआधी शेतीच्या विकासाला, सरंजामदारीला दासपद्धतीच अनुकूल होती. म्हणून ती अमलात आली, टिकून राहिली आणि तिचा उपदेश करणारी धर्मतत्त्वे साधुसंत सांगत राहिले. उपनिषत्काली संन्यास, वैराग्य यांचा उदय का झाला ? विश्वाच्या मूलकारणांचे चिंतन केल्यावर मोक्षसाधनाला संन्यास अवश्य असे, ऋषींना वाटले म्हणून त्यांनी तसा उपदेश केला, हे खोटे. गृहस्थधर्म, यज्ञधर्म झेपणे कठिण व्हावे अशी आर्थिक परिस्थिति निर्माण झाली म्हणून ऋषींना संन्यासधर्माचा उपदेश करण्याची बुद्धी झाली, हे खरे. म्हणजे तत्त्वज्ञानातून, मानवी विचारांमुळे परिस्थिती बदलते असे नसून परिस्थितिमुळे मानवी विचार, बुद्धी, तत्त्वज्ञान, संस्कृती ही बदलतात, निर्माण होतात, असे हे मत आहे. आणि ही परिस्थिती म्हणजे आर्थिक परिस्थिती. धनोत्पादनसाधने, विनिमयपद्धती, रस्ते, वाहने, त्या साधनांतून निर्माण झालेले वर्ग, त्यांचे परस्परसंबंध हे सर्व आर्थिक परिस्थितीत समाविष्ट होते. (यापुढे अर्थसंबंध या शब्दाने आपण त्याचा निर्देश करू.) या परिस्थितीच्या नियंत्रणांत सर्व घडामोडी असल्यामुळे तिचे ज्ञान असणाऱ्या मनुष्याला भविष्ये सांगता येतील हे उघडच आहे. शनि-मंगळाच्या नियंत्रणात मानव आहे असे ज्यांना वाटते ते त्यांच्या स्थितिगतीचा अभ्यास करतात आणि भविष्ये वर्तवितात. अर्थसबंध मानवाचे नियंत्रण करतात असे मत असणारे मार्क्सवादी त्याच्या अभ्यासाच्या आधारे भविष्य सांगतात.

याविषयीचे आपले सिद्धान्त अनेक ठिकाणी मार्क्सवादी पंडितांनी सांगितलेले आहेत. प्रत्येक युगात उत्पादन व विनिमय यांच्या ज्या पद्धती अस्तित्वात असतात त्यांच्यामुळे जी अनिवार्य अशी समाजरचना झालेली असते तिच्या पायावरच सर्व राजकीय व बौद्धिक इतिहास उभा असतो, व या साधनांच्या आधारेच त्याचे रहस्य उकलता येते. (कम्युनिस्ट मॅनिफेस्टो).

राजकीय, सामाजिक व धार्मिक जीवनाला उत्पादनसाधनांमुळेच विशिष्ट

स्वरूप प्राप्त होते. माणसाच्या विवेकबुद्धीने परिस्थिती ठरत नसून परिस्थितीमुळेच माणसाच्या विवेकबुद्धीचे रूप निश्चित होत असते. (मार्क्स–क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनमी)

सामाजिक व राजकीय क्रांतीची अंतिम कारणे माणसाच्या कर्तृत्वात नसून उत्पादन व विनिमय यांच्या साधनांत जो बदल होतो त्यात ती सापडतात. (एंगल्स – शास्त्रीय समाजवाद)

मानवाच्या विचारांच्या प्रवाहाची दिशा भोवतालच्या जड परिस्थितीमुळे निश्चित होते. धर्म, कायदा, शासनसंस्था, भिन्न भिन्न गटांतील मानवांचा दर्जा यांचे स्वरूप त्या काळच्या उत्पादनसाधनांनीच निश्चित होत असते. (एंगल्स – मार्क्समृत्यूनंतरचे भाषण.)

या वचनांवरून ज्योतिषशास्त्रातील शनिमंगळांइतक्याच सामर्थ्याने व तितक्याच सूक्ष्मपणे नांगर, माग, मासे पकडण्याचे जाळे, गिरण्या-कारखाने, बँका ही अर्थसाधनेहि मानवी जीवनाचे नियंत्रण करतात असे मार्क्सवादी मानतात असे दिसून येईल. नाचणाऱ्या बायका नाचताना काही हातवारे करतात. ते सुद्धा वाटेल तसे होत नाहीत. गाजरे, बटाटे, मुळे इ. भाज्या जमिनीतून उपटताना आणि झाडावरची फळे तोडताना म्हणजे अन्नधान्य प्राप्त करून घेताना जसे कामकरी बायकांचे हात होतात तसेच त्या वेळच्या नृत्यात हातवारे होणार. अन्यप्रकारे होणे शक्य नाही असे प्लॅखेनॉव्ह हा रशियातील लेनिनस्टॅलिनादि मार्क्सवाद्यांचा परात्पर गुरू म्हणतो. मानवी जीवनावर अर्थसंबंधाचे इतके सूक्ष्म नियंत्रण असताना भविष्ये सांगता येऊ नयेत ही खरोखरच नामुष्कीची गोष्ट आहे. मार्क्सने अर्थशास्त्रज्ञांची ही नामुष्की दूर करून त्यांचे लज्जारक्षण केले, यासाठी त्यांनी त्याला शतशः धन्यवाद दिले पाहिजेत.

फल-ज्योतिषशास्त्राच्या तोडीचे किंवा त्यापेक्षाही जास्त सुनिश्चित असे जे जगप्रसिद्ध शास्त्र मार्क्सने निर्माण केले त्याच्या आधाराने मार्क्सने व त्याच्या अनुयायांनी भविष्ये तरी कोणची सांगितली आणि त्यांपैकी खरी किती झाली ते आता आपणास पहावयाचे आहे.

पहिले भविष्य अर्थातच कम्युनिस्ट क्रांतिविषयीचे. कम्युनिस्ट क्रांती हा मार्क्सवादाचा आत्मा. त्या पंथाचे ते सर्वात मोठे वैभव ! तेव्हा त्याविषयीचे

भविष्य कम्युनिस्ट पंडितांनी अगदी सूक्ष्म अभ्यासानेच वर्तविलेले असणार. आणि म्हणून त्याचे महत्त्वहि फार. यामुळेच त्याचा प्रथम विचार करू.

भांडवलशाही ज्या देशात परिपक्व दशेस आली आहे त्याच देशांत प्रथम कम्युनिस्ट क्रांती होणार आणि अशा भांडवलशाही देशांचे अर्थव्यवहार परस्परात अत्यंत गुंतलेले असल्यामुळे अशा सर्व देशात ती क्रांती एकदमच होणार हे निश्चित, असे 'प्रिन्सिपल्स ऑफ कम्युनिझम्' या संवादरूप लेखात एंगल्सने म्हटले आहे. आणि तपशिलात शिरून त्याने असेही वर्तविले होते की कम्युनिस्ट क्रांती राष्ट्रीय म्हणजे एका राष्ट्रापुरती मर्यादित क्रांती होणार नाही. ती प्रगत भांडवली देशात म्हणजे ग्रेट ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स व जर्मनी या देशांत प्रथम एकदम होईल. त्यातही जेथे औद्योगिक प्रगती सर्वात जास्त, धनोत्पादन जेथे पराकोटीला गेलेले तेथे ती प्रथम होईल. या दृष्टीने ब्रिटनमध्ये ती सर्वात जास्त वेगाने होईल व जर्मनीत अगदी मंदगतीने होईल, असे त्याने लिहून ठेविले होते.

मार्क्सवादाचे दुर्दैव असे की कम्युनिस्ट क्रांती ही यांपैकी कोणच्याहि प्रगत देशांत न होता औद्योगिक दृष्टीने अत्यंत मागासलेला असा देश जो रशिया तेथे झाली. सावित्रीचा पती सत्यवान् याचे प्राणहरण करताना यमाने चूक-भूल केली. याचे कारण मोरोपंत असे देतात की " जे ब्रह्मलिखित बरे न वाची ते." यमाने ब्रह्मदेवाने सत्यवानाचा लिहिलेला ललाटलेख नीट वाचला नाही. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात क्रांतिदेवतेने अशीच चूकभूल केली. एंगल्सचा लेख तिने नीट वाचला नाही. तिने पूर्ण मागासलेल्या देशांत अवतार घेतला आणि पुन्हा एकाच देशापुरती ती मर्यादित राहिली. स्टॅलिनला १९२६ साली कम्युनिस्ट क्रांती ही जगव्यापक नसून एकराष्ट्रमर्यादितच आहे अशी घोषणा करावी लागली. म्हणजे तिने एंगल्सची दोन्ही भविष्ये सपशेल चुकविली. अर्थात् फलज्योतिषशास्त्रात ज्याप्रमाणे भविष्य सपशेल चुकलेले असताना ते पूर्ण बरोबर कसे आहे हे सांगणारे ज्योतिषी असतात तसेच ऐति-हासिक जडवाद या शास्त्रातही आहेत. बढती सांगितलेली असताना बडतर्फी झाली तरी ती बडतर्फी हीच कशी बढती होय हे स्पष्ट करणारे ज्योतिषी सर्वत्र आढळतात; त्याचप्रमाणे भांडवली दृष्टीने पूर्ण मागासलेल्या रशियात क्रांती झाली तरी भांडवलपरिपक्व देशांत ती प्रथम होणार हे मार्क्सवादाचे

भविष्य कसे तंतोतंत बरोबर आले हे स्पष्ट करणारे अनेक कम्युनिस्ट आढळतात. त्यांचे लेखही प्रसिद्ध आहेत. (रशियन राज्यक्रांति–पां. वा. गाडगीळ– पृ. २६० पहा.) पण त्याचा विचार न करता एंगल्सच्या या महत्त्वाच्या भविष्याचा विचार प्रथम आपणांस पुरा केला पाहिजे.

टाकचाव्ह नावाच्या एका पंडिताचे मत असे होते की रशियातच क्रांती प्रथम होणे जास्त शक्य आहे. जर्मन कामगारांसमोर भाषण करताना तो म्हणाला की, 'फ्रेड्रिक एंगल्स याला रशियाविषयी काही माहिती नाही. त्याला काही कळत नाही. रशियात कामगार नाहीत हे खरे पण तसे भांडवलदारही नाहीत. तेव्हा तेथील लढा सोपा आहे. इ.' यावर आपल्या एका लेखात कडक टीका करून एंगल्सने सांगितले की 'या टाकचॉव्हला सोशॅलिझम्‌चा ओनामा सुद्धा कळत नाही.' आणि नंतर त्या लेखात एंगल्सने रशिया हा मागासलेला आहे, समाजवादी क्रांती होण्यास भांडवलशाहीची परिणती झालेली असणे आवश्यक असते, तशी रशियात नाही. पाश्चात्त्य राष्ट्रांआधी रशियात क्रांती होईल. पण ती समाजवादी क्रांती असणार नाही, अशा तऱ्हेने विवेचन केले आहे. (ऑन सोशल रिलेशन्स इन् रशिया, सन १८७५)

रशियात १९१७ साली जी क्रांती झाली ती समाजवादी क्रांतीच होय असे बहुतेक सर्व कम्युनिस्ट पंडितांचे मत आहे. मार्क्सवचन श्रुतीप्रमाणे मानणारे लेनिनचे काही सहकारी समाजवादी क्रांती रशियात होणे शक्य नाही, असे १९१७ साली झारशाही कोलमडून पडल्यावरही म्हणत होते. स्टॅलिन त्यातच होता. पण लेनिनने त्या सर्वांना खोडून काढले, व मार्क्समताच्या आधारेच रशियातील समाजवादी क्रांती घडवून आणली. तेव्हा मार्क्स-एंगल्सचे समाजवादी क्रांतिविषयीचे भविष्य कितपत खरे झाले ते यावरून स्पष्ट होईल. रशियातील क्रांती कोणच्या जातीची आहे याविषयी जरी वाद असला तरी समाजवादी क्रांती ब्रिटन, अमेरिका इ. भांडवली देशांत प्रथम होईल हे भविष्य फसले हे मान्य केलेच पाहिजे.

कम्युनिस्ट (समाजवादी) क्रांती ही जागतिक क्रांतीच होणार. ती एकराष्ट्रीय असणार नाही हा वरील भविष्याचा उत्तरार्ध आहे तोही खरा ठरला नाही हे उघडच आहे. पण त्याविषयी थोडे आणखी सांगितले पाहिजे. १९१७

साली रशियात क्रांती होऊन लेनिन सत्ताधारी झाला. आपण समाजवादी क्रांती केली आहे अशी त्याची श्रद्धा होती आणि अजूनही त्याचा वरील भविष्याच्या उत्तरार्धावर विश्वास होता. त्यामुळे, रशियन क्रांती हा केवळ आरंभ आहे, जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका येथे आता अशीच क्रांती होत जाणार, तशी न झाली तर आपला सर्वनाश होईल, आपल्या क्रांतीचा घात होईल, असे तो नित्य म्हणत असे. क्रांतीच्या अपेक्षेने त्याने आपले हस्तक या वरील देशांत पाठविले होते. पण कोठे काहीच झाले नाही. आणि मग हळूहळू ती आशा सोडून देऊन 'कम्युनिस्ट क्रांती एकराष्ट्रीय असू शकते' अशा घोषणा रशियन मार्क्सवादी करू लागले.

लेनिन हा भविष्यज्ञानात मार्क्सइतकाच निपुण होता असे म्हणतात. १९१७ च्या आधी पंचवीस वर्षे ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, या देशांतील अर्थोत्पादन साधने, तेथील भांडवलशाही, कामगारवर्ग, तेथील पक्षोपपक्ष, इतर परिस्थिती यांचा तो अभ्यास करीत होता. तरी १९१७ साली सुद्धा त्याला त्यांच्याविषयी, त्या समाजाच्या पुढील दोन-तीन वर्षांतल्या भवितव्याविषयी काहीही कळू शकले नाही. तेथे समाजवादी क्रांती होणार असेच तो म्हणत होता. पण जर्मनी, फ्रान्समध्ये पुढील काळात झाले ते अगदीच उलट झाले !

टाकचाव्हचे मत व त्यावरील एंगल्सची टीका वर दिली आहे. ती आणि लेनिनचे हे भविष्यज्ञान यांवरून समाजवादाचा ओनामा कोणाला कळला आहे हेच कळेनासे होते. एंगल्सच्या मते टाकचाव्हला तो कळलेला नव्हता. पण क्रांतीने टाकचाव्हला तो कळला असल्याचे सिद्ध केले. लेनिननेही ते मान्य केले. पण पुढल्या भविष्यज्ञानावरून त्याच्याबद्दलही तीच शंका येते. स्टॅलिनला खरे भविष्यज्ञान असते तर हिटलरचा जर्मनी पुढे आपल्यावर उलटणार आहे एवढे त्याच्या ध्यानात आले असते.कारण कोणचा पक्ष कोणच्या बाजूला जाईल, कोणाची काय तत्त्वनिष्ठा राहील हा तपशील ग्रहगोलांच्या गतीप्रमाणेच निश्चित सांगता येतो असे मार्क्समत आहे. तेव्हा स्टॅलिनचे भविष्यज्ञान व समाजवादाचे ज्ञान शंकास्पदच दिसते. आणि आजच्या रशियाच्या सत्ताधाऱ्यांना ते मान्य आहेच. या सगळ्यामुळे मोठी पंचाईत होते. तूर्त आपण मार्क्स व एंगल्स यांना समाजवादातले काही कळत होते, असे धरून पुढे जाऊ.

क्रांतीचे स्वरूप, तिचा व्याप व तिचा कमीअधिक वेळ यांविषयीच्या मार्क्सच्या भविष्याचा विचार झाला. दुसरे भविष्य वर्गभेदाच्या तीव्रते-विषयीचे. मार्क्सचे मत असे होते की पश्चिम युरोपीय देशांत भांडवलशाही परिपक्व झाली आहे. तेथे उत्तरोत्तर संपत्तीची वाटणी अत्यंत विषम होत जाणार. कामगारवर्ग कमालीचा दरिद्री होणार आणि सर्व संपत्ती भांडवल-दारांच्या हाती एकवटणार. आणि यातूनच मग भडका उडून कामगार लोक भांडवलशाही नष्ट करून कामगारसत्ता प्रस्थापित करणार. जगाच्या सुदैवाने हेही भविष्य असेच लटके झाले. संपत्तीची विषम वाटणी होत आहे असे पाहताच मार्क्सच्या डोळ्यादेखत बिस्मार्क, डिझरायली या नेत्यांनी कामगार-हिताचे कायदे करून तिचा निचरा करण्यास प्रारंभ केला. १८८० च्या सुमारालाच हा उपक्रम झाला होता. त्याच्याआधीच जॉइंट स्टॉक कंपन्यांची पद्धत सुरू होऊन गिरण्या-कारखान्यांवरची धनिक सत्ता नष्ट होण्यास प्रारंभ होऊन धनामध्ये मध्यमवर्ग वाटेकरी होऊ लागला होता. त्या वेळचे लेसे फेअरचे म्हणजे अर्थक्षेत्रातील अनिर्बंधतेचे तत्त्वज्ञान नष्ट होऊन सरकारने अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवले पाहिजे, हे तत्त्वज्ञान दृढमूल होऊ लागले होते. या सर्व प्रेरणांमुळे कामगारवर्गाला हळूहळू सुस्थिती प्राप्त होऊ लागली, धनिकांच्या संपत्तीचा निचरा होऊ लागला आणि मार्क्सची भविष्यवाणी खोटी ठरू लागली. अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी येथे मार्क्समतान्वये समाजवादी क्रांती मुळीच झालेली नाही. रशियात ती झालेली आहे. तरी भांडवली देशातील कामगारांचे राहणीचे मान सोव्हिएट कामगारांच्यापेक्षा शतपटीने श्रेष्ठ आहे. या प्रगत देशांची गोष्ट सोडून दिली तरी मार्क्सच्या काळापासून पुढच्या काळात मार्क्स म्हणाला त्याप्रमाणे वर्गभेदाची तीव्रता कोणच्याच देशात वाढली नाही. नियंत्रणाचे तत्त्व सर्वच देशांनी मान्य केले होते. आणि कालांतराने कामगारवर्ग संघटित झाल्यामुळे त्याला भांडवली व्यवस्थेतच थोडे बरे दिवस येऊ लागले. पाश्चात्त्य देशांप्रमाणे त्याला सुस्थिती आली असे नव्हे. पण कालप्रवाह बदलून गेला हे निश्चित. समाजात वर्ग नष्ट होतील, मध्यमवर्ग समूळ नष्ट होईल, लहान कारखानदार हे भिकेस लागतील व शेवटी मजूर होतील आणि शेवटी एका बाजूला अत्यंत धनाढ्य, कमालीचा संपन्न असा भांडवलदार व दुसऱ्या बाजूला अन्नवस्त्रालाही महाग

झालेला कामगार असे दोनच वर्ग राहतील हे मार्क्सचे भविष्य तर कोठल्याच देशात खरे झाले नाही. ज्या दिवशी त्याने ते वर्तविले त्या दिवसापासूनच ते खोटे ठरू लागले. किंबहुना त्याच्याआधीच कालप्रवाह बदलू लागला होता. मार्क्सला त्याचे ज्ञान झाले नाही एवढेच.

मध्यमवर्ग व राष्ट्रनिष्ठा यांच्याविषयीचा भविष्याच्या असाच प्रकार झाला. राष्ट्रनिष्ठा ही धर्माप्रमाणेच अफू आहे असे मार्क्सचे मत होते. धर्माप्रमाणेच तेही तत्त्वज्ञान कामगारांना झुलविण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी निर्माण केले आहे, कामगारांना मातृभूमी, पितृभूमी, यांचे सोयरसुतक काही नाही, कामगार हा जगाचा नागरिक आहे, जगातील सर्व कामगार एक आहेत, जाती, धर्मपंथ, राष्ट्र हे भेद ते मानीत नाहीत, असे मार्क्स म्हणत असे. त्याचे अनुयायी अजूनही म्हणतात. (त्यांना तसे म्हणत राहिलेच पाहिजे.) राष्ट्रनिष्ठा ही कामगारांना त्याज्य असल्यामुळेच मार्क्सने त्यांची जी संस्था स्थापिली तिचे नाव 'फर्स्ट इंटरनॅशनल'–'आंतरराष्ट्रीय सभा'–असे ठेविले. ती मोडल्यावर १८८९ साली दुसरी स्थापन झाली तिचे नावहि तसेच–'दुसरी आंतरराष्ट्रीय सभा' असे ठेविले आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी की क्रांतीनंतर रशिया पक्का राष्ट्रवादी झाल्यानंतर एकराष्ट्रीय समाजवादाची स्टॅलिनने घोषणा केल्यानंतर तिसऱ्या सभेचे नावही 'थर्ड इंटरनॅशनल' असेच राहिले. रशियाच्या दृष्टीने ते युक्तच होते. कारण जो सोव्हिएट रशियाशी एकनिष्ठ तोच खरा आंतरराष्ट्रवादी अशी व्हिशिन्स्किसारखे कम्युनिस्ट व्याख्या करतात. तरी जगातल्या सर्व देशातले कामगारनेते–हिंदुस्थानातले सुद्धा–अगदी वारकऱ्याच्या भक्तिभावाने या सोव्हिएट रशियांकित, रशियानिष्ठ अशा आंतरराष्ट्रीय सभेला उपस्थित राहतात. असो, एवढे खरे की राष्ट्र ही कल्पनाच पुढच्या काळात नष्ट होईल हे मार्क्सचे भविष्य क्रांतीच्या भविष्याइतकेच खोटे ठरले, हे पुन्हा एकदा सोव्हिएट रशियाने सिद्ध केले.

विद्याजीवी किंवा बुद्धिजीवी मध्यमवर्गावर मार्क्सवादाचा फार कटाक्ष. हे लोक म्हणजे कामगारक्रांतीचे कट्टे शत्रू, भांडवलदारांचे गुलाम आणि प्रस्थापित सरकारचे लाचार दास होत, असे कम्युनिस्टांनी अनेक वेळा म्हटले आहे. भांडवलदार व कामगार यांहून इतर सर्व वर्ग नष्ट होणार असे मार्क्सचे भविष्य असल्याचे वर सांगितलेच आहे. अर्थात् मध्यमवर्गही नष्ट होणारच !

पण मार्क्सच्या या शापवाणीतून हा वर्ग सहीसलामत सुटला एवढेच नव्हे तर ज्या काळात त्याचा मार्क्सवादाच्या मते नष्टांश व्हावयाचा होता त्याच काळात तो अत्यंत प्रभावी झाला, व जगातल्या अधिराज्याची सूत्रे त्याने आपल्या हाती घेतली. १८५० ते १९५० या शतकाचा इतिहास पाहिला तर पाश्चात्त्य देशातच नव्हे तर हिंदुस्थान, चीन, जपान, तुर्कस्थान, इजिप्त, इ. मागासलेल्या देशांतसुद्धा विद्याजीवी मध्यमवर्गानेच सर्वत्र विज्ञानाचे, लोकशाहीचे व राष्ट्रनिष्ठेचे युग निर्माण केले आहे असे दिसून येईल. रानडे, विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक, रवींद्रनाथ, जगदीशचंद्र, विवेकानंद, बिपिनचंद्र, अरविंद, लाला लजपतराय, महात्माजी, विठ्ठलभाई, वल्लभभाई हे सर्व विद्याजीवी पुरुष होते. अशीच परंपरा इतर देशांत गेल्या शतकात निर्माण झाली आणि तिने आपल्या देशात वर्चस्व प्रस्थापित केले. धन हे जसे एक सामर्थ्य आहे तसेच विद्या व चारित्र्य हेही एक सामर्थ्य आहे. ते धनशक्तीवरही मात करू शकते हे इतिहासाने अनेक वेळा दाखविले आहे. मार्क्सला व कम्युनिस्टांना हे जाणण्याची कुवत नाही, कारण अर्थशक्तीवाचून दुसरी स्वतंत्र बौद्धिक शक्ती असूच शकत नाही या तत्त्वाचे ते गुलाम आहेत. म्हणूनच मार्क्सची भविष्ये फलज्योतिषाइतकीसुद्धा खरी ठरली नाहीत. मार्क्स लिहीत होता, त्याच वेळी मागासलेल्या जगात – जपान, चीन, हिंदुस्थान या देशांत-पाश्चात्त्य विद्येचा प्रसार होऊन हा विद्याजीवी वर्ग निर्माण होत होता, इतकेच नव्हे तर आपला प्रभाव दाखवू लागला होता. पण भविष्य जाणणाऱ्या मार्क्सला हे वर्तमानही कळले नाही !

मार्क्सच्या सर्व भविष्यात विशेष कौतुक एका भविष्याचे होते. ते म्हणजे पहिल्या महायुद्धाविषयीचे त्याचे भविष्य. १८७० साली, पुढे (कधी ?) जर्मनी व रशिया यांच्यात युद्ध होईल, असे त्याने एका मित्राला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते. १८८८ साली एंगल्सनेही जागतिक महायुद्धाचे भविष्य वर्तविले होते.

हे पहिल्या जागतिक महायुद्धाचे भविष्य हा शुद्ध भोंगळपणा आहे. पहिली गोष्ट अशी की मार्क्स व एंगल्स हे आपल्या भविष्याचा काळ कधीच देत नाहीत. गणितशास्त्राइतक्या अचूक असणाऱ्या शास्त्रात काळ कधीच सांगितलेला नसतो हे लक्षात ठेवले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे या युद्धाची मार्क्स-

वादी लोकांनी दिलेली कारणमीमांसा. दोन राष्ट्रे आपापली साम्राज्ये वाढविण्याची खटपट करणार आणि त्यातून संघर्ष निर्माण होऊन युद्ध होणार अशी, मार्क्सवादाची कारणमीमांसा आहे. तीअन्वये अमेरिका व ब्रिटन यांच्यात युद्ध अटळ आहे असे अनेक कम्युनिस्टांनी भविष्य सांगितले होते. पण ते अजूनही घडलेले नाही व पुढे घडण्याची सध्या तरी चिन्हे नाहीत. आणि त्या कारणाने पाहिले तर जर्मनी व रशिया यांच्यात युद्ध मुळीच व्हावयास नको होते. कारण या दोन देशांच्या साम्राज्यविस्ताराचा संघर्ष कोठे आलाच नव्हता. इतकेच नव्हे तर काही पंडितांच्या मते जर्मनी व ब्रिटन यांचाही साम्राज्यासाठी संघर्ष येण्याचे कारण नव्हते. कारण १९१४ साली जर्मनी अतिशय भरभराटीच्या अवस्थेत होता. आणि त्याला विकसण्यास पुष्कळ क्षेत्र मोकळे होते. व्यापाराचा व भांडवलशाहीचा विस्तार होत नाही, माल खपत नाही, धन मिळत नाही, त्यामुळे दारिद्र्य येत चालले आहे, कुचंबणा झाली आहे असा प्रसंग जर्मनीवर १९१४ साली मुळीच आलेला नव्हता. दुसरे असे की त्या वेळी फ्रान्स, जपान, ही राष्ट्रेही भांडवली क्षेत्रात येत होती. ब्रिटनशी साम्राज्यासाठी म्हणजे बाजारपेठेसाठी संघर्ष यावयाचा तर तो त्यांचा येणे अवश्य होते. पण ते तर त्या वेळी ब्रिटनच्या बाजूचे दोस्त होते. म्हणजे आर्थिक परिस्थिति किंवा अर्थसंबंध हा जो भविष्याचा मूलाधार त्याअन्वयेही भविष्ये खरी होतच नाहीत. पण मार्क्सच्या या भविष्याचे खरे दारिद्र्य पुढेच आहे. युद्ध होईल हा त्यातला पूर्वार्ध आहे. त्या युद्धाचा जो परिणाम तो भविष्यातला महत्त्वाचा भाग होय. तो परिणाम म्हणजे भांडवलशाहीचा नाश, कामगारांचा विजय व कामगारांच्या दंडसत्तेची प्रस्थापना. यांचा तर कोठे मागमूसही दिसत नाही. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटली, तुर्कस्थान, इजिप्त, इराक, इराण, सिरिया, या अनेक देशांत पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात भयानक उलथापालथी झाल्या पण कामगारांची दंडसत्ता कोठेही प्रस्थापित झाली नाही. रशियात तशी झाली असे ४-५ वर्षांपूर्वीपर्यंत कम्युनिस्ट म्हणत. पण स्टॅलिन हा केवळ सुलतान होता असे आता क्रुश्चेव्हनेच सांगून टाकले आहे. क्रुश्चेव्हसारखे लोकही त्याच्यापुढे लाचार झाले होते असे तेच म्हणतात, मग कामगारांचे काय झाले असेल ते सांगणे नकोच. तेव्हा रशियात कामगारसत्ता तर नाहीच पण अत्यंत भयंकर अशी सुलतानशाही व साम्राज्यशाही आहे.

पूर्वी भांडवली राज्ये असत. आता कम्मुनिस्ट साम्राज्ये निर्माण होऊ लागली आहेत. हंगेरी, पोलंड, बल्गेरिया, लॅटव्हिया इ. देशांवर रशियाचे साम्राज्य आहे. तिबेट, मांचूरिया इ. देशांवर चीनचे आहे. कामगारसत्ता कोठेच नाही.

कार्ल मार्क्स व एंगल्स हे जे आद्य भाई, त्यांनी वर्तविलेल्या अनेक भविष्यांचा येथवर आपण विचार केला. त्यांच्या अनुयायांच्या मताने ती जरी खडान् खडा बरोबर आली असली तरी प्रत्यक्ष इतिहासात पाहता ती कुडमुड्या ज्योतिष्यापेक्षा काही निराळी नाहीत असे दिसते. पण याहून निराळे काही होणे शक्य नव्हते व नाही. कारण अर्थसंबंधामुळे मानवी संस्कृती निश्चित होते हे जे त्याचे आधारभूत तत्त्व तेच मुळी भ्रामक व अशास्त्रीय आहे. ते कसे ते थोडक्यात पहावयाचे आहे. पण त्याच्याआधी या भविष्याकडे निराळ्या दृष्टिकोनातून पहाणारे मार्क्सचे अनुयायी आहेत. त्यांच्या मतांचा परामर्श घेऊन नंतर वरील विचार पाहू व समारोप करू.

(डॉ. फ्रिट्झ् स्टर्नबर्ग या पंडिताचा 'कॅपिटॅलिझम् अँड सोशॅलिझम् ऑन् ट्रायल' या नावाचा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. स्वित्झरलंडमधील एक इतिहासकार हर्बर्ट लूथी याने त्याचे 'क्वेस्ट' या त्रैमासिकाच्या जानेवारी-मार्च १९५९ च्या अंकात परीक्षण करून काही विवेचन केले आहे. पुढील विवेचनाच्या अधिक अभ्यासासाठी जिज्ञासूंनी ते परीक्षण पहावे. पुढील विचार मी लूथीच्या आधारे मांडले आहेत.)

स्टर्नबर्गसारख्या अनेक मार्क्सवादी पंडितांना मार्क्सची भविष्ये चुकली असे वाटते. पण त्यांना मार्क्सचे ऐतिहासिक जडवादाचे शास्त्र व भविष्यकथनाची पद्धत चुकली असे वाटत नाही. आणि भविष्ये चुकली हे मान्य असले तरी तसे ते म्हणत नाहीत. ते 'डेव्हिएशन' किंवा 'वक्रीभवन' असा शब्द वापरतात. शनि-मंगळादिकांच्या गती देताना पंचांगात कोठे कोठे वक्री शनिः, वक्री गुरुः, असे दिलेले असते, व नंतर काही दिवसांनी मार्गी शनिः, मार्गी गुरुः असे म्हटलेले असते. याचा अर्थ असा की शनि-गुरू यांचे मार्ग निश्चित ठरलेले आहेत. पण मध्येच ते हे मार्ग टाकून जरा वाकडे जातात. पण काही झाले तरी पुन्हा मार्गावर येतातच. त्याचे हे जे अल्पकाळ मार्ग सोडून जाणे त्याला वक्रीभवन असे म्हणतात. तसाच प्रकार मार्क्सने ज्यांची गती वर्तविली त्या

देशांचा आहे. ते थोडा वेळ त्याने आखून दिलेल्या मार्गापासून च्युत झाले पण अल्पकाळातच पुन्हा मार्गावर आले. हा अल्पकाळ म्हणजे शंभर वर्षांचा होय. येथे आपण लक्षात ठेवले पाहिजे की प्रारंभापासूनच हे देश वक्री चालू लागले आहेत. स्टर्नबर्गच्या पुस्तकात गेल्या शंभर वर्षांच्या इतिहासाची मीमांसा आहे. मार्क्सने भविष्य वर्तविल्याला इतकीच वर्षे झाली आहेत. म्हणजे आतापर्यंत या देशांचा अधिकांश प्रवास वक्रीच झालेला आहे, हे या पंडितांनाही मान्य आहे. पण मूळ शास्त्र चुकले असे त्यांना वाटत नाही. म्हणून त्यांच्या ग्रंथात हे वक्रीभवन का झाले ते सांगण्यावर व मार्क्स कसा चुकला नाही ते दाखविण्यावर भर असतो.

मार्क्स लेखन करीत होता त्याच वेळी त्यांच्या मते भांडवलशाही परिपक्व झाली होती. एका बाजूला अफाट संपत्ती व दुसऱ्या बाजूला दारिद्र्याचा नरक अशी तीव्र विषमता त्याच वेळी झाली होती. यालाच भांडवलशाहीचा अंगभूत विरोध, अंतर्विरोध असे म्हणतात. आता हा अंतर्विरोध तीव्र झाला म्हणजे भांडवलशाहीचा नाश ठेवलेलाच आहे, असा मार्क्सचा सिद्धान्त आहे. असे असताना भांडवलशाहीला आणखी शंभर वर्षे जीवदान कसे मिळाले, मार्क्सने आखून दिलेल्या विनाशाच्या मार्गाने ती का गेली नाही? उलट तिचा उत्कर्षच का झाला? असा प्रश्न येतो.

साम्राज्यशाही, साम्राज्यविस्तार, वसाहतवाद हे त्याचे उत्तर आहे. भांडवलशाहीचा अंत होणारच होता. पण तिने याच सुमारास साम्राज्यवादाचा आश्रय केला. वसाहती जिंकल्या. या वसाहतींतून व जित देशांतून धनाचे ओघ भांडवली देशात येऊ लागले म्हणून कामगारांना भांडवलशहा जरा बरा पगार देऊ शकले. त्यामुळे त्यांचा तीव्र संतापाग्नी जरा शमला आणि आजचे मरण उद्यावर गेले. पण इतकेच. ते टळले असे मात्र नाही. साम्राज्यशाही हे भांडवलशाहीचे परिणत रूप होय असा लेनिनने सिद्धान्त सांगितला आणि त्यामुळेच हे 'डेव्हिएशन', हे वक्रीभ्रवन, झाले असा विचार त्याने मांडला. स्टर्नबर्गने भांडवली देशांच्या मार्गच्युतीचे कारण साम्राज्यशाही हेच दिले आहे. पण त्याचे विवेचन जरा निराळे आहे. तो म्हणतो की मार्क्सने विचार मांडला तो शुद्ध भांडवली अर्थसंबंधाचा. इतर सामाजिक घटक त्याने लक्षात घेतलेच नाहीत. तेव्हा जगात प्रत्येक देशात जेव्हा पूर्ण भांडवलशाही

परिपक्व होईल तेव्हा त्याचे भविष्य खरे ठरणार. तोपर्यंत नाही. आतापर्यंत वक्रीभवन झाले ते यामुळेच. ज्या परिस्थितीत मार्क्सचे भविष्य खरे ठरावयाचे ती परिस्थिती आलेलीच नाही. त्याला तो काय करणार ?

मार्क्सचे भविष्य फसण्याचे साम्राज्यशाही हे जे कारण त्याचे अनुयायी देतात ते पाहून मोठा अचंबा वाटतो. मार्क्स ग्रंथ लिहीत असतानाच साम्राज्यशाही विस्तारत होती. इंग्रजांनी हिंदुस्थान जिकला होता. चीनवर युरोपीयांचे आक्रमण झाले होते. याचा काहीहि उमग मार्क्सला झाला नाही ? चालू अर्थसंबंध पाहून पुढे काय घटना घडणार, युद्धे कोणात होणार, क्रांती प्रथम कोणच्या देशात होणार, हे ज्याला सांगता येते त्याला परिणत होत चाललेली भांडवलशाहीची पुढची अवस्था जी साम्राज्यशाही तिचे रूप जाणता येऊ नये, आणि त्यामुळे त्याचे भविष्य चुकावे हे त्याच्या भविष्यज्ञानाचे द्योतकच ठरते काय ? आणि ज्या ऐतिहासिक जडवादाच्या आधारावर हे सांगावयाचे त्याच्या जनकानेच इतके अज्ञान दर्शविल्यावर त्या जडवादाला अजूनही गणितासारखे सत्यशास्त्रच समजावयाचे काय ? आणि साम्राज्यशाहीचा विस्तार डोळ्याने पाहून लेनिनने जे भविष्य सांगितले त्याचे तरी काय झाले ? पहिले महायुद्ध झाले, दुसरे झाले तरी त्यातून निर्माण होणारी कामगारसत्ता अजून जन्मालाही आलेली नाही. स्टर्नबर्गच्या मते लेनिनला मार्क्सवादाचे व साम्राज्यशाहीचे मर्म कळले नव्हते. स्वकालीन युरोपातील भांडवलशाहीचे सामर्थ्य त्याला मुळीच आकळता आले नाही. कामगार कमालीचे दरिद्री झाले आहेत, स्वतःच्या संतापाग्नीत भांडवलशाहीचा बळी देण्यास ते अगदी सिद्ध आहेत असे त्याला वाटले. हा त्याचा फार मोठा भ्रम होता. त्याला सत्यज्ञान झाले असते तर त्याने रशियात 'ऑक्टोबर-क्रांती' केलीच नसती. आणि स्टर्नबर्गच्या मते झाली ती समाजवादी क्रांती मुळीच नाही. पण ते काही असले तरी स्वतः स्टर्नबर्गच्या स्पष्टीकरणात तरी काय अर्थ आहे ? वर सांगितल्याप्रमाणे ती मार्गी झाल्याची कसलीही चिन्हे अजून तरी दिसत नाहीत.

मार्क्सने वर्तविलेली भविष्ये कोणची, त्यांचे स्वरूप काय, ती कितपत सत्य ठरली आणि त्याचे अनुयायी त्याच्या सत्यासत्यतेचे समर्थन कसे करतात ते येथेवर आपण पाहिले. आता त्याच्या भविष्यकथनाला शास्त्राचे रूप येण्या-

ऐवजी वर दर्शविल्याप्रमाणे पुराणाचे रूप का आले त्याचा विचार करावयाचा आहे.

ज्या ऐतिहासिक जडवादाच्या आधाराने ही भविष्ये वर्तविली जातात त्यांतच वरील अपयशाचे कारण आपणांस सापडेल. मानवी मन, मानवाची बुद्धी, प्रज्ञा ही केवळ त्याच्या काळच्या अर्थसंबंधामुळेच निश्चित होत असते, मानवी बुद्धी अर्थोत्पादन-साधनांमुळे सर्वस्वी नियंत्रित होत असते हा जो जडवादाचा सिद्धान्त तो अगदी भ्रामक आहे. मानवी मनाची घडण अनेक घटकांमुळे होत असते. अनुवंश, धर्मसंस्कार, राष्ट्रनिष्ठा, शिक्षण, भूगोल, इतर परिस्थिती, समाजाच्या व घराण्याच्या परंपरा, मानवाच्या वासना इ. अनेक कारणांनी तिचे रूप निश्चित होत असते. आणि त्यातही महत्त्वाची गोष्ट अशी की यातील कोणचे कारण कमीजास्त प्रभावी ठरेल हे सांगता येत नाही. कोणचेही ठरेल, कोणचेहि अजिवात कारणरूप होणार नाही, आणि आज धर्मसंस्कार महत्त्वाचे ठरतील तर उद्या काममोह निर्णायक ठरेल. मानवी मन स्वतंत्र आहे म्हणतात ते याच अर्थाने. वरील सर्व घटकांतून ते निर्माण होते हे खरे पण कोणच्या घटकाचे प्रमाण किती, कोणाचा प्रभाव किती आणि कोणच्या वेळी, कोणच्या प्रसंगी किती हे काहीही निश्चित सांगता येत नाही. म्हणूनच या सर्व घटकांपलीकडे व्यक्तीचे ‘स्व’ म्हणून काही निराळे आहे आणि त्याच्या तंत्राप्रमाणे हे घडत असते असे शास्त्रज्ञ सांगतात. मानवी बुद्धी स्वतंत्र आहे याचा अर्थ असा आहे. मार्क्सने हे सर्वच अमान्य केले आहे. मानवी बुद्धी केवळ अर्थसाधनांनी नियंत्रित आहे असे तो म्हणतो. आणि ती सुद्धा इतकी की तिच्यावर याचे केव्हा कोठे व कसे परिणाम होतील हे निश्चित सांगता येते असे त्याच्या ऐतिहासिक जडवादाचे तात्पर्य आहे. अध्यात्मशास्त्रात ‘बुद्धिः कर्मानुसारिणी’ असे तत्त्व आहे. माणूस मागल्या जन्मीच्या कर्माने बद्ध असतो. त्याचे सर्व भवितव्य त्यामुळे ठरत असते. तो काही निराळे करू म्हणेल पण तशी बुद्धी होणे त्याच्या हातचे नाही. तीही पूर्वकर्मांनी बद्ध असते, असे हे तत्त्व आहे. मार्क्सचे जडवादाचे तत्त्व असेच आहे. पूर्वकर्माऐवजी अर्थसंबंध असा शब्द घातला की झाले. म्हणजे मार्क्सने मानवी मनाच्या घडणीत अनुवंश, परंपरा इ. घटकांचा विचार केला नाही. केवळ अर्थसाधनांमुळेच ते नियंत्रित असते असे मानले हे

एक आणि ते सर्वस्वी नियंत्रित मानले, त्याची स्वतंत्रता अगदी अमान्य केली हे दुसरे. या गृहीतांवर त्याने आपली भविष्ये उभारली असल्यामुळे ती पूर्ण उभी राहण्याच्या आधीच कोसळू लागली.

मार्क्सने धर्म, अनुवंश इ. इतर घटनांचा विचार केला नाही, आणि मानवी बुद्धी तो सर्वस्वी परतंत्र मानतो असे कोणी म्हटले तर त्याच्यावर अत्यंत संतापण्याची मार्क्सवादी लोकांची चाल आहे. हा मार्क्समताचा विपर्यास आहे, तुम्हाला मार्क्सवाद कळला नाही, तुम्ही भांडवलशाहीचे हुजरे आहात असे भाषण ते एकदम म्हणू लागतात. (भांडवलशाहीचे हुजरे ही मार्क्सवादातली अत्यंत लाडकी शिवी आहे. प्रत्येक कम्युनिस्टाला ती एकदा तरी म्हणावीच लागते.) पण वस्तुस्थिती तशीच आहे. याविषयी फ्रेडरिक एंगल्सने केलेले विवेचन पुढे देतो. त्यावरून वाचकांना स्वतः निर्णय करता येईल.

"केवळ आर्थिक स्थिती हीच मानवी भवितव्याची निर्णायक आहे, असा आमच्या प्रतिपादनातून काही लोक जो भावार्थ काढतात त्याला अंशतः आम्हीच (मार्क्स व मी) जबाबदार आहो" असे एंगल्सने एके ठिकाणी म्हटले आहे. (जे. ब्लॉक याला एंगल्सचे पत्र, २१–९–१८९०) याचे कारण देताना तो म्हणतो, "आर्थिक घटक अमान्य करणाऱ्या प्रतिपक्षीयांना आम्हांला खोडून काढावयाचे होते. त्यामुळे आम्ही त्याच्यावरच भर दिला आणि इतर घटकांचे महत्त्व सांगण्यास आम्हांला वेळ आणि संधी नेहमी मिळेच असे नाही." एंगल्सच्या या म्हणण्याचा कोणालाही विस्मय वाटेल. नवे शास्त्र निर्माण करणारे हे दोन तत्त्ववेत्ते यांना चाळीस वर्षात अर्थेतर घटकांचे महत्त्व वाटत असूनही त्यांचे विवरण करण्यास वेळ मिळाला नाही! पण त्यांना महत्त्व वाटत नव्हते हेच खरे आहे. याच पत्रात आरंभी परंपरा, अनुवंश, धर्म इ. घटकांचे महत्त्व सांगताना दर वेळी एंगल्स म्हणतो की त्यांचे महत्त्व आहेच, ते नाकारणे हास्यास्पद आहे, पण त्यांना निर्णायक सामर्थ्य नाही. निरनिराळ्या शक्तींमुळे घटना घडतात हे खरे. पण अंतिम फल आर्थिक शक्तीनेच निर्णित व्हावयाचे आणि हे दर वेळी! अंतिम निर्णय घडविण्याचे सामर्थ्य इतर घटकांना केव्हाही नाही. आता इतर घटक केवळ अलंकाराप्रमाणे होत असा याचा अर्थ नव्हे काय? पण याहीपेक्षा आणखी एका पत्रात एंगल्सने जे विवरण केले आहे त्यावरून त्याच्या मनातील भाव अगदी स्पष्ट होईल. तो म्हणतो," धार्मिक,

राजकीय, वाङ्मयीन इ. सर्व घटक महत्त्वाचे आहेतच. आर्थिक घटकांवरही त्यांचे परिणाम घडतात. आणि या दृष्टीने मानव स्वतंत्र आहे, तो स्वतःचा इतिहास स्वतःच घडवितो हे खरे; तरी आर्थिक घटक हेच निर्णायक ठरतात. माणसाचे कर्तृत्व त्यांच्या आधीन असते. (असे ते स्वतंत्र आहे!)" हे सांगून एंगल्सने पुढे ऐतिहासिक आवश्यकतेचे विवरण केले आहे. मार्क्सवादाचे मत असे की इतिहासाच्या विशिष्ट आर्थिक परिस्थितीत अर्थसाधनांच्या विकासाची आवश्यकता निर्माण होते. व्यापाराची प्रगती होईनाशी झाली की सर्व सरंजामदार नाहीसे करून टाकून एकछत्री सत्ता स्थापन होण्याची आवश्यकता निर्माण होते. आणि त्या वेळी नेपोलियन किंवा तत्सम पुरुष निर्माण होतोच. भांडवलदारांना गिरणीकारखान्यात पुरेसे मजूर पाहिजेत. पण शेतीवरच्या कुळांना शेती सोडून जाण्याचे स्वातंत्र्य नव्हते. पण भांडवलासाठी मजुरांची आवश्यकता निर्माण होताच व्यक्तिस्वातंत्र्याचा पुकारा करणारा तत्त्ववेत्ता ब्लॉक, नंतर रूसो, नंतर व्होल्टेर हे निर्माण झालेच पाहिजेत. शास्त्रज्ञ, कवी, तत्त्ववेत्ते यांना आपण महापुरुष म्हणतो. पण मार्क्सवादी लोक त्यांना तथाकथित महापुरुष म्हणतात. वाफ, वीज, यंत्र, यांची अर्थविकासाला आवश्यकता निर्माण झाली की त्यांचा शोध लावणारा शास्त्रज्ञ निर्माण झालाच पाहिजे. आणि त्याने तेच कार्य केले पाहिजे; दुसरे त्याच्या हातून होणार नाही. असेच कवी, धर्मवेत्ता, तत्त्ववेत्ता यांचे आहे. अर्थसाधनांच्या प्रगतीला शिवाजी, रामदास, क्रॉमवेल, विवेकानंद, कार्ल मार्क्स, लेनिन यांची गरज लागली की ते जन्म घेतात आणि जरूर तेच कार्य करण्याची, तत्त्वज्ञान सांगण्याची बुद्धी त्यांना होते. इतर होणार नाही. नेपोलियनचे उदाहरण सांगून एंगल्स म्हणतो की, एखादे वेळी असा नेपोलियन जन्माला येऊनही काही अपघाताने तो मरेल हे शक्य आहे. पण तो मेला तर दुसरा निश्चित निर्माण होईल व इतिहासनियत कार्य करून जाईल. इतिहासात प्रत्येक वेळी असा मनुष्य निर्माण झाला आहे असे दिसते. (एंगल्सचे स्टार्कनबर्ग यास पत्र : २५–१–१८९४).

मार्क्सवाद अर्थेतर घटकांचा विचार किती करतो, त्यांना महत्त्व किती देतो आणि पुरुषबुद्धीला त्याच्या मते किती स्वातंत्र्य आहे हे यावरून कळून येईल आणि मार्क्सवाद स्वतःला जडवादी म्हणवीत असला तरी तो पूर्ण अध्यात्मवादी

आहे असे अनेक टीकाकार का म्हणतात तेही कळून येईल. भूमीला दुष्टांचा भार झाला म्हणजे परमात्मा अवतार घेतो असे म्हणणारे गोपाळभट वा गोविंदभट आणि अर्थविकास अडून राहताच तो पुढे चालू करून देणारा शास्त्रज्ञ वा तत्त्ववेत्ता निर्माण होतोच असे म्हणणारे मार्क्सभट वा एंगल्सभट यांच्यात कसलाही फरक नाही. अर्थविकास अडून राहिला आहे हे जाणणे व त्यावर उपाय योजून शास्त्रज्ञ वा तत्त्ववेत्ता जन्माला आणणे हे मानवेतर दैवी चित्-शक्तीचे कार्य आहे; ती चित्शक्ती न मानणे म्हणजे जडवाद. पण ती नाही तर हे कार्य कसे होते या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. 'ऐतिहासिक आवश्यकता — हिस्टॉरिकल नेसेसिटी – हे मार्क्सचे उत्तर आहे. याचा अर्थ इतकाच की त्याने परमेश्वराचे नाव बदलले आहे. कोणी सत्य म्हणतात, कोणी सत्यदेव म्हणतात; कोणी हिस्टॉरिकल नेसेसिटी म्हणतात. पण भटजीपणात यामुळे फरक होत नाही. एंगल्सच्या इतिहासवाचनातही तोच भटजीपणा, तीच पुराणवृत्ती दिसून येते. आवश्यकता निर्माण झाली की योग्य तो पुरुष अवतरतोच असे इतिहासाने सिद्ध होते असे तो म्हणतो ! कोणचा इतिहास त्याने वाचला होता ? स्पेन व पोलंड या देशांत १४ व्या १५ व्या शतकांत इंग्लंडसारखी प्रगती दिसू लागली होती. पण अंध धर्मकल्पनांच्या वर्चस्वा-मुळे ते देश चारशे वर्षे कुजत पडले. त्या वेळी अर्थविकासाची, औद्योगिक क्रांती होण्याची तेथे आवश्यकता नव्हती काय ? १८५४ च्या आधी शेकडो कवाडे बंद करून जपान स्वस्थ पडला होता. त्या काळात यादवी चाल वर्षे होती. अर्थव्यवस्था कुजून गेली होती. तेथे विकासाची आवश्यकता नव्हती काय ? महाराष्ट्र, बंगाल, गुजराथ इ. हिंदुस्थानातील प्रांतांची इंग्रज येण्यापूर्वी सहाशेसातशे वर्षे अर्थव्यवस्था काय होती ? कृषी, वाणिज्य कोणच्या हीन स्थितीला गेले होते ? अर्थसंबंधाचा विकास करणारे पुरुष तेथे का निर्माण झाले नाहीत ? महाराष्ट्रांत स्वराज्य आले तरी व्यापार वाढला नाही. कृषिसुधारणा झाली नाही. त्या वेळी ऐतिहासिक आवश्यकता काय करीत होती ?

अशी शेकडो उदाहरणे देता येतील. पण आपल्याला अनुकूल तेवढाच इतिहास वाचण्याची मार्क्सवाद्यांची पद्धत आहे. त्यांना त्यांचा काय उपयोग ? आपल्याकडच्या समुद्रगुप्त, चंद्रगुप्त, पुलकेशी, हर्ष यांच्या एकछत्री साम्राज्याची

मीमांसा करताना इकडील कम्यनिस्ट भटजी म्हणतात, "राजन्य वर्ग आपसात सारखा लढत राहिल्यामुळे कृषी, शिल्प, वाणिज्य इ. व्यवसायांना भरभराट येत नव्हती. एकछत्री साम्राज्याची त्याकरिता आवश्यकता उत्पन्न झाली." ही खरोखर आसुरी मीमांसा आहे ! कृषी, वाणिज्य यांची भरभराट न झाली तरी चालेल असा एखादा कालखंड असतो काय ? एकछत्री साम्राज्य नसले की सरदार, सरंजाम तर नित्य लढत राहणारच. त्यामुळे शेती, व्यापार यांचा ऱ्हास होणारच. तेव्हा त्यांच्या भरभराटीसाठी एकछत्री साम्राज्य नेहमीच अवश्य आहे. पण या कम्युनिस्ट भटजीबोवांच्या मते विशिष्ट कालीच ती आवश्यकता निर्माण होते. म्हणजे शेती, व्यापार यांचे वाटोळे झाले तरी चालेल असा कालखंड ते मनाने कल्पू शकतात. याच त्यांच्या वृत्तीला अनुसरून सिडने हूक याने, ही भयानक राक्षसी वृत्ती आहे, असे म्हटले आहे. आणि इतका दुष्टपणाचा आरोप ज्यांना करावासा वाटत नाही ते टीकाकार त्यांना आध्यात्मिक वृत्तीचे, अंधश्रद्ध किंवा भटजीबोवा म्हणतात. मॅक्स ईस्टमन हा अमेरिकन टीकाकार हेच म्हणाला : "जगाच्या विकासाची आपल्या मनातली योजना ही विश्वरचनेतच अंतर्भूत आहे आणि सृष्टीचे गूढ नियम हे आपण मानलेल्या ध्येयाच्या सिद्धतेसाठी प्रयत्नशील झाले आहेत असे मानणे हे भोळ्या धर्मश्रद्धेचे लक्षण होय."

माणूस पूर्वकर्माने बद्ध असतो असे अध्यात्मवादी लोक मानतात. पण त्यांनीही माणूस त्रिगुणांच्या पलीकडे गेला म्हणजे कर्मबंध तुटून पडतात असे मानले आहे. म्हणजे काही दृष्टींनी तरी मानव स्वतंत्र आहे. मार्क्सने तेही स्वातंत्र्य मानवाला दिलेले नाही. अर्थसाधनांनी मागणी केली की त्याने जन्माला आलेच पाहिजे व नियत कार्य केलेच पाहिजे. मध्येच तो मेला तर दुसरा निर्माण होईल असे मार्क्सवादी म्हणतात. त्यावरून निदान मरण्याचे स्वातंत्र्य त्याला आहे असे दिसते. आवश्यकता निर्माण होताच माणूस निर्माण होतो म्हणून महापुरुष हा केवळ तथाकथित, नाममात्र महापुरुष होय असे मार्क्सचे मत होते आणि त्याच्या शास्त्रीय समाजवादातील सर्व अशास्त्रीयता यातच आहे. महापुरुष असा हुकमी निर्माण झाला असता तर जगाला आणखी काय हवे होते ? शिवछत्रपती महाराष्ट्रांत निर्माण झाले त्याच्याआधी शेकडो वर्षे बंगाल, पंजाब, सिंध येथे त्यांची आवश्यकता होती.

पण ते अवतरले नाहीत. वायक्लिफ, लूथर, गॅलिलिओ, न्यूटन, बेकन, जॉन हस, लॉक्, रूसो यांच्यासारखे पुरुष भारतात निर्माण झाले असते तर धर्म-स्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, विज्ञान, लोकसत्ता ही तत्त्वे येथे उदयास येऊन ही भूमि बलाढ्य झाली असती. येथल्या अर्थसाधनांच्या विकासाला त्यांची निश्चित आवश्यकता होती. आठव्या शतकात आरबांनी स्पेन जिंकला आणि त्याच वेळी फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड इकडे त्यांनी मोहरा वळविला होता, पण चार्ल्स मार्टलने त्यांचा पराभव करून त्यांच्या आक्रमणास कायमचा पायबंद घातला. हे टळले ते चार्ल्स मार्टलमुळे; तो नसता तर पश्चिम युरोप आज रूमानिया, बल्गेरिया, इजिप्त, यांच्यासारखाच झाला असता. स्पेन तसा झालाच. मार्टलची फ्रान्स, जर्मनीतच आवश्यकता होती आणि या इतर देशांत नव्हती काय ? पण तो झाला नाही; आणि महापुरुष असे हुकमी निर्माण होतच नाहीत. म्हणून तर मानवाचे भवितव्य सर्व अनिश्चित आहे, अज्ञात आहे. मार्क्सवादाला नेमके हेच कळत नाही.

मार्क्सची भविष्यकल्पना काय आहे, त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी कोणची भविष्ये सांगितली, ती कितपत खरी ठरली, त्याची त्याच्या अनुयायांत पुढील काळात काय प्रतिक्रिया झाली हे सांगून मार्क्सचा भविष्यविचार शास्त्र न ठरता पुराण का ठरला याची येथवर चिकित्सा केली. आता युरोपातल्या दोन थोर पंडितांची या विषयावरची मते सांगून समारोप करतो. 'फ्रीडम् अँड ऑर्गनायझेशन' हा रसेल याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. १८१४ ते १९१४ या शतकातील युरोपीय इतिहासाची त्यात मीमांसा केली आहे. त्याच्या प्रस्तावनेत रसेल म्हणतो, 'या शतकात जी अनेक स्थित्यंतरे झाली त्यांच्या बुडाशी माझ्या मते तीन कारणे आहेत. आर्थिक यंत्रणा, राजकीय तत्त्वज्ञान (राष्ट्रवाद, राजनिष्ठा, समाजवाद इ०) आणि थोर प्रभावी पुरुष. यांतील एकही कारण दुर्लक्षून चालणार नाही. तीनही स्वतंत्र आहेत. एकामुळे दुसरे उद्‌भवले असे कोणाच्याही बाबतीत म्हणता येणार नाही. व्यक्तीला जे महत्त्व त्याचा कार्लाइलने अतिरेक केला. पण आता आपण दुसऱ्या टोकाला जात आहो. माझ्या मते बिस्मार्क नसता तर जर्मनीचा इतिहास बदलला असता. आणि हेच इतर पुरुषांविषयी. याचा अर्थ असा की इतिहास हे शास्त्र नाही. ज्यांचा तसा आग्रह आहे त्यांना सत्या-

पलाप करावा लागतो आणि प्रतिकूल प्रमाणे गाळून टाकावी लागतात--'

एच्. ए. एल्. फिशर हा एक फार मोठा इतिहासपंडित आहे. 'युरोपचा इतिहास' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याने हाच भावार्थ व्यक्त केला आहे. तो म्हणतो, "मी निओलिथिक युगापासून स्टॅलिन-हिटलर-पर्यंत इतिहास दिला आहे. त्यात अनेक स्थित्यंतरे, उलथापालथी यांचे वर्णन आहे. पण एक बौद्धिक दृष्टी दुर्दैवाने मला प्राप्त झालेली नाही. माझ्यापेक्षा जास्त विद्वान् व प्रज्ञावंत पुरुषांना इतिहासात काही सूत्रबद्धता, काही योजना दिसते. पण या सुसंगतीचा अवगम मला झालेला नाही. सागरावर लाटां-मागून लाटा येतात. तशा इतिहासात एकामागून एक घटना घडतात. सर्वांना बांधील असा नियम, असा साधारण सिद्धान्त त्यांत दिसत नाही. मानवाच्या भवितव्याचा विचार करताना अनाकलनीय, आकस्मिक, योगायोगवश असे काही गृहीत धरलेच पाहिजे. मानवाची प्रगती झालीच नाही असे मी म्हणत नाही. पण तो इतिहासाचा नियम नाही."

मानवी इतिहासाचे शास्त्र का होऊ शकत नाही हे यावरून ध्यानात येईल. मानवी मन, त्याची बुद्धी, प्रज्ञा, त्याच्या वासना, यांचे पुरेसे ज्ञान अजून आपल्याला प्राप्त झालेले नाही. आणि जो जो अभ्यास वाढत आहे तो तो हे मन जास्तच गूढ व अनाकलनीय होत चालले आहे. मानवाचे शरीरव्यापारही अजून अज्ञात आहेत आणि एकंदर मानवच अज्ञात आहे असे अलेक्सिस कॅरेलसारखे नोबेल प्राइझ मिळविणारे आयुर्विद्याविशारदही म्हणत आहेत. जडसृष्टीच्या शास्त्रांची निश्चितता सुद्धा गेल्या शतकात होती तितकी आता राहिलेली नाही असे सुलिव्हान ('लिमिटेशन्स् ऑफ सायन्स' या ग्रंथाचे लेखक) सारखे पंडित सांगत आहेत. अशा स्थितीत मानवाच्या घडा-मोडीचे ग्रहज्योतिषाइतके सुनिश्चित शास्त्र कोणी करू पाहील तर त्याला अनेक प्रतिकूल घटना गाळाव्या लागतील, अनेक घटनांचा विपर्यास करावा लागेल, अनेक ठिकाणी असत्याचा आश्रय करावा लागेल. मार्क्सवादाने तसे केले आहे. म्हणूनच ऐतिहासिक जडवाद हे त्याचे शास्त्र ग्रहज्योतिष न होता फलज्योतिष झाले, भविष्यशास्त्र न होता भविष्यपुराण झाले.

# ६. समाजकारणाची बचावती ढाल

‘ रत्नागिरीतील हे सामाजिक मतपरिवर्तन पाहून मी निःशंकपणे सांगतो की येथे घडत असलेली सामाजिक क्रांती खरोखर अपूर्व आहे. रत्नागिरी-सारख्या रेल्वे-टेलिफोनचे तोंड न पाहिलेल्या सोवळचाच्या बालेकिल्ल्यांत अस्पृश्यतेचे उच्चाटन करून आज जन्मजात जातिभेदाचेच उच्चाटन करण्यास तुम्ही सजला आहात, याचा मला इतका आनंद होत आहे की हे पाहण्यास मी जगलो हे ठीक झाले असे मला वाटते. मी कुणाचा भाट होऊ इच्छीत नाही. पण ज्या स्वातंत्र्यवीराने आपल्या अज्ञातवासाच्या अवघ्या सात वर्षांत ही अपूर्व सामाजिक क्रांती घडवून आणली त्या बॅ. सावरकरांचा किती गौरव करूं असे मला झाले आहे. त्यांनी चालविलेली सामाजिक क्रांतीची ही यशस्वी चळवळ पाहून मी इतका प्रसन्न झालो आहे की देवाने माझे उरलेले आयुष्य त्यांसच द्यावे ! कारण माझे अपुरे राहिलेले हेतू पुरवील तर हाच पुरवील असे मला वाटत आहे. ’ कर्मवीर महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांचे हे उद्गार आहेत.

१९३३ सालच्या महाशिवरात्रीच्या दिवशी रत्नागिरीस अस्पृश्यतेचा पुतळा जाहीर समारंभाने जाळण्यांत आला. कर्मवीर शिंदे हे त्या मंगल समा-रंभाचे अध्यक्ष होते. रत्नागिरीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केवळ सात वर्षांत घडवून आणलेली सामाजिक क्रांती पाहून महर्षींचा आत्मा संतुष्ट झाला आणि त्यांनी त्यांच्या कार्याला वरीलप्रमाणे आशीर्वाद दिला.

सावरकरांनी रत्नागिरीस केलेले कार्य खरोखर अभूतपूर्व असेच आहे. भारताच्या इतिहासात पाच हजार वर्षांत अस्पृश्यता व जातिभेद यांचे असे तत्त्वज्ञानपूर्वक उच्चाटन कधीच झाले नव्हते. त्या चळवळीचा इतिहास

वाचताना आजही हे आपण एखादे स्वप्न तर पहात नाही ना, अशी शंका येऊं लागते.

इतक्या दृढपणे आसनस्थ झालेला हा पर्वत, हा रत्नागिरी स्वा. वी. सावरकरांनी हलविला कसा, कोणच्या पुण्याईने त्यांना हे सामर्थ्य प्राप्त झाले हा मोठा विचारणीय प्रश्न आहे. क्रांतिकारक राजकारणांतली सावरकरांची अलौकिक देशसेवा, त्यांनी केलेला त्याग, अंदमानला भोगलेले कष्ट हीच पुण्याई येथे कारणीभूत झाली असावी असे वाटते. पूर्वीच्या काळी ऋषिमुनी अरण्यांत जाऊन बारा बारा वर्षे तपश्चर्या करीत आणि मग त्यांना दिव्य सामर्थ्य प्राप्त होई.

सावरकरांनी अंदमानमध्ये जातिभेदाचा, अस्पृश्यतेचा हा नरकासुर भस्म करून टाकता येईल असे सामर्थ्य आपणांस प्राप्त व्हावे म्हणूनच चवदा वर्षे जणू तप:साधना केली आणि तीतून प्राप्त झालेली अमोघ शक्ती त्यांनी या असुरावर सोडली. अत्यंत अल्पावधीत त्याचे निर्दालन करण्यात त्यांना यश आले त्याचे हेच कारण होय. या संग्रामात त्यांनी इतर आयुधे, इतर शस्त्रास्त्रेही अनेक वापरली यात शंकाच नाही; पण ही अमोघ शक्ती हे त्यांचे प्रधान अस्त्र होय.

ही शक्ती व इतर शस्त्रास्त्रे हाती घेऊन त्यांनी हा संग्राम कसा केला ते आता पाहावयाचे आहे. या संग्रामाची, या युद्धाची ही कथा खरोखरीच मोठी रम्य आहे.

हजारो वर्षे, निदान गेली हजार वर्षे जातिभेद व अस्पृश्यता यांमुळे हा हिंदुसमाज छिन्नविच्छिन्न होत आला आहे. प्राणज्योती नष्ट झाल्यावर एखादे प्रेत जसे सडत जाते, त्याचे अवयव विगलित होतात आणि शेवटी त्या मृत देहाचा कण न् कण फुटून निराळा होऊ लागतो तशी बुद्धिप्रामाण्य, विवेकनिष्ठा, प्रत्यक्ष व प्रयोगनिष्ठ शास्त्रावरची श्रद्धा नष्ट झाल्यामुळे या हिंदुसमाजाची स्थिती झाली होती. प्रथम इस्लामी आक्रमण आणि त्यानंतर पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांचे आक्रमण याना तो सहजासहजी बळी पडत गेला, याच्या अनेक कारणांपैकी हे एक प्रधान कारण आहे. अस्पृश्यता (स्पर्शबंदी) व जातिभेद (बेटीबंदी) यांतून अनेक प्रकारच्या बंदी कशा निर्माण झाल्या आणि त्यांमुळे कोणची अनर्थपरंपरा ओढवली याचे बॅ. सावरकरांनी फार उत्कृष्ट वर्णन केले

आहे. वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी (परदेशगमन-निषेध) शुद्धिबंदी (पतितांना परत स्वधर्मात घेण्याची मनाई), रोटीबंदी आणि बेटीबंदी यांना सावरकर सात स्वदेशी बेड्या, सात स्वदेशी शृंखला म्हणतात. म्लेच्छ, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांनी आपल्याला जिंकून आपल्या पायांत बेड्या घातल्या त्या परदेशी बेड्या होत. पण त्या बेड्या आपल्या पायांत पडल्या याचे मुख्य कारण हे की हे शत्रू येथे येण्यापूर्वी आपणच आपल्या पायांत या सात बेड्या ठोकून स्वतःच करंटेपणाने परतंत्र होऊन बसलो होतो. या सप्तशृंखला, पोथीजात जातिभेदाचे हे प्राणघातक विळखे आपण तोडून टाकले की त्या विदेशी बेड्या तोडण्यास आपणांस मुळीच अवधी लागणार नाही असा सावरकरांनी सिद्धान्त मांडला आहे. अमके राजकारण आणि अमके समाजकारण हा भेद त्यांच्या मते किती कृत्रिम आहे हे यावरून दिसून येईल. 'राजकारण ही एका हातातील चढती तलवार आणि समाजकारण ही दुसऱ्या हातातील बचावती ढाल' असे त्यांनी एका ठिकाणी या दोन 'कारणां'चे वर्णन केले आहे.

ते म्हणतात, 'शतवार सांगितले तरी पुन्हा सांगतो की, हिंदुराष्ट्राच्या अभ्युत्थानास्तव राजकारण व समाजकारण ही दोन्ही साधने अत्यावश्यक आहेत. यांपैकी कोणतेही एक दुसऱ्यावाचून पंगू आहे.' हिंदुराष्ट्र प्रबळ व्हावयाचे तर हा समाज एकजीव, एकात्म व संघटित झाला पाहिजे. सोळाव्या शतकापासून मराठे भारतात राजकारण करीतच आहेत. पण त्याला समाजकारणाचा पाठिंबा न मिळाल्यामुळे, त्या सात स्वदेशी बेड्या पायांत तशाच ठेवून मराठे लढत असल्यामुळे, मोगली आक्रमण मोडून काढण्यास जरी त्यांना यश आले तरी पाश्चात्त्य संघटित, एकात्म राष्ट्रांशी गाठ पडताच ते नामोहरम झाले हे इतिहासात आपण पाहतच आहो. आजच्या राजकारणातही आपणास तेच दिसत आहे. गेल्या शंभर वर्षांच्या प्रयत्नाने त्या सात बेड्या काहीशा ढिल्या झाल्या म्हणून आपणांस स्वातंत्र्य मिळाले. पण त्या निखालस तोडून टाकण्यात आपल्याला अजूनही यश आलेले नाही. त्यामुळे आजचे राजकारण नासत चालले आहे; म्हणून 'राजकारण हे समाजकारणावाचून नेहमी पंगूच राहणार' हा स्वातंत्र्यवीरांचा सिद्धान्त आजही शिरोधार्यच वाटतो.

या सप्तशृंखला तोडून टाकण्यास सावरकरांच्या मते एकच घण उपयोगी पडेल आणि तो म्हणजे बुद्धिप्रामाण्य, प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगक्षम धर्म. विज्ञाननिष्ठा हा होय. रत्नागिरीला स्थानबद्ध असताना या घणाचेच घाव ते या स्वदेशी बेड्यांवर घालीत होते. जातिभेद, अस्पृश्यता आणि एकंदर जन्मजात उच्चनीचता यांच्या मुळाशी असलेल्या कल्पना किती वेडगळ, किती अशास्त्रीय, किती भ्रांत व अधर्म्य आहेत ते त्यांनी अनेक लेखांतून दाखवून देण्यास प्रथम प्रारंभ केला.

पूर्वीच्या काळी भारतात शेकडो वर्षे श्रुतिस्मृतींच्या आज्ञेनेच वर्णसंकर कसा चालू होता, अनुलोम विवाहपद्धतीने का होईना, पण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्यात सर्रास विवाह कसे होत होते, ब्राह्मणाची धर्मपत्नी म्हणून शूद्र स्त्री समानतेने एकाच घरात कशी नांदत होती आणि तिची मुले ब्राह्मणच कशी गणली जात होती ते सावरकरांनी ' मनुस्मृतींतील महिला, ' ' जातिभेदाचे इष्टानिष्टत्व ' या आपल्या लेखमालांतून दाखवून दिले आहे. त्यावरून पाहता ' वेदकालापासून आम्ही शुद्ध वंशाचे आहो, ' असे भारतात वास्तविक कोणाही शुद्धीवर असलेल्या समाजाला म्हणता येणार नाही. जातिभेदाला धर्माचा सनातन आधार आहे हे म्हणणे क्षणमात्र टिकणार नाही. इतकेच नव्हे तर जातिभेद म्हणजे हिंदूंना (कोणच्याही अर्थाने का होईना) अत्यंत प्रिय असलेले जे चातुर्वर्ण्य त्याचा उच्छेद होय हे श्रुतिस्मृतींच्या वचनांनीच सावरकरांनी दाखवून दिले आहे. त्याचप्रमाणे संकराविषयीच्या भ्रांत कल्पनाही त्यांनी आपल्या धर्मग्रंथाच्या आधारेच निरस्त केल्या आहे. संकरज प्रजा कित्येक वेळा औरस प्रजेपेक्षाही प्रबळ व कर्तृत्वसंपन्न झाल्याची विदुर, वसिष्ठ, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, महादजी इ. अनेक उदाहरणे देऊन संकर हा मुळीच अनर्थकारक नाही असे त्यांनी वारंवार सांगितले आहे. ज्या विवाहामुळे प्रजा नाकर्ती होते, दुबळी, कर्तृत्वहीन होते किंवा विवाहित स्त्री-पुरुष प्रजोत्पादनाला अक्षम ठरतात त्यालाच फक्त संकर म्हणावे असे सावरकरांचे मत आहे. या दृष्टीने पाहता आपले सर्व जातिभेद, वर्णभेद हे केवळ पोथीजात आहेत, त्या भिन्न जातींनी आपसांत विवाह केले तर तो संकर मुळीच होणार नाही असा सावरकरांचा ठाम सिद्धान्त आहे. आणि हा सिद्धान्त त्यांनी श्रुतिस्मृती, पुराणे व इतिहास यांच्या आधारेच मांडला आहे.

अनुवंशाच्या कल्पनेचा आधार जातिभेदाच्या व अस्पृश्यतेच्या समर्थनार्थ नेहमी घेतला जातो. त्याचाही सावरकरांनी असाच धुरळा करून टाकला आहे. आज हिंदू समाजात असलेल्या शेकडो जाती, पोटजाती या रक्तातल्या तितक्या भिन्न गुणांमुळे निर्माण झाल्या हे म्हणणे किती हास्यास्पद आहे हे वरवर पाहतासुद्धा दिसणार आहे. पण सावरकरांनी तेवढ्यावर ते ठेवले नाही. त्यांनी अनेक जातींचे इतिहास देऊन अत्यंत क्षुद्र कारणांनी, वेडगळ कारणांनी त्या कशा निर्माण झाल्या आहेत ते दाखविले आहे. गंध लावण्याच्या मानापमानावरून कचोळे फेकून कोणी एकाने दुसऱ्यास मारले, तेवढ्यावरून तेढ माजली, बहिष्कार पडला आणि बहिष्कृतांची निराळी 'कंचोळे प्रभु' ही जात झाली. ओसवाल जातीतल्या एका लहान मुलाचा पाय चिमणीच्या अंड्यावर पडला. तेवढ्यावरून माळव्यातील अहिंसानिष्ठ जैन समाजात भांडणे माजली, बहिष्कार पडला आणि निराळी जात निर्माण झाली. हा प्रकार १९३१ साली माळव्यात घडलेला आहे. मागल्या काळी भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, शिवाशिव, अग्रपूजेचे मान, यांवरून किती मारामाऱ्या होत असत आणि जरा खुट्ट होताच ग्रामण्ये, बहिष्कार यांचे सत्र कसे सुरू होत असे याची ज्याला कल्पना आहे त्याला एका जातीच्या कालांतराने शेकडो पोटजाती कशा होत असतील याची सहज कल्पना येईल आणि मग पाश्चात्त्य शास्त्रज्ञांचे आधार घेऊन या एवढ्या जाती-पोटजातींचे समर्थन करणारे आजचे पंडित आपल्या विद्वत्तेचा कसा दुष्ट विक्रय करीत आहेत, हिंदुधर्माचे व हिंदुराष्ट्राचे तेच कसे खरे शत्रु आहेत हे ध्यानात येण्यास उशीर लागणार नाही. परंपरेने आलेले विशेष गुण कायमचे जतन करून ठेवणे व पुढच्या पिढीत तेच संक्रान्त होतील याची काळजी वाहणे या हेतूने अनुवंशाचे शास्त्र पंडितांनी सांगितले आहे. पण त्याअन्वये पाहता हिंदू समाजातील वर्णांचा वा जातींचा अर्थाअर्थी अनुवंशाशी कसलाही संबंध नाही हे सावरकरांनी ठायी ठायी दाखवून दिले आहे. शेकडो वर्षे पिढ्यानुपिढ्या सुतारी, लोहारी, शिवणकाम, वेदपठण करीत आलेल्या घराण्यात व जातीत पुढील संतती त्या त्या कर्मात निपुण होतेच असे नाही. आणि ज्या जातीत एकही पिढी तो व्यवसाय कोणी केला नाही त्या जातीत पिढीजात तो व्यवसाय करणाऱ्यांच्या संततीपेक्षा त्या कर्मात जास्त निपुण असलेले पुरुष उत्पन्न होतात हे मागल्या इतिहासातून

शेकडो उदाहरणांवरून दाखवून देता येईल. तसे दाखवून अनुवंशाच्या आधारावर पोथीजात उच्चनीचतेचे, त्या सात स्वदेशी शृंखलांचे, समर्थन करणे हे विवेकबुद्धीचे दिवाळे निघाल्याचे लक्षण आहे असे स्पष्ट मत सावरकरांनी मांडलेले आहे.

पण याहीपेक्षा जातिभेदाने या देशात गेल्या हजार वर्षांत प्रत्यक्ष अनर्थ काय घडले त्याचे जे चित्रण सावरकरांनी केले आहे ते पाहून या सप्तशृंखलां-वर घण घालणे हाच खरा धर्म होय, हेच थोर राष्ट्रकार्य होय, हे कोणाही देशहिताची चिंता वाहणाऱ्या नागरिकाला पटल्यावाचून राहणार नाही. जातिभेद म्हणजे धर्मरक्षण असे सनातनी लोक मानतात. पण या जातिभेदानेच आपली धर्महानी झाली आणि त्यामुळेच पुढे व्यापार, साम्राज्य व शेवटी स्वराज्य यांची हानी झाली हे लक्षात घेतले तर स्वतःला सनातनी म्हणवि-णाऱ्या लोकांनी हिंदुराष्ट्राचा केवढा घात केला आहे हे ध्यानात येईल. मागे हिंदू लोक व्यापारासाठी, साम्राज्यासाठी व धर्मप्रसारासाठी तिन्ही खंडांत जात होते. पण जातिभेदाच्या कल्पना तीव्र झाल्या तेव्हा परदेशी गेल्यास इतर जातींशी अन्नोदक संबंध घडेल, स्पर्शास्पर्श-विचार पाळता येणार नाहीत, अभक्ष्यभक्षण-अपेयपान करावे लागेल आणि मग जातिबहिष्कृत व्हावे लागेल अशी भीती सर्वत्र निर्माण झाली आणि म्हणून समुद्रगमन, परदेशगमन निषिद्ध झाले. म्हणजे बेटीबंदीतून ही सिंधुबंदी निघाली. आणि हा सारा समाज करंटा होऊन गेला. मलबारच्या राजास आपल्या काही लोकांनी दर्यावरील व्यापारात प्रवीण व्हावे अशी इच्छा झाली. तेव्हा त्या वेळच्या प्रौढ पोक्त हिंदूंनी असे ठरविले की प्रत्येक कुटुंबातील एका पुरुषाने मुसलमान व्हावे ! समुद्र ओलांडला तर जात जाईल. त्यापेक्षा जात घालविणारा धर्मच सोडावा हे बरे. जातिभेद हे धर्मरक्षणासाठी आहेत. पण समुद्रगमनाच्या ते आड येतात म्हणून उपाय काय ? तर धर्मत्याग !

समाज संघटित, एकात्म व बलशाली करणे हे धर्माचे अंतिम ध्येय असते. समाज विघटित व बलहीन आणि म्हणूनच परतंत्र करून टाकणाऱ्या सप्त-शृंखलांवर घण घालून त्या तोडून टाकण्यात सावरकरांनी तेच ध्येय साधले आहे. स्वातंत्र्यवीर रत्नागिरीस गेले तेव्हा महारांच्या सावलीचाही विटाळ मानण्याची शेकडो वर्षांची दुष्ट व घातक रूढी तेथे दृढपणे पाळली जात होती.

या पायरीवरून स्पृश्यांनी अस्पृश्य वस्तीत जाऊन भजने म्हणणे, अस्पृश्यांनी स्पृश्य वस्तीत भजनासाठी येणे, शाळेत स्पृश्य व अस्पृश्य मुलांनी सरमिसळ बसणें, हळूहळू देवळात अस्पृश्यांना सर्वांच्या बरोबर प्रवेश देणे, स्त्रियांचे हळदीकुंकू-समारंभ सरमिसळ करणे आणि शेवटी सर्रास सर्वांनी एका पंक्तीला बसणे या पायरीपर्यंत सावरकरांनी हिंदुसमाजाला नेले हा फार मोठा विक्रम आहे. त्रावणकोरच्या राजाने अशाच सुधारणा आपल्या राज्यात घडवून आणल्या होत्या, पण तेथेही अस्पृश्यांतील पालुवा व पारिया या जातींना प्रवेश दिलेला नाही. आणि भंग्यांना तर मुळीच नाही. रत्नागिरीच्या पतितपावनमंदिरात यच्चयावत् हिंदुमात्राला प्रवेश मिळतो, एवढेच नव्हे तर हे सर्व पूर्वास्पृश्य वेदोक्ताने त्या मंदिरात देवाची पूजा करू शकतात. तो अधिकार त्रावणकोरात मंदिरात प्रवेश मिळालेल्या एझुवा जातीच्या अस्पृश्यांनाही नाही. बॅ. सावरकरांच्या पुण्याईची यावरून आपल्याला सहज कल्पना येईल. त्रावणकोरात राजशासनाला जे करता आले नाही ते रत्नागिरीस सरकारी अवकृपेत वावरणाऱ्या स्थानबद्ध अशा एका व्यक्तीने करून दाखविले.

जातिभेदाचे सावरकरांनी तात्त्विक खंडन केले, व त्यामुळे झालेले व भविष्यात होणारे अनर्थही वर्णून सांगितले. उपायाच्या चिंतनास आरंभ करताना पहिली गोष्ट त्यांनी स्पष्ट केली आहे की या अनर्थाला भारतातील एकच एक अशी कोणतीच जात किंवा वर्ण जबाबदार धरता येणार नाही. ब्राह्मण व क्षत्रिय जतकी अस्पृश्यता चांभार-महारांविषयी पाळतात, तितकीच अस्पृश्यता चांभार-महार हे धेड-भंग्यांविषयी पाळतात. त्रावणकोरात पालुवा व पारिया जातींना मंदिरप्रवेश देण्यास एझुवा या अस्पृश्य जातीचाच विरोध आहे. आपल्याला ब्राह्मण-क्षत्रियादि वरिष्ठ मानलेल्या जातींनी बरोबरीचा मान द्यावा अशी महारांची मागणी आहे. पण तीच मांग-भंगी यांची मागणी त्यांना मान्य होत नाही. ही प्रत्येक जातीची दु:खद कहाणी असताना आज त्या पापाचे खापर एका जातीने दुसरीच्या माथी फोडण्यात काय अर्थ आहे? सावरकर म्हणतात, 'जी जी शिवी अस्पृश्य स्पृश्यांना देतात ती ती त्या अस्पृश्यांना स्वत:लाही दिली जाते हे त्यांनी विसरू नये.' तेव्हा सर्वच या महाअनर्थाला जबाबदार आहेत, सारेच दोषी आहोत हे जाणून सर्वांनी

मिळून तो दोष दूर करावा हे उचित. मद्रासमधील अस्पृश्य जातींची माहिती देताना, नि त्रावणकोरच्या सुधारणांचे विवेचन करताना आणि अन्यत्रही त्यांनी अनेक ठिकाणी हा विचार आवर्जून मांडला आहे. याचा अर्थच असा की उपाय योजावयाचे ते सर्वांनीच योजले पाहिजेत. कारण भारतीय राष्ट्र-पुरुषाच्या पायांत या स्वदेशी शृंखला ठोकून बसविण्याच्या कामात लोहाराचे काम सर्वांनीच केले आहे !

उपायचिंतनाच्या प्रारंभीच भूमिका अशी स्पष्ट करुन घेतल्यानंतर स्वातंत्र्य-वीरांनी धर्मांतराच्या उपायाचा विचार केला आहे आणि तो मार्ग सर्वस्वी त्याज्य होय असे आपले मत दिले आहे. 'धर्मांतराच्या प्रश्नाविषयी महार-बंधूंशी मनमोकळा विचार' या शीर्षकाखाली त्यांनी तीन लेख लिहिले आहेत. आणि धर्मांतराने कोणते अनर्थ होणार आहेत ते त्यांत सांगितले आहेत. स्वातंत्र्यवीरांचे म्हणणे असे की, सर्वच्या सर्व महार जाती धर्मांतर करणे कधीही शक्य नसल्यामुळे या धर्मांतरामुळे एक नवीनच जात निर्माण होईल. शिवाय धर्मांतर केलेल्यांची अस्पृश्यता जाईल व केवळ धर्मांतरामुळे त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होईल असे नाही. दुसरे असे की महार जातीतील हजारोंनी बौद्ध धर्म स्वीकारला असला तरी न स्वीकारणारांची संख्या किती तरी मोठी आहे. आणि यामुळे त्यांच्यात्यांच्यात उभा दावा निर्माण झाला आहे. इतर अस्पृश्य जाती तर धर्मांतरास मुळीच तयार नाहीत. त्यामुळे अस्पृश्यतेचा प्रश्न धर्मांतराने सुटणार आहे असे स्वप्नात सुद्धा मानता येणार नाही. यांसारखे अनेक युक्तिवाद सावरकरांनी या व अन्य लेखांत मांडले आहेत. पण त्यांचा सर्वात प्रभावी युक्तिवाद अगदी निराळा आहे. ते म्हणतात की हा हिंदुधर्म काय केवळ स्पृश्यांचा आहे ? त्याच्या रक्षणार्थ आजवर अस्पृश्यांनी काय रक्त सांडलेले नाही ? त्याच्या तत्त्वज्ञानात रोहिदास, चोखा, सजन, तिरुवल्लुवर यांनी काहीच भर घातलेली नाही ? असे असताना आजच्या काही वरिष्ठ वर्गांनी अन्याय केला तर त्यांच्याशी झगडून आपल्या स्वत्वाचे प्राणपणाने रक्षण करण्याचे सोडून तो स्वतःचा धर्मच टाकून देणे हे सावर-करांच्या मते नेभळेपणाचे लक्षण होय, 'हिंदुधर्म ही काही स्पृश्यांच्या बापाची मत्ता नाही; आमचाही तिच्यावर त्यांच्याइतकाच हक्क आहे' असे अस्पृश्यांनी सडेतोडपणाने सांगून त्यांच्याशी झुंजून आपले न्याय्य स्वत्व मिळवावे असे

सावरकरांनी अस्पृश्यांना आणि विशेषत: महारबंधूंना आवाहन केले आहे. 'हिंदुधर्मावरील अस्पृश्यतेचा कलंक वेळ पडली तर आम्ही आपल्या रक्ताने धुऊन काढू' ही आंबेडकरांची प्रतिज्ञा सावरकरांना अत्यंत योग्य व खऱ्या हिंदूस शोभण्यासारखी वाटली. त्यामुळे त्यांचा सत्याग्रह त्यांना न्याय्यच वाटला. महाड, पुणे (पर्वती) येथील सत्याग्रहाचे सावरकरांनी जोरदार भाषेत समर्थन केले आहे. पण धर्मांतर हा उपाय मात्र त्यांना अगदी मान्य नाही. त्यामुळे अस्पृश्यांचाच अध:पात होईल असे त्यांचे मत आहे.

बॅ. सावरकरांच्या मते अस्पृश्यता म्हणजे स्पर्शबंदी आणि तसल्याच इतर सप्त-बंदी म्हणजे बेड्या तोडण्यास विज्ञानाचा प्रसार हा एकच उपाय आहे. पोथीजात उच्चनीचतेचे सर्व तत्त्वज्ञान अत्यंत भ्रांतिमूलक अशा सिद्धान्तावर आधारलेले आहे. विज्ञानाने निर्माण केलेल्या शास्त्रापुढे, नव्या तत्त्वज्ञाना-पुढे, ते क्षणमात्र टिकू शकणार नाही. तेव्हा या विज्ञाननिष्ठेचा प्रसार हेच या शृंखला तोडण्याचे खरे हत्यार होय. युरोपने याच मार्गाने आपली प्रगती करून घेतली हे अनेक लेखांमधून त्यांनी पुन:पुन्हा दाखविले आहे. हिंदूंपैकी सनातन धर्माचा कैवार घेणारे लोक मुसलमानांच्या पोथीनिष्ठ कट्टरपणाकडे बोट दाखवून कित्येक वेळा सांगतात की त्या कट्टरपणामुळेच मुसलमान सर्वत्र विजयी झाले व होत आहेत. तेव्हा आपणही तसेच पोथीनिष्ठ नि कट्टर झाले पाहिजे. पण हा भ्रम सावरकरांनी 'विज्ञानबळ' या आपल्या लेखात समूळ उच्छेदून टाकला आहे. मराठ्यांचा उदय झाला तेव्हा मुसलमान तितकेच कट्टर होते. पण त्यांचे साम्राज्य मराठ्यांनी सहज धुळीस मिळविले. युरोपात तेच झाले. विज्ञानाचा उदय युरोपात झाला नव्हता तेव्हा काही ठिकाणी मुस्लिमांना जय मिळाले. पण युरोप विज्ञाननिष्ठ होताच मुस्लिम सत्ता त्यांच्यापुढे उभ्यासुद्धा राहू शकल्या नाहीत. तुर्कस्तान हा त्याला अपवाद आहे पण त्याला हे सामर्थ्य प्राप्त झाले ते विज्ञानबळामुळेच होय, अंध अविवेकामुळे नव्हे हे स्वातंत्र्यवीरांनी सप्रमाण दाखवून दिले आहे.

शब्दप्रामाण्य, पोथीनिष्ठ, श्रुतिस्मृति-पुराणोक्त व अपरिवर्तनीयता, यांतून आपल्या सात स्वदेशी बेड्या निर्माण झाल्या आहेत. तेव्हा त्यांचा उच्छेद करावयाचा तर त्या शब्दप्रामाण्यादि रूढींचा प्रथम उच्छेद केला पाहिजे.

या सर्व शृंखला मानसिक असल्यामुळे बुद्धिप्रामाण्य, प्रत्यक्षनिष्ठ व प्रयोगक्षम विज्ञान, आणि विवेकी वृत्ती या शस्त्रांनीच त्या तोडता येतील.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या दिव्य जीवनाचा विचार करता त्यातले अनेक रोमहर्षक प्रसंग आपल्या डोळ्यांपुढे उभे राहतात. त्यांना हिंदुस्थानात घेऊन येणाऱ्या बोटीतून त्यांनी फ्रान्सच्या सागरात उडी फेकली तो प्रसंग त्या सर्वांत अत्यंत अद्‌भुतरसपूर्ण होय. पण माझ्या मते रत्नागिरीस त्यांनी जे सीमोल्लंघन केले ते त्यांचे हिंदुसमाजाला सर्वांत मोठे देणे होय. पहिल्या विक्रमाने त्यांनी पारतंत्र्याच्या शृंखलेवर घण घातला. पण दुसऱ्या विक्रमाने भारताच्या कपाळी ज्या शृंखलेमुळे पुन्हा पुन्हा पारतंत्र्य येत होते तिच्यावर घण घातला; आणि ती छिन्नून टाकली. पहिल्या विक्रमाने स्वातंत्र्यवीर स्वतः मृत्युंजय झाले, दुसऱ्याने हा हिंदुसमाजच मृत्युंजय होईल अशी आशा वाटते.

# ७. आपल्या लोकशाहीवरील नवे संकट

या वर्षाच्या आरंभी लोकसभापती श्री. आयंगार यांचे चित्तूर येथे वकिलांच्या पुढे भाषण झाले. ते म्हणाले, "सध्या देशात गुंडगिरी, मवाली वृत्ती फार वाढत चालली आहे. तिला नियंत्रण घालावे म्हणून पुष्कळ कायदे केलेले आहेत पण त्यांचा काही उपयोग नाही. कारण कायदा आपले काही करू शकणार नाही ही गुंडांची खात्री आहे. असे का असावे याचेही कारण उघड आहे. आपली अंमलबजावणीची यंत्रणा भ्रष्ट झाली आहे. गुन्हेगार पकडून त्याच्यावर फिर्याद केली की ती काढून घ्यावी म्हणून दडपण येते. धमक्याही येतात. पुष्कळ वेळा फिर्याद नोंदण्याच्या आधीच धमक्या येतात. गुन्हेगारांना हे कळते कसे ? अर्थात् त्यांना पोलिसांचा पाठिंबा असतो. या सर्व प्रकारामुळे कायदा पाळणारे नागरिक निराश होतात." हे सर्व सांगून वकिलांनी गुंडांची बाजू घेऊ नये असा सभापतींनी त्यांना उपदेश केला.

मलबार-फेरोक या विभागात गुन्हेगारी वाढत आहे अशी तक्रार करून अर्थमंत्री सुब्रह्मण्यम् यांनी राजकीय पक्षांचा या गुन्हेगारीमागे हात असतो, राजकीय पक्ष गुंडांना पोशीत असतात असे सभागृहात सांगितले. ग्रामीण विभागात तर आपली उद्दिष्टे साधण्यासाठी गुंडांचा सर्रहा वापर केला जातो असे त्यांचे म्हणणे आहे : (सकाळ, ऑगस्ट १९५५)

बेळगाव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष शिवनगौडा पाटील यांनी मुंबईच्या मुख्य मंत्र्यांना पत्र पाठवून प्रार्थना केली की, कायद्यात त्वरेने दुरुस्ती करा. सध्या या भागात खुनी व दरवडेखोर यांनी धुमाकूळ घातला आहे.

आणि वातावरण असे दहशतीचे आहे की पोलिसांना पुरावा जमविणे अशक्य आहे. (सकाळ, फेब्रुवारी १९५४)

बनारसच्या हिंदु विद्यापीठाविषयी मुदलियार कमिटीने राष्ट्रपतींना सादर केलेला अहवाल प्रसिद्धच आहे. वर्षानुवर्षे तेथील अधिकारी खोटे हिशेब, पैशाचा अपहार, सग्यासोयऱ्यांच्या नेमणुका, परीक्षेतील वशिलेबाजी इ. पापे बिनदिक्कत आचरीत आहेत. या गुन्हेगारीत तेथील प्राध्यापक, विद्यार्थी व इतर अधिकारी सर्व सारखेच सामील आहेत. डॉ. राधाकृष्णन्, अमरनाथ यांसारख्या थोर पुरुषांना तेथे सुधारणा तर करता आली नाहीच उलट त्यांनाच तेथून काढता पाय घ्यावा लागला.

आपल्याला स्वातंत्र्य मिळून आता ११ वर्षे पुरी झाली. एवढ्या अवधीत शील, चारित्र्य, सत्यनिष्ठा, यांची किती प्रगती झाली हे आपण पाहू लागलो तर मन कळंजून जाते. जिकडे पहावे तिकडे गुन्हेगारी, मवालीगिरी, गुंडगिरी, भ्रष्टता, अपहार, वशिलेबाजी, दरवडे, रक्तपात, खून ! आणि यातून अमुक एक प्रदेश, अमुक वर्ग वा जाती वा समाज वा क्षेत्र मुक्त आहे असे नाही. सरकारच्या कोणत्याही खात्याविषयीचा ऑडिटरचा अहवाल पाहिला तर हेच दिसून येईल. अपहार, खोटे हिशेब, अफरातफर ! संरक्षण खात्याच्या एका अहवालात ३ कोटी १८ लक्ष रुपयांची रोकड नाहीशी झाली असा शेरा दिलेला आहे. प्रदेश काँग्रेस कमिटयांच्या हिशोबाच्या वार्ता येणेप्रमाणेच आहेत. हिशेबाच्या वह्यांत हिशेबनीस शिरला की खंडीभर घाण बाहेर येतेच. मग अध्यक्ष पळून जातात. नंतर वरचे अधिकारी येऊन सारवासारव करून प्रकरणे मिटवून टाकतात. सर्वोदय केंद्रांना सरकारने दिलेल्या देणग्यांचे काय होते त्याची कथा आचार्य विनोबांना लोकांनी सांगितली ती प्रसिद्धच आहे. विमा-कंपन्यांचा कारभार भ्रष्ट होऊ लागला म्हणून सरकारने त्यांचे राष्ट्रीयीकरण केले. त्याबरोबर त्यातून मुंदडा प्रकरणे उत्पन्न होऊ लागली. केरळ विषबाधा प्रकरण ताजेच आहे. भाडे कमी पडावे म्हणून जालीम विषाच्या पेटयांवर कंपनीने निराळीच नावे लिहिली. आणि त्यामुळे दीडदोनशे माणसाचे बळी पडले. आपल्या इस्पितळांची वर्णने याच मासल्याची आहेत. रोग्यांसाठी घेतलेली औषधे, उपकरणे त्यांच्यापर्यंत पोचतच नाहीत. मधल्यामधेच ती नाहीशी होतात. आणि परत बाजारात येतात. धरण बांधण्याच्या

योजना सरकारी आहेत. तेथेही हीच तऱ्हा. तेथील अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिलेले सीमेंट, लोखंडी सामान, चुना इ. सामग्री धरणापर्यंत पोचत नाही. मात्रा-नानगलवरील अठ्ठावीस इंजिनियरांना यासाठी अटक झाल्याचे वृत्त मागे आलेच होते.

आणि यावर कळस म्हणजे सर्वांचे लाडके असलेले, देशाचे आधारस्तंभ म्हणून गणलेले शाळा-कॉलेजांतील विद्यार्थी. पेपर जरा अवघड वाटताच हे उठून धावत व्हाइस चॅन्सेलरच्या बंगल्यावर जाऊन निदर्शने करतात. परीक्षेत नापास केल्याबद्दल शिक्षकांना मारहाण करतात. शाळेची मोडतोड करतात; खेळाच्या मैदानावर, संमेलनाच्या समारंभात शिक्षक, मुख्याध्यापक, यांपैकी कोणाचीही मुर्वत न राखता बेफाम होऊन मारामाऱ्या करतात. मुलींच्या डब्यात बसणें, त्यांच्या वसतिगृहात शिरणे, केवळ बायकांच्यासाठी असलेल्या समारंभात घुसणे, हा ते आपला जन्मसिद्ध हक्कच समजतात. दिल्ली, लखनौ, कलकत्ता, औरंगाबाद, मद्रास, सांगली, अर्नाकुलम, सर्व ठिकाणांहून याच वार्ता येत आहेत. हे आता नित्याचे झाले आहे.

विद्यार्थ्यांचे अत्याचार म्हणजे सर्वांवर कळस आहे असे वर म्हटले खरे पण अजून याहीपलीकडे एक दुःखद घटना आहे. महात्माजींच्या सहवासात ज्यांनी हयात घालविली, पंडितजींच्या सान्निध्यात जे अनेक वर्षे होते अशा सज्जनांनी कोटीकोटीची जिंदगी केल्याचे उघडकीस येऊ लागले आहे.

हे सर्व पाहून आभाळ फाटल्यासारखे वाटते. आणि आपल्या समाजाचे पुढे काय होणार याची दारुण चिंता मनाला ग्रासून टाकते.

याविषयीची चिंता समाजातले थोर थोर पंडित करीतच आहेत. गुन्हेगारीला मनुष्य का प्रवृत्त होतो, त्याच्या ठायी पापप्रवृत्ती कशामुळे निर्माण होते याची समाजशास्त्रज्ञ आज मोठ्या गंभीरपणे चिकित्सा करीत आहेत. पाश्चात्त्य देशांत तर अक्षरशः हजारो पंडित याचा अभ्यास करीत आहेत आणि नित्य नव्या उपपत्ती मांडीत आहेत. या सर्वांत प्रभावी ठरलेली एक उपपत्ती अशी आहे की गुन्हेगार हा मूलतःच, जन्मतःच दुष्ट प्रवृत्तीचा, अधोगामी असतो हे मत चुकीचे असून त्याची तशी प्रवृत्ती होण्यास परिस्थिती ही कारण असते. मनुष्य परिस्थितीमुळे गुन्हा करण्यास प्रवृत्त होतो. दारिद्र्यामुळे, अन्नान्नदशा झाल्यामुळे, इतर वासना अतृप्त राहिल्यामुळे, कामक्रोधा-

वरील संयम सुटल्यामुळे त्याच्या हातून गुन्हा घडतो. जन्मतः तो अधम असतो असे नाही. किंवा एकदा गुन्हा केल्यावर तो कायम बदमाषच राहील असे नाही. यासाठी त्याला बरी परिस्थिती निर्माण करून द्यावी, ज्या उणीवेमुळे, ज्या भुकेच्या अतृप्तीमुळे तो वाममार्गी झाला असेल ती भूक शमवावी म्हणजे पापी मनुष्य पुन्हा सज्जन होईल व भला नागरिक होईल, असे नवे शास्त्र आहे. डॉ. सिगमंड फ्रॉइड, जुंग, अॅडलर या मानसशास्त्रज्ञांच्या सिद्धान्तांच्या आधारे पाश्चात्त्य पंडितांनी ते तयार केले आहे. याविषयी विवेचन करताना हे पंडित असे सांगतात की पापकर्मी मनुष्याला गुन्हेगार न समजता रोगी समजावे, त्याला तुरुंगात न धाडता डॉक्टरकडे धाडावे; विशेषतः मानसोपचारी डॉक्टरकडे धाडावे. अर्थवादी पंडित थोडी निराळी उपपत्ती मांडतात. पण ते परिस्थितीवादीच असतात. दारिद्र्य, उपासमार, भूक ही सर्व पापकृत्यांच्या बुडाशी आहे आणि मनुष्याच्या गरजा तृप्त करण्याची व्यवस्था समाजाने केली की गुन्हेगारी कमी होईल, नष्ट होईल, अशी ते ग्वाही देतात.

हा सर्व विचार डोळ्यापुढे आला की मनुष्याच्या गुन्हेगार प्रवृत्तीचा फेरविचार करणे अवश्य आहे असे वाटते. तसे न करता नवे तत्त्वज्ञान आपण स्वीकारले तर आपल्या समाजात लवकरच प्रलयकालाची चिन्हे दिसू लागतील अशी भीती वाटते. परिस्थितीमुळे मनुष्य गुन्हेगार होतो म्हणजे काय ? माणूस दरिद्री असला, घरात खायला अन्न नाही, अंगावर वस्त्र नाही अशी त्याची स्थिती असली तर त्यामुळे तो पापवृत्त होईल हे समजू शकते. पण प्रारंभी जी दुष्कृत्ये सांगितली ती तशा प्रकारची आहेत काय ? अन्नवस्त्रादि प्राथमिक गरजा भागल्या की मनुष्य गुन्हेगारीकडे वळणार नाही असे वरील हकीकतीवरून दिसते काय ? पाचशे रुपये पगार असलेले इंजिनियर, डॉक्टर, प्राध्यापक यांच्या कोणच्या प्राथमिक वासना अतृप्त राहिल्या होत्या ? लाखांनी पैसे मिळविणारे कारखानदार, भांडवलदार, पेढीवाले, व्यापारी यांच्या पापकर्माची जबाबदारी कोणच्या परिस्थितीवर टाकता येईल ? राज्यसरकारची जी मंत्रिमंडळे आहेत त्यांत प्रत्येक प्रदेशात दुफळी झालेली आहे. आणि ही भांडणे तत्त्वासाठी नसून सत्तालोभ, धनलोभ यांतूनच उद्भवलेली आहेत. ती इतकी विकोपाला गेलेली आहेत की काँग्रेसचे अध्यक्ष ढेबरभाई यांनी ही संघटनाच मोडून टाकावी असे वैतागाने अनेक वेळा

उद्गार काढले आहेत. या मंत्र्यांच्या कोणत्या प्राथमिक वासना अतृप्त राहिल्या आहेत? डॉक्टर, वकील, इंजिनियर, प्राध्यापक, कारखानदार, भांडवलदार, पेढीवाले, व्यापारी, काँग्रेसचे मंत्री व काँग्रेस कमिटचांचे अध्यक्ष व इतर सरकारी अधिकारी हे स्वार्थ, लोभ यांमुळेच पापे करतात यांत शंका नाही. त्यांच्या दुष्कृत्यांच्या बुडाशी वासनाच आहेत. पण हेही सर्व परिस्थिती-मुळेच होते असे म्हणावयाचे काय ?

आपल्याकडच्या या सभ्य जनांच्या कहाणीपेक्षा अमेरिकेतील सभ्य जनांची कहाणी फार भयंकर आहे. ती आपल्याला उद्बोधक होईल म्हणून तिचा थोडा परामर्श घेऊ.

अमेरिका हा देश किती श्रीमंत आहे त्याची साधारण कल्पना आपल्या-कडे सर्वांना आहेच. तेथली वर्णने वाचून स्वर्ग, कुबेरनगरी या पुराणांतल्या कल्पना साकार झाल्या आहेत असे वाटते. भारताच्या केंद्रसरकारचा अर्थ-संकल्प ५०० कोटींचा असतो. त्यात प्रदेश सरकारचे संकल्प मिळवले तर हे १५०० कोटींपर्यंत जाईल. म्हणजे आमचा राष्ट्रीय अर्थसंकल्प १५०० कोटींचा होतो. अमेरिकेत दरसाल १६०० कोटींच्या सिगरेटस् खपतात. या आंकडचांवरून आपल्याला बराच अदमास लागेल. हे जे अपार अनंत धन तेथे आहे त्याची वाटणी पूर्वी अत्यंत विषम होती. पण गेल्या वीस वर्षांत आता तीही तक्रार फारशी राहिलेली नाही. अन्नवस्त्राची ददात तेथे आता कोणालाच नाही. मनुष्य बेकार असला तरी त्याच्या कुटुंबाच्या पोषणाचा भार कायद्यानेच सरकारवर असतो. सामान्य मजुरांनाही तेथे महिन्याला ६००-७०० रु. पगार असतो. त्यामुळे अन्नवस्त्राची प्राथमिक भूक भागत नाही असा तेथे कोणीच नाही. कामवासनेच्या बाबतींत तर आपल्या तुलनेने तेथे निर्बंधच नाहीत असे म्हणावे लागेल. १६-१७ व्या वयापासूनच तरुण-तरुणींना तेथे परस्परांचा निकट सहवास आणि स्पर्शसुख लाभू शकते. स्त्रीच्या जीवनाचा संपूर्ण विकास होण्यास तेथे पूर्ण अवसर आहे. नाचणे, गाणे, खेळणे, अर्थार्जन करणे, स्वतंत्र विचार करणे, पति निवडणे, विद्या-कला यांत प्रगती करून घेणे या सर्व दृष्टींनी तिला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणच्याही बाबतीत वासना दडपून काही गंड तयार व्हावे अशी स्थिती तेथे नाही. कामगार, शेतकरी हा कष्टकरी वर्ग. त्याच्या वासना सर्वत्र अतृप्त असतात. पण अमेरिकेत

ही गोष्ट इतिहासजमा झाली आहे. त्यांना आर्थिक सुस्थिती तर मिळतेच पण सामाजिक प्रतिष्ठा, सत्ता या त्यांच्या तृष्णाही आता तृप्त होत आहेत. चित्रपट, रेडिओ, टेलीव्हिजन यांमुळे अत्यंत श्रेष्ठ मनोरंजनही सर्वांना सुलभ झाले आहे.

अशा या अमेरिकेत आतापर्यंत जगाच्या कोणच्याच देशात नसेल इतके गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. गेल्या पंचवीस-तीस वर्षांतील अमेरिकेतील गुन्हेगारीचा इतिहास वाचून जगाच्या प्रगतीबद्दलची आशा जळून खाक होते. अमेरिकेतल्या या गुन्हेगारीला 'व्हाइट कॉलर क्राइम' असे तेथील शास्त्रज्ञ संबोधितात. याचा अर्थ असा की दारिद्र्य, अतृप्ती, मनोविकृति यांमुळे हे गुन्हे घडलेले नसून सभ्य, प्रतिष्ठित, सज्जन गणलेल्या लोकांचीच ही कृत्ये आहेत. या गुन्हेगारीचे पहिले विपरीत लक्षण म्हणजे ती सर्व संघटित गुन्हेगारी आहे. व्यापार, कारखानदारी, वाहतूक यांसाठी जशा कंपन्या, कॉर्पोरेशिनस्, सिंडिकेट्स् स्थापलेली असतात तशीच ही 'क्राइम सिंडिकेट्स्' असतात. चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ही सर्व व्यवस्था त्यांच्यातही असते. आणि न्यूयॉर्क, शिकॅगो, वॉशिंग्टन या शहरात ज्या भागात मोठेमोठे भांडवलदार, पेढीवाले, व्यापारी, कारखानदार यांच्या कचेऱ्या असतात त्याच भागात, त्यांच्या शेजारीच या प्रतिष्ठित ठग-पेंढाऱ्यांच्याही कचेऱ्या असतात. आता गुन्हेगारी ही दरिद्री वस्तीत, लहान बोळात किंवा गावाबाहेरच्या हीन वस्तीत राहात नाही. ती राजवाड्याजवळच्या प्रासादांत राहते. 'रॅकेटिअरिंग' हा शब्द या संबंधांत नेहमी वापरला जातो. हा उद्योग पुढीलप्रमाणे चालतो. हे ठगांचे संघ क्रमाने एकेका व्यवसायाकडे लक्ष पुरवितात. कोणातरी प्रतिष्ठित, श्रीमंत कापडवाल्याच्या दुकानात यांचे प्रतिनिधी जातील आणि 'तुमचे संरक्षण आम्ही करू, दरमहा ५०० डॉलर देत चला' अशी प्रथम सूचना करतील. शेठजींना प्रथम काहीच कल्पना नसल्यामुळे ते साहजिकच मागणी नाकारतात. पण पुढील दहा-पंधरा दिवसांत 'संरक्षण' घेणे आवश्यक आहे हे त्याच्या ध्यानात येते. त्याच्या गुदामाला आग लागते, मोटारीला अपघात होतो, कापडाचे ट्रक नाहीसे होऊ लागतात. हे पाहून घाबरून जाऊन ते महिना ५०० डॉलर्स चालू करतात. नंतर थोड्याच दिवसांत बहुसंख्य कापडवाले असे संरक्षण घेतात. मग ही संक्रांत इतर धंद्यांकडे

वळते. बँकांवर दरोडे ही अमेरिकन जीवनातील नित्याची बाब झाली आहे. दरसाल सुमारे १२० कोटी रुपयांपर्यंत यातून लूट होत असते. मोटारीच्या चोऱ्या हीही दैनंदिन गोष्टच आहे. या धंद्यातील संघटना इतकी कार्यक्षम आहे की मोटार चोरल्यापासून एक-दोन दिवसांच्या आत तिचे सुटे भाग निरनिराळ्या दहा शहरांत पोचविले जातात. आणि त्यातून नव्या मोटारी तयार होऊन विकल्या जातात. अमेरिकेत १९४९ साली १६ लक्ष ८६ हजार गुन्हे झाले. दर १८ सेकंदाला एक असे हे साधारण प्रमाण आहे. दर दिवशी ३६ खून, १५० दरोडे, व २५५ बलात्कार झाले. आणि हे प्रमाण उत्तरोत्तर वाढतच आहे असे त्या क्षेत्रातले शास्त्रज्ञ सांगतात. अमेरिकेत सर्वत्र दहशतीचे वातावरण होऊन बसले आहे, असे आजचे तज्ज्ञ सांगत आहेत.

आपल्याला असे वाटते की यांना आळा घालण्याचा काहीच प्रयत्न होत नाही काय ? अमेरिकेतील दक्ष, कार्यक्षम, जनसेवातत्पर पोलीस काय करीत आहेत ? तेथे कायद्याचे राज्य आहे की नाही ? याचे उत्तरही शास्त्रज्ञांनी दिले आहे. वाचकांनी त्याचे नीट मनन करावे. म्हणजे भारताच्या भवितव्यात काय वाढून ठेविले आहे त्याची त्यांना कल्पना येईल. (वर दिलेली, व पुढे येणारी माहिती हॅलरी एल्मर बार्नेस यांच्या 'सोसायटी इन् ट्रॅन्झिशन' या ग्रंथांतून घेतलेली आहे. दुसरी आवृत्ती १९५२–न्यूयॉर्क. या विषयावरचा हा फार मोठा ग्रंथ असून शेकडो समाजशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचे संदर्भ व त्यांतील उतारे लेखकाने दिले आहेत. याच्या जोडीला 'ब्रास चेक' हा अप्टन सिंक्लेअर या जगविख्यात कादंबरीकाराचा ग्रंथही पहावा.)

गुन्हेगारी भयानक स्वरूपात व तितक्याच भयानक वेगाने सारखी पसरत असताना, अब्जावधी डॉलरांची लूट व त्यापायी शेकडो खून दरसाल पडत असताना अमेरिकनांसारखे प्रगत व कार्यक्षम लोक या प्रकाराला आळा का घालू शकत नाहीत यांचे उत्तर बार्नेस याने पुढीलप्रमाणे दिले आहे. पहिली गोष्ट अशी – ज्यांनी या अधम कृत्यांना आळा घालायचा त्यांचे चारित्र्य अगदी निष्कलंक असले पाहिजे. ते स्वतः निःस्वार्थी, त्यागी व धैर्यशील असणे अवश्य आहे. असे दहावीस लोक एकत्र जमून त्यांनी या उद्योगाला प्रारंभ केलाच तर त्यांना काय अनुभव येईल ? बार्नेस म्हणतो, हे लोक गुन्ह्याची वार्ता कळताच प्रथम पोलीसाकडे जातात. पण पोलीस हे या सभ्य पेंढाऱ्यांच्या

पैशाने बांधलेले असतात. त्यांना दरमहा पगार चालू असतो. त्यातूनही एखादा लहान पोलीस अधिकारी कामाला लागलाच तर वरिष्ठ अधिकारी तावडतोब त्याची बदली करतात किंवा त्याला बडतर्फ करतात. जेम्स हा ठगांचा बादशहा होता. त्याला पोलिसांनी एकदा पकडले व त्याच्यावर खटला भरला. त्या वेळी काही पोलिसांनी प्रामाणिकपणे काम केले. तेव्हा ठगमंडळाने वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रारी करून त्यांच्या भराभर बदल्या करून घेतल्या. हे पोलिसांचे झाले. तेथे निराश होऊन आपला पापनिर्दालन-संघ पब्लिक प्रॉसीक्यूटरकडे जाईल. त्याचीही तीच स्थिती असते. त्याला ठग-पेंढाऱ्यांकडून पगार चालू असतो. किंवा पुष्कळ वेळा तोच त्यांच्या कंपनीत असतो. थॉमस ई. ड्यूईसारखा निःस्पृह प्रॉसीक्यूटर एकतर विरळा असतो, आणि तो काही धाडस करील अशी शंका येताच त्याला बढती देऊन वाटेतून दूर करण्यात येते. पूर्वी दरोडा घातल्यावर पोलिसांनी पकडले म्हणजे मग दरोडेखोर वकिलाकडे जात. आता सभ्य ठग-पेंढाऱ्यांनी कायदेशीर सल्लागारांची मंडळेच स्थापन केलेली आहेत. त्यांतील वकील, बॅरिस्टर, प्रॉसीक्यूटर यांच्या सल्ल्यानेच दरोड्यांची किंवा रॅकेटची योजना सध्या आखली जाते.

प्रॉसीक्यूटर बधत नाही असे पाहून आपले ध्येयवादी मंडळ ग्रँड ज्यूरीकडे जाईल. पण या ज्यूरीत कोण असते ? राजकारणी लोक ! सीनेटर ! तेही संबंधितच असतात. पक्षनिष्ठ राजकारण चालविण्यासाठी ठग-पेंढाऱ्यांची सेना अत्यंत अवश्य असते. त्या बादशहांना दुखविले तर निवडणुका हरतील हे राजकारणी लोकांना पक्के माहीत असते. १९५० साली शिकागोच्या निवडणुकीत याच कारणामुळे डेमोक्रॅटिक पक्षाचा पराभव झाला. तेव्हा राजकारणी लोक पुढील निवडणुकीवर नजर ठेवून या गुन्हेगार जगाला संभाळण्यातच गर्क असतात. ते या सज्जनांकडे कसे लक्ष देणार ? तेथून तुम्ही न्यायालयाकडे जाल. तेही यातून मुक्त नसतात. तेथून स्टेटच्या गव्हर्नराकडे जाल. त्याबद्दल बार्नेस म्हणतो की गव्हर्नर हे पूर्वीच्या कोठल्या तरी पक्षातलेच असतात. आणि ज्याचे पूर्वचरित्र अगदी निष्कलंक आहे असा गव्हर्नर अमेरिकेत दुर्मिळ आहे. सध्याच्या राजकीय पक्षाची यंत्रणाच अशी आहे की तिची चाके व तिचे आरे या ठगांनीच घडविलेले असतात. हे ध्यानात आल्यावर तुम्ही

ॲटर्नी जनरलकडे आणि तेथून प्रेसिडेंटकडे जाल. पण तेथेही तुमची निराशाच होईल. कारण पक्ष, निवडणुकी, त्यांची यंत्रणा आणि तिचे आधारस्तंभ या पाशातून तेही मुक्त होऊ शकत नाहीत.

या संबंधात विवेचन करताना बार्नेस याने अमेरिकेतील दारूबंदीची माहिती दिली आहे. हा प्रयोग अत्यंत उदात्त होता पण त्याची प्रेरणा बहुधा सैतानाकडूनच मिळाली असावी. कारण या दारूबंदीच्या काळात कोटयवधी लोक दारू पीत असत. आणि ही बेकायदा दारू पुरविण्यासाठी ठगांच्या ज्या टोळ्या त्या वेळी निर्माण झाल्या त्या म्हणजे गुन्हेगारीच्या शाळाच ठरल्या. दारूबंदी पुढे रद्द झाली. पण या शाळांचे कार्य चालूच राहिले. अल कॅपोन हा या काळातला सर्वांत मोठा पेंढारी होता. त्याचे महिन्याचे उत्पन्न १२ कोटी रुपयांचे होते. त्यातून तो दोन कोट रुपये पोलिसांपासून प्रॉसीक्युटर, न्याया-धीश, सीनेटर येथपर्यंत पोचवीत असे. ज्या चार स्टेट्स्मध्ये त्याचा धंदा चालत असे ती त्याने ‘संरक्षित’ करून घेतली होती. हे ठगाचे अधिराज्य याच पद्धतीने दारूबंदी रद्द झाल्यावर पुढेही चालू राहिले. या प्रतिष्ठित – व्हाइट कॉलर – ठगांनी फेडरल जज्जापर्यंतचे लोक दावणीला बांधलेले असतात. अगोदर पैशाचा मोह कठिण. दरमहा मिळणारे हजारो लाखो डॉलर सोडून देणे फार कठिण आहे. तो कोणी जिंकलाच तर बदनामी, मुले पळविणे किंवा खून या भीतीने माणूस वाकतो आणि त्यातून सुटलाच तर पक्षीय राजकारणी लोकांचे दडपण, पुढील निवडणुकांतील अपयश हा मोठा प्रश्न असतो. या मर्मावर आघात करूनच ठगांच्या बादशहांनी आपली निर्वेध सत्ता अमेरिकेत प्रस्थापित केली आहे. एका प्रख्यात गुन्हेगाराच्या अंत्ययात्रेला २१ न्यायाधीश, ९ वकील, अनेक स्थानिक अधिकारी व केन्द्रसरकारचे अनेक अधिकारी उपस्थित राहिले होते. अशा काही प्रसंगांचे वर्णन देऊन बार्नेस म्हणतो की अशा वेळी उपस्थित राहण्याची फर्माने सुटलेली असतात. त्या बादशाही फर्मानांचा अवमान करणे कोणालाही शक्य नसते.

गुन्हेगारीच्या या वाढीची कारणमीमांसा करताना बार्नेसने कारणे दिली आहेत. कुटुंबसंस्थेची विघटना हे एक फार मोठे कारण आहे. परकीय लोकांची आवक व त्याने अमेरिकन समाजाला आलेली विरूपता वा बकालीपणा हेही तसेच एक महत्त्वाचे कारण आहे. पण तज्ज्ञांच्या मते सर्वात महत्त्वाचे कारण

म्हणजे भांडवलशाहीची व सट्टेबाजीची अतिरिक्त वाढ हे होय. कष्टाविना पैसा ही वृत्ती यामुळे गेली शंभर वर्षे सारखी पोसत आलेली आहे. ठग–पेंढाऱ्यांनी केलेली लूट व व्यापारी, भांडवलदार, कारखानदार यांनी केलेली लूट यात एक बेकायदेशीर व दुसरी कायदेशीर आहे इतकाच फरक. नैतिक दृष्टीने दोन्ही प्रकार लुटीचे होत. 'ब्रास चेक' हे वर सांगितलेले पुस्तक अमेरिकेतील वृत्तपत्रसंस्थेविषयी आहे पण त्यात अमेरिकन भांडवलशाहीचे यथार्थ चित्र पाहावयास मिळते. 'ब्रास चेक' हा मूळ कुंटिणखान्यातला शब्द आहे. तोच अप्टन सिक्लेअर याने अमेरिकन भांडवलशाहीने चालविलेल्या वृत्तसंस्थेला लावला आहे. त्याच्या मते अमेरिकन वर्तमानपत्रे व एकंदर वृत्तसंस्था ही भांडवलशाहीची बटीक आहे. आणि अपार धन व अपार वृत्तसामर्थ्य या शक्तींच्या साह्याने त्यांनी अमेरिकेतील विधानसभा आपल्या दासी करून टाकल्या आहेत. भांडवलदारीची परिणती म्हणजे फायनॅन्स कॅपिटॅलिझम्. (पहिली व्यापारी भांडवलशाही, दुसरी औद्योगिक आणि तिसरी ही आर्थिक). गिरण्या, कारखाने, खाणी, आगगाडी, जंगले या व्यवसायांत भांडवलदारांनाही अपार कष्ट करावे लागतात. पण फायनॅन्स कॅपिटॅलिझम् हा कागदांचा खेळ आहे. बसल्या जागेवरून हा सहज खेळता येतो. याच्या जोडीला यातून निर्माण झालेली सट्टेबाजी. यामुळे पैसा व कष्ट यांची फारकत झाली. लक्ष्मी व नीति यांचाही संबंध संपला. अमेरिकन नागरिक हा गेली पन्नास वर्षे हे पाहत आहे. बँका, गिरण्या, कारखाने यांतून खोटया कंपन्या उभारणे, दिवाळी काढणे, खोटे दस्तऐवज करणे, खोटी कंत्राटे देणे, घेणे, भांडवलदारांचे संघ उभारणे यांमुळे जनतेच्या कोटयवधी डॉलरांची कशी लूट केली जाते हे त्याच्या ध्यानात येत आहे. त्यामुळे श्रमाविना पैसा ही वृत्ती बळावत गेली. आणि धनसाधनांच्या अभावी त्याने साहस, धैर्य, बेडर वृत्ती व संघटनाकुशलता या शक्तींच्या साह्याने भांडवलदार व त्यांचे सगे जे राजकारणी लोक यांच्या तोडीस तोड अशी ठग-पेंढाऱ्यांची जमात उभी केली व तिच्या आधारे राजकारण व सरकारी सत्ता आपल्या ताब्यात घेतली. यामुळे अमेरिकन समाज अगदी भ्रष्ट होऊन गेला आहे. बार्नेसच्या ग्रंथात त्याने अनेक समाजशास्त्रज्ञांची अवतरणे दिली आहेत. त्यांना आपल्या समाजाच्या भवितव्याची केवढी घोर चिंता लागून राहिली आहे ते त्यावरून स्पष्ट दिसते. अलीकडे

तरुण स्त्री-पुरुषांत ही पापवृत्ती फार बळावत आहे. यामुळे ते फारच चितातुर झाले आहेत. एकटच्या न्यूयॉर्क शहरात तरुण स्त्रीपुरुषांच्या दीडशे ते दोनशे लुटारू टोळचा आहेत !

या वर्णनावरून ही नवी, प्रतिष्ठित गुन्हेगारी गरीबीतून, अतृप्तीतून निर्माण झालेली नसून श्रीमंतीतून, अतितृप्तीतून निर्माण झालेली आहे हे स्पष्ट दिसून येईल. कोडोपती भांडवलदार, साहसी सुशिक्षित दरवडेखोर व राजकारणी नेते या त्रयीच्या धनलोभातून, सत्तालोभातून, नीतिभ्रष्टतेतून ही गुन्हेगारी निर्माण झालेली आहे. त्याच्यापुढे जुनी चोरी, घरफोडी ही गुन्हेगारी काहीच नव्हे. क्लरेन्स डॅरो या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाने म्हटले आहे की आज अमेरिकेतील सर्व तुरुंगांची कवाडे खोलून सर्व गुन्हेगार कैदी मोकळे सोडून दिले तरी समाजनीतीत फारसा फरक पडणार नाही. कारण त्याच्यापेक्षा दसपट, शतपट गुन्हेगार तुरुंगाच्या बाहेरच आहेत. गेल्या पन्नास-साठ वर्षांत फ्रॉइड, जुंग, ॲडलर इ. मानसशास्त्रज्ञांनी व इतर समाज-शास्त्रज्ञांनी गुन्हेगार हा रोगी असतो, त्याला तुरुंगापेक्षा इस्पितळाची जरूर आहे, तो मनाने विकृत, दुबळा असतो, त्याला सुधारणे हे काम पोलिसाचे नसून डॉक्टरचे आहे इ. सिद्धान्त प्रस्थापित केले होते. नव्या गुंड, मवाल्यांनी, प्रतिष्ठित पेंढाऱ्यांनी हे सिद्धान्त धुरळचासारखे उधळून लावले आहेत. हे गुन्हेगार अत्यंत बुद्धिमान्, कणखर, पाताळयंत्री व दूरदर्शी असतात. मनो-दौर्बल्यामुळे ते गुन्हेगार झाले असे कोणी शास्त्रज्ञ म्हणू लागला तर त्याच्याच मनाची तपासणी करावी लागेल. नवी गुन्हेगारी मनोदौर्बल्य किंवा भूक यातून निर्माण झालेलीच नाही. भांडवली समाजरचना आणि भ्रष्ट लोकशाही यांतून ही निर्माण झालेली आहे. म्हणून ती नष्ट करावयाची असेल तर आपली अर्थव्यवस्था आणि आपली राज्यपद्धती यांचे स्वरूप आमूलाग्र बदलले पाहिजे. जुन्या काळी राजाच्या व त्याच्या सरदारांच्या हाती अनि-यंत्रित सत्ता असे. ते उन्मत्त व मदांध झाले की प्रजेचा अनन्वित छळ करीत. नुसती लूटमार करीत. ही अनियंत्रित सत्ता नको म्हणून विचारवंतांनी, लोकसत्तेची प्रस्थापना केली. पण भांडवलशाहीच्या अनियंत्रित सत्तेमुळे नव्या राज्यव्यवस्थेला, लोकशाही समाजव्यवस्थेला अत्यंत हिडीस स्वरूप प्राप्त झाले आहे. आणि मागल्यापेक्षा जनतेचा अनेक पटींनी जास्त रक्तशोष

चालू आहे. म्हणून सध्याची आर्थिक व राजकीय घडी बदलून समाजाची पुनर्घटना केली पाहिजे.

अमेरिकेतील वाढती नीतिभ्रष्टता, वाढती गुन्हेगारी यांचे वर्णन वर दिले आहे. तज्ज्ञांनी तिची केलेली कारणमीमांसा आणि सुचविलेले उपाय हेही वर दिले आहेत. त्याच्या आधी प्रारंभी आपल्या देशातील आयंगार, सुब्रह्मण्यम्, शिवन्‌गौडा, मुदलियार यांनी आपल्या देशातल्या गुन्हेगारीची केलेली वर्णने व मीमांसाहि दिली आहे. यावरून अमेरिकेतल्या प्रतिष्ठित ठग-पेंढारशाहीचा व येथल्या गुन्हेगारीचा तोंडवळा बराच सारखा आहे असे दिसून येईल. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत व विशेषत: गेल्या दहाबारा वर्षांत म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण अमेरिकेच्याच दिशेने वाटचाल करीत आहोत, हे दोहोंची तुलना करून पाहणाऱ्याच्या सहज लक्षात येईल. आणि मग आपल्या देशावर नजीकच्या भविष्यकाळात केवढी भयानक आपत्ती कोसळणार आहे याची त्याला कल्पना येईल.

गेल्या वर्षी ‘ केसरी ’ च्या दिवाळी अंकात ‘ दुसरे आव्हान ’ हा लेख मी लिहिला होता. त्या वेळी औद्योगिक विकासाच्या दृष्टीने आपल्या देशाची स्थिती अमेरिका व रशिया यांहून अगदी निराळी कशी आहे ते सांगितले होते. अमेरिकेत औद्योगिक विकास झाला तेव्हा लोकशाही विकसित झालेली नव्हती. त्यामुळे पोटाला घासभर अन्न देऊन किंवा तेही न देता कारखानदार १८-१८तास मजुरांच्याकडून काम करून घेत. कामगार त्या वेळी जागृत नव्हते, संघटित नव्हते, बलशाली नव्हते म्हणून हे शक्य झाले. रशियात औद्योगिक विकास सध्या चालू आहे. पण तेथे लोकशाहीचा गंधही नाही. स्टॅलिनने हजारो लाखो शेतकऱ्या-कामकऱ्यांचे काय अनन्वित हाल केले, केवढा भयानक जुलूम केला, त्याचे वर्णन तेथला नवा स्टॅलिन क्रुश्चेव्ह यानेच केले आहे. हिंदुस्थानात यातले काहीच शक्य नाही. म्हणून एक विचित्र समस्या आपल्यापुढे टाकून काळाने आपल्याला आव्हान दिले आहे असे त्या लेखात सांगितले आहे. प्रतिष्ठित पेंढारशाही – व्हाइट कॉलर क्राइम – हीही तशीच दुसरी समस्या – पहिली पेक्षाही घोरतर अशी समस्या – त्याच परिस्थितीमुळे आपल्यापुढे उभी आहे.

अमेरिकेत फार मोठी लूटमार चालू आहे. जनतेचे भयंकर शोषण चालू आहे. पण तेथे धनसंपदाच इतकी विपुल आहे की हे शोषण सहन करण्याचे

सामर्थ्य थोडेतरी जनतेत आहे. या पेंढारशाहीला आळा घालण्याचे नवे नवे उपाय शोधून काढण्यात मधून मधून तेथे लोक यशस्वी होतात. गुन्हेगारीच्या शोधासाठी, तिच्या बंदोबस्तासाठी, तुरुंग, पोलीस, गुप्तपोलीस, न्यायालये, सरकारी वकील यांसाठी अमेरिकेत दरसाल १५ शे कोटी–म्हणजे सर्व भारताच्या अर्थसंकल्पाइतके – रुपये खर्च होतात. तेथे एका जनरल मोटर्स या कंपनीचे भांडवलच भारताच्या राष्ट्रीय अर्थसंकल्पाएवढे आहे. म्हणून प्रतिष्ठित मवालीगिरीने केलेली लूटमार काही काळ तरी तेथे जनतेला सोसणे शक्य आहे. हेही दिवसेंदिवस फारच कठीण होत चालले आहे हे खरे. आपल्याला माहित आहे की अमेरिकेत वेडचा माणसांचे प्रमाण फार झपाट्याने वाढत आहे. या पेंढारशाहीमुळे अनेक ठिकाणी समाजरचना उद्‌ध्वस्त होत आहे; लोकांच्या मनावर निराशेचा, विफलतेचा पगडा बसत आहे आणि त्यामुळे मनोदौर्बल्य कमालीच्या वेगाने वाढत आहे. १९५१ साली अमेरिकेत १ लक्ष ७० हजार वेडे वा मनोभ्रंश झालेले लोक होते व बार्नेसने दिलेल्या माहितीप्रमाणे ही संख्या शे. ४ या प्रमाणात वाढत आहे. आज जी १५ वर्षांची मुले आहेत त्यांच्यातून दर विसांपैकी १ वेडा होणार असे तज्ज्ञांचे भविष्य आहे. अमेरिकेत विवाहसंस्थाही भग्न होत आहे. दर तीन विवाहांपैकी एकाचा तेथे विच्छेद होतो. आणि पुढील १०।२० वर्षांत ते प्रमाण एकास एक असे होईल अशी समाजशास्त्रज्ञांना भीति आहे. याला अनेक कारणे आहेत. पण गुंडमवाल्यांची चलती–त्यांची सत्ता–त्यांचे अधिराज्य हे एक निश्चित आहे. प्रतिष्ठित ठगांच्या अनेक धंद्यांपैकी जुगारी हा फार मोठा धंदा आहे. अमेरिकेत कारखानदारी चालत नसेल इतक्या मोठ्या प्रमाणावर हा व्यवसाय चालतो. याच्याही मोठमोठ्या कंपन्या, कॉर्पोरेशन्स, सिंडिकेट्स् आहेत. त्यांचेही कारभार मागे सांगितल्याप्रमाणे शहराच्या श्रीमंत भागातून चालतात. याचा संसारावर, कुटुंबव्यवस्थेवर व विवाहसंस्थेवर केवढा परिणाम होत असेल हे सहज ध्यानात येईल. शेकडो संसार यामुळे क्षणाक्षणाला उद्‌ध्वस्त होत असतात. आणि त्यामुळे पुन्हा गुन्हेगारी आणि मनोदौर्बल्य वाढत जाते. विवाहसंस्था व वैवाहिक नीती खालावत चालली म्हणजे सिफिलिस, गनोरिया अशा गुप्तरोगांचे प्रमाण वाढत जाते. कार्ल वॉरन् या पंडिताच्या मते अमेरिकेत या रोगांनी दोन कोटी लोक ग्रस्त आहेत. आश्चर्य असे की

१९४० सालापासून या रोगांवर रामबाण औषधे सापडली आहेत. पण हा रोग उत्तरोत्तर वाढतच आहे. या रोग्यांतील शेकडा ६० लोक १५ ते २५ या वयाचे असतात. तरुण स्त्रीपुरुषांच्या आरोग्यावर याचा काय परिणाम होत असेल हे सांगणे नकोच. अमेरिकेत मादकद्रव्यसेवनाचे प्रमाण वाढत आहे. तरुणांत ते प्रमाण इतके वाढत आहे की ते पाहून समाजशास्त्रज्ञांना धक्का बसतो. अमेरिकेत अफू, कोकेन व इतर मादक द्रव्यांवर (यांत मद्य नाही. ते निराळेच आहे.) १४०० कोटी रुपये दरसाल खर्च होतात. या व्यसनाबरोबर अमेरिकेत आत्महत्येचेही प्रमाण असेच वाढत आहे. यामुळे अमेरिकेतही या सर्व आपत्तींना तोंड देणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. मग आपल्याकडे काय होईल, सध्याच काय होत असेल याची कल्पना करता येईल. युद्धाची जशी सर्व आधुनिक शस्त्रास्त्रे अमेरिकेत सिद्ध आहेत आणि त्यासाठी लागणारे धनही आहे त्याचप्रमाणे या आपत्तींशी लढा देण्यास लागणारी साधनसामुग्री, पैसा हाही तेथे आहे. पण आपल्याजवळ त्यातले काहीच नाही. आणि या घोर आपत्ती मात्र आपल्याकडे वेगाने चालून येत आहेत.

या सर्व आपत्तींना तोंड देण्यासाठी, या प्रतिष्ठित पेंढारवृत्तीला आळा घालण्यासाठी अमेरिकन शास्त्रज्ञ कोणचा उपाय सुचवितात ? चारित्र्य ! समाजातील तरुणांना नीतीचे, चारित्र्याचे, उदात्त ध्येयवादाचे, मनोनिग्रहाचे शिक्षण दिले पाहिजे. यालाच जुन्या काळी धर्म असे म्हणत. पण धर्मसंस्था ज्यांच्या हाती होत्या आणि आहेत त्यांनी धर्माला अत्यंत जड, कर्मठ, विपरीत व ओंगळ रूप आणून ठेविले आहे. म्हणून अलीकडे तो शब्द चटकन् कोणी वापरीत नाही. वास्तविक मनोनिग्रह, त्याग, जनसेवा, नीतिधैर्य, ध्येयवाद, सत्यनिष्ठा, परमेश्वरावरील श्रद्धा, कुटुंबनीति, हाच खरा धर्म होय. आणि हा धर्म म्हणजेच–नव्या भाषेत ही मूल्ये अमेरिकेतून नष्ट होत चालली आहेत. फायनॅन्स कॅपिटॅलिझम्, प्रतिष्ठित ठगपेंढारशाही, व कुटिल नीतिभ्रष्ट राजकारण यांतूनच निर्माण झाले आहे हे खरे. पण याचाही सूक्ष्म विचार केला तर हा वाद बीज आणि वृक्ष यांच्यासारखा आहे असे दिसेल. भांडवल-शाहीचा अतिरेक तरी स्वार्थाच्या अतिरेकामुळेच होतो. माणूस संयमी असला, म्हणजे वरील अर्थाने धर्मनिष्ठ असला, त्याची नीतिमूल्ये दृढ असली तर

हा अतिरेक होत नाही. समाजात काही प्रमाणात जरी अशी निःस्पृह माणसे असली तरी ही आपत्ती टळते. इंग्लंडने ही किती तरी प्रमाणात टाळली आहे. बार्नेसनेच ही तुलना केली आहे. तो म्हणतो, " कायदा पाळण्याची ब्रिटिश जनतेची वृत्ती प्रशंसनीय आहे. त्यामुळे लोकमत तेथे जास्त प्रभावी आहे. म्हणजेच राजकारणी लोक इतके भ्रष्ट नाहीत. अमेरिकेच्या तुलनेने सट्टे-बाजीचा रोग ब्रिटनमध्ये फार कमी आहे. स्वार्थाला धनिक लोक तेथे काही तरी आळा घालू शकतात असा याचा अर्थ आहे. गेल्या दोनशे वर्षांत इंग्लंड-मध्ये बँका गडगडल्याचे उदाहरण नाही. असले तर अगदी तुरळक. याचा अर्थ काय ? सट्टेबाजीचा, हरामाच्या पैशाचा मोह इंग्लंडमधले लोक जिंकू शकतात हा त्याचा अर्थ आहे. सामाजिक वा आर्थिक परिस्थितीला महत्त्व नाही असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. पण मानवाची चारित्र्यशक्ती, मानवाचा धर्म हाच अंतिम निर्णायक आहे हे आपण विसरून चालणार नाही. गेल्या तीनशे वर्षांत इंग्लंडमध्ये रक्तपाती क्रांती झाली नाही आणि सर्व प्रकारची आर्थिक समता मात्र बऱ्याच अंशाने प्रस्थापित झाली आहे. हे तरी फल कशाचे ? तेथील सत्ताधिकारी, तेथील धनशहा हे विवेकी आहेत, बुद्धि-वश आहेत, सत्ता व धन यांचा लोभ मर्यादित केला पाहिजे हे ते जाणतात आणि तसा करू शकतात यामुळेच हे अनर्थ टळले आहेत. मानव स्वभावतःच सत्प्रवृत्त वा पापप्रवृत्त असतो यांपैकी कोणतेच मत इतिहाससिद्ध नाही. पण त्याच्या पापाची सर्व जिम्मेदारी परिस्थितीवर ढकलणे हे अगदी आत्म-घातकीपणाचे आहे. पण अलीकडे आपल्याकडे हे मत प्रबळ होत आहे असे वाटते. नाटक, कादंबरी, लघुकथा या ललितसाहित्यात तर चोर, दरोडेखोर, खुनी, यांना मोठ्या नाट्यमय पद्धतीने पापाच्या जबाबदारीतून मुक्त केलेले असते. या गुन्हेगाराला पकडले आणि 'तू वाममार्गी का झालास ?' असे विचारले तर 'ते समाजाला विचारा' असे तो मोठ्या रुबाबात उत्तर देतो. परिस्थिती वा समाज पापप्रवृत्तीला जबाबदार आहे असे शास्त्रज्ञांनी म्हणणे निराळे आणि गुन्हेगाराने म्हणणे निराळे. अंतःस्थ निग्रहशक्ती, संयम, विवेक ही मानवाच्या हातची अमोघ शक्ती आहे. त्या शक्तीच्या जोरावर तो परिस्थितीवर मात करू शकतो. व्यक्ती स्वतःच आपली पापे परिस्थितीवर लादू लागली तर मानव हे एक जडयंत्र आहे, तो अचेतन आहे, त्याला सद्-

असद् विवेकशक्ती नाही असे म्हटल्यासारखे होईल. ही मानवजातीची हत्या आहे. मानव मोह जिंकू शकतो यातच त्याचे मानवत्व आहे. म्हणूनच सध्याच्या समाजातले श्रमाविना पैसा, हरामी पैसा हे तत्त्वज्ञान खणून काढून नव्या पिढीला चारित्र्याचे शिक्षण दिले पाहिजे असे अमेरिकन शास्त्रज्ञ सांगत आहेत. अर्थव्यवस्था नीतीच्या अधीन असली तरच त्या गुन्हेगारीला नियंत्रित करता येईल असे त्यांना वाटते.

आपल्याकडे ही अद्ययावत् गुन्हेगारी हळूहळू वाढत आहे,याविषयी कोणाचे दुमत आहे असे दिसत नाही. खेडेगावातील ग्रामपंचायतीपासून प्रदेशातील विधान-सभेपर्यंत सर्वत्र 'दादांचे' राज्य सध्या चालू आहे, असे सर्व पक्षाचे लोक, अपक्ष लोक, विद्वान्, अविद्वान् सर्वच म्हणत आहेत. उत्तर प्रदेशात कॉंग्रेसपक्षातील लोकांनी स्वतःच्याच मंत्रिमंडळाला हैराण करण्याचा डाव मांडला आहे. सरकारने मांडलेल्या ठरावाला आम्ही विरोध करू, असे त्यांनी मुख्य मंत्र्याला बजावले आहे. यामागे मागल्या निवडणुकांत पडलेल्या मोठ्या दादांचा हात आहे असे जाहीरपणे सांगितले जात आहे. पंजाब, कर्नाटक, ओरिसा येथल्या मंत्रिमंडळांतील गटबाजीचे वर्णन कॉंग्रेसश्रेष्ठीच नित्य करीत आहेत. गटबाजीचा अर्थ एकच होतो. राज्यकारभारात तत्त्वनिष्ठेचा संबंध राहिला नसून, कारस्थानी, पाताळयंत्री, वळदंड माणसांचे तेथे राज्य आहे असा तो अर्थ होय. यातून पुढले सगळे अर्थ उद्‌भवत असतात. पब्लिक अकौंट्स् कमिटी, गोरावालासारखे सरकारने नेमलेले तपासनीस यांनी सादर केलेल्या अहवालावरून हे अनर्थ कोणच्या सीमेपर्यंत गेले आहेत याची कल्पना येते. जनतेच्या पैशाचा अपहार करण्याच्या या वृत्तीतूनच पुढे गुंडराज्य निर्माण होते. कारण सुखासुखी हा अपहार कोणीच पचू देत नाही. यासाठी मग ठग-पेंढाऱ्यांच्या सेना तयार ठेवाव्या लागतात आणि हळूहळू मग तेही आपली संघटना निर्माण करून राजकारण व राजकारणी यांना ताब्यात घेतात. पक्षनिष्ठ राजकारणामुळे दोन्ही पक्षांना ठग-पेंढाऱ्यांचे साह्य घ्यावे लागते. भारतात कॉंग्रेसशी सामना देईल असा पक्ष नसल्यामुळे इतके दिवस याला थोडा आळा पडला होता. पण आता कॉंग्रेसमध्येच प्रत्येक प्रदेशराज्यात तट पडल्यामुळे आणि ते तट एकमेकांशी भिन्नपक्षांच्या अहिनकुल-न्यायानेच वागत असल्यामुळे अधोगतीला फारसा वेळ लागणार नाही.

आपल्या देशावर नजीकच्या भविष्यकाळात ओढवणारे हे जे भयंकर संकट त्याची जाणीव पुष्कळ विचारवंतांना झालेली असल्यामुळे ते आपापल्या-परीनें त्यावर उपायही सुचवीत आहेत. आचार्य विनोबा भावे व जयप्रकाश नारायण यांच्या मते पक्षपद्धतीच अजिबात नष्ट केली म्हणजे तिच्यामुळें उद्भवलेले अनर्थही टळतील. पण एकतर ही पद्धती नष्ट करून तिच्या जागी दुसरी कोणची आणावयाची याचे व्यावहारिक भूमिकेवरून या दोघांपैकी कोणीच उत्तर दिलेले नाही आणि दुसरे म्हणजे जोपर्यंत कोणचीही पद्धती शेवटी मनुष्याच्याच हातात राहणार आहे तोपर्यंत नुसत्या पद्धतीत बदल करून काहीच उपयोग होणार नाही. स्वार्थी, हृदयशून्य, चारित्र्यहीन मनुष्य कोणच्याही शासनपद्धतीतून, कोणच्याही समाजरचनेतून वाटेल ते अनर्थ घडवू शकतो हे इतिहासात पावलोपावली आपल्याला दिसून येत आहे तोपर्यंत या दोन थोर नेत्यांच्या सूचनेचा विचारसुद्धा करता येणार नाही. ठग-पेंढारशाही पक्षनिष्ठ राजकारणाशी निगडित आहे तशीच ती भांडवल-शाहीशी निगडित आहे. तेव्हा भांडवलशाही नष्ट करावी म्हणजे सगळ्या अनर्थांचे मूळच नष्ट होईल असे म्हणणारा एक पक्ष आहे. आणि हा पक्ष फारच मोठा आहे. त्याचे मत असे की भांडवलाने उभारलेल्या सर्व उद्योग-धंद्यांचे राष्ट्रीयीकरण करून टाकावे म्हणजे पुढील अनर्थपरंपरा टळतील. पण हाही विचार वरच्यासारखाच भोळा व सात्त्विक आहे. राष्ट्रीयीकरण म्हणजे उद्योगधंदे राष्ट्राच्या ताब्यात देणे. म्हणजे कोणाच्या ? तर सरकारच्या. आणि सरकारच्या म्हणजे कोणाच्या ? तर निवडून दिलेले जे मंत्री त्यांच्या. त्यांच्याच कारभारावर पब्लिक अकौंट्स् कमिटी व इतर तपासनीस कसा प्रकाश टाकीत आहेत हे वर सांगितलेच आहे. आणि विमाकंपन्यांच्या राष्ट्रीयी-करणाने वर सांगितलेल्या विचाराचा आदर्श पाठ आपल्याला दिलाच आहे. तेव्हा याचाही निष्कर्ष हाच की नुसती जडयंत्रणा बदलणे याला काहीच अर्थ नाही. धरणयोजना, ग्रामविकासयोजना, कृषि-पुनर्घटना, राष्ट्रविकास-योजना, वनमहोत्सव या सगळ्या सरकारीच योजना आहेत. म्हणजे त्यांचे राष्ट्रीयी-करणच झाले आहे. त्यांची काय अवस्था आहे ते आपण पाहातच आहो. तीच अवस्था सर्व उद्योगधंद्याच्या राष्ट्रीयीकरणामुळे प्राप्त झाल्याखेरीज राहणार नाही. मानवाची नीती व चारित्र्य यांची पातळी वाढली नाही तोपर्यंत

राष्ट्रीयीकरण ही फारच मोठी आपत्ती आहे हे आपण कधीही विसरू नये.

तेव्हा चारित्र्यधनाची वाढ करणे हा एकच उपाय सर्व आपत्तींवर आहे. आणि अत्यंत दुर्दैवाची गोष्ट ही की स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या धनाला ओहोटी लागून आपली गंगाजळी आता जवळजवळ रिती झालेली आहे. १९४९ च्या बंगलोरच्या भाषणात सरदार वल्लभभाई पटेलांनी अत्यंत तीव्र शब्दांत काँग्रेसजनांना हेच कटु सत्य सांगितले होते. 'स्वातंत्र्यापूर्वी आपण ध्येयवादी होतो, त्यागी होतो. पण आता आपली नीती फारच खालावली आहे. इतरां-प्रमाणेच काँग्रेसजनही भ्रष्ट झाले आहेत,' असे ते म्हणाले; त्याच साली मद्रासला केलेल्या भाषणात अतिशय निराशेने ते म्हणाले होते, 'आपल्याला आता बाहेरून संकट येणार नाही. आले तर ते आतूनच येणार आहे. आपण इतके चारित्र्यभ्रष्ट आहोत की, लवकरच याचे आपल्याला भयंकर परिणाम भोगावे लागतील.' दुर्दैवाने सरदारजींची भीती आज खरी ठरली आहे. आणि यापेक्षाही दुसरे जास्त भयंकर सत्य यातून स्पष्ट झाले आहे. ते हे की या देशाला ध्येयवाद शिकवील, नीतिमार्गावर आणील, चारित्र्यसंपन्न करील असा सामर्थ्यसंपन्न एकही पुरुष येथे आता नाही. पंडित नेहरू, राजेंद्रबाबू, पंत यांसारखे थोर नेते आज दहा वर्षे जनतेला व काँग्रेसजनांना नीत्युपदेश करीत आहेत. पट्टाभि, ढेबरभाई यांसारखे काँग्रेसचे अध्यक्ष कंठरवाने तेच सांगत आहेत. पण देशाच्या चारित्र्याची पातळी वर न जाता खालीच चालली आहे.

आपल्यापुढची समस्या किती बिकट आहे याची काहीशी कल्पना वाचकांना आली असेल. चारित्र्यधन जर आपण आता प्राप्त करून घेतले नाही तर अमेरिकेप्रमाणे येथे ठग-पेंढारशाही सुरू होईल. आणि तिने केलेला रक्तशोष सोसण्याचे सामर्थ्य आपल्या ठायी मुळीच नाही. चारित्र्यधन हे इतर धनाप्रमाणे आयात करता येत नाही. ते मानवाच्या चित्तांतच प्रगट व्हावे लागते. आणि ही भूमी तर सध्या येथे अगदी नापीक झाली आहे. काँग्रेसकडे देशाचे नेतृत्व आहे. तिची काय स्थिती आहे ते वर सांगितलेच. विरोधी पक्षाचे या बाबतीतले दारिद्रय तर जास्तच केविलवाणे आहे. त्यांच्या-तील हेवेदावे, गटबाजी, फुटीरपणा, क्षुद्र कारणावरून होणारी लाथाळी ही सर्व अगदी घृणास्पद आहे. ध्येयवाद, चारित्र्य, सच्छील शिकविण्याचा

मूळ अधिकार विद्यापीठांचा; तेथील प्राध्यापकांचा आणि एकंदर शिक्षकवर्गाचा! पण बनारस, शांतिनिकेन, आग्रा, मुंबई या विद्यापीठांची कहाणी नुकतीच वर्तमानपत्रांतून आली आहे. त्यावरून स्वतःच चारित्र्यशून्य असलेली ही विद्यापीठे विद्यार्थ्यांना कोणचे वळण लावणार हे दिसतेच आहे. अनेक वेळा या सर्वांना बाजूस सारून स्वतः विद्यार्थीवर्गच आत्मस्फूर्तीने स्वतःच्या ठायी स्वतःच ध्येयवादाचे, थोर आकांक्षांचे, श्रद्धांचे बीजारोपण करू शकतो. पण तीही आशा भारतातील विद्यार्थ्यांकडून धरता येत नाही. त्यांचे काय चरित्र आहे याचे वर्णन आरंभी केलेच आहे. अशा रीतीने येथे सर्व शून्याकार आहे. आणि व्यापार, कारखानदारी, धरणयोजना, विकासयोजना यांसाठी तूट पडली तर अवश्य ते भांडवल परक्या देशांतून आणता येते तसे हे चारित्र्यरूप भांडवल आणता येत नसल्यामुळे आपली समस्या अगदी बिनतोड होऊन बसली आहे.

चारित्र्यसंवर्धनाचा ऐतिहासिक दृष्टीने आपण विचार केला तर आपली ही समस्या दिसते यापेक्षा शतपट बिकट आहे हे आपल्या ध्यानात येईल. जगातल्या कोणच्याही देशाचा इतिहास पाहिला तर असे दिसते की ज्यात प्राणपणाने लढणे अवश्य आहे असा घोर समरप्रसंग जेव्हा लोकांच्या डोळ्यापुढे असतो तेव्हाच ते त्यागाला, शारीरिक वा मानसिक यातना सोसण्याला, देहदंडाला, आत्मबलिदानाला सिद्ध होतात. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न आहे, युद्धाचा प्रसंग आहे, अन्य राष्ट्रीय लढ्याचा प्रसंग आहे अशा वेळी सामान्य जनांचेही धैर्यशौर्यादि गुण, त्याग हे प्रगट होतात, विकसित होतात. शांततेच्या काळी लोकांमध्ये ध्येयवाद टिकवून धरणे, त्यांना त्यागाला प्रवृत्त करणे, सुखभोगापासून परावृत्त करणे ही गोष्ट फार कठिण; कल्पनेच्या बाहेर कठिण आहे. ही गोष्ट इंग्लंडलाच आजपर्यंतच्या इतिहासात जमली आहे. अन्यत्र नाही. गेल्या शतकात जर्मनी, इटली, जपान, चीन या देशांत राष्ट्रसंघटना झाली. या सर्व संघटना राष्ट्रीय आपत्तीच्या काळी, त्या वेळी झालेल्या युद्धाच्या आगीतून निर्माण झालेल्या आहेत. त्याच्या 'आधीच्या शतकात नेपोलियनने फ्रान्सचे वैभव वाढविले, वॉशिंग्टनने अमेरिकेचे कर्तृत्व उदयास आणले ते सर्व क्रांतीच्या संग्रामातून निर्माण झालेल्या अग्निज्वाळांच्या साहाय्याने. त्याच्या आधी मोठमोठे धर्मसंग्राम होत. त्या वेळी माणसे जिवंत

होत. पराक्रम करीत. त्यांचे कर्तृत्व वहरून येई. ज्यांनी धर्मासाठी, सामाजिक व राजकीय क्रांतीसाठी किंवा राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी संग्राम केले नाहीत ते समाज लोकांचे चारित्र्य-संवर्धन करू शकले नाहीत. समाजाला ध्येयवाद, त्याग, मनोनिग्रह शिकवू शकले नाहीत. शांततेच्या काळी मनुष्याला स्वार्थाचा, सुखाविलासाचा, क्षुद्र आपपरभावाचा त्याग करण्यास शिकविण्याची किमया अजून फारशी कोणाला साधलेली नाही.

संग्रामकालात मनुष्य जो त्याग करतो तो भावनेच्या भरात, काही एका आवेगात आणि थोडया बेभान अवस्थेतच करतो. रक्त तापलेले आहे, राग-द्वेष उत्कट झालेले आहेत, मनाचा प्रक्षोभ झालेला आहे, अशा वेळी मनुष्य यातना सोसू शकतो. स्वतःची क्षुद्रता विसरून क्षणभर तो उदात्त भूमीवर आरोहण करतो आणि त्यामुळे देहदंड आनंदाने सोसण्याची त्याच्या मनाची तयारी झालेली असते. शांततेच्या काळात या प्रेरणा नष्ट झालेल्या असतात. शांततेच्या काळची ध्येये वास्तविक तितकीच उदात्त असतात. सर्व राष्ट्राला पुरेसे अन्नधान्य निर्माण करणे, प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, घर, आणि शिक्षण हक्काने मिळण्याची सोय करणे, अस्पृश्यता, जातीयता नष्ट करून सर्वत्र समता प्रथापित करणे, अमाप धन निर्माण करून प्रत्येकाला साहित्य, संगीत, नाटय, नृत्य, शिल्प इ. कलांचा आस्वाद घेण्याची संधी मिळवून देणे ही ध्येये खरोखरी फार उदात्त आहेत. राष्ट्रीय संग्राम करावयाचे ते यासाठीच करावयाचे असतात. पण ही ध्येये बुद्धिगम्य आहेत. भावनांना त्वरित आवाहन करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी नाही. ती रक्तात प्रक्षोभ निर्माण करीत नाहीत आणि भावनांच्या ठायी मनुष्याला कार्यप्रवण करण्याची शक्ती असते तशी बुद्धीच्या ठायी नसते. बुद्धी हिशेब करीत असते आणि हिशेबातून त्यागाची प्रेरणा कधीच निर्माण होत नाही. म्हणूनच क्रान्तीचा, संग्रामाचा ताण ढिला पडला की माणसे गळाठतात. त्यांचे रक्त थंड होते आणि मग वासनांवर जय मिळवण्याची त्यांच्या ठायी काही काळ आलेली शक्ती नष्ट होते. सामान्य माणसांप्रमाणेच नेत्यांचेही असेच अवस्थांतर होते. क्रान्ती होईपर्यंत नेते क्रांतिकारक वृत्तीचे असतात. पण ती संपताच ते सत्तारूढ झाल्यामुळे सनातनी आणि प्रतिगामी होतात. (इंग्लिश इतिहासकार ट्रिव्हेलियन याने क्रॉमवेलच्या चरित्राची मीमांसा करताना या सिद्धान्ताचे सुरेख विवेचन केले आहे.)

त्यामुळे ज्या जळत्या नंदादीपापासून लोकांनी आपल्या ठायीच्या ज्योती प्रदीप्त करावयाच्या तोच विझला असे होऊन सर्वत्र अंधार पडतो, आणि लोक खालच्या पातळीवर घसरतात. भारतामध्ये टिळक, महात्माजी यांनी पेटविलेला वन्ही स्वातंत्र्यप्राप्तीबरोबर विझून गेला. नियमाप्रमाणे सत्तारूढ नेते सनातनी झाले आणि जनतेचे रक्त थंड झाले.

पण आपण लोकशाही प्रस्थापित केलेली आहे. मानवतेचे हक्क प्रत्येकाला मिळाले पाहिजेत असा आपला आग्रह आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचे श्रेष्ठ सुख प्रत्येकाला प्राप्त करून देऊ अशी आपली प्रतिज्ञा आहे. तिची पूर्ती आपणास करायची तर रक्त थंड असतानाच त्याग करण्याची शिकवण आपण स्वतःला दिली पाहिजे. शांततेच्या काळची ध्येये नाट्यमय, तेजाने झगझगणारी, विद्युल्लतेप्रमाणे लखलखणारी अशी नसतात हे खरे आहे. पण केवळ संग्रामातील विजयांनी मानवी जीवनाची परिपूर्ती होत नसते हे जाणण्याची रसिकता आपल्या ठायी आपण निर्मिली पाहिजे. सर्वांना अन्नवस्त्र मिळाले तरच 'मानवता' या शब्दाला अर्थ आहे. सर्वांना शिक्षण मिळाले तरच मनोविकास, मतस्वातंत्र्य, व्यक्तित्व या कल्पना साकार होतात. हे जाणण्याइतकी बुद्धीची प्रगल्भता आपल्या समाजात आली पाहिजे आणि मुख्य म्हणजे बुद्धीने, विवेकाने दिलेली प्रेरणा आपल्याला त्यागाला प्रवृत्त करण्यास समर्थ होईल अशी आपली मनोवृत्ती झाली पाहिजे. जीवांच्या संहारापेक्षा जीवांचा प्रतिपाल हे ध्येय जास्त रम्य, जास्त विलोभनीय वाटण्याइतकी श्रेष्ठ अभिरुची आपण जोपासिली तरच आपली लोकशाही यशस्वी होईल. नाहीतर लवकरच या भूमीत जुगारीच्या अड्ड्यांचे प्रमुख, चोरट्या दारूच्या व्यापाराचे बादशहा, सट्टेबाजीत पारंगत झालेले थैलीशहा, मोठी संघटना करून बँका, पेढ्या भर दिवसा लुटणारे प्रतिष्ठित पेंढारी, यांचे साम्राज्य प्रस्थापित होईल.

येवढ्या मोठ्या पाशवी शक्तीशी संग्राम करण्याइतके समर्थ चारित्र्य निर्माण करणे ही गोष्ट दुष्कर तर खरीच. पण एका दृष्टीने ती सुकर आहे. धनधान्य, भांडवल परदेशातून आणता येते हे खरे, पण ते काही झाले तरी परावलंबनच होय. चारित्र्याचे धन हे स्वायत्त आहे, मदायत्त आहे. कोणच्याही परिस्थितीत अंतरात्म्याला आवाहन करून हे धन प्राप्त करून घेता येते. हे मानवाला मिळालेले सर्वात मोठे वरप्रदान होय. मानवाचे मानवत्वच मुळी

यात आहे. मनोनिग्रह, संयम हा स्वत:चा स्वत:ला शिकवता येतो. ध्येयवाद अंगीकारणे ही स्वाधीन कला आहे. ही स्वाधीन धनदौलत आहे. आणि हे धन प्रत्यक्ष भांडवलापेक्षा श्रेष्ठ आहे. चारित्र्य या धनातून आर्थिक भांडवल सहज निर्माण होते. पण ते जर नसेल तर आर्थिक भांडवल कितीही असले तरी ते नष्ट होते. वेदव्यास म्हणतात,

**अर्थानामीश्वरो यः स्यादिंद्रियाणामनीश्वरः।**
**इंद्रियाणामनैश्वर्याद् ऐश्वर्याद् भ्रश्यते हि सः ।।**

'जो मनुष्य धनाचा स्वामी असून इंद्रियांचा दास असतो तो त्या इंद्रियांच्या दाबामुळे धनैश्वर्यापासून भ्रष्ट होतो.' (महाभारत ५. ३४. ६३)

भारताच्या तरुण पिढीने या व्यासवचनाचे चांगले अध्ययन केले तर स्वाधीन असलेले इंद्रियांचे स्वामित्व – म्हणजेच त्याग, ध्येयवाद किंवा चारित्र्य त्यांना प्राप्त होईल आणि मग धनाचे, समृद्धीचे स्वामित्वहि सुलभ होऊन या भूमीवर येऊ घातलेले भयंकर संकट आपल्याला सहज टाळता येईल. व्यक्तित्व, स्वातंत्र्य, यांची अभिरुची आमच्या विद्यार्थ्यांच्या अंगी कितपत आहे यावर हे सर्व अवलंबून आहे. ही अभिरुची असली तर आपल्या अध:पाताची सर्व जबाबदारी परिस्थितीवर टाकून ते मोकळे होणार नाहीत आणि 'स्वाधीन' होण्याचा मार्ग स्वीकारतील असे वाटते.

# ८. अमेरिका : जगाच्या स्वातंत्र्याची ढाल

'अमेरिका हे जगाचे आशास्थान आहे' असे आत्मविश्वासाचे उद्‌गार अमेरिकेचे अध्यक्ष थॉमस जेफरसन (१८००–१८०८) यांनी आपल्या पहिल्या अध्यक्षीय भाषणात काढले होते. आज त्यांचे वचन अक्षरश: खरे ठरले आहे. अमेरिकेच्या अभावी व्यक्तिस्वातंत्र्य, समता, लोकसत्ता यांचा जगातून बहुधा लोपच झाला असता, आणि आजच्या जगाचे चित्र आतापेक्षा फारच निराळे दिसले असते. दंडसत्तेच्या काळ्या घनदाट छायेतच जग आपल्याला आज पाहावे लागले असते. पण लोकसत्ता ही इतर सर्व सत्तांहून जास्त बलाढ्य व समर्थ असते हे अमेरिकेने सिद्ध करून दाखवून जगावरची ती महान् आपत्ती निस्तरून टाकली आहे. अमेरिकेच्या या यशाचे रहस्य काय त्याचा येथे विचार करावयाचा आहे.

औद्योगिक क्रांतीनंतर जी भांडवलशाही जन्माला आली तिची अमेरिकेत अत्यंत वेगाने वाढ झाली. अल्पावधीतच तिने फार प्रचंड रूप धारण केले आणि देशातल्या नागरिकांच्या जीवनावर आपली सत्ता प्रस्थापित केली. व्यक्ति-स्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, प्रजासत्ताक हे शब्द तिने शून्यवत् करून टाकले. पैशाच्या जोरावर भांडवलशहा मते विकत घेत, वृत्तपत्रे विकत घेत आणि सीनेट हाऊस ही विधिमंडळेहि विकत घेऊन या योगे हाती येणाऱ्या निरंकुश सत्तेच्या जोरावर जनतेचा रक्तशोष करीत. लवकरच भांडवलशाहीइतकी क्रूर, स्वार्थी, सैतानी, सत्ता जगात दुसरी नाही हे अमेरिकन लोकांना दिसून आले. स्वातंत्र्याच्या लढ्यात ज्यांनी आपले रक्त सांडले होते त्यांच्या लवकरच ध्यानात आले की आपण राजकीय दास्यातून मुक्त झालो असलो तरी आर्थिक दास्याच्या शृंखला आपल्या पायांवर अधिकच करकचून आवळून बसल्या

आहेत. स्वातंत्र्ययुद्धाचे हे विपरीत पर्यवसान पाहून अमेरिकन नागरिक अगदी हतबुद्ध होऊन गेले. कारण हे नवे दास्य फार भयानक होते. ज्या जनतेच्या साह्याने भांडवलाशी लढावयाचे त्या जनतेलाच भांडवलशहा वश करीत. ज्या वृत्तपत्रातून लोकजागृती करावयाची ती वृत्तपत्रेच त्यांची गुलाम होत. लोकसभा, न्यायपीठे, यांची हीच अवस्था होऊन गेली. राजा उन्मत्त झाला तर त्याला पदच्युत करता येते, फाशी देता येते पण येथे कोणाला फाशी द्यावयाचे? जनतेला? म्हणजे स्वतःलाच?

लोकसत्तेपुढे हा अत्यंत विचित्र पेच येऊन पडला होता. लोकांची मते, लोकसभा, वृत्तपत्रे, न्यायपीठे ही खरी लोकशाहीची शस्त्रास्त्रे. पण हीच शत्रूने काबीज केल्यावर त्याच्याशी कोणच्या शस्त्राने लढावयाचे? लढा करता आला नाही तर लोकसत्ता ही कल्पनाच जगातून नष्ट होईल! हा विचित्र पेच सोडवावयाचा कसा? भांडवली शक्तीशी कोणत्या शक्तीच्या साह्याने मुकाबला करावयाचा?

'चारित्र्य' ही ती शक्ती होय हे या प्रश्नाला अमेरिकेने दिलेले उत्तर आहे. धनमोहातीत, नीतिभ्रष्ट, चारित्र्यसंपन्न अशी एक व्यक्ती निर्भयपणे धनसत्तेशी सामना करण्यास उभी राहताच जनतेच्या विवेकबुद्धीवरचे मालिन्य नष्ट होते, ती जागृत होते आणि तिच्या ठायी जी महाशक्ती निर्माण होते ती कोणच्याही सत्तेला सहज नमवू शकते, हा सिद्धान्त अमेरिकेच्या गेल्या दीडशे वर्षांच्या इतिहासातील पानापानावर लिहिलेला आहे.

थॉमस जेफरसन यांनीच या लढ्याला प्रारंभ केला. ते निवडणुकीस उभे राहिले त्या वेळी धनशहांनी वृत्तपत्रांचे सर्व सामर्थ्य त्यांच्याविरुद्ध उभे केले होते. पण या चारित्र्यसंपन्न पुरुषाचा पराभव करण्यास ते असमर्थ ठरले. आणि हेच पुढे थिओडोर रूझवेल्ट (१९००–१९०८), विड्रो विलसन (१९१२–२०) व फ्रँकलिन रूझवेल्ट (१९३२–४६) यांच्या वेळी दिसून आले. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भांडवलशहा अत्यंत उन्मत्त झाले होते. निरनिराळ्या कारखान्यांनी व कंपन्यांनी आपले संघ करून मुक्तस्पर्धा हे भांडवली अर्थव्यवस्थेतील मुख्य तत्त्वच नष्ट करून टाकले आणि मग वाटेल ती भाववाढ करून जनतेच्या रक्ताचे जळवांसारखे शोषण चालविले. क्लीव्हलँड, मक्‌किन्‌ले हे अध्यक्ष अगदी दुबळे होते. त्यांना राजकीय दादांनी

आपल्या हातातील बाहुली बनविली. 'चाइल्ड लेबर ॲक्ट', 'शेरमन ॲक्ट' असे अनेक जनहिताचे कायदे अमेरिकन काँग्रेसने केले होते. पण ते दप्तरातच पडून राहिले. त्यांचा अंमल करण्याचे सामर्थ्यच सरकारला नव्हते. पोलीस, न्यायालय अशा ठिकाणच्या सरकारी अधिकाराच्या जागेवर दादा लोक परस्पर नेमणुका करीत व मागून अध्यक्षांना कळवीत, आणि ते नेभळे पुरुष त्याला मान्यता देत. त्यामुळे या काळात अमेरिकेत दादांनी नुसता नंगा नाच घातला होता. 'जनतेला आम्ही पायपोसाने मोजतो' असे ते जाहीरपणे बोलत असत. 'लोकसत्ता', 'अमेरिकेची घटना' यांसारख्या किरकोळ गोष्टींकडे लक्ष देण्यास त्यांना फुरसत नसे. त्यामुळे अमेरिकेतील शासन हे वॉलस्ट्रीटचे, वॉलस्ट्रीटसाठी व वॉलस्ट्रीटकृत असे होऊन गेले. पण थिओडोर रूझवेल्ट यांनी अध्यक्षपदी येताच वॉलस्ट्रीटला धडा देण्याचे ठरविले व जनहिताच्या कायद्यांचा भराभर अंमल करण्यास सुरुवात केली. निर्भय, स्वार्थातीत व चारित्र्यसंपन्न शास्ता दिसताच जनता त्याच्या पाठीशी उभी राहिली आणि मग थोडक्याच अवधीत रूझवेल्ट यांनी दादांची हाडे मोडली. जेव्हा जेव्हा दादा उन्मत्त होत तेव्हा तेव्हा ते जनतेला हाक देत. आणि त्या शक्तीचे उग्र रूप पाहताच दादा विनम्र होत. विड्रो विल्सन यांनी हेच धर्मयुद्ध पुढे चालवून भांडवलशहांना नामोहरम केले आणि फ्रँकलिन रूझवेल्ट यांनी आपल्या १४ वर्षांच्या कारकीर्दीत एकारलेल्या संपत्तीचा निचरा करण्याचे अनेक कायदे करून त्या उन्मत्त शक्तीला निर्जीव करून टाकले.

जेफरसन, थिओडोर रूझवेल्ट, विल्सन व फ्रँकलिन रूझवेल्ट यांनी धनसत्तेशी केलेल्या संग्रामाला वर धर्मयुद्ध म्हटले आहे. हा शब्द (क्रुसेड) अमेरिकन इतिहासकारांनीच वापरला आहे. जेरुसलेम या क्षेत्रासाठी झालेल्या युद्धांना धर्मयुद्धे म्हणतात. पण लोकशाहीच्या रक्षणार्थ केलेल्या या संग्रामाच्या बाबतीत तो शब्द तितकाच, नव्हे, अधिकच सार्थ आहे. कारण लोकशाही हा सर्वश्रेष्ठ धर्म असून त्याच्या रक्षणाला जेरुसलेमच्या रक्षणापेक्षा जास्त महत्त्व आहे. हे युद्ध जिंकून अमेरिकेच्या अध्यक्षांनी लोकशाहीला दिलासा दिलेला आहे. भांडवली सत्ता ही अजिंक्य ठरली असती, तिला नमविणारी दुसरी शक्ती जगात नाही असे ठरले असते तर लोकशाहीचा यापूर्वीच मृत्यू ओढवला असता. पण स्वार्थत्याग, ध्येयनिष्ठा निर्भय वृत्ती, मनोनिग्रह हे जे

चारित्र्य, हा जो धर्म त्याची शक्ती श्रेष्ठतर आहे हे अमेरिकेने धर्मयुद्धे करून सिद्ध केले, व लोकशाहीच्या संरक्षणासाठी एक ढालच जगाच्या हाती दिली.

भांडवलशहा आणि जनता यांचा हा जो दीर्घकाल संग्राम चालू होता त्यामुळे अमेरिकेत आणखी एक मोठे परिवर्तन घडून आले. अमेरिकन भांडवलदारांना सुबुद्धता प्राप्त झाली. जनता जागृत झाल्यामुळे त्यांच्या धनलोभाला तर आळा पडलाच पण कष्टकरी जनतेला, कामगारांना जास्त वेतन देऊन त्यांची क्रयशक्ती वाढली तर भांडवलाचा त्यात फायदाच आहे, हे हळूहळू त्यांच्या ध्यानात आले आणि त्यामुळे मार्क्सप्रणीत समाजवादाचा अवलंब न करता अमेरिकेला संपत्तीच्या विभजनाचा प्रश्न सोडविता आला. मार्क्सने कम्युनिझमचे तत्त्व सांगताना रक्तपाती क्रांतीवाचून, वर्गविग्रह चेतवून भांडवलदारवर्गाचा नायनाट केल्यावाचून, कामगारांची सत्ता प्रथापित झाल्यावाचून संपत्तीचे न्याय्य विभजन होणे शक्य नाही, असे सांगितले होते. पण अमेरिकन भांडवलदारांनी आपली विवेकदेवता जागृत ठेविल्यामुळे मार्क्सचा हा सिद्धान्त खोटा पडला. अमेरिकेत आर्थिक क्रांती झाली. पण ती शांततेच्या मार्गाने झाली. हेन्री फोर्ड हा त्या क्रांतीचा प्रणेता होय असे काही अर्थवेत्त्यांचे मत आहे. १९१४ साली त्याने कामगारांना २५ रु. रोज वेतन देण्यास प्रारंभ केला व ८ तासांचा कामाचा दिवस ठरविला. त्यामुळे कामगार हा गुलामगिरीतून मुक्त होऊन देशाचा एक सन्मान्य नागरिक झाला. २५ रु. रोज वेतन करण्याचा निश्चय फोर्डने स्वतःहून कसल्याही प्रकारचे बाह्य दडपण नसताना केला होता. त्यामुळे मानवाच्या सद्‌बुद्धीचा, विवेकशीलतेचा, समाजहिततत्परतेचा तो एक अपूर्व विजय होय असे इतिहासकार मानतात. कामगारांचे शारीराश्रम ही त्याआधी बाजारांतील क्रय-विक्रय करण्याची वस्तू होती. आणि कामगार हा आर्थिक यंत्रातील एक आरा होता. आता तो व्यक्तित्वसंपन्न, स्वतंत्र असा एक नागरिक झाला. जगाच्या इतिहासात ही फार मोठी क्रांती होय.

संपत्तीचे न्याय्य विभजन व्हावयाचे तर समाजवादाचाच अवलंब केला पाहिजे, असे एक मत २०।२५ वर्षांपूर्वी सर्वत्र रूढ होते. अजूनही बऱ्याच लोकांच्या मनात ते मूळ धरून आहे. मार्क्सने सांगितलेली रक्तपाती क्रांती

ज्यांना मान्य नव्हती त्यांनाहि समाजवादावाचून तरणोपाय नाही असेच वाटत होते. धनोत्पादनाच्या सर्व साधनांवर समाजाची म्हणजेच सरकारची मालकी असणे याचे नाव समाजवाद. धनिकवर्गाचा नाश करून ही मालकी प्रस्थापित करावी लागेल असे मार्क्सचे मत होते. इंग्लंडमधील समाजवादी लोकांना हा वर्गविग्रहाचा मार्ग मान्य नव्हता. हे लोकशाही मार्गानेच साधता येईल असे त्यांचे मत होते. आपल्या पंथाला ते लोकशाही समाजवाद म्हणत. पण धनसाधने सरकारने ताब्यात घेतली पाहिजेत हा आग्रह मात्र त्यांचा कायम होता. अमेरिकेने त्याची जरूर नाही असे दाखवून देऊन जगाला प्रत्यक्ष कृतीने संपत्तीच्या विभजनाचा मार्ग दाखविला. अमेरिकेत जी अर्थव्यवस्था सध्या आहे तिला भांडवलशाहीच म्हणतात पण पन्नास वर्षांपूर्वीची भांडवलशाही व ही नवी भांडवलशाही यांत जमीन-अस्मानाचे अंतर आहे. फायदा, नफा, धन हे एकच ध्येय त्या जुन्या भांडवलशाहीपुढे होते. त्यापायी सैतानाहूनही ती जास्त निर्दय व क्रूर झाली होती. कामगारांचा व एकंदर जनतेचा ती रक्तशोष करीत असे. आताच्या भांडवलशाहीचे फोर्डने म्हटल्याप्रमाणे समाजसेवा हे उद्दिष्ट आहे, पूर्वीच्या युगातले अॅडम-स्मिथचे, लेसे-फेअरचे, अनिर्बंध आर्थिक स्वातंत्र्याचे तत्त्व तिने कधीच धिक्कारून टाकले आहे. समाजाच्या एकंदर अर्थव्यवहारावर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे, त्यांत नियोजन असले पाहिजे हे तत्त्व तिने मान्य केले आहे. त्यामुळे दुसऱ्या बाजूला कामगारांनाही वर्गविग्रह, कामगारसत्ता या तत्त्वांचा अवलंब करावा लागला नाही. आणि अशा रीतीने कम्युनिझम तर नव्हेच, पण सोशॅलिझमसुद्धा न स्वीकारता, अमेरिकेने आर्थिक क्रांती घडवून आणली आहे. म्हणूनच 'भांडवलशाही' हे नावही आता टाकून द्यावे असा कित्येक लोकांचा आग्रह आहे. ते नाव ठेवावयाचेच असेल तर तिला 'जनतेची भांडवलशाही' म्हणावे असे काही लोकांचे मत आहे.

हेन्री फोर्डने प्रस्थापिलेली तत्त्वे आता अमेरिकेत सर्वमान्य झाली आहेत. १९४६ साली अमेरिकेत 'रोजगार कायदा' पास झाला. त्या अन्वये जनतेच्या योगक्षेमाची, अन्न, वस्त्र, घर व शिक्षण यांची जबाबदारी सरकारवर कायद्यानेच येऊन पडली आहे. ती पार पाडण्यासाठी सरकारला अर्थव्यवहारात

हस्तक्षेप करण्याचा, त्याचे नियंत्रण करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. मात्र स्पर्धाशील मुक्त उद्योगांना (फ्री एंटरप्राइझ) पूर्ण अवसर देऊनच सर्व साधले पाहिजे असा तेथे दंडक आहे. अर्थसाधने शासनाच्या ताब्यात देणारा जो समाजवाद त्याचा अमेरिकन जनतेला अत्यंत तिटकारा आहे. लोकशाही समाजवाद हा 'वदतोव्याघात' आहे असे तिचे मत आहे. कारण एक अर्थव्यवहार जर शासनाच्या ताब्यात गेला तर सर्व जीवनच त्याच्या ताब्यात जाते व जनता गुलाम होते. म्हणून मुक्त उद्योग, मुक्त विनिमय हा जो भांडवली पद्धतीचा आत्मा त्याला धक्का लागता कामा नये असा अमेरिकनांचा कटाक्ष आहे. आणि भांडवली व्यवस्था व समाजकल्याण यांचा समन्वय साधता येतो हे त्यांनी प्रत्यक्षात दाखवून दिल्यामुळे लोकसुखाच्या दृष्टीने जगाचे एक पाऊल पुढे पडले आहे यात शंकाच नाही.

जगाच्या इतिहासात अमेरिकेने तिसरीहि एक क्रांती घडविली आहे. १९४७ च्या मार्चमध्ये ब्रिटनचे एक शिष्टमंडळ अमेरिकेचे अध्यक्ष ट्रूमन यांच्याकडे गेले. युद्धात ब्रिटन विजयी झाले होते तरी त्याचा ताण तेथील अर्थव्यवस्थेला सहन न होऊन ती कोसळण्याच्या बेतात होती. ट्रूमन यांनी सीनेट व हाऊस-मधील नेत्यांना व आपल्या आर्थिक सल्लागारांना बोलावून एक बैठक घेतली व विचारविनिमय सुरू केला. त्याच वेळी इटली, फ्रान्स येथून ब्रिटनसारख्याच वार्ता येऊ लागल्या. त्यामुळे एकंदर युरोपच दारिद्र्य, उपासमार, निराशा, व अराजक यांच्या भेसूर मगरमिठीत सापडणार अशी चिन्हे स्पष्ट दिसू लागली. अशा वेळी मागल्या साम्राज्यशाहीच्या युगात काय झाले असते? शेजारचा देश दरिद्री झाला आहे, हतबल झाला आहे, अगतिक झाला आहे हे ऐकताच श्रीमंत, बलाढ्य देश त्याच्यावर झडप घालून त्याला गुलाम करून टाकीत व त्याचा रक्तशोष करीत. कायद्याचे राज्य जगात प्रस्थापित झाले होते. पण ते देशाच्या सरहद्दींच्या आत. दोन देशांच्या संबंधात जंगली दरोडेखोरी-चाच न्याय जारी होता. स्वारी, लूटमार, साम्राज्य, रक्तशोष हेच निर्बलांचे भवितव्य होते. पण आता अमेरिकेने हे साम्राज्यशाहीचे युग संपुष्टात आणले आणि हतबल, दरिद्री झालेल्या देशांना सर्व प्रकारचे साह्य देऊन त्यांना फिरून सबल व संपन्न करण्याचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून त्यासाठी योजना आखली. सुप्रसिद्ध 'मार्शल योजना' ती हीच. अध्यक्ष ट्रूमन यांच्या मागणीप्रमाणे

अमेरिकन लोकसभेने युरोपच्या साह्यासाठी ८००० कोटी रुपये मंजूर केले आणि हे सर्व साह्य विनशर्त करण्याची घोषणा करून एका नव्या मन्वंतराला प्रारंभ केला.

अमेरिकेच्या या योजनेची युरोपने फार प्रशंसा केली. अमेरिकेला मनापासून धन्यवाद दिले. 'या औदार्याला तोड नाही' असे चर्चिलसाहेबांनी उद्‌गार काढले. पण अमेरिकन जनतेने व नेत्यांनी अत्यंत नम्रपणे सांगितले की, यात औदार्य असे काहीच नाही. आम्ही हे आमच्या स्वार्थाच्या दृष्टीनेच करीत आहो. व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही यांचे रक्षण हे आमचे उद्दिष्ट आहे. युरोप असाच दैन्यावस्थेत राहिला तर तो कम्युनिस्टांच्या भक्ष्यस्थानी पडेल आणि मग युरोपातून ही मूल्ये हद्दपार होतील. आणि आज युरोपवर जो प्रसंग तोच उद्या आमच्यावर! हे ध्यानी घेऊन आत्मसंरक्षणाच्या हेतूनेच आम्ही ही योजना आखली आहे.

जगातल्या उदयोन्मुख देशांनी अमेरिकेच्या इतिहासाचा अभ्यास करणे किती अवश्य आहे ते यावरून कळून येईल. स्वातंत्र्यापूर्वी भारतात शालेय अभ्यासक्रमात ब्रिटनचा इतिहास अवश्य म्हणून विषय होता. व्यक्तिस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, राजसत्तेशी संघर्ष, राष्ट्रनिष्ठा, विज्ञाननिष्ठा इहवाद या तत्त्वांचे संस्कार या इतिहासाच्या अध्ययनाने मुलांच्या मनावर लहानपणीच होत असत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात दुर्दैवाने ब्रिटनचा इतिहास अभ्यासक्रमातून काढून टाकण्यात आला आहे. माझ्या मते हा फार मोठा प्रमाद होय. भारताला आपली लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर ब्रिटनच्या इतिहासाला शालेय अभ्यासात पूर्वीचे स्थान देणे अवश्य आहे. आणि त्याबरोबरच महाविद्यालयात अमेरिकेचा इतिहास अभ्यासक्रमात समाविष्ट करणे हेही अवश्य आहे. कारण आज जगापुढे ज्या बिकट समस्या आहेत त्यांतील काहींची उत्तरे अमेरिकेला सापडली आहेत. भांडवली सत्तेशी झगडा कसा करावा, संपत्तीचे न्याय्य विभजन दंडसत्तेच्या अवलंबावाचून कसे करावे आणि राष्ट्राराष्ट्रातील संबंध स्नेहाचे, बंधुभावाचे कसे घडवावे याच आजच्या जगाच्या समस्या आहेत. अमेरिकेने त्या कशा सोडविल्या आहेत ते वर सांगितलेच आहे. भारताने अमेरिकेच्या इतिहासाचा अभ्यास केला तर आपल्या जनतेलाही या समस्या सोडविण्याचा मार्ग सापडेल व

अमेरिकेच्या आदर्शामुळे स्फूर्ती व शक्तीही प्राप्त होईल. म्हणून शाळांनी व विद्यापीठांनी विद्यार्थ्यांच्याकडून हा अभ्यास करविण्याच्या योजना आखाव्या आणि स्वातंत्र्यप्रेम, निर्भयवृत्ती, राष्ट्रनिष्ठा, वास्तवाची अभिरुची इ. गुणांचे त्यांच्या मनात बीजारोपण करून जुन्या पिढीच्या मनाचे पोषण वाघिणीच्या दुधावर जसे झाले तसेच याही पिढीचे करण्याचे श्रेय घ्यावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0013088

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

आमची नवी प्रकाशने

**वामनपंडितांची यथार्थदीपिका**
( टीकात्मक अभ्यास )
वि. रा. करन्दीकर

**झेप ( कादंबरी )**
ना. सं. इनामदार

**मजल ( कथा )**
वामन चोरघडे